म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सन

लेखक गोविंद गोपाळ

…गोरे

पुस्तकाचें नांव …

चरित्र

ताहाल… क्रमांक

२४७ ज

१.२४९

270
M22

Ramchandra Abaji

Raje

२०९

Baroda

डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें पसंत करून
दक्षिणाप्राइज फंडांतून २०० रुपये बक्षिस दिलेलें

# बेंजामिन फ्रँक्लिन

## याचें चरित्र.

—:o:—

हें पुस्तक

एका इंग्रजी ग्रंथाधारें

**गोविंद गोपाळ टिपणीस**

यांनीं

तयार केलें.

—o—

तें

पुणें येथें "श्रीविठ्ठल" छा. छा.

---

सन १८९६ इ.

---

किंमत सव्वा रुपया.

From life without freedom
Oh! who would not fly,
For one day of freedom
Oh! who would not die.

TENNYSON.

आर्या भाषांतर.

॥ परतंत्रजीवितानल टाळाया पळ न कोण काढीतो ॥
॥ स्वातंत्र्य एक दिनही मिळवाया कोण मृत्युला भीतो ॥

नं........
मा........

# प्रस्तावना.

———:o:———

ज्या सत्पुरुषांनीं आपल्या देशजननीच्या पायांतील पारतंत्र्याची दुर्भेद्य बिडी अनेक हाल अपेष्टा व अपमान सोसून आपल्या दृढनिश्चयाच्या आणि अविश्रांत श्रमांच्या प्रखर शस्त्रानें तोडून टाकली किंवा अशाच एकाद्या कृतीनें आपला देश उन्नतावस्थेस आणून पोहोंचविला त्यांचीं चरित्रें, सांप्रत आमच्यापैकीं लिहितां वाचतां येणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या, विशेषत: होतकरू मुलांच्या हातीं पडणें अत्यंत अवश्य आहे; आणि ह्मणूनच अमेरीकेंतील संयुक्त संवस्थानांच्या स्वातंत्र्यास व एकंदर उन्नतीस कारण झालेल्या मंडळीपैकीं **डा. फ्रँक्लिन** यांचें हें चरित्र त्याच्या देशबांधवांपैकीं **जॉन** एस. सी. **ॲबट** यांनीं केलेल्या इंग्रजी चरित्राच्या आधारानें मीं मराठीमध्यें लिहिलें आहे. हें पुस्तक सदरहू इंग्रजी पुस्तकाचें निवळ भाषांतर नसून त्याच्या आधारानें तें लिहिलें आहे असें ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं मूळ पुस्तकांतील धर्मविषयक गोष्टी व वाद आणि त्यांत वेळोवेळीं दृष्टीस पडणारा, कमी महत्वाचा परंतु पाल्हाळानें लिहिलेला बराच मजकूर मीं यांत अगदीं गाळून टाकिला आहे.

तसेंच हें पुस्तक लिहिते वेळीं त्यांतील भाषेकडे विशेष लक्ष दिल्यामुळें मूळ पुस्तकाचें जरी शब्दश: भाषांतर केलें नाहीं तरी जेणेंकरून त्याच्या सौंदर्याला व वृत्तांताला कमीपणा येणार नाहीं अशा तऱ्हेचा प्रयत्न केला आहे. आणि कित्येक ठिकाणीं प्रसंगाला अनुसरून सध्यांच्या समाज स्थितीवर मीं आपले स्वत:चे विचारही नमूद केले आहेत.

मूळ ग्रंथ वाचणाऱ्यांचा बहुधा इंग्लंडच्या इतिहासाचा अभ्यास होत असल्यामुळें त्यांस त्यांत येणाऱ्या स्थलांचा व व्यक्तींचा बराच परिचय झालेला असतो. परंतु केवळ मराठीचा अभ्यास झालेल्या आमच्या बऱ्याच वाचकांस त्यांचा बोध व्हावा ह्मणून सदर पुस्तकांत येणाऱ्या बहुतेक स्थलांच्या आणि व्यक्तींच्या नांवांवर आणि दुसऱ्या अपरिचित शब्दांवर टिपा देऊन त्यांमध्यें त्यांचा विशेष खुलासा केला आहे.

हें पुस्तक मी सन १८९० सालीं लिहिलें पण तें प्रकाशित करण्यास ज्या गोष्टींची अवश्यकता होती त्यांचा अभाव असल्यामुळें आज पांच वर्षेपर्यंत तें तसेंच पडून राहिलें होतें. पुढें मी तें आमच्या भाषेच्या उद्धारासाठीं अवतीर्ण झालेल्या **डे. व्ह. ट्रा. सोसायटी**कडे पाठविलें, तिनें तें पसंत केलें आणि ह्मणूनच तें प्रसिद्ध करण्याचा सुप्रसंग आला याबद्दल सदर मंडळीचा मी फार आभारी आहें

अशा उपयुक्त संस्थेस जर आमच्यांतील पैसेवाली मंडळी द्रव्य द्वारा मदत करतील तर त्यांचे आपल्या देशभाषेवर मोठे उपकार होऊन उत्तम ग्रंथकारांस चांगलें उत्तेजन मिळेल.

हें पुस्तक तपासण्याच्या व त्याबद्दल कांहीं महत्वाच्या सूचना करण्याच्या कामीं रा. रा. रामकृष्ण नीलकंठ बडे, बी., ए., **डे. व्ह. ट्रा. सोसायटी**चे सन्मान्य चिटणीस रा. ब. विष्णु बाळकृष्ण सोहनी, व माझे परम पूज्य मित्र रा. रा. हरि नारायण आपटे या त्रिवर्गांनीं आपला अमोलिक वेळ खर्च करून मला जें साहाय्य केलें त्याबद्दल मीं त्यांचा फार आभारी आहें.

**पुस्तक कर्ता.**

---

परमपूज्य गुरुवर्य.

# कै. प्रि. गोपाळ गणेश आगरकर,

## एम्. ए.

यांस

त्यांचा शुद्ध स्वदेशाभिमान, अप्रतिम आत्मत्याग
आणि त्यांची स्वभाषेची आस्था वगैरे अनेक
गुणांवर लुब्ध होऊन हें पुस्तक
अर्पण केलें आहे.

त्यांचा आज्ञाधारक

शिष्य,

पुस्तककर्ता.

# अनुक्रमणिका.

पृ. सं.


भाग १ ला.—मातापितरें व बाळपण .... .... १

भाग २ रा.—स्वभावविकास .... .... .... २१

भाग ३ रा.—इंग्लंडचा प्रवास .... .... .... ३८

भाग ४ था.—मनाचा व नीतीचा झगडा .... ५९

भाग ५ वा.—भाग्योदयाचे दिवस .... .... ७४

भाग ६ वा.—धार्मिक आणि तात्त्विक विषयांचा विचार .... .... .... ९७

भाग ७ वा.—व्यापारी तत्वज्ञानी झाला .... ११२

भाग ८ वा.—लढाईचीं वादळें .... .... .... १२७

भाग ९ वा.—फ्रँक्लिन इंग्लंडला जातो .. .... १४१

भाग १० वा.—फ्रँक्लिन पुनः इंग्लंडला जातो.... १५९

भाग ११ वा.—इंग्रजांची कमाल .... .... .... १८३

भाग १२ वा.—गोष्ट परिणामाला आली .. .... १९९

भाग १३ वा.—लढाई व वकिली.... .... .... २१७

भाग १४ वा.—अमेरिका स्वतंत्र झाली.... .... २३४

भाग १५ वा.—शेवट.... .... .... .... .... २५४

भाग १६ वा.—उपसंहार .... .... .... .... २६३

पु. ३०८

# बेंजामिन फ्रँक्लिन याचें चरित्र.

नं. ५१८

## भाग १ ला.

### मातापिता व बाळपण.

फ्रँक्लिनचे पूर्वज.—त्याचे आईबाप अमेरिकेला जातात.—त्याच्या बापाचा स्वभाव.—त्याची आई अबियाफोल्जर.—त्याचा जन्म आणि धर्मसंस्कार.—त्याचा चुलता —चिमणीची गोष्ट.—त्याचे बाळपणचे पराक्रम.—नावडतें काम.—पोहण्याचें कौशल्य.—पहिलें वाचन.—त्यावेळचें बोस्टन शहर—करारानें राहिलेला अंतेवासी.—त्यानें लिहून दिलेल्या संकेतपत्राचा नमुना.—छापखान्यांत प्रवेश.—वाचनाभिरुचि—कांहीं घडलेल्या गोष्टी.—अभ्यासक्रम.—वादविवादाची आवड.—शाकान्नधारण.—त्याचीं नीतितत्वें.—

इसवी सन १६८५ चे सुमारास "ज्योसिआ फ्रँक्लिन" आपल्या प्रियपत्नीस आणि तिचांमुलांस बरोबर घेऊन, कांहीं धंदा करून चार पैसे मिळवावे, ह्या उद्देशानें इंग्लंडाहून अमेरिकेस जाण्याकरितां निघाला. एकंदरींत पाहतां फ्रँक्लिन हा फार योग्य मनुष्य असून

मोठा बुद्धिवान्, उद्योगी, नीतिवंत आणि धार्मिक असल्यामुळें त्याजबरोबर अमेरिकेस जाण्यास त्याचे पुष्कळ मित्र व शेजारीपाजारीही तयार झाले यांत कांहीं विशेष नाहीं.

ह्यावेळीं "**बोस्टन**" हा, जरी सुमारे पांच सहा हजार वस्तीचा गांव होता, तरी तेथील लोक नेहमीं एके ठिकाणीं न राहतां आपले इकडील वडारी, भोरपि, विसाडी वगैरे लोकांप्रमाणें गांवोगांव भटकत असत. "**बोस्टन**" गांवासमोर 'बोस्टनचें' आखात त्यांतील सुंदर बेटांसह फारच रमणीय दिसे व त्याचे पिछाडीस '**पॅसिफिक**' महासागरापर्यंत एक मोठें विस्तीर्ण व दुर्गम अरण्य पसरलेलें असे. **फ्रँक्लिन** हा रंगाऱ्याचा धंदा करी; परंतु या कामांत आपणास बरोबर गिऱ्हाइकी मिळत नाहीं असें पाहून त्यानें मेणबत्त्या व साबण करण्याचा कारखाना सुरू केला. अशा रीतीनें संसारांत नेहमीं येणाऱ्या सुखदुःखाच्या अनुभवांत चार वर्षें लोटलीं नाहींत तोंच **फ्रँक्लिन** याची बायको मरण पावली त्यावेळीं त्यास एकंदर सहा मुलें असून सर्वांत मोठा मुलगा अवघा अकराच वर्षांचा होता, आतां ह्या लहानशा कुटुंबांत आपल्या मुलांचें संगोपन एकाद्या स्त्रीवांचून होणें कठीण असें जाणून फ्रँक्लिन यानें "अबियाफोल्जर" नांवाच्या "पिटर फोल्जरच्या" सर्वांत लहान मुलीशीं

---

१ बोस्टन हें म्यासाच्युएट्स प्रांताच्या राजधानीचें शहर असून सध्यां याची लोकसंख्या सुमारें पांच लक्ष आहे. येथें कांच वगैरे जिन्नस तयार होत असून व्यापारही मोठा चालतो.

आपलें लग्न लाविलें. पिटरफोल्जरहा "**नॉन्टकेट**" येथील राहणारा असून आपल्या अंगच्या गुणांविषयीं फारच प्रसिद्ध होता. "हा बेंजामिन फ्रँक्लिनचा मातामह होण्यास योग्य होता." असें त्याविषयीं कोणी यथा-योग्य रीतीनें म्हटलें आहे. '**अबिया**' ही पुढें योग्य बाई निपजून तिजपासून तिच्या पतीस व मुलांबाळांस मोठें सुख मिळालें. **फ्रँक्लिन** याला ह्या द्वितीयसंबंधापासून आणखी दहा मुलें झालीं; यांपैकीं '**बेंजामिन**' हा इसवी सन १७०६ च्या जान्यूआरी महिन्यांत एके रविवारीं सकाळीं जन्मला.

ज्या बालकाच्या कीर्तीनें थोड्याच दिवसांत सर्व जग भरून जाईल अशी कोणास कल्पनाही झाली नाहीं, त्या तान्हुल्यास त्याच्या जन्मदिवशींच **फ्रँक्लिन** यानें एका घोंगडींत गुंडाळून थंड हवा पडली असतां रस्त्यामधून '**ओल्डसाउथ** नामक देवालयामध्यें नेलें व धर्माध्यक्ष. डाक्टर '**बुइलर्ड**' यांजकडून त्यास बाप्तिस्मा देवविला

---

१ बोस्टनच्या दक्षिणेस अट्लांटिक महासागरांत एक बेट आहे.

२ रविवार हा दिवस ख्रिस्ती लोकांत फार पवित्र मानिला असून त्यादिवशीं ईश्वरोपासना व पारमार्थिक कृत्यें मात्र करितात. अत्यंत अवश्य नाहीं असें कोणतेंही ऐहिक कृत्य त्यादिवशीं कर-ण्याची त्यांच्या शास्त्रांत मनाई आहे.

३ **बाप्तिस्मा** ख्रिस्ती मुलांच्या किंवा ख्रिस्ती धर्म स्वी-कारणाऱ्या मनुष्याच्या डोक्यावर पाणी घालून "आजन्म धर्म-निष्ठेनें वागण्याविषयीं ईश्वर तुला बुद्धि देवो" असें म्हणून ईश्वराची प्रार्थना करितात या विधीला बाप्तिस्मा ह्मणतात. ख्रिस्ती धर्माचे कांहीं पंथ या विधिविरुद्ध आहेत.

**फ्रँक्लिन** याचा ' **बेंजामिन**, नांवाचा एक लोकप्रिय भाऊ त्यावेळीं इंग्लंड देशामध्यें राहत असे. त्याचेंच नांव त्याच्या ह्या पुतण्यास ठेविलें; त्यावेळच्या उत्तम मनुष्यास लागणारे सर्व गुण **बेंजामिन**च्या आंगांत पूर्णपणें वास करीत होते; तो मोठा ईश्वरभक्त असून एकप्रकारच्या पुस्तकांचा व्यासंग त्याला मनापासून आवडत असे; व त्याजपाशीं मालमत्ताही बरीच होती. त्याची आपल्या पुतण्याविषयींची ममता दिवसेंदिवस इतकी वाढत गेली कीं शेवटीं तो अमेरिकेंत आला व आपल्या तीक्ष्ण बुद्धीच्या पुतण्यास सुशिक्षित करण्याचे कामीं त्यानें फार मेहनत घेतली.

**बेंजामिन** जन्मल्यानंतर लवकरच त्याच्या बापानें आपलें बिऱ्हाड बदललें. ही जागा दिसण्यांत जरी फारशी चांगली नव्हती तरी सोईची होती, ह्मणून त्यानें आपलें सर्व आयुष्य तेथेंच घालविलें. ' **बेंजामिन** ' यास पांच वर्षें पुरीं होऊन हिंवाळ्यास नुक्ताच प्रारंभ झाला होता, तोंच ' **बोस्टन** ' गांवांत एक मोठी भयंकर आग लागून त्या उत्तरोत्तर भरभराटीस येत चाललेल्या टुमदार शहराचा मध्यवस्तीचा बहुतेक भाग जळून खाक झाला. आणि शंभरांवर कुटुंबें अन्न अन्न करीत रस्तोरस्तीं भटकूं लागलीं. ' **बेंजामिन फ्रँक्लिन** ' सुमारें सात वर्षांचा झाला त्यावेळीं त्याच्या मनावर अविनाशी ठसा उमटविणारी अशी एक अति महत्वाची गोष्ट घडून आली. तिजबद्दलची हकीकत त्यानें आपल्या आत्मलिखित

चरित्रांत—हल्लीं आमच्या पैकीं सुशिक्षित लोक जर आपलीं अशीं चरित्रें लिहून ठेवितील तर त्यांचे आपल्या देश बंधूंवर मोठे उपकार होणार आहेत—खालीं लिहिल्या-प्रमाणें दिली आहे.

"सणाचे एक दिवशीं माझ्या इष्ट बांधवानीं खाऊ करितां ह्मणून मला पुष्कळ पैसे दिले; ते खिशामध्यें घालून मोठ्या आनंदानें खिसा हालवीत हालवीत मी एका मुलां-चे खेळ विकणाराचे दुकानीं धांवत चाललों असतां. वाटेनें एक मुलगा आपली चिमणी मोठ्यानें वाजवीत चाललेला पाहून तसली विकत घेण्याविषयीं मला फारच उत्कंठा झाली व कांहीं एक विचारपूस न करितां मी आपल्या खिशांतील सर्व पैसे देऊन एक चिमणी विकत घेतली. घरीं आल्यावर ती चिमणी मोठ्यानें वाजवीत मी सर्व घरभर आनंदानें नाचूं लागलों. परंतु माझ्या वाजविण्यानें घरांतील मंडळीस त्रास होतो हें माझ्या स्वप्नींही आलें नाहीं. माझीं भावंडें मी केलेला हा सवदा पाहून माझ्या भोंवतीं जमलीं; व मी योग्य किंमतीच्या चौपट पैसे देऊन अगदींच फसलों आणि त्या पैशांत दुसरे पुष्कळ मजेचे पदार्थ विकत घेतां आले असते ह्मणून मला सांगूं लागलीं; आणि माझ्या मूर्खपणाबद्दल त्यांनीं माझी हंसून अगदीं टेर उडवून टाकली, त्यामुळें मला रडूं कोसळलें व विचारांतीं चिमणीपासून होणाऱ्या आनंदापेक्षां मला दुःखच फार झालें"

इंग्लड आणि अमेरिका या दोन्हीं ठिकाणीं ही

गोष्ट आतां प्रत्येक कुटुंबास माहित झाली असून ज्याप्रमाणें आपण संध्याकाळच्या वेळीं मुलांस काऊचिउच्या गोष्टी सांगतों त्याप्रमाणें तिकडील मुलांस, ही गोष्ट सांगतात. कावळ्या चिमणीच्या अशक्य वाटणाऱ्या व कोणत्याही प्रकारचा मनावर उत्तम ठसा न उमटविणाऱ्या हजारों गोष्टी सांगण्यापेक्षां खऱ्या, अनुभवाच्या व ज्ञानप्राप्ति करून मनोरंजन करणाऱ्या अशा गोष्टी मुलांस सांगणें किती हितावह आहे बरें! ह्या गोष्टीचें भाषांतर युरोपांत चालू असलेल्या बहुतेक भाषांमध्यें झालें आहे.

लहानपणापासून '**फ्रँक्लिन**' याचें सौंदर्य, त्याची सहृदता आणि सुस्वभाव, हीं सर्व प्रसिद्ध होतीं. त्याचे सोबती त्याला आपणांमधील नायक समजत. आणि स्वाभिमानाचें तत्व तर अगदीं बाळपणापासूनच त्याच्या आंगीं खिळून गेलें होतें.

**बेंजामिन** व त्याचे सोबती जवळच एका खाजणांत भरतीच्या वेळीं मासे मारण्या करितां जात असत. तेथें जवळच एक मनुष्य घर बांधीत असून, त्यानें दगडाच्या पुष्कळ गाड्याच्या गाड्या भरून आणल्या होत्या मासे मारण्याकरितां, उभें राहण्याच्या सर्व जागेंत ह्या मंडळीनें पायांनीं तुडवून तुडवून अगदीं चिखल करून टाकला होता; ह्मणून **फ्रँक्लिन** ह्यानें, आपल्या सर्व सोबत्यांस बोलावून आणून, संध्याकाळच्या वेळीं सर्वांनीं मिळून ते दगड आणून त्याचा एक धक्का सर्वांस उभें राहण्या करितां बांधावा असें सुचविलें. ही सूचना लागलीच अमलांत

आली व फ्रँक्लिनच्या देखरेखीखालीं तें काम अगदीं शास्त्रीय रीतीनें झालें. दगडांच्या मालकानें ते नेणारांचा शोध लावून त्यांच्या पालकां कडे आपली तक्रार नेली. **ज्योसिआफ्रँक्लिन** यानें आपला मुलगा **बेंजामिन** याच्या ह्या गैर वर्तना बद्दल त्याची पुष्कळ खरडपट्टी काढली; परंतु त्या वयानें लहान पण बुद्धीनें प्रौढ बालकास आपल्या कृत्याबद्दल किंचित्‌ही वाईट वाटलें नाहीं. तो मोठ्या जोरानें ह्मणाला "बांधलेल्या धक्कयाचीं उपयुक्तताच त्याच्या अवश्यकतेची साक्ष देत आहे" आठवेवर्षी **बेंजामिन** यास त्याच्या बापानें **बोस्टन** येथील **लॅटिन** व **ग्रीक** भाषा शिकण्याचे शाळेंत घातलें. त्याची अभ्यासांत गति इतक्या जलदीनें झाली कीं, एका वर्षाचे आंतच त्यानें आपल्या वर्गांत पहिला नंबर पटकावला. त्याच्या बापाचा बेत आपल्या होतकरू मुलास, उच्चप्रतीचें शिक्षण द्यावें असा होता; परंतु कुटुंब फार मोठें, व मिळकत बेताची, असल्या मुळें तो जागच्याजागीच राहिला. दहावे वर्षी '**बेंजामिन**' याचा या शाळेंतील सर्व अभ्यास पुरा झाल्यामुळ तो आपल्या बापाच्या दुकानीं जासुदाचें काम करूं लागला, मेणबत्त्या करण्याच्या खुब्या त्याने लक्ष देउन पाहिल्या व वाती कापणें आणि सांचे भरणें हीं कामें करून दुकानची विक्रीही तो करूं लागला. त्याचें अक्षर फारच चांगलें असून तो अस्खलित रीतीनें वाची व आपले विचार स्पष्ट रीतीनें कागदावर लिही. गणितांत मात्र तो किंचित्‌ कच्चा होता.

तिकडील मुलांस पोहण्यासारखा आनंद देणारा दुसरा खेळच नाहीं ! वास्तविक पाहतां ह्या खेळाच्या योगानें व्यायामच्या व्यायाम होऊन प्रसंगीं जीव वांचविण्याचें एक मोठेंच साधन आपणास मिळतें. आपले इकडे पाहिलें असतां कोंकण व नद्यांच्या कांठच्या गांवांवांचून इतर ठि-काणच्या लोकांस क्वचितच पोहतां येतें; व त्यामुळें प्रसंगीं पाण्यांत पाऊल टाकणेंही त्यांस मोठें धोक्याचें वाटतें. खरें ह्मटलें तर पोहतां न येण्याचें कारण जलसंचय नसणें हें नसून आमचा आळस किंवा मुलांविषयीं वाजवीपेक्षां फाजील ममता दाखविण्याची पद्धत हेंच होय. असो, ह्या खेळांत फ्रँक्लिनानें आपल्या सर्व सोबत्यांवर ताण केली; असें सांगतात कीं, त्याची पोहण्याची हातोटी फारच वि-लक्षण होती ! बारापासून सोळा वर्षांच्या वयांत तो हेलिस्पांटच्या पलीकडे अगदीं सहज पोहून गेला असतां, कोणत्याही प्रकारचा खेळ खेळत असतां, अथवा एकादा धंदा करीत असतां, त्याची शोधक बुद्धि नेहमीं आपला इष्ट हेतु साधण्याचीं साधनें शोधून काढण्याकडे गंतलेली असे. जलद पोहता यावें ह्मणून त्यानें दहा इंच लांबीच्या व सहा इंच रुंदीच्या, दोन वर्तुलाकार फळ्या तयार केल्या; त्या प्रत्येकीस आंगठा अडकविण्याकरितां एक एक भोंक ठेविलें होतें. ह्या फळ्या तो पोहते वेळेस नळहातास बांधी. पायांस बांधण्याकरितांही त्यानें अशाच फळ्या तयार केल्या होत्या. ह्या युक्तीनें जलद पोहतां येतें खरें, पण मणगटें फारच लवकर दमतात, तसेंच पायांस बांधावयाच्या

फळ्यांचा कांहींच उपयोग होत नाहीं असें फ्रँक्लीन यास लकरच आढळून आलें.

बोस्टनपासून जवळच मैलभर रुंदीचा एक तलाव होता. एके दिवशीं फ्रँक्लीनानें एक मोठा पतंग तयार करून त्या तलावावरून मोठ्या सोसाट्याचा वारा वाहत असतां तो उडविला, आणि त्याचा दोरी धरून उताणा पोहून तो त्या तलावाच्या पैलतिरीं गेला !

त्याची वाचनावर फारच विलक्षण भक्ति असे. त्याला जरी फारच थोडीं पुस्तकें मिळालीं तरी तितकींच त्यानें मोठ्या उत्सुकतेनें वाचलीं. बनियन कृत "पिलग्रिम्स प्रॉग्रेस" (यात्रिक क्रमण) तर त्याला फारच आवडत असे. तें पुस्तक पुष्कळ वेळां वांचून त्याचें पूर्ण अध्ययन झाल्यानंतर त्यानें तें विकलें व बर्टन कृत "हिस्टॉरिकल कलेक्शन" (इतिहास तरंगिणी) या नांवाचें पुस्तक विकत घेतलें. यांत पुष्कळ ऐतिहासिक गोष्टी व धाडसाचीं कृत्यें यांचें फारच मनोवेधक रीतीनें वर्णन केलेलें असून याची किंमतही माफकच होती. लहानपणींच त्यानें आणखी एक पुस्तक वाचलें व त्याचा परिणाम त्याच्या वर्तनावर फारच उत्तम रीतीचा घडला. आपल्या इकडे मुलें वाचावयास शिकल्यावर तीं शाळेच्या अभ्यासावांचून दुसरें कांहीं वाचतात किंवा नाहीं, व वाचीत असल्यास कोणत्या प्रकारचीं पुस्तकें वाचतात ह्याबद्दल पुष्कळ मुलांचे पालक मुळींच काळजी घेत नाहींत; आणि अशा रीतीनें अनेक वेडींवांकडीं पुस्तकें त्यांच्या वाच-

ण्यांत येऊन त्यामुळें नीं बिघडतात. असो, ह्या पुस्तकाविषयीं फ्रँक्लिनानें आपल्या ऐशींव्या वर्षी त्या पुस्तककर्त्याच्या मुलास एक पत्र पाठविलें तें असेः—

"मी लहान असतां **'एसेज टु डू गुड्' (परोपकारावर निबंध)** या नांवाचें एक पुस्तक माझ्या वाचण्यांत आलें. मला वाटतें तें तुमच्या वडिलांनींच केलें असावें. त्या पुस्तकाच्या पूर्वीच्या मालकानें तें बऱ्याच निष्काळजीपणानें वापरल्यामुळें त्याचीं कित्येक पानें फाटून गेलीं होतीं. तरी बाकीचीं पानें वाचल्यानें मी विचारानें वागूं लागून सर्व आयुष्यभर माझ्या वर्तनावर चांगलाच दाब राहिला. कारण इतर कोणत्याही कीर्तिपेक्षां दुसऱ्याच्या हितासाठीं झटून मिळविलेल्या कीर्तीस मी फारच चाहतों, व परहितनिरत मनुष्य मला मनापासून आवडतो. आणि तुम्ही सर्व म्हणतां त्याप्रमाणें खरोखरच जर मी कांहीं तुमच्या उपयोगीं पडलों असेन, तर त्याचें सर्व श्रेय या पुस्तकास आहे."

बेंजामिन् यानें मेणबत्त्या व साबण करण्याचे कामांत आपले बापास दोन वर्षेपर्यंत चांगली मदत केली. तो ह्या त्रासांतून सुटून दुसऱ्या एखाद्या चांगल्या धंद्यांत शिरण्याची अगदीं संधि पहात होता. पुष्कळ धाडशी मुलांप्रमाणें याच्याही मनांत कोठें तरी गलबतावर चाकरी धरून जलपर्यटण करावें असें फार होतें. याचा एक थोरला भाऊ खलाशाचें काम करण्याचे उद्देशानें पळून गेला होता. त्याकडून बरेच दिवसांत कागदपत्र वगैरे कांहीं आलें

नव्हतें. त्यामुळें बेंजामिनाच्या बापास आपला मुलगा त्या कारखान्याला अगदीं कंटाळला आहे असें पाहून मोठी चिंता पडली. बेंजामिनाच्या लग्न झालेल्या दुसऱ्या एका भावानें '१ऱ्होड' बेटांत जाऊन त्याठिकाणीं मेणबत्त्या व साबण करण्याचा कारखाना घालण्याचा बेत केला, हें पाहून तर त्याच्या बापास जास्तच चिंता उत्पन्न झाली आणि यामुळें बेंजामिन यास आपणास आतां घरीं राहण्यावांचून गत्यंतरच नाहीं असें वाटलें, कारण बाहेरून तरी त्याचा बाप त्याला नेहमीं कामांत गुंतवीत असे, सारांश आपणांस आतां नावडता धंदा करण्यांतच दिवस काढावे लागणार असें बेंजामिन यास खास दिसून आलें.

न जाणो एखादे दिवशीं आपला मुलगा पळून जलपर्यटण करण्यास जाईल, ह्या भितीनें बेंजामिनाच्या बापानें त्याला बोस्टन शहरांतील सर्व कारखाने दाखविले, आणि "ह्यांपैकीं तूं कोणत्या कारखान्यांत काम करणार ?" म्हणून त्याला मोठ्या ममतेनें विचारिलें. त्यानें सर्वांचें नीट लक्षपूर्वक अवलोकन करून "शिकलगाराचें काम मला फार आवडतें ह्मणून सांगितलें.

फ्रँक्लिन बारा वर्षांचा झाला त्यावेळीं बोस्टनची लोकसंख्या दहाहजारांपर्यंत वाढली होती. त्यावेळच्या त्याच्या मानसिक विचारांचे व धर्मविषयक गोष्टींविषयीं

---

१ हें बेट अटलांटिक महासागरांत असून, तें सं. सं. (संयुक्तसंस्थानांपैकीं) एक निरनिराळें संस्थान (प्रांत) च आहे.

उत्तरोत्तर दृष्टीस पडत असलेल्या अनादराचें एक उदाहरण लिहून ठेविलें आहे, तें असें:—दररोज जेवणाच्या शेवटीं त्याचा बाप ईश्वराची लांबलचक प्रार्थना करी त्यामुळें छोट्या फ्रँक्लिनाला बराच त्रास होत असे. एके दिवशीं या हुशार निरीश्वरवादी मुलानें आपल्या नेहमीच्या उद्धटपणानें बापास म्हटलें, "बाबा आपण बऱ्याचशा भोजनसामुग्रीबद्दल एकदमच काय करावयाची असेल, ती प्रार्थनाकरून टाकाल तर मला वाटतं, नेहमीं असा पुष्कळवेळ फुकट जाणार नाहीं." हे उद्गार फक्त बारावर्षांच्या मुलाचे! यांत जरी ईश्वरभक्तीचा लेशही नाहीं, तरी यावरून त्याच्या बुद्धीची विलक्षण तीव्रता दिसून येते.

आपल्या आयुष्यांत बालपणचे दिवस फार सुखाचे, असें फ्रँक्लिन नेहमीं म्हणत असे. त्याच्या विशेष स्वभावामुळें, लोकांना ज्या स्थितींत फार दुःख होतें; त्या स्थितींत त्याला फार सुख होत असे. शेवटीं तर बोस्टनविषयीं त्याला मोठा अभिमान वाटे. त्याला तो नेहमीं 'माझें आवडतें शहर' असें ह्मणत असे. जॉनलॅथॉपला पाठविलेल्या एका पत्रांत तो ह्मणतो:— "बोस्टनच्या चालीरीति, भाषापद्धति, तेथल्या लोकांचें बोलणें आणि शब्दोच्चार यामुळें मला मोठा आनंद होऊन हुषारी वाटते." व तें काम त्यानें कांहीं दिवस केलेंही, परंतु त्यावेळीं अशी चाल होतीकीं, जर एकाद्या मुलास एकादा धंदा शिकावयाचा असेल तर त्यानें त्या

कारखान्यामध्यें उमेदवार होऊन राहिलें पाहिजे, व याबद्दलची खात्री करण्याकरितां सुमारें दोनशें रुपये कारखान्याचे मालकाकडे अनामत ठेविले पाहिजेत. कांहीं वर्षें काम केल्यावर त्याला एकाद्या मजुराप्रमाणें थोडा दरमहा देत; अर्थातच या अटी **बेंजामिनाच्या** बापास कबूल करवल्या नाहींत, व त्यामुळें त्याला तें काम सोडून द्यावें लागलें.

**बेंजामिन्** हा एका मोठ्या कुटुंबापैकीं होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याच्या बापाच्या दोन लग्नापासून झालेले मुलगे व मुली मिळून एकंदर सोळा मुलें त्या कुटुंबांत होतीं. मुलांपैकीं **जेम्स** ह्यास लंडनमध्यें छापण्याचें काम शिकवयास पाठविलें होतें. तो **बेंजामिनाच्या** अकराव्या वर्षीं **बोस्टन** येथें आपला धंदा सुरू करण्याचे उद्देशानें परत आला. '**बेंजामिन्**' यास त्याच्या लगामी लावण्याचें ठरलें, परंतु अशा प्रकारची आपल्या भावाची ताबेदारी त्यानें मोठ्या नाखुषीनेंच पत्करिली. बारा वर्षांपासून एकवीस ह्मणजे नऊ वर्षेंपर्यंत त्यानें हें काम करावें व शेवटच्या वर्षीं थोडा पगार घ्यावा असें ठरलें. पहिल्या **जार्ज** राजाच्या वेळीं जो अंतेवासीयानें लिहून देण्याच्या संकेतपत्राचा नमुना होता, तो वाचकांस बराच मनोरंजक होईल असें वाटल्यावरून या दोघा भावांत झालेल्या ठरावाचा थोडा भाग खालीं दिला आहे.

"मी आपल्या धन्याच्या परवानगीवांचून कोणतीही वस्तु विकत घेणार नाहीं किंवा विकणार नाहीं; फराळाचीं

दुकानें, खाणावळी अथवा दारुचेगुत्ते या ठिकाणीं मी कधीं ही जाणार नाहीं; पैसे लावून पत्ते, सोंगट्या, जुगार वगैरे गैरकायदा खेळ मी खेळणार नाहीं; मी लग्न करणार नाहीं; दिवसा अथवा रात्रीं धन्याच्या चाकरींत गैरहजर राहणार नाहीं; व लिहून दिलेल्या मुदतींत धन्याशीं सर्व व्यवहारांत फारच प्रामाणिकपणानें वागेन. माझे धनी **जेम्सफ्रँक्लिन** यांनीं माझे बापापासून जे दाहा पौंड इंग्रजी चलनाचें नाणें घेतलें, त्याबद्दल त्यांना येईल तितक्या उत्तम रीतीनें त्यांनीं मला छापण्याचें काम शिकवावें व त्यांजपाशीं राहण्याची मुदत संपेपर्यंत, माझें खाणें-पिणें, कपडे धुणें, बिऱ्हाड वगैरे मला अवश्य लागणारा सर्व खर्चही त्यांनीं करावा."

बेंजामिनानें छापण्याचें काम शिकण्याकरितां अविश्रांत श्रम घेतले. झोंपेच्या व जेवणाच्या वेळेशिवायरून बाकीचा सर्व वेळ तो हें काम करी. अशारीतीनें त्यानें तीन वर्षें घालविलीं. विश्रांति घेणें किंवा स्वतःचें मनोरंजन करणें, तें तो झोंपेच्या व जेवणाच्या वेळांतूनच वेळ काढून करीत असे. बोस्टन येथें यावेळीं पुस्तकविक्रीचीं दुकानें पुष्कळ होतीं. फ्रँक्लिनाला वाचण्याचा फार नाद असल्यामुळें त्यानें या दुकानांवरील कारकून लोकांशीं स्नेह संपादन केला. तो संध्याकाळीं त्यांजपासून मनोरंजक पुस्तकें मागून घेऊन मोठ्या काळजीनें घरीं नेई आणि बरीच रात्र होईपर्यंत वांचून सकाळीं दुकानाचा मालक पुस्तकें तपासण्यास येण्यापूर्वींच तीं परत करी.

फ्रँक्लिनाचें वर्तन पाहून **बोस्टन** येथील म्याथ्यूअॅडम नांवाच्या व्यापाऱ्याचें मन त्यावर बसलें. तो त्याला आपल्या पुस्तकसंग्रहालयांत बोलावी व पुस्तकें वाचावयास देई. ह्या मुलाच्या इंग्लंडमधल्या **बेंजामिन** नांवाच्या चुलत्यास यमकबद्ध पद्यें रचण्याचा फार नाद असे. तो त्यांना कवितां असें ह्मणे व त्यांपैकीं पुष्कळ आपल्या आवडत्या पुतण्यास पाठवी. **बेंजामिन्** फ्रँक्लीनही मोठा यमकबद्ध गाणीं रचणारा बनला. त्यानें पुष्कळ पद्यें रचिलीं व त्यांचा मोठ्या झपाट्यानें खप होऊन तीं बरींच लोकप्रियही झालीं त्यावेळीं चाचे लोकांच्या पराक्रमाच्या गोष्टी, खून करणाऱ्यांस झालेल्या शिक्षा व विलक्षण प्रीतिकरितां घडलेलीं धाडसाचीं कृत्यें असल्या गोष्टी ऐकण्याची लोकांस मोठी आवड होती. असें सांगतात कीं, **बोस्टन** येथील एका पुस्तकें प्रसिद्ध करणारानें अशा विषयांवरील नुमतीं गाणीं छापून काढण्यांतच पुष्कळ पैसा मिळविला. **बेंजामिन्** यास असलीं गाणीं अगदीं सहज रचितां येत असल्यामुळें त्यानें, " दीपगृहाचा दुःखपर्यवसायी पोवाडा " रचून कप्तान व त्याच्या दोन मुली ह्यांच्या मृत्यूचें हुबेहुब चित्र लोकांच्या नजरेस आणलें. दुसरें एक गाणें त्यानें सर्व प्रसिद्ध चांचा **एडवर्डटीच**. ज्याला ' ब्ल्याक बीअर्ड ' असें ह्मणतात त्यावर रचिलें, व तें पहिल्यापेक्षांही लोकांस जास्त पसंत पडलें. हें अगदीं इतिहासाला धरून रचलें होतें. ह्या वेळीं जरी हें सर्व लोकांस फार आवडलें तरी पुढें **बेंजामिनाला** तें फारच भि-

कार वाटलें. त्यावेळीं तो फक्त पंधरा वर्षांचा होता ह्मणून त्याला तें चांगलें वाटलें होतें यांत आश्चर्य नाहीं. हें गाणें रचून छापून तयार झाल्यावर तें घेऊन रस्तोरस्तीं हिंडून विकण्याचें काम त्यालाच करावें लागले. लोकांनींही दोन्ही गाणीं विकत घेऊन मोठ्या उत्सुकतेनें वाचिलीं. यामुळे त्या स्वाभिमानी छोट्या कवीस मोठा संतोष झाला असेल, यांत संशय नाहीं.

**ऑडिसन** हा बोलण्याचे कामांत अगदींच नादान होता; परंतु त्यानें लिहिलेलें प्रत्येक वाक्य मोठें मजेदार आहे. **बर्क** यानें **गोल्डस्मिथ**विषयींही एके प्रसंगीं असेंच ह्मटलें आहे. **फ्रँक्लिन** हा बोलण्यांत जरी अगदींच कुचकामाचा नव्हता, तरी त्यास जलद बोलतां येत नसे; तो मध्येंच अ-अ करी व कोठें कोणता शब्द योजावा ह्याचीं त्याला मोठी अडचण पडे परंतु त्याच्या लेखांची भाषासरणी रमणीय असून शब्दयोजना फारच निवडक असे. त्यानें लेखनचातुर्य संपादण्याकरितां जितकी मेहनत घेतली, तितकीच जर बोलण्याची हातोटी साधण्याकरितां घेतली असती, तर लेखकाप्रमाणेंच तो उत्तम वक्ताही झाला असता. लहानपणापासून त्याला झोंकदार लेखकापेक्षां जोरदार लेखकच बनण्याची इच्छा असल्यामुळें भाषासरणीकडे विशेष लक्ष न देतां आपले विचार वाचकाच्या झटदिशीं लक्षांत यतील, अशा स्पष्ट व सुबोध भाषेनें लिहिण्याचा प्रयत्न त्यानें चालविला.

एके दिवशीं **बेंजामिन् ॲडिसनचें स्पक्टेटर** (प्रेक्षक)

हें पुस्तक घेऊन वाचीत असतां, त्याच्या भाषापद्धतींत त्याचें मन अगदीं गढून गेलें, व पुढें त्यांपैकीं कांहीं भाग निवडून काढून तो लक्ष लावून वाचावा, नंतर पुस्तक मिटून भाषेकडे लक्ष न देतां नुसते विचार ध्यानांत ठेवण्याचा प्रयत्न करावा, पुढें दऊत-लेखणी घेऊन आपल्या जोरदार व ठसा उमटविणाऱ्या शब्दांनीं तो भाग लिहून काढावा. हें झाल्यावर शुद्धाशुद्ध विरामचिन्हादि तपासून होईल तितकें पूर्णत्व त्यास आणावें आणि शेवटीं हा लिहिलेला भाग मुळांतील लेखांशी ताडून पहावा असा क्रम त्यानें चालविला. आतां पुष्कळ वेळां त्याच्या लेखांत चुका असत व त्या असणेंही साहजिकच होतें. तरी प्रसंगीं त्याचा लेख मुळाहुनही चांगला उतरत असे. यामुळें त्याला उत्तेजन येऊन पुष्कळ दिवस हाच क्रम चालविल्यास आपण चांगले इंग्रजी लेखक होऊं, असें त्यास खात्रीनें वाटे. हा व कांहीं प्रसंगीं याच्यांतच थोडा फरक करून निराळ्या तऱ्हेचा भाषा सुधारण्याचा प्रयत्न त्यानें कित्येक महिनेपर्यंत एक सारखा चालविला. आपल्या पद्यांत कवित्व मुळींच नसतें, तरी भाषा सुधारण्यास त्याचें थोडें तरी सहाय्य होईल, असें समजून तोही क्रम त्यानें चालू ठेविला होता. भाषाज्ञान संपादण्याकरितां अशा तऱ्हेचा उद्योग आह्मांपैकीं कितीजण करीत आहेत?

फ्रँक्लिन् जरी हीं असलीं गचाळ गाणीं रचीत असे, तरी त्याला उच्च प्रतींचीं मनोवेधक पुस्तकें वाचण्याची गोडी विशेष होती. **लॉकच्या ह्यूमन अंडरस्टांडिंग**

( मनुष्याचें ज्ञान ) ह्या निबंधाचा त्यानें बराच व्यासंग केला होता. डी पोर्ट रॉयलच्या आर्ट ऑफ थिंकिंग ( विचार करण्याची कला ) या निबंधात तर त्याचें सर्व मन गढून गेलें होतें. परंतु विशेषतः क्झेनो फननें साक्रेटिसा विषयीं लिहिलेल्या एका पुस्तकाचें वेड जितकें लागले होते तितकें दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाचें वेड त्याला नव्हतें.

फ्रँक्लिनाला वादविवाद करणें स्वभावतःच फार आवडत असे. सॉक्रेटिसाची वादविवाद करण्याची पद्धति त्याच्याहून जरी फार निराळी होती, तरी तिची त्यानें पुष्कळ स्तुति करून तीच जास्त पसंत केली. उत्तरपक्ष करण्यांत किंवा एकादें मत स्पष्टपणें प्रतिपादण्यांत सॉक्रेटिसाकडून कधींही असभ्यता घडली नाहीं. तो आपल्या नेहमींच्या सभ्यपणानें आणि लोकप्रीति संपादन करण्याच्या हेतुनें प्रतिपक्षास चमत्कारिक प्रश्न विचारून आपलीं मतें मान्य करण्यास लावीत असे. फँक्लिनानें ह्या पद्धतीनें वादविवाद करण्याची सुरवात केली. त्यात त्याला चांगलें यश मिळून तो आपल्या मित्रमंडळीचा फार आवडता झाला. व ज्या वादांत दोन्ही पक्ष सत्याचा निर्णय करण्यापेक्षां जयाकरितांच भांडत असतात, त्या वादाचा मूर्खपणाही त्याला पूर्णपणें कळून आला.

वादविवाद ह्मणजे एक बुद्धिसामर्थ्याचें द्वंद्व आहे, यांत ज्याचें चातुर्य व ज्ञान मोठें तो आपल्या प्रतिपक्षाचा पाडाव करून यश संपादन करितो जेफरसन ह्यानें आपल्या पुतण्यास

वाद सोडून देण्याविषयीं पुष्कळ सांगितलें. तो एकदां ह्मणाला, " मी पुष्कळ वाद करणारे पाहिले आहेत, परंतु मजा ही कीं, वादकरून उभयपक्षांचें एकमत न होतां प्रत्येक पक्ष आपआपल्या मतांविषयीं उलट पहिल्यापेक्षांही जास्त खात्री देऊं लागतो. " नेहमीं कोणत्याना कोणत्या तरी विषयाची चर्चा करणारांनीं हें चांगलें लक्षांत ठेवावें.

फ्रँक्लिन् अगदीं निरोगी होता व त्याची पचनशक्तिही चांगली होती. त्याला कोणताही खाल्लेला पदार्थ जिरत असे. भाजीपाला खाण्याचेंच ज्यांत विशेष महत्व सांगितलें होतें, असें एक पुस्तक त्याचे हातीं लागलें. भाजीपाला खाण्यापासून पैसा व वेळ हीं दोन्ही वांचून मनुष्याचा पुष्कळ फायदा होतो, असें त्यांत सिद्ध करून दाखविलें होतें. तें सर्व फ्रँक्लिनाला पसंत पडलें. जरी त्या ग्रंथकर्त्यानें फक्त कांदे आणि गाजरें खाऊनच राहण्यास सांगितलें असतें तरी देखील फ्रँक्लिन् यास तीं मुळींच बाधलीं नसतीं त्यानें आपल्या भावाची परवानगी घेऊन आपलें जेवणखाण पूर्वीच्या निम्मे खर्चांत चालविलें, त्यामुळें त्याचा वेळ व पैसाही पुष्कळ वांचला. मूठभर मनुका, एक पोळी आणि वर पाण्याचा घोट, इतकें झालें कीं, आटोपलें त्याचें जेवण! आणि हें सर्व तो दहा मिनिटांत उरकी; व बाकीचा जेवणाचा वेळ वाचनांत खर्च करी. रात्र तर सर्व त्याचीच असे; तो पुष्कळ उशिरां निजे व लौकर उठे; आणि या सर्व वेळांत वाचनावांचून दुसरा धंदा त्याला माहीत नव्हता.

फ्रँक्लिन् यास, कोणी कोणास मारूं नये, कोणाची वस्तु चोरूं नये, आपल्या शेजाऱ्यांची आणि इष्टमित्रांची निंदा करूं नये व त्यांना कपटानें फसवूं नये, हीं ऐहिक नीतीचीं तत्वें पारमार्थिक नीतितत्वांपेक्षां जास्त आवडत असत.

---

# भाग २ रा

———:o:———

## स्वभाव विकास.

फ्रँक्लिनचीं धर्मतत्वें—**कोरंट** नांवाचें वर्तमानपत्र—त्याची निंदा—त्याची लेखनचातुर्य संपादण्याची पद्धत—लेखक या नात्यानें त्याची कीर्ति—**कोरंटाच्या** चालकावर फिर्याद—**कोरंटाचा** चालक व प्रकाशक बेंजामिन्—त्याच्या भावाची असूया—पळपुटा अंतेवासी—**न्यूयार्कचा** प्रवास—दुश्चिन्हें-सुचिन्हें.

फ्रँक्लिन सोळा वर्षांचा असतां त्याचीं जीं धर्ममतें होतीं, तीं आपल्या व त्याच्या धर्मांचा अर्थाअर्थी संबंध नसल्यामुळें विस्तारपूर्वक सांगत बसण्याची अवश्यकता दिसत नाहीं. त्याची ख्रिस्तीधर्मावर मुळींच श्रद्धा नसून येशूमही तो मानीत नसे, एवढें सांगितलें ह्मणजे पुरे आहे.

**जेम्स** फ्रँक्लिन याच्या धंद्यास दिवसेंदिवस बरीच तेजी येत चालली होती. त्यानें ता. २१ आगष्ट सन १७२१ रोजीं "**धी न्यू इंग्लंड कोरंट**" या नांवाच्या वर्तमानपत्राचा पहिला अंक प्रसिद्ध केला. **बेंजामिन्** अक्षरांचे ठसे जोडी, एका मनुष्यास चालवितां येणाऱ्या छापण्याच्या यंत्रावर त्या पत्राच्या दोनतीनशें प्रती छापी

आणि नंतर त्या पोहोंचविण्याकरितां वर्गणीदारांच्या घरो-घर जाई. कांहीं उत्तम लेखकांनीं ह्या पत्रास आपले लेख पाठविण्याची सुरवात केल्यामुळें कोरंटाकडे लोकांचें बरेंच लक्ष लागलें. अशा रीतीनें हें पत्र लोकप्रिय होत आहे, तोंच त्याच्या विरुद्ध हाकाटी चालू झाली. त्याचीं राजकीय व्यवस्थेबद्दलचीं मतें कोणास पसंत पडेनात, आणि धर्मसंस्थाची त्यानें केलेली निंदा कोणास बरी वाटेना. **कॉटन मॅदर** नांवाच्या एका प्रसिद्ध लेखकानेंही त्याजवर आपल्या कलमाचे प्रहार केले होते तो लिहितोः—

" कोरंट या नांवाचें घाणेरडें आणि गर्हणीय वर्तमानपत्र आमचे पाहण्यांत आलें. त्यांत सर्व मूर्खपणा, मनुष्यपणास न शोभणाऱ्या गोष्टी, शिव्या, पूज्य गोष्टीं-विषयीं अपमानकारक उद्गार, अनीति, उरमटपणा दुसऱ्याचे दोष काढण्याची बुद्धी असत्य प्रलाप आणि वितंड वाद इत्यादि गोष्टी, ज्या भांडणास व एकोप्याच्या नाशास कारणीभूत होऊन मनास कुमार्गगामी करतात त्या सर्व ओतप्रोत भरल्या आहेत. "

**इंक्रीज म्यादर** यानें तर यापेक्षांही कडक रीतीनें या पत्रावर गहजब उडविला आहे.

यावेळच्या सुमारासच **जेम्स** आणि त्याचा अंतेवासी भाऊ या दोघांमध्यें बरेंच वितुष्ट येत चाललें होतें. **जेम्स** यानें धनीपणाच्या ताठ्यानें त्यावर मोठा कडक अंमल चालविला व पुष्कळ वेळां रागाच्या सपाट्यांत त्यास मारिलें देखील **बेंजामिन्** हा मोठा अभिमानी, दुराग्रही व लो-

कांच्या तंत्रानें न वागणारा असा होता. ज्यावेळीं त्यानें आपले लेख कोरंटमध्यें प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या लेखांशीं ताडून पाहिले त्यावेळीं आपण त्यांच्याहून चांगले जरी नाहीं, तरी त्यांच्या बरोबरीचे लेख लिहूं, असें त्यास खात्रीनें वाटलें. त्यानें सोळा वर्षांचा होण्यापूर्वींच एके दिवशीं संध्याकाळीं मोठ्या काळजीनें शुद्ध ॲडिसनच्या पद्धतीवर एक निबंध तयार केला, व रात्रीं कोणास न कळत दाराच्या फटींतून तो छापखान्यांत टाकून ठेविला. सकाळीं बेंजामिन् आपले ठसे जुळण्याचें काम करीत होता व लेखक मंडळी जवळच पत्रकर्त्याच्या खोलींत गप्पा छाटीत बसली होती, इतक्यांत एकानें तें बिननावीं पत्र फोडून त्यावर उघड उघड टीका करण्यास सुरवात केली. सर्वांनीं त्या पत्राची मोठी वाहवा केली, व लेखकांविषयीं तर्क करीत असतां मोठमोठ्या प्रख्यात लिहिणारांचीं नांवें घेतलीं, हें पाहून त्या तरुण लेखकास फारच समाधान वाटलें.

त्यानें " सायलेन्स डू गुड " असें विलक्षण नांव धारण करून पुष्कळ निबंध लिहिले हे निबंध लोकांस इतके आवडले कीं अखेरीस बेंजामिनाला, हीं पत्रें मी लिहिलीं असें सांगितल्यावांचून राहवलें नाहीं व त्यामुळें त्याचा भाऊ आणि दुसरे पुष्कळ लोक पूर्वीपेक्षां त्याला फार मान देऊं लागले.

**कोरंट** पत्र जरी लोकांना विशेष आवडूं लागलें, तरी सरकारी कामदार आणि धर्मभोळी मंडळी ह्यांना तें

मुळींच रुचत नसे. सरकारावर कोरडा ओढण्याच्या उद्देशानें न्यूपोर्ट येथून एक काल्पनिक गोष्ट लिहून आली होती, त्यांत असें होतें कीं, " किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावर एक चांच्यांचें गलबत आलें असून तें लोकांचीं जहाजें लुटतें, जाळतें व त्यांची अगदीं नासाडी करून टाकतें. त्याच्या प्रतिकारार्थ म्यासाचेट्स येथील सरकारी अधिकारी, एक लढाऊ जहाज तयार करवीत असून वारा व हवा अनुकूळ असल्यास तें बोस्टनाहून याच महिन्यांत केव्हां तरी निघेल."

सरकारच्या दीर्घसूत्रीपणावर ओढलेल्या ह्या प्रतोद-प्रहारानें अंमलदार मंडळीस मोठा गुस्सा येऊन कौन्सिलाच्या सभासदांनीं ह्याबद्दलचा जाब देण्याकरितां जेम्स विषयीं त्यास बोलावणें केलें. त्यानें मी पत्र प्रसिद्ध करणारा आहे हें कबूल केलें. परंतु लेखकाचें नांव मात्र सांगेना. अखेर लिहिलेली गोष्ट सरकारच्या फार विरुद्ध आहे, याकरितां जेम्स फ्रँकलिन यास बोस्टन येथें एक महिनापर्यंत कैदेंत ठेवावें असा कौन्सिलानें ठराव केला. त्याप्रमाणें एक आठवडा काढल्यावर " मला एकसारखा कोंडून ठेविल्यास माझ्या जिवास धक्का पोहोंचेल, करितां तुरुंगाचें आंगणयांत येण्याची परवानगी मला असावी " असा त्यानें मोठ्या गरिबीनें अर्ज केला, व त्याप्रमाणें त्याची विनंति मान्य होऊन पुढील तीन आठवडे, त्यानें दिवसांतून कांहीं वेळ उघड्या हवेंत काढून कैद भोगिली.

ह्यावेळीं बेंजामिन फक्त सोळा वर्षांचा असून त्यानेंच तें पत्र चालविलें होतें. तो मजकूर लिही, ठसे जुळी, पत्रं छापी आणि तीं वर्गणीदारांस वांटी. शेवटीं जेम्स सुटला, परंतु कोरंटचा क्रम पूर्वीप्रमाणेंच चालला होता. ख्रिस्तिधर्माचा पोकळ डौल मिरविणाऱ्यांवर त्यांत नेहमीं हल्ला केलेला असे.

शेवटीं कौन्सिलानें कोरंटाच्या विवक्षित अंकांत पवित्र-शास्त्रास दोष देणारीं कित्येक वाक्यें काम सरकारच्या न्यायखात्याची, प्रधानमंडळाची व चांगल्या लोकांची त्यांत बरीच निंदा केलेली आहे असें जाणून, तिघांजणांची एक मंडळी नेमली व त्यांचें या मजकुराविषयींचें मत मागितलें. दोन दिवसांनंतर त्यांचा ठराव प्रसिद्ध झाला, तो. व ले-

"आमच्या अल्पमतीस असें वाटतें कीं, सदरहू पत्राचा चालक धर्माची थट्टा करून त्याविषयींचा तिर-स्कार लोकांच्या मनांत उत्पन्न करण्या ा खटपट करीत असून, पवित्रशास्त्रावर तर त्यानें शिव्यांचा गहबज उडविला आहे. तसेंच पूज्य आणि विश्वासू मानलेल्या धर्मा-धिकाऱ्यांवर मोठे कडक वाग्बाण त्यानें सोडिले आहेत, इतकेंच नाहीं, तर सरकारच्या राज्यपद्धतीसही त्यानें नांवें ठेविलीं आहेत; सारांश, ह्या प्रांतांतील प्रजेच्या स्वस्थ-तेस व व्यवस्थित पणास हरताळ लावण्याचा ह्या कोरं-टाचा उद्देश दिसतो."

इतकें लिहून त्या मंडळीनें अशी सूचना केली होती कीं, "जेम्स फ्रँक्लिन यास हें किंवा अशाच तऱ्हेचें पत्र

ह्या प्रांताच्या चिटणीसाच्या देखरेखी वांचून काढण्याची सक्त मनाई झाली पाहिजे. ''

युक्तिप्रयुक्तीनें आपल्या कार्यभागास धक्का न येतां ह्या हुकुमाच्या तडाख्यांतून सुटावें ह्मणून जेम्स फ्रँक्लिन् आणि त्याची मित्रमंडळी कोरंटाच्या ऑफिसांत एके ठिकाणी जमली, व त्यांनीं मोठ्या हुशारीनें अशी तोड काढिली कीं, बेंजामिनानें लिहून दिलेलं संकेतपत्र रद्द करून कोरंट त्याचे नांवावर चालवावें, हें ठरतांच त्या सुज्ञ मुलानें आपला संपादक या नात्यानें पहिला लेख तयार केला. त्यांतील भावार्थ असाः—

" आजपर्यंत द्वेष उत्पन्न करणारीं छोटीं पुस्तकें, मात्सर्य उत्पन्न करणारे भिकार लेख आणि पचकळपणाचे विचार प्रसिद्ध करण्यांतच छापखान्याचा उपयोग झाला, सध्यां आह्मीं हातांत घेतलेल्या जनमनरंजनाचे कामीं, कोणीही उदार अंतःकरणाचा व निःपक्षपाती मनुष्य आह्मांस अगदीं दोष देणार नाहीं. मनोरंजनाकरितां लिहिलेल्या चुटक्यांच्या खुबीनें, संतापलेल्या मनास समाधान वाटून चैन न पडूं देणाऱ्या रागाचें सहज शांतवन होतें. बोस्टनसारख्या शहरांत जगाला कित्ता घालून देणाऱ्या नेहमीं घडत असलेल्या गोष्टी लोकांपुढें आणून त्यांचें मनोरंजन करण्याचा जरी ह्या साप्ताहिक पत्राचा मुख्य हेतु आहे; तरी समयविशेषीं आह्मीं आपल्या पत्रद्वारें हास्यकारक आणि विलक्षण आयुष्यक्रमापासून काढतां येणाऱ्या नीतितत्वांचाही प्रसार करण्यास चुकणार नाहीं."

आपल्या देशबांधवांची शक्ति त्यांची नीति आणि त्यांचा धर्म वाढावा ह्मणून जे लोक आपल्या अंतःकरणापासून प्रयत्न करीत होते, त्यांच्यावरसुद्धां **बेंजामिनानें** आपल्या तीक्ष्ण लेखशरांचें संधान केलें आहे, हें कबूल केलें पाहिजे. अशा लोकांच्या चुका बाहेर काढण्याकडे त्याचें फार बारीक लक्ष असे. एकादे वेळीं रागाच्या सपाट्यांत, तो त्यांवर अशीं कांहीं खुबीदार गाणीं रची कीं, तीं दारूबाज व दुसरे हलकट लोक पाठ करून रस्त्यांवरून ह्मणत जात, आणि त्यामुळें वरच्या मंडळीची त्यांच्यापेक्षां फारच हलकट अशा लोकांकडून चांगलीच फजीती उडे.

**बेंजामिन** झालेल्या स्तुतीमुळें आणि मिळालेल्या यशामुळें चढून जाऊन, आपल्या वयाचे सत्रावे वर्षी **जेम्स**-बरोबर उद्धटपणानें वागूं लागला. ही गोष्ट तो स्वतःही कबूल करितो. **जेम्साला** त्याचा उत्कर्ष सहन न-होऊन त्याजवर तो आपला अधिकार चालवूं लागला. शेवटीं त्या दोघां भावांत मोठाच तंटा झाला, तेव्हां थोरल्यानें धाकट्यास आपला अंतेवासी समजून कडक शिक्षा करण्याचा विचार केला. कारण ठराव रद्द केला ही गोष्ट प्रतिपक्षावर कडी करण्याकरितांच असून आपसांतील होती, असा त्याचा समज होता. **फ्रँक्लिन** रागानें अगदीं जळफळून भावाची चाकरी यापुढें करावयाची नाहीं, अशा संकेतानें **बोस्टन** येथील कित्येक छापखानेवाल्यांकडे नवीन काम पाहण्याकरितां गेला; परंतु त्याच्या

भावानें आधींच सर्वांकडे जाऊन आपली हकीकत सांगून आपल्या भावाचा नास्तिकपणाही सर्वांस जाहीर केला होता.

जरी आपल्या भावाच्या आपण वचनानें गुंतलों आहों, असें **बेंजामिन** यांस वाटत होतें, तरी त्यानें त्याचें अन्यायाचें वर्तनच आपणास वचनभंग करण्यास प्रवृत्त करीत आहे अशी मनाची समजूत घालून पळून जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपलीं कांहीं पुस्तकें विकून वाट-खर्चाकरितां पैसा तयार केला; आणि *न्यूयॉर्कला जाणारें एक गलबत होतें, त्यावरील मुख्यास भेटून त्याला खोटेंच असें सांगितलें कीं, "माझी एका तरुण मुलीवर मोठी प्रीति बसली होती, परंतु तिची वर्तणूक पुढें वाईट ठरली. आतां तिच्या मैत्रिणी मला तिच्याशीं लग्न लावण्यास सांगत आहेत, तेव्हां पळून जाण्यावांचून दुसरा मार्गच नाहीं, ह्मणून मला लपण्याकरितां तुमच्यागलबतांत थोडी जागा द्या." हें त्याचें बोलणें खरें वाटून त्या गलबताच्या मालकानें त्याला गलबतांत चांगली जागा दिली.

**बेंजामिन** यास न्यूयार्कचा प्रवास मोठा सुखावह होऊन रोज मजलही बरीच झाली. तो भाजीपाला खाऊन राहणारा बनल्या दिवसापासून फक्त आपली भोजनेच्छा तृप्त करण्याकरितां प्राण्यांचा घात करणें त्याला बरोबर

---

* हें सं. सं. पैकीं सर्वांत मोठें शहर, न्यूयार्कप्रांतांत **हडसन** नदीच्या मुखाजवळ आहे. येथील लोकसंख्या अजमासें साडेपंधरा लक्ष आहे.

वाटत नसे. गलवत * ब्लॉक बेटाजवळ उभें राहिलें, तेव्हां ती जागा मासे मारण्यास फार सोयीची आहे असें पाहून त्यावरील खलाशी लोकांनीं तेथें पुष्कळ मासे मारिले. **बेंजामिन** त्यांस ह्मणाला, " मासे पाण्यांत मोठ्या आनंदानें पोहून कोणास कोणत्याही प्रकारचा त्रास देत नसतां त्यास आपण मारावें, हें केवढें भयंकर कृत्य आहे ! " त्याला फारच भूक लागली होती, इकडे तळणाची कढई चढवून मंडळी मासे तळण्याच्या कामांत अगदीं गुंतून गेल्यामुळें क्षुधा उद्दीपित करून मनास आनंद देणारा ताज्या माशांचा घमघमाट जिकडे तिकडे सुटला होता. इतक्यांत दुसरीकडे एक खलाशी मोठा थोरला मासा कापीत बसला होता. त्याच्या पोटांतून त्यानें नुकताच गिळंकृत केलेला एक लहानसा मासा निघाला, हें पाहून **बेंजामिन** मोठ्यानें ह्मणाला,—

" अरे ! जर तुह्मी एकमेकांस खातां तर आह्मांलाही तुमची चटणी उडविण्याचा हक्क असला पाहिजे. "

त्याचा सर्व संशय दूर झाला, आणि तो त्या मंडळीबरोबर फराळास बसला. यापुढें वरच्या प्रकारची शंका त्याला कधींच आली नाहीं.

**बेंजामिनानें** आपल्या आत्मलिखित चरित्रांत ही गोष्ट सांगून एका ग्रंथकाराचें खालीं दिलेलें वाक्य जास्त लिहिलें आहे.

---

* हें ऱ्होड (बेट) प्रांताच्या ताब्यांतील एक बेट असून तें गुरेंढोरें व मेंढरें यांकरितां फार प्रसिद्ध आहे. येथें दह्याचा व लोण्याचा मोठा व्यापार चालतो.

" मनुष्याचे मनांत एकादी गोष्ट करण्याचें आलें असतां तो तीस हवें तें कारण लढवूं शकतो, ह्मणून विचारशील अशा मनुष्यप्राण्याचा जन्म पावणें किती हितावह आहे बरें ! "

इ. स. १७२३ च्या आल्हादजनक आक्टोबर महिन्यांत बेंजामिनाचें जहाज न्यूयार्कच्या धक्क्यास लागलें. ह्यावेळीं त्याचें वय पुरें अठरा वर्षांचेंही नसून त्याजपाशीं पैसेही थोडेच होते. जवळ शिफारसपत्र मुळींच नसून गांवांत कोणाची ओळखही नव्हती. शहरची लोकसंख्या सात आठ हजार होती व रस्ते नागमोडी असून त्यांपैकीं कांहींस ओबडधोबड फरसबंदी केली होती. बहुतेक नागरिक, डच जातीचे असल्यामुळें त्यांचे सर्व व्यवहार त्याच भाषेंत चालत; ह्मणून इंग्रजी छापखानेवाल्यांस तेथें फारसें काम नसे. त्या गांवीं एक किताबखाना व वुइल्यम ब्रॅडफर्डानें चालविलेला एक छापखाना होता.

आपल्या पळपुट्या अंतेवाशाला तेथें काम मिळेना, तेव्हां वुइल्यम ब्रॅडफर्डानें त्याला सांगितलें कीं, " माझा एक मुलगा फिलाडेल्फिया येथें छापखान्याचें काम करीत असतो त्याचा नौकर नुक्ताच वारल्यामुळें त्याला कोणीतरी मनुष्य पाहिजे आहे; तो तुह्माला ठेवील. "

कपड्यांची पेटी निराळ्या मार्गानें रवाना करून फ्रँक्लिन न्यूयार्कहून फिलाडेल्फियास जात असतां वाटेंत त्याचा फार नाश झाला. तो ज्यावेळीं ॲम्बाय येथें गेला त्यावेळीं दोन प्रहर उलटून गेली होती, आणि तीस तासांत त्यास अन्नपाणी मुळींच मिळालें नव्हतें.

फ्रँक्लिन निरोगी असल्यामुळें, भिकार धर्मशाळेंतही त्याला चांगली झोंप लागली, आणि तो सकाळीं उठला. तेव्हां नेहमींप्रमाणें त्याच्या तोंडावर हुशारी दिसत होती. त्याला अद्याप पन्नास मैल खुष्कीच्या मार्गानें जावयाचें होतें. ह्या वेळीं ह्या पन्नास मैलांत आगगाडी, टपालाचे तांगे अथवा गाड्या वगैरे कमलेंही साधन नसून रस्ताही चांगलासा नव्हता. शिवाय पाऊस पडत होता, ह्मणून आमच्या प्रवाशास पायींच रखडत जावें लागलें.

तिसरे प्रहरच्या सुमारास तो रस्त्याच्या बाजूच्या एका खेड्यांत आला, ह्यावेळीं पूर्वी संवय नसल्यामुळें चालण्याच्या श्रमानें, पावसांत भिजण्यानें आणि चिखल तुडवीत चालण्यानें तो अगदीं थकून गेला होता; ह्मणून दुसरे दिवशीं सकाळपर्यंत तेथेंच मुक्काम करण्याचा निश्चय करून, तो एका लहानशा खोपटांत उतरला. तो दिसण्यांत एकाद्या भिकाऱ्यासारखा दिसे. कारण त्यानें आपला काम करितेवेळीं घालण्याचा पोशाक केला असून, तो अगदीं थकून गेला होता. तो ज्या खोपटांत उतरला होता, तेथील लोकांनीं त्याजवर दया केली. परंतु हा कोणी पळपुटा चाकर आहे, असा त्यांस संशय आला. हें पाहून बेंजामिन यास फार वाईट वाटलें.

मुलें अविचारानें कोणतेंही धाडसाचें कृत्य करण्यास प्रथम तयार होतात, परंतु असल्या अविचारानें जिवावरचे प्रसंग गुदरून त्यांच्या आयुष्याचें मातेरें होतें, व शेवटीं

कृतकर्माचा त्यांना चांगलाच पश्चात्ताप होतो, इकडे त्यांनीं चांगलें लक्ष पुरवावें. आमच्या या उद्योगशील मुलाची गोष्ट इतरांप्रमाणें नव्हती, हें वाचकाच्या लक्षांत येईलच !

इतकेंही असून रात्रीं त्यास आरंभिलेल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला व आपण **बोस्टन**ला गेलों तर फार बरें होईल, असें त्यास वाटूं लागलें. आकाशांत ढग फार आल्यामुळें जिकडे तिकडे अगदीं अंधार पडून कांहींच दिसेनासें झालें होतें. उजाडतांच तो आपल्या वाटेस लागला, व सर्व दिवसभर मोठ्या नेटानें चालून संध्याकाळच्या वेळीं * बर्लिंग्टन पासून दहा मैलांवर एका खेड्यांत आला, व तेथें एकाच्या खोपटींत रात्र घालवून तेथून सकाळींच निघाला, तो थेट बर्लिंग्टन येथें येऊन पोंहोचला. तेथें त्याला अशी बातमी समजली कीं, “ शनवारची तर, नुक्तीच निघून गेल्यामुळें मंगळवारपर्यंत **फिलाडेल्फियाला** जाणारी दुसरी तर मिळणार नाहीं. ” हें ऐकून त्याची फार निराशा झाली. त्यानें आपला फराळ, जेवण वगैरे चट सारें वाटेवर एका म्हातारीपासून विकत घेतलेल्या सुंठीच्या वड्यांवरच भागविलें.

**बर्लिंग्टन**, नदीच्या पूर्वेस असून, **फिलाडेल्फिया** तिच्या पश्चिमेस होतें. ह्या दोन गांवांचा परस्पर व्यवहार चालण्यास नदीवांचून दुसरा मार्गच नव्हता. रानांतून जावें, तरी पंचाइतच ! इतकेंही असून **बेंजामिना** जवळ अवघे अडीच रुपये होते. अतिशय काटकसरीनें-

* सं. सं. पैकीं न्यूजर्सी प्रांतांत एक शहर आहे.

ही हा पैसा बर्लिंग्टन येथील तीन दिवसांचा खर्च जाऊन वाट खर्चीस पुरला नसता.

ह्या संकटाच्या प्रसंगीं ज्याचा शहाणपणा सर्व खिश्चन राष्ट्रांत गाजत राहिला तो आपला छोटा तत्वज्ञ ज्या गरीब ह्मातारीकडून सुंठीच्या वड्या घेतल्या होत्या तिची मसलत विचारण्या करितां मागें परतला. त्या ह्मातारीनें ह्या मुलाचा सरळ स्वभाव व गोजिरवाणा चेहेरा पाहून मोठ्या ममतेनें त्याला आपल्या घरीं येण्याविषयीं आग्रह केला. त्यानेंही त्या निमंत्रणास मान देऊन ह्मातारीचा मीठभात गोड करून खाल्ला.

बेंजामिन् संध्याकाळच्यावेळीं नदीच्या काठानें फिरत असतां, पुष्कळ उतारूंनीं भरलेली फिलाडेल्फियाला जाणारी एक होडी सहज त्या बंदरांत लागलेली त्यानें पाहिली. त्यानें लागलीच बिऱ्हाडीं जाऊन ह्मातारीस सलाम करून तिचा निरोप घेतला; व होडीच्या मालकास विचारून तो होडीवर चढला. त्याबरोबर ती चालू झाली. रात्र काळोखी होती, व वारा अगदीं बंद पडला होता, ह्मणून वल्हीं मारणें फारच अगत्याचें होते; मध्यरात्र उलटून गेल्यावर फिलाडेल्फिया आपणास न दिसतां मागेंच निघून गेलें असेल, असें ह्मणून मंडळीनें वल्हवणें बंद केलें व होडी नदीच्या एका फाट्यांत घेऊन विस्तव पेटवून पाहिलें तों फिलाडेल्फिया मैल दीड मैल पूर्वींच निघून गेलें, असें त्यांस समजलें. उजाडेपर्यंत ते तसेच थांबले आणि नंतर होडी हाकारून नऊ वाजण्याच्या सुमारास ते

फिलाडेल्फियाला येऊन उतरले. ह्या वेळीं फ्रँक्लिनजवळ एक डालर[१] व आठ आणे किंमतीचा खुर्दा इतकीच काय ती शिल्लक होती; पैकीं खुर्दा त्यानें होडीचे भाड्याबद्दल ह्मणून देऊन टाकला.

बेंजामिन यास पुढें जेथील आधिपत्य मिळालें तेथें त्याचें प्रथमागमन असल्या थाटानें झालें, हें मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. खरोखरच ह्या वेळचा त्याचा पोशाक चमत्कारिक व चित्रविचित्र रंगाचा असा होता. त्याच्या प्रत्येक कपड्याची मळून मळून अगदीं घाण झाली होती.

त्याला रात्रीं झोंप न मिळाल्यामुळें फारच त्रास झाला होता; भुकेनें त्याचे पंचप्राण व्याकुळ झाले होते; व बोलण्याचालण्यास कोणीच सोबती नसल्यामुळें तो अगदीं कंटाळला होता. अशा अवस्थेंत तो शहरांतून हिकडे तिकडे हिंडत असतां एक पावविक्याचें दुकान त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें दुकानांत शिरून दोन आण्याचे पाव मागितले. **फिलाडेल्फियांत** स्वस्ताई असल्यामुळें दुकानदारानें तीन पाव काढून त्याच्या हवालीं केले. इतक्याशा पैशांत एवढे पाव आलेले पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. भुकेनें त्याचे प्राण व्याकुळ झाले होते, ह्मणून दोन बगलेंत दोन पाव मारून तिसरा खात खातच तो रस्त्यानें चालूं लागला. फिलाडेल्फियाची लोकसंख्या

१ हें अमेरिका व स्पेन येथें चालणारें चांदीचे नाणें असून एका डालराची किंमत सरासरी सवा दोन रुपये आहे.

सात हजार असून त्याचा विस्तारही बराच मोठा होता, व गांवच्या आसपास मळे वगैरेही पुष्कळ होते.

बेंजामिन चौथ्या गल्लीपर्यंत तसाच चालत गेला. त्याच मार्गावर मि० रीड नांवाच्या गृहस्थाचें घर असून त्याची अठरा वर्षांची डेबोरा नांवाची मुलगी आपल्या दरवाज्यांतच उभी होती, ती या तरुणाचा मोहक चेहरा पाहून अगदीं मोहित झाली.

**फ्रँक्लिन**, पाव खात तसाच रस्त्यानें चालून, पाणी पिण्याकरितां नदीवर गेला; व तेथें होडींत एक गरीब बाई आपल्या मुलांस घेऊन बसली होती, तिला राहिलेले दोन पाव त्यानें देऊन टाकले.

पुढें काय करावें हें त्याला सुचेना. तरी शहर पाहण्याच्या उत्कंठेनें तो बाजाररस्ता ह्मणून एक शहरांतील मुख्य रस्ता होता, तिकडे चालला. हा सर्व रस्ता देवळांत जाण्याकरितां, चांगले पोशाक करून निघालेल्या लोकांनीं गजबजून गेला होता: सकाळचे दहा नुक्तेच वाजले होते. ही मंडळी ग्रेटमीटिंग हाऊस ( भव्य सभागृह ) ह्मणून दुसरी गल्ली आणि राजरस्ता ह्या दोन्ही रस्त्यांचे कोपऱ्यावर क्वेकर्स* लोकांची इमारत होती, तींत शिरली.

---

* **एलिझाबेथ** राणीचे, धर्माधिकारीत्व न मानणाऱ्या प्रोटेस्टंट पंथानुयायांनीं इ. स. १५३६ सालीं इंग्लिशचर्चशीं असलेला आपला संबंध तोडून टाकून **प्युरिटन्स** नांवाचा एक नवाच धर्मपंथ काढला. याच्या एका पोटभेदाला 'क्वेकर्स' ह्मणतात. हे हिंसाकरणें निंद्य मानीत आणि अप्रतिकारतत्वाचें प्रतिपादन करीत. ते आपणाला मित्र ह्मणवीत. त्यांची बोलण्याची पद्धत कांहीं निराळी असून त्यांचें राहणेंही साधें असे.

सर्वांबरोबर फ्रँक्लिनही आंत गेला व एका खुर्चीवर ब-सला, परंतु त्याला लौकरच झोंप लागली, वेळ भरतांच सर्व मंडळी भराभर चालती झाली. इतक्यांत एकानें मेहेरबानी करून त्या थकलेल्या प्रवाशास हलवून जागें करतांच तो बाहेर पडला, व ज्या रस्त्यानें ओळखीचें ह्मणून कोणी भेटावयाचेंच नाहीं व जेथें पैसे खर्च केल्यावांचून फुकटचा आसराही मिळावयाचा नाहीं, अशा रस्त्यानें जाऊं लागला.

तो नदीकडे चालला असतां वाटेंत त्याला एक क्केकर भेटला; त्याची मुद्रा पाहून त्यास मोठा आनंद झाला आणि त्यानें त्याला चांगलें सभ्य ठिकाणीं सुखावह असें बिऱ्हाड कोठें मिळेल ह्मणून विचारिलें. त्या ममताळू क्केकरानें क्रुकेटविलेट नांवाची एक खाणावळ त्याला दाखविली. फ्रँक्लिनानें तेथें जाऊन थोडक्याच खर्चांत जेवण तयार करण्यास सांगितलें, जेवण झाल्यावर तो निजला आणि रात्रीच्या जेवणास उठला. तें आटोपल्यावर त्यानें पुनः पथारी ताणली ती उजाडपर्यंत !

त्याला घर सोडून अकरा दिवस झाले होते, व त्याच्या जवळच्या पैशांचा निकाल लागून कपड्यांच्या चिंध्या उडाल्या होत्या. त्याला मि. ब्रॅडफर्डचा मुलगा भेटून आपणास धंद्यास लावील, अशी आशा मात्र होती, परंतु तीही मनांतल्या मांड्यांप्रमाणेंच काल्पनिक म्हटली तरी चालेल. सकाळींच त्यानें आपले, प्रवासांत खराब झालेले कपडे, बूट आणि टोपीही कुंच्यानें झाडून साफ केलीं, व दिसण्यामध्यें आणवेल तितका सभ्यपणा आ-

णून तो अँड्रू ब्रॅडफर्ड याजकडे गेला. त्याचा बापही न्यु-यार्कहून घोड्यावर बसून नुक्ताच आला होता हें पाहून फ्रँक्लिनाला मोठें आश्चर्य व समाधान वाटलें.

बेंजामिनाचा तेथें मोठा सत्कार होऊन फराळाचें आमंत्रणही त्याला मिळालें. तथापि अँड्रू ब्रॅडफर्डानें दुसरा मनुष्य नुकताच ठेविला, हें ऐकून त्याची अगदीं निराशा झाली. परंतु ब्रॅडफर्ड साहेबानें त्याला असें सांगितलें कीं, " येथें कोणी केइमर नांवाचा मनुष्य असून, अलीकडे छापण्याचें काम त्यानें चालू केलें आहे. त्याला एकाद्या मनुष्याची जरूर असेल, तर मी तुह्माला नेऊन त्याची तुमची ओळख घालून देतों.

ते त्याजकडे गेले असतां केइमर दिसण्यांत त्यांना मोठा चमत्कारिक मनुष्य दिसला. तो एका लहानशा जागेंत एक जुनें मोडकळीस आलेलें छापण्याचें यंत्र आणि थोडेसे जुने झालेले ठसे घेऊन बसला होता. त्यानें फ्रँक्लिनाला कांहीं प्रश्न विचारून थोडे ठसे जुळण्यास सांगितलें, व ह्याचें काम पाहून आपण खुष झालों असें दाखविलें. तो ह्मणाला, " सध्यां जरी काम नसल्यामुळें तुला ठेवितां येत नाहीं तरी पुढें मागें मी तुझी सोय करीन. बेंजामिनानें वाट न पाहतां तें मोडकें यंत्र नीट करण्याच्या कामास सुरवात केली असें दिसतें. कारण तेव्हांपासून तो ब्रॅडफर्डकडे जेऊन केईमरपासून कामाबद्दल घेतलेले पैसे जेवणासंबंधानें देऊं लागला.

---

# भाग ३ रा

---

## इंग्लंडचा प्रवास.

डिबोरेच्या घरीं फ्रँक्लिनचा प्रवेश–गव्हर्नर केइथ त्याला भेटण्याकरितां येतो–बोस्टनला जाणें–कॉलिन्सला घेऊन फ्रँक्लिनचें परत येणें–केइथ साहेबांची मदत–व्यसनांचा परिणाम–व्हर्नानचा पैसा–त्याचे तिघे मित्र–डिबोरेस वचन–इंग्लंडला जाणें–केइथचें कपट–राल्फ–लंडन मधील छापखान्यांत नोकरी.

केइमर यास, फ्रँक्लिन हा चांगला काम करणारा असून, त्याच्या चाकरी पासून आपल्यास बराच फायदा होईल असें दिसून आलें. त्याचें स्वतःचें घर नव्हतें, तरी आपल्या नोकरानें आपल्या प्रतिस्पर्धी छापखानेवाल्याकडे जेवावें हें त्याला बरोबर वाटेना; ह्मणून त्यानें त्याची थोड्या दिवसांपूर्वीं, फ्रँक्लिनाला पाहून आनंद पावलेल्या डिबोरेच्या बापाकडे सोय लावून दिली.

फ्रँक्लिन न्यूयार्काहून निघाला त्यावेळीं त्यानें आपली कपड्यांची पेटी निराळ्या मार्गानें रवाना केली होती, ती यावेळीं येऊन दाखल होतांच त्याला शिष्टसंप्रदायाप्रमाणें पोशाक चढवून त्या सुंदरी डिबोरे कडे जातां आलें.

त्याची बोलण्याची ढब एकाद्या मोठ्या सभ्य गृहस्थाप्रमाणें असून तो दिसण्यांतही फारच सुरेख होता.

**फ्रँक्लिना**ला आतां चांगले दिवस आले. त्याच्या धन्यानें त्याच्या आंगचे अनेक विलक्षण गुण पाहून त्याचा पगार वाढविला. तो ज्या कुटुंबांत रहात असे तें मोठें मनमिळाऊ असून त्याच्या सुशिक्षित मनास समाधान देण्यासारखें होतें. पुष्कळ दिवसपर्यंत त्याला त्याच्या **बोस्टनच्या** मित्रांकडून कांहींच कळलें नाहीं; व भावाच्या निष्ठुरतेनें तो इतका त्रासला होता कीं, कांहीं दिवस बोस्टन विषयींचे सर्व विचार आपले मनांतून अगदीं जातील तरी बरें, असें त्याला वाटत होतें. त्याला आपल्या बहिणी पैकीं एकीचें लग्न बोस्टनपासून डेलावेराच्या किनाऱ्यावरील सर्व बंदरें घेणाऱ्या गलबतावरील मुख्य नावाडी **रॉबर्ट हालेम्स** याशीं झालें असें कळलें.

ह्या दिवसांत चांचे लोकांचा फारच त्रास असल्यामुळें गलबतवाल्यांस आपले जहाजांवर तोंडोतोंड भरलेल्या तोफा आणि उत्तम धारेच्या तरवारी सदोदित बाळगाव्या लागत; ह्यामुळें गलबत चालविणें ह्मणजे एक जबाबदारीचें व साधारण मनुष्यास अशक्य असें काम होतें. यावरून **हालेम्स** हा साधारण मनुष्य नव्हता, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. बायकोवर असलेल्या विशेष प्रीतिमुळें त्यानें **फ्रँक्लिन** यास, "झालें तें झालें, तुमच्या वियोगानें कुटुंबांतील सर्व मनुष्यांस फार दुःख होत आहे; तर कृपाकरून तुह्मी आतां परत यावें"अशा आशयाचें एक पत्र लिहिलें.

**बेंजामिनानें** ह्या पत्रास अशा खुबीनें उत्तर लिहिलें कीं, तें वाचतांच **हल्याम्स** यास समाधान वाटून, **फ्रँकलिन** निवून गेला, यांत त्याचा मुळींच दोष नाहीं, असा त्याचा पक्का ग्रह झाला. ज्यावेळीं हें पत्र त्याला पोहोंचलें, त्यावेळीं तो **पेनिन सिल्व्हयाचा** गव्हर्नर **सर वुइल्यम केइथ** याजपाशीं बोलत बसला होता. त्यानें हें पत्र गव्हर्नरास वाचून दाखवितांच लिहिण्याची आलंकारिक शैली पाहून तो फार खुष झाला; व हें पत्र लिहिणारा एक अठरा वर्षांचा मुलगा आहे. हें तर त्याला खरेंही वाटेना. तो ह्मणालाः—

"फिलाडेल्फियांतील छापखानेवाले आधीं सारे मूर्ख ! त्यांतून केइमर नुसता मूर्खच नाहीं तर लुच्चाही आहे. परंतु ह्या तरुण होतकरू मनुष्यास चांगलें उत्तेजन मिळणें फार अवश्य आहे."

एके दिवशीं **बेंजामिन** व त्याचा धनी काम करीत बसले असतां दोघे सभ्य गृहस्थ आपणाकडे येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. त्यांच्या पैकीं एक पेनिनसिल्व्हयाचा गव्हर्नर सर वुइल्यम केइथ व दुसरा **बेंजामिनाचा** त्यानें कधीं न पाहिलेला मेहुणा कप्तान हल्याम्स होता. केइमर, ते आपणास भेटण्याकरितां आले असतील असें समजून धांवत धांवत त्यांस खालीं सामोरा गेला. परंतु त्यांना आपला नोकर **बेंजामिन** याला भेटावयाचें आहे, असें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें, व तो त्यांस घेऊन वर गेला.

त्या दोघांनीं फ्रँक्लिनाचा फार संमान केला. गव्हरनरानें त्याला सलाम करून त्याशीं मैत्री करण्याची आपली इच्छा दर्शविली; व तो फिलाडेल्फियांत आला त्याच-वेळीं आपल्या बंगल्यावर आला नाहीं ह्मणून त्यास स्नेहा-च्या नात्यानें तो थोडा रागेंही भरला. शेवटीं ते दोघे त्याला शेजारच्या फराळाचे दुकानीं घेऊन गेले, व तेथें त्या तिघांनीं मित्रत्वाच्या नात्यानें वागून फराळ करते वेळीं पुष्कळ विषयांवर वादविवाद केला.

गव्हरनर साहेब मोठे गोडबोले, विश्वासास अपात्र, आणि वचनांची रेलचेल उडवून एकही तडीस न नेणारे अशाप्रकारचे मनुष्य होते. त्यांनीं, फ्रँक्लिनानें स्वतंत्र छाप-खाना काढून पेनिनसिल्व्हिया आणि डेलावेअर प्रां-तांतील छापण्याचें सर्व काम करावें असें सुचविलें व ह्या कामाकरितां, त्याच्या बापानें पैसा द्यावा, ह्मणून त्याज-पाशीं आपलें वजन खर्चिण्याचें कबूल केलें.

आपला बाप इतके पैसे खर्च करण्यास समर्थ नाहीं व कबूलही होणार नाहीं, ह्मणून बेंजामिनानें किंचित् दुःख दर्शविलें, तेव्हां गव्हरनरानें आपण स्वतः त्यास ह्या कामांत कसा फायदा होईल वगैरेविषयीं सविस्तर हकीकत लिहून कळविण्याचें वचन दिलें.

ह्या भेटीच्या प्रसंगीं असें ठरलें कीं बेंजामिन यानें गव्हरनर साहेबांचें पत्र घेऊन आपल्या वडिलांचें मन ह्या बेताकडे वळविण्याकरितां प्रथम जें गलबत निघेल त्यांतून बोस्टन येथें निघून जावें.

आठपंधरा दिवस निघून गेल्यावर **बोस्टनाला** जाणारें एक गलबत तयार झालें. ह्या वेळचे लोक यांत्रिककलांत छापण्याची कला श्रेष्ठ मानीत, व तींत कांहीं पवित्रपणा आहे असें समजून छापण्याचा धंदा विद्वान् लोकांच्या धंद्यांत गणला जात असे. **फ्रँक्लिन** यास गव्हरनराकडून जेवणाचें आमंत्रण वारंवार येत असे. त्याचें आत्मसंयमन, त्याचा पोशाक, त्याची बोलण्याची ढब आणि विषयप्रतिपादनाची शैली इत्यादि गुणांनीं तो तेथल्या सर्व मंडळीस फारच प्रिय झाला.

इ. स. १७२४ च्या एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांत **फ्रँक्लिन** एका लहानशा गलबतांत बसून **बोस्टनला** जाण्याकरितां निघाला. त्याला आपला बेत गुप्त ठेवणें विशेष महत्वाचें वाटल्यावरून त्यानें तसें केलें. आणि ह्मणून **फिलाडेलिफयांतील** त्याच्या स्नेही मंडळीस, तो **बोस्टन** येथील आपल्या सोबत्यांस भेटण्याकरितां जात आहे. ह्यापलीकडे कांहींएक माहिती नव्हती.

वाटेनें अतिशय वादळ होऊन गलबतांत पाणी शिरूं लागलें; ह्मणून खलाशी व उतारू लोकांनीं रात्रंदिवस मेहनत घेरून तें उपसण्याचा सपाटा चालविला. अशा रीतीनें चौदा दिवसपर्यंत ठोकरा खाऊन् एकदांचें तें गलबत **बोस्टनच्या** किनाऱ्यास येऊन पाहोंचलें. फ्रँक्लिनाला घर सोडल्यास यावेळीं सात महिने पुर झाले होते.

तो एकाएकीं आल्यामुळें त्या मोठ्या कुटुंबांतील सर्वजणांस आश्चर्य वाटलें. दोन दिवस मुंबईसारख्या एका-

ह्या मोठ्या शहरांत काढून भिकारसा धंदा करून कां होईना, परंतु दोन पैसे मिळवून, परत आल्यावर आमच्या इकडच्या एकाद्या अक्षरशत्रूस सुद्धां मोठा डौल येतो. तर अल्पवयांतच केवळ आपल्या बुद्धीच्या प्रभावानें मोठ्या योग्यतेस चढून चार पैसे मिळवून आणल्यावर आमच्या चरित्रनायकानें थोडा झोंक दाखविला यांत आश्चर्य तें काय ? त्याचा पोषाक नवा व सुबक होता; आणि त्यानें एक सुंदर घड्याळ विकत घेऊन तें लोकांस दिसेल अशारीतीनें अडकविलें होतें. ह्या वेळीं त्याजपाशीं सुमारें पंचवीस डालर्स शिल्लक होते.

आपल्या जुन्या नोकराची ही ऐट पाहून जेम्सला फार वाईट वाटलें. त्यानें तिरस्कारयुक्त मुद्रेनें त्याला नखशिखांत पाहून कोणत्याही रीतीनें आनंदप्रदर्शित न करितां निमूटपणें तो आपल्या कामास लागला. परंतु त्या थोर मनाच्या मुलाचा यांत तिळभरही अपमान झाला नाहीं. त्याचे जुने सोबती त्याच्या भोंवतीं गराडा घालून त्याच्या सफरीची हकीकत मन लावून ऐकूं लागले. त्यानें फिलाडेल्फिया संबंधीं सर्व वृत्त त्यांस मोठ्या उत्सुकतेनें सांगितलें, व आपल्या खिशांतील चांदीचीं नाणीं त्यांस दाखवून त्यांतील कांहीं पैसे त्यांस दारू पिण्याकरिता ह्मणून दिले.

आमचे वाचक, फ्रँक्लिन हा आज सात महिन्यापूर्वी आपल्या भावाच्या जांचास कंटाळून पळून गेला होता, हें स्मरून त्याच्या ह्या वर्तनाबद्दल त्याला, व जेम्स हा

अगदीं गरीब स्थितींत असून मोठ्या संकटांत होता हें जाणून त्याला क्षमा कारितील, व त्यांच्या दोषांकडे विशेषसें लक्ष देणार नाहींत असें वाटतें. कोरंट पत्रांत फ्रँक्लिनाचे चरचरीत लेख येईनातसे झाल्यामुळें त्याचे वर्गणीदार कमी होऊन तें यावेळीं बंद पडलें होतें.

बेंजामिनाचा बाप जोसिआ ह्याला मिळेल तितका पैसा आपल्या धंद्यांत घालावयाचा होता. त्यानें सर वुइल्यम केइथ याचें पत्र मोठ्या शांततेनें कांहीं एक न बोलतां शेवटपर्यंत वाचलें, व आपल्या मुलाचें बोलणेंही लक्ष लावून ऐकिलें. इतक्यांत कॅप्टन हेलॅम्स तेथें आला. त्याजपाशीं याजबद्दल बराच वेळ बोलून शेवटीं आपलें मत देतांना तो ह्मणाला कीं, "आठरावर्षांच्या अल्पवयी मुलाला एवढ्या जबाबदारीच्या कामांत स्वतंत्र रीतीनें घालूं पाहणारे हे वुइल्यम केइथ जरा अल्पविचारीच दिसतात."

**कॅप्टन हल्यॅम्स** ही तेथें आला होता त्यानें मोठ्या उत्सुकतेनें गव्हरनराचे विचार त्याच्या मनांत भरविण्याची पुष्कळ खटपट केली, परंतु **जोसिआ फ्रँक्लिनानें** विचारा अंतीं मी ही रक्कम देत नाहीं, ह्मणून स्पष्ट सांगितलें. तो ह्मणालाः—

" असलें महत्वाचें आणि धैर्याचें काम हातीं घेण्याचें त्याचें वय नव्हे. आतां पेनिनसिल्व्हियाचे गव्हरनराची शाबासकी मिळवून आपल्या मेहनतीनें आणि विश्वासुकपणानें तो चांगला प्रसिद्धीस आला, ह्या गोष्टीबद्दल मला फार आनंद वाटतो. पुनः जर तो **फिलाडेल्फियाला**

परत जाऊन एकवीस वर्षांचा होईपर्यंत आपलें काम तत्परतेनें करील, आणि टाकवेल तितका पैसा मोठ्या काळजीनें मागें टाकील, तर पुढें मजकडून होईल ती मदत मी त्याला करीन."

तो **बेंजामिनास** ह्मणाला, "बाळा! लोकांवर असे वाग्बाण सोडून ज्या गोष्टी, चार धार्मिकलोक पूज्य ह्मणून मानितात, त्यांची लोकांत अशी टवाळी करूं नये." त्यानें गव्हरनरास एक पत्र पाठवून त्यांत आपल्या मुलाविषयीं त्यानें दाखविलेल्या ममतेबद्दल त्याचे आभार मानिले, व पैसे न देण्याचें कारणही त्यास लिहिलें. वास्तविक पाहतां **जोसिआ फ्रँक्लिन** हा; बुद्धि, नीति, आदिकरून प्रत्येक बाबतींत त्या उथळमनाच्या गव्हरनरापेक्षां फारच श्रेष्ठ होता.

ह्यानंतर साठ वर्षांनीं **फ्रँक्लिनानें रे. कॉटनम्याद**रच्या मुलास एक पत्र लिहिलें, त्यांतला एक मनोरंजक उतारा खालीं दिला आहे:—

'तुमच्या वडिलांची व माझी भेट मी प्रथम **पेनिनसिल्व्याला** गेल्यानंतर लागलीच ह्मणजे इ. स. १७२४ मध्यें झाली. त्यांनीं आपल्या वाचनालयांत माझी गांठ घेतली. पुढें मी त्यांचा निरोप घेऊन निघालों असतां त्यांनीं मला घराचे बाहेर पडण्यास एक जवळची वाट दाखविली, ती फार अरुंद असून तीवरून एक बहाल आडवें टाकिलें होतें. मी निरोप घेतला तरी ते मजब-

रोबर बोलत येतच होते. ते मागं व मी पुढं चाललों होतों. इतक्यांत ते ओरडून ह्मणाले, "वांका ! वांका" !! माझें डोकें बहालावर आपटेपर्यंत मला त्यांच्या ह्या बोलण्याचा हेतु कळला नाहीं. उपदेश करण्याची संधि फुकट दवडीत नसल्यामुळें ते मला ह्मणाले—"मुला, तूं अद्याप लहान आहेस, आणि ह्या जगांत तुला आपलें आयुष्य कंठावयाचें आहे. करितां त्यांतील लोकांपाशीं तूं नम्रतेनें वाग; ह्मणजे तुझ्या, पुष्कळ ठोकरी चुकून तुला सुख होईल." हा उपदेश मी नेहमीं स्मरत असून, मला त्याचा अद्याप पुष्कळ उपयोग होतो. विशेषतः गर्विष्ठ लोकांची मानहानि किंवा त्यांवर आलेलीं संकटें पाहून तर मला त्याची अवश्य आठवण होते."

**बोस्टन** येथें **कालिन्स** नांवाचा फ्रँक्लिनाचा एक मित्र होता, तो दिसण्यांत फार सुरेख असून कोणाची पर्वा करीत नसे. व्यसनांत पैसा उडविणें तर त्याच्या आंगवळणीं पडलें होतें फ्रँक्लिनानें त्याजपाशीं केलेलें **फिलाडेलफियाचें** वर्णन ऐकून तो फार खुप झाला, आणि तिकडे जाण्याचा निश्चय करून तो न्यूयार्काला गेला ह्यामुळें फ्रँक्लिनावर एक मोठें अरिष्ट ओढवलें.

**फ्रँक्लिन** हा गलबतांत बसून निघाला, व तें गलबत **न्यूपोर्ट** बंदरास लागलें. त्या ठिकाणीं त्याचा भाऊ **जॉन** हा मेणबत्त्या करण्याचा धंदा करीत असे, त्यानें त्याचा मोठा सत्कार केला. येथें जे उतारू चढले, त्यांत **न्यूयार्कला** जाणाऱ्या डामडौली आणि भपकेदार पोशाक

चढविलेल्या दोन तरुण स्त्रिया होत्या, त्यांनीं **फ्रँक्लिनाशीं** स्नेह जोडण्याकरितां आपली शिकस्त केली.

याच गलबतावर एक सभ्य क्केकर स्त्री होती, तिनें मातृवात्सल्यानें त्या अनुभवी तरुण **फ्रँक्लिनास** एकीकडे बोलावून त्या दुष्ट स्त्रियांच्या फासांत न पडण्याविषयीं सुचविलें. त्याला जरी ह्या उपदेशाची विशेषशी आवश्यकता नव्हती, तरी यामुळें तो जास्त सावध राहिला. त्या **न्युयार्क** बंदरीं उतरल्यावर **बेंजामिनाला** आपल्या घरीं भेटीस बोलावूं लागल्या, परंतु त्यानें तें कबूल केलें नाहीं. त्याला गलबतावरील अधिकाऱ्यानें, "त्या बायांनीं तुमच्या चांदीचा चमचा लांबविला," असें सांगितलें. ही वस्तु त्यावेळीं साधारण कुटुंबांत मुळींच दृष्टीस पडत नसून मोठी मौल्यवान् गणिली जात असे. तेव्हां **बेंजामिनानें** त्यांजवर फिर्याद लाविली, तींत गुन्ह्याची शाबिती होऊन दोघीही आरोपी बायांस भरबाजारांत फटके मिळाले.

फ्रँक्लिन **न्यूयार्काला** येतांच प्रथम त्याला त्याचा लंगोटीमित्र **कालिन्स** भेटला. हा लहानपणीं अगदीं निर्व्यसनी, मोठा उद्योगी आणि बुद्धिवान् असा होता, परंतु पुढें तो व्यसनाधीन होऊन जुगार खेळत असे, इतकेंच नव्हे, तर नेहमीं दारूच्या तारेंत अगदीं गुंग राही. त्याला अगदीं गरीब स्थिति आली होती, ह्मणून **फ्रँक्लिनानें** त्याच्या पोटाकरितां कांहीं पैसे दिले, आणि **फिलाडेलल्फियापर्यंतच्या** वाटखर्चीचीही त्याची सोय लाविली.

**वुइल्यम बर्नेट** हा **फिलाडेल्फियाचा** गव्हरनर

होता. त्याला पुस्तकांचा फार नाद असून त्यानें त्यांचा मोठा संग्रह केला होता. **फ्रँक्लिनालाही** तोच नाद असल्यामुळें त्यानें **फिलाडेल्फियास** नेण्याकरितां पुष्कळ पुस्तकें बरोबर घेतलीं होतीं. **फिलाडेल्फियास** जाणाऱ्या गलबतावरील मुख्यानें आपल्या जहाजावर पुस्तकांचा शोकी, एक तरुण गृहस्थ आला आहे, ही बातमी गव्हरनरास कळविली. त्यावेळीं त्यानें कप्तानालाच त्याला आपल्या भेटीस आणण्याविषयीं सांगितलें. ह्या भेटीविषयीं **फ्रँक्लिन** येणेंप्रमाणें लिहितोः—

"मी गव्हरनराच्या भेटीला गेलों, त्यावेळीं **कालिन्स** जर शुद्धीवर असता तर त्यालाही घेऊन गेलों असतों. त्यानें माझा सत्कार केल्यावर आमचें पुस्तकांविषयीं व ग्रंथकर्त्यांविषयीं बरेंच भाषण झालें. माझ्याविषयीं कळकळ दाखविणारा हा दुसरा गव्हरनर असल्यामुळें मला त्यावेळीं मोठा आनंद झाला यांत कांहीं विशेष नाहीं."

**फिलाडेल्फियाला** जातांच **फ्रँक्लिनानें** आपल्या बापाचें पत्र **केइथसाहेबांस** दाखविलें. तें वाचून तो ह्मणालाः—

"तुमचे वडील वाजवीपेक्षां फाजील दूरदृष्टी दिसतात! मनुष्यांमनुष्यांत तरी अंतर आहे; शहाणपण कांहीं वयावर अवलंबून नसतें! वयोवृद्ध तेवढा आपला विचारी आणि तरुण तेवढा अल्पदृष्टि असलाच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. बरें असो, तुम्ही, इंग्लंडांतून कोणकोणत्या जिनसा आणावयाच्या त्यांची एक यादी करून

आणा ह्मणजे मी त्या मागवितों. तुह्मांला पैसे मिळतील, त्यावेळीं सावकाश माझी फेड करा. मग तर झालें ? येथें एक चांगला छापखानेवाला पाहिजे, आणि माझी खात्री आहे कीं, तुह्मीं तें काम फार उत्तम रीतीनें कराल."

ह्या सर्व बोलण्यावरून **फ्रँक्लिना**चा त्या गव्हरनरावर चांगला विश्वास बसला, व त्यानें पांचशें डालर्स किंमतीच्या सामानाची एक यादी करून त्याला दाखविली. गव्हरनर साहेब कोरड्या थापा मारण्यांत फार पटाईत होते, हें मागें सांगितलेंच आहे. त्यांनीं त्या यादीवर नुसती नजर फेंकून पैसा ह्मणजे आह्मांला कांहींच वाटत नाहीं, असें दाखविलें. व **फ्रँक्लिनाला** " तुह्मी स्वतःच **ॲनिस** गलबतांत बसून सामान आणण्याकरितां लंडनाला जा." असें सांगितलें. तें ऐकून **फ्रँक्लिनाला** फारच आनंद झाला. **ॲनिस** हें **लंडन** आणि **फिलाडेल्फिया** या दोन बंदरांमध्यें सफरी करणारें गलबत असून ह्यांपैकीं एका बंदराहून दुसऱ्या बंदराला जाण्याकरितां तें बरोबर एक वर्षानें निघे.

गलबत निघण्यास बरेच महिने अवकाश असल्यामुळें **फ्रँक्लिन**, केइमर कडेच काम करूं लागला. गव्हरनरानें ही बातमी कोणाजवळही फोडूं नको अशी **फ्रँक्लिनास** सक्त ताकीद दिली होती, ह्यामुळें त्यानें **केइमर** जवळ देखील एक अवाक्षरही त्याबद्दल काढलें नाहीं. हा बेत अशा रीतीनें गुप्त राखिल्यानें गव्हरन-

राची नसता डोल मारण्याची आवड, त्याचा विश्वास-घातकीपणा आणि गर्विष्टपणा हे व्यक्त करणारा. फ्रँक्लिन यास कोणी मिळाला नाहीं.

यापुढील सहा महिने फ्रँक्लिनानें मोठ्या आनंदांत घालविले. त्याला कांहीं दुखणेंबाणें न येतां तो आपल्या शारीरिक आणि मानसिक गुणांचें फळ यथेच्छ अनुभवीत होता. सर्व लोकांची त्याजवर चांगली मर्जी बसली होती. व त्याच्या धंद्यांतही त्याला चांगले पैसे मिळत होते. तो मोठा उत्सवप्रिय असून, मंडळीचा त्याला फार शोक असे; शिवाय गाणें आणि दारू पिणें यांचाही त्याला बराच नाद होता.

त्या वेळीं बेंजामिनासारखा सत्व घेऊन फोल टाकून देणारा तरुण मनुष्य मिळणें फार कठीण होतें. तो आनंदाच्या सर्व प्रसंगीं मंडळींत मोठ्या विचारानें वागे. तो जरी इतका मद्यप्रिय होता तरी आपल्याइकडील पुष्कळ अविचारी दारूबाजांप्रमाणें शक्तिबाहेर मद्यपान करून गटारांत लोळण्याचा प्रसंग त्याजवर कधींच आला नाहीं. जुगारांत पैसा घालणें त्याला मुळींच आवडत नसे. ज्या गोष्टी त्याला अडाणीपणाच्या किंवा निंद्य वाटत त्यांपासून तो अगदीं दूर राहत असे. व ज्या गोष्टीपासून शरीरास दुःख किंवा मनास त्रास होईल ती कधींही करावयाची नाहीं, असा त्याचा मोठा कडक नियम होता.

प्राणिमात्रांस सुखदुःख हें लागलें आहेच, असा नियम असतां फ्रँक्लिनालाच नेहमीं कोठून सुख मिळेल! तो

दारूबाज **कालिन्स** ह्मणजे त्याच्या भोंवतीं एक साडे-सातीच होती. त्याला तो मोठ्या जुलमानें पैसे पुरवी. **व्हरनान** नांवाच्या **फ्रँक्लिन**च्या एका मित्रानें पन्नास डॉलरची ठेव प्रसंगीं उपयोगी पडावी ह्मणून त्याजपाशीं ठेविली होती. ती त्यानें आपल्या ह्या उधळ्या मित्राकरितां खर्च केली. तेव्हां पैशाची मागणी होते कीं काय, अशी रात्रंदिवस त्याला मोठी चिंता पडली. कॉलिन्सचें व त्याचें लवकरच अगदीं पटनासें झालें.

**व्हरनान**चे पैसे खर्च केले ही आपली पहिली मोठी चूक, असें त्यानें आपल्या चरित्रांत लिहिलें आहे. जरी **व्हरनान**नें आपले पैसे, **फ्रँक्लिन** देण्यास समर्थ होईपर्यंत त्याजपाशीं मागितले नाहींत, तरीं पुष्कळ दिवसपर्यंत **फ्रँक्लिना**च्या जिवाला हा मोठा चटकाच लागला होता, व पुष्कळ प्रसंगीं तो आपणास ह्या गोष्टीबद्दल फारच दोष देई.

शेवटीं **फ्रँक्लिन** आणि **कालिन्स** हे एकमेकांस अगदीं पाण्यांत पाहूं लागले. एके दिवशीं कांहीं मंडळी मजेनें होडींत बसून चालली असतां, **कालिन्स** नेहमीं प्रमाणें आपले अमलांत गुंग होऊन कांहीं गैरवर्तन करूं लागला. हें पाहून **फ्रँक्लिन** यास जो राग आला, त्यासरसें त्यानें त्याला होडीखालीं ढकलून दिलें. **कालिन्स**ला चांगलें पोहतां येत होतें, ह्मणून गटंगळ्या खाऊं लागेपर्यंत त्याला कोणी वर घेतलें नाहीं. तो चांगला गुदमरून, त्यानें मी यापुढें चांगल्या रीतीनें वागेन, असें

कबूल केल्यावर मंडळींनें त्याला वर घेतलें. ह्यापुढें त्या दोघांचें भापण कधींच नाहीं. फ्रँक्लिनचे कालिन्सावर फार उपकार झाले होते, तेव्हां इतउत्तर तरी त्याच्या ऋणांत राहूं नये, ह्मणून कॉलिन्सनें बॅर्बाडोज, येथें एक नोकरी पत्करून तिकडे प्रयाण केलें, यापुढील त्याची हकीकत कळत नाहीं.

व्यसनाधीन मनुष्याचें केव्हां काय नुकसान होईल, याचा नियम नाहीं! पहा बरें, फ्रँक्लिन सारख्याच्या सत्संगास मुकून कालिन्सनें आपली जी छी थू करून घेतली, तिला व्यसनावांचून दुसरें कांहीं तरी कारण आहे काय?

फ्रँक्लिनला इंग्लंडास जाण्यास फक्त दोन महिन्याचा अवकाश होता तोंच, तो ज्यांकडे जेवीत असे ते रीडसाहेब निवर्तले. ते, त्यांची बायको आणि सुंदर व सुशील अशी त्यांची मुलगी डिबोरा यांच्या सहवासांत फ्रँक्लिननें मोठ्या आनंदानें दिवस घालविले होते. यावेळीं डिबोरेचें वय सतरा अठरा वर्षांचें असून फ्रँक्लिन व डिबोरा या दोघां मधली विलक्षण प्रीति अगदीं स्पष्ट दिसत होती. कुलशील आणि द्रव्य यांचा मेळ असल्यामुळें ह्या जोडप्याचें लग्न फार सुखावह होण्याचा संभव होता.

फ्रँक्लिनला गव्हरनराचा आसरा असल्यामुळें व आपणाला आतां चांगले दिवस येतील असें त्यास खात्रीपूर्वक वाटत असल्यामुळें त्यानें डिबोरेशीं वाग्निश्चय केला; आणि इंग्लंडाला जाण्यापूर्वींच लग्न उरकून घेऊन बायकोस तिच्या आईजवळ ठेवावें, असें मोठ्या उत्सुकतेनें दर्श-

विलें. रीड बाईनें दोघेंही लहान असल्यामुळें फ्रँक्लिन परत येईपर्यंत लग्न लांबवावें असा आग्रह धरिला. आपल्या इकडील बायका मनासारखा जांवई मिळत असतां असें कधीं बोलतील काय?

सर वुइल्यम केइथनें फ्रँक्लिनाला आपल्या घरीं नेऊन थापा मारण्याचा क्रम चालविलाच होता, खिळे, कागद किंवा छापण्याचें यंत्र घेण्याकरितां हुंडी वगैरे लिहून देण्याची तो अगदीं टाळाटाळ करी. गलबत निघण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली, तसतसे फ्रँक्लिन त्याजपाशीं पत्रें, हुंड्या वगैरे जरूरीचे कागद मागूं लागला. परंतु साहेब मजकुरांकडून "आज क्षमा करा" ह्या षडक्षरी मंत्रापलीकडे जबाबच मिळाला नाहीं. शेवटीं गलबत निघण्याचा दिवस येऊन ठेपला.

गलबत हांकारण्याच्या ऐन वेळीं गव्हरनर साहेबांच्या खासगीकडील चिटणिसानें फ्रँक्लिन यास भेटून कळविलें कीं, "न्यूकॅसलला गलबत लागणार आहे, तेव्हां साहेब तुह्मांला तेथें भेटून जरूरीचे कागदपत्र देतील" हें ऐकून फ्रँक्लिन बरें ह्मणून गलबतावर चढला. तें गलबत डेलावेअर आखाताच्या खालच्या आंगानें जाऊं लागलें. त्यावेळीं त्या रुंद व सुंदर आखाताचे दोन्ही किनाऱ्यांवर गवत उगवल्यामुळें ते हिरवेगार दिसत होते शेवटीं हें गलबत फिलाडेल्फिया पासून बत्तीस मैलांवर × न्यूकॅसल बंद-

× पेन्सिलव्हीया प्रांतांत डेलावेरा नदीच्या कांठीं एक शहर आहे.

रीं येऊन दाखल झालें. गव्हरनर साहेब तेथें आले नाहींत हें ऐकून फ्रँक्लिन अगदीं निराश झाला. नामदार साहेबांनीं आपणास महत्वाच्या कामाची निकड असल्यामुळें येतां आलें नाहीं वगैरे अनेक सबबी कळविण्याकरितां आपल्या चिटणीस साहेबांस पाठविलें होतें; व सर्व कागदपत्र गलबत चालू होण्यापूर्वींच कप्तानाच्या नांवें पाठवितों अशा प्रकारचा गुळचट निरोपही त्याजबरोबर फ्रँक्लिनाला सांगून पाठविला होता.

फ्रँक्लिनला मोठी आशा असल्यामुळें हे बडे साहेब आपणास फसवितील असें त्याच्या ध्यानींमनींही आलें नव्हतें; आणि वास्तविक पाहतां ह्या विचाऱ्याचा असा केसांनीं गळा कापण्यांत ह्या बड्या साहेबांचा एकादा उद्देश असेल, असें कोणासही वाटण्याचें कारण नव्हतें. शेवटीं साहेबांकडून पत्रांनीं भरलेली एक पिशवी येऊन ठपली व गलबतही शीड उभारून चालू झालें. फ्रँक्लि-नानें ह्या पत्रांपैकीं आपल्या नांवाचीं तेवढीं पत्रें कप्ताना-जवळ मागितलीं, परंतु तो कामांत गढून गेला असल्या-मुळें त्यानें सवडीप्रमाणें तीं शोधून देण्याचें कबूल केलें.

नोव्हेंबर महिन्याच्या २४ व्या तारिखेस लंडनला पाय लागले; तों पर्यंतचे सर्व दिवस बरेच हालांत गेले. वाटेनें कप्तान व फ्रँक्लिन ह्या दोघांनीं मिळून ती सर्व पिशवी मोठ्या काळजीनें तपासली, परंतु फ्रँक्लिनाच्या नांवाचें एकही पत्र तींत आढळलें नाहीं. तरी त्या पत्रांपैकीं कांहीं पत्रें दुसऱ्याचे नांवचीं असून त्यांच्या लिफाफ्याचे

एके आंगास—हीं पत्रें आपल्या कामाबद्दल आहेत, असें फ्रँक्लिन यास वाटावें ह्मणूनच कीं काय कोणजाणे—फ्रँक्लिनाचें नांव घातलें होतें. ह्या पत्रांपैकीं एक राजाच्या छापखानेवाल्याच्या व दुसरें लंडन येथील कागद, शाई, टांक वगैरे लिहिण्याचें सामान विकणाऱ्या एका बड्या दुकानदाराच्या नांवाचें होतें. हीं दोन्हीं पत्रें पाहून आमच्या प्रवाशास आपल्या हाल भोगून केलेल्या सफरीचें खास चीज होईल, असें वाटलें. लंडनमध्यें जातांच त्यानें प्रथम कागद वगैरे सामान विकणाराचें पत्र त्यास देऊन हें पेन्सिल्व्हानिआचे गव्हरनर सरविल्यम केइथ यांनीं दिलें आहे, ह्मणून सांगितलें; हें ऐकून त्या व्यापाऱ्यास मोठें आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला:—

"गव्हरनर केइथ या नांवाचा एकही मनुष्य माझ्या ओळखीचा नाहीं." असें ह्मणून त्यानें तें पत्र फोडलें, व त्यावरील सही वाचून, "रिड्लसडेन*! हा अगदीं लुच्चा मनुष्य आहे, असें मला नुकतेंच कळून आलें, त्याची आणि त्याच्या पत्राची मी मुळींच पर्वा करीत नाहीं." इतकें बोलून त्यानें तें पत्र फ्रँक्लिनच्या आंगावर टाकिलें व आपण गिऱ्हाइकास माल देण्याकरितां चालता झाला.

हा सर्व प्रकार पाहून फ्रँक्लिन आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेला, त्यानें ही सर्व हकीकत मि० डेन-

---

* "हा एक लबाड वकील असून, त्याचा व कोईथचा कांहीं संबंध असावा अशी या दुकानदारास शंका आली असें दिसतें" असें फ्रँक्लिननें लिहिलें आहे.

हॅम यास सांगितली ह्या उभयतांचा येते वेळीं गलबतावर मोठा स्नेह जमला होता. असें करण्यांत गव्हरनराचा काय उद्देश असेल याची जरी त्यांना कल्पना करितां येईना तरी त्या दुष्टानें फ्रँक्लिनला हुंडी अथवा लंडनच्या लोकांबरोबर ओळख घालून देणारें एकादें पत्र वगैरे कांहीं एक दिलें नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री झाली. डेनहॅमनें आपल्या सोबत्यास सांगितलें कीं, ह्या साहेबांच्या वचनावर त्यांच्या ओळखीचा एकही मनुष्य विश्वास ठेवीत नाहीं; शिवाय यांची पत येथील लोकांशीं मुळींच नसल्यामुळें हे हुंडी देतील असें मानणें हीच मोठी चूक होय.

फ्रँक्लिनाचा परम मित्र जेम्स राल्फ, त्याला, लंडनास येत असतां वाटेंत भेटला व ह्या अफाट शहरांत ते दोघेही बरोबर आले. तेथें त्या उभयतांस एकमेकांवांचून दुसऱ्या कोणाचाही आधार नव्हता. त्यांची कोणाशीं ओळख होण्याचा संभव नव्हता, व कोठें धंदा मिळण्याचें चिन्हही दिसत नव्हतें. फ्रँक्लिनाला राल्फच्या वर्तनाची अजून चांगलीशी परीक्षा झाली नव्हती, तरी त्याच्या सद्गुणांनीं राल्फच्या अविचारावर बराच दाब ठेविला होता. त्यांजपाशीं पैसे नव्हते, तेव्हां आतां काय करावें, ह्मणून ते दोघेही विचार करीत बसले. त्यांनीं आपापली शिल्लक तपासिली त्यावेळीं राल्फजवळ पुऱ्या तीन दिडक्याही निघाल्या नाहींत. फ्रँक्लिन जवळ मात्र सरासरी सवाशें रुपये होते. तेव्हां राल्फ-

नें फ्रँक्लिनच्या पैशांवरच पुरवा पाडण्याचा क्रम चालविला, हें निराळें सांगणें नकोच.

फ्रँक्लिन आपल्या सामर्थ्यानें दोघांचींही पोटें भरील, अशी राल्फची पूर्ण खात्री होती.

अशा वेळीं फ्रँक्लिन मि. डेनहॅम यास कोणता धंदा करावा ह्मणून विचारण्याकरितां गेला असतां त्यानें कोठें तरी छापखान्यांत कामाची चौकशी करा, ह्मणजे कांहीं महिन्यांनीं, खर्चवेच जाऊन घरपर्यंत वाटखर्चीचे पैसे तुमच्याजवळ सहज शिल्लक रहातील, असें सांगून त्यास मोठें उत्तेजन दिलें. फ्रँक्लिनानें शांतपणें या गव्हरनर साहेबांच्या पाजीपणावर अशी टीका केली आहे कीः—

"असल्या घाणेरड्या कृति करून एकाद्या गरीब अज्ञान मुलास अशा भयंकर रीतीनें फसविणाऱ्या ह्या बड्या नामदार साहेबांविषयीं काय बरें आपल्या मनांत येईल ? ही त्याला संवयच लागली होती; प्रत्येक मनुष्याला खूप ठेविण्यांत त्याला मोठें भूषण वाटे, परंतु देण्याला जवळ कांहींच नसल्यामुळें लोकांना तो मोठ्या आशा मात्र लावून ठेवी. एरवीं तो अगदीं मोकळ्या मनाचा, शहाणा, चांगला लेखक, व आपल्या कामांत मोठा वाकबगार असा होता. अमेरिकेच्या उत्तम कायद्यांपैकीं कांहीं त्यानें केले, व त्याच्याच कारकीर्दींत ते मंजूर झाले."

ज्या गव्हरनरानें त्याचा एवढा छळ केला, त्याविषयीं क्रोधावेशांत त्यानें एकही वांकडा शब्द लिहिला नाहीं,

यामुळें सर्व लोकांनीं फ्रँक्लिनाची पुष्कळ वाखाणणी केली.

फ्रँक्लिन आणि त्याच्या पैशांवर उदरनिर्वाह करणारा राल्फ या दोघांनीं मिळून एका गल्लींत एक भिकारशी जागा भाड्यानें घेतली. राल्फ हा मोठा वस्ताद बोलणारा असून चांगला शिकला सवरलेला होता. त्याची लहर लागली ह्मणजे, तो अशा खुबीदार रीतीनें भाषण करीत असे कीं, प्रत्येक मनुष्यास आपला आणि याचा स्नेह असावा अशी इच्छा साहजिक उत्पन्न होई. परंतु त्याला स्वतःचें हिताहित मुळींच कळत नसे. त्यावेळीं फ्रँक्लिनाची त्यावर मोठी प्रीति जडली होती. तो तरुण असून फार सुरेख होता, व त्याचें वर्तनही चांगलें होतें. जो जो ह्मणून त्याचें संभाषण ऐके, त्याला त्याला हा पुढें कोणी तरी प्रसिद्ध पुरुष होईल, असें वाटे.

फ्रँक्लिनानें दर आठवड्यास सरासरी पंधरा रुपये पगाराचा ठराव करून पॉमरच्या छापखान्याच्या जंगी कारखान्यांत काम पत्करिलें. त्यांत एकंदर पन्नास नोकर होते. राल्फला नाटकांत सोंगें घेणें फार आवडत असे. त्यानें पुष्कळ नाटककार मंडळ्यांत चौकशी केली, परंतु कोठेंही कांहीं जमेना. ह्मणून निराश होऊन स्पेक्टेटर ( प्रेक्षक ) नांवाचें वर्तमानपत्र चालविण्याचा त्यानें विचार केला, परंतु तें छापून प्रसिद्ध करणारा त्याला कोणी मिळेना. शेवटीं न्यायकचेऱ्यांमधून नकला करण्याचें काम तो पाहूं लागला, परंतु तेंही कोठें जुळेना. हा वेळपर्यंत फ्रँक्लिनच त्याला पैसे पुरवीत होता. त्याजपाशीं स-

वारीं रुपये शिल्लक होतेच आणि आठवड्यास हे पंधरा रुपये मिळत. इतक्या पैशांत ते दोघे मोठ्या आनंदानें रहात.

---

# भाग ४ था.

## मनाचा व नीतीचा झगडा.

कार्य व्यापृति—डिबोरेची उपेक्षा—फ्रँक्लिननें लिहिलेलें एक टीकाविषयक पुस्तक—पोहण्याचें चातुर्य—अमेरिकेला परत जाणें—मिस रीडचें लग्न—भयंकर आजारीपणा—डेनह्यामचा मृत्यु—केइमरची नोकरी—जंटो नावाची मंडळी—तिचीं धर्ममतें.

फ्रँक्लिन आणि रॅल्फ या दोघांचीं धर्म संबंधीं मतें बहुतेक सारखींच होतीं. रविवारीं देवळांत जाऊन व्यासपीठावरून निघालेलीं धर्माध्यक्षाच्या तोंडचीं चार धर्मवचनें ऐकण्यापेक्षां, मजेनें फिरावयास जाणें अथवा अन्यरीतीनें आपल्या मनाचें रंजन करून घेणेंच त्यांस बरें वाटत असे. वास्तविक पाहतां असें न करितां ते धर्मोपदेश ऐकण्यास जाते तर त्यांचा जास्त फायदा होता;

कारण सर्व लंडन शहरांत असें एकही देऊळ नव्हतें कीं, जेथें " लोकांचें हित करा अहित करूं नका, " हा उपदेश पुनः पुनः ऐकूं येत नसे.

फ्रँक्लिन आपल्या धन्याची चाकरी मोठ्या नेकीनें करीत असे. दिवसभर शारीरिक व मानसिक श्रम करून आलेला थकवा घालविण्याकरितां राल्फाला बरोबर घेऊन तो रात्रीं नाटक पाहण्याकरितां जात असे. ज्या नाटकांच्या योगानें आमच्या चरित्रनायक तरुण तत्त्ववेत्याचें मन फारच तल्लीन होऊन जाई, तीं उत्तम नाटककारांचीं उत्तम नाटकें होत, असें मानण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. राल्फवर दिवसें दिवस त्याची जास्तच मर्जी बसत चालली; कारण आपण ज्यावर उपकार करितों त्यावर, आपल्यावर जो उपकार करितो त्यापेक्षां, आपली जास्त ममता असते, असा सर्व साधारण नियम आहे.

ह्या दोघांस लंडन हें कांहीं अपरंपार सुखाचें स्थान आहे, असें वाटूं लागून, फ्रँक्लिनाला तर आपल्या नरादाराची आणि इष्टमित्रांची शुद्धिच नाहींशी झाली. लंडनसारखी सुखावह दुसरी जागाच नाहीं, असा त्याचा ग्रह झाल्यामुळें, तो देशीं परत जाईल किंवा नाहीं याचा पुष्कळांस मोठा संशय पडूं लागला. तो आपल्या धंद्यांत नेहमीं अगदीं चूर असे. त्याचा स्वभाव थोडा काटकसरी असल्यामुळें अडीअडचणींतून पार पडण्यास, त्याजपाशीं पैशाचाही बराच संग्रह झाला होता; व दिवसेंदिवस जास्तच होईल, अशी त्याची खात्री होती. तो

आपला मित्र राल्फ यासह निःकाळजीपणानें आपलें आयुष्य मोठ्या आनंदांत घालवूं लागला.

दिवसेंदिवस डिबोरेवरची त्याची प्रीति कमी होत चालली, त्याला तिची क्वचितच आठवण होई आणि तिला पत्र पाठविण्यालाही वेळ पण त्यास क्वचितच सांपडे. अलीकडे तो मुळींच पत्र पाठवीनासा झाल्यामुळें त्याच्या सुखरूपतेविषयीं तिला सहजच शंका उत्पन्न झाली. राल्फाला आपल्या बायका मुलांची आणि फ्रँक्लिनाला आपल्या वचनाची मुळींच शुद्धि राहिली नाहीं. ह्या गोष्टीचा आमच्या चरित्र नायकास पुढें जन्मभर अगदीं चटका लागून राहिला. त्यानें आपल्या वृद्धापकाळीं ह्या गोष्टीविषयीं लिहिलें आहे तें असें:—

" ही माझ्या आयुष्यांत घडलेली दुसरी मोठी चूक ! जर परमेश्वर कृपेनें मला ते दिवस पुनः येतील तर ती मी मोठ्या आनंदानें सुधारीन. "

पुष्कळ पगार मिळवून व तो सढळपणें खर्चून बेंजामिनानें एक वर्ष पॉमर याजकडे काढिलें. इंग्लंडमधील प्रख्यात धर्माध्यक्ष वोल्यास्टन यानें एक धर्म पुस्तक लिहिलें, तें पुष्कळांस पसंत पडल्यामुळें छापून प्रसिद्ध करण्याचें काम पॉमरानें पत्करिलें. पुढें त्यांतील कांहीं भाग फ्रँक्लिनाकडे खिळे जुळण्याकरितां आला- तेव्हां नेहमींप्रमाणें त्यानें तो ग्रंथ समग्र वाचून त्यावर टीकापर आणि त्यांतील मतांचें खंडण करणारें असें एक लहानसें

पुस्तक लिहिलें, व तें **जेम्स राल्फ** यास अर्पण केलें. ह्या पुस्तकाचे आरंभीं " जगाच्या वस्तुस्थितीवर मीं आपले सध्यांचे विचार यांत दाखल केले आहेत, " असें वाक्य त्यानें लिहिलें आहे.

एकोणीस वर्षाच्या मुलानें, लिहिलेलें हें पुस्तक, फारच चांगलें उतरलें होतें. आपणांपैकीं सर्वांत लहान मनुष्यानें केलेलें तें विद्याविषयक, धर्मविषयक आणि तत्वज्ञानप्रचुर असें पुस्तक पाहून छापखान्यांतील सर्व नोकरांस मोठें आश्चर्य वाटलें. आणि ते सर्व त्याला आपल्यांत शहाणा समजूं लागले.

**राल्फाची** एका तरुण कपडे विकणाऱ्या बाईशीं चांगली ओळख झाली होती, ती त्याजवर फारच ममता करून त्याला चांगला मान देत असे.

**फ्रँक्लिनाचा** खर्च वाढून त्याची प्राप्ति त्यालाच लागूं लागली, ह्मणून **राल्फाला** दूर करण्याचा विचार त्यानें काढला. **राल्फानें** हें पाहून एका खेडेगांवांत जाऊन तेथें शाळा काढिली, परंतु त्यांत त्याला मुळींच यश आलें नाहीं तेव्हां तो त्या बाईच्या साहाय्यानें राहूं लागला. परंतु तिच्यानें त्याला मदत होईना, ह्मणून तिनें पत्रद्वारें **फ्रँक्लिनाची** मदत मागितली. दुःख नाहींसें करण्याचें आंगीं सामर्थ्य असल्यावांचून तो त्यासंबंधीं विचार कधींही करीत नसे. त्या पत्रानें त्याच्या मनास मोठा द्रव आणला: आणि त्यानें तिला थोडे थोडे करून पगाराशी

तीनशें रुपये दिले. फ्रँक्लिनासारख्या मनुष्यानें सुद्धां आपले पैसे व शहाणपण खर्च करून तिची प्रीति संपादन करण्याचा यत्न केला आणि आपल्या मित्राचें मन तिज-विषयीं कलुषित करण्याची खटपट चालविली ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. परंतु त्या दोघांचा एकमेकांवर पूर्ण भरंवसा असल्यामुळें फ्रँक्लिनाच्या गैर वर्तनाबद्दल तिनें रालफाला कळवितांच त्या दोघांत मात्र वैर उत्पन्न झालें. रालफ ज्यावेळीं लंडनाला परत आला त्यावेळीं त्यानें फ्रँक्लिनाला तूं आजपर्यंत मजवर केलेल्या सर्व उपकारांस, ह्या तुझ्या दुर्वर्तनामुळें, हरताळ लावून टाकिलास; असें साफ सांगितलें.

फ्रँक्लिनानें, हा आपल्याकडून एक मोठाच अपराध घडला असें आपल्या आत्मलिखित चरित्रांत लिहून ठेविलें आहे. पुढें कांहीं दिवसपर्यंत रालफनें लोकांची पत्रें लिहिण्याचें काम केलें, परंतु आणखी कांहीं दिवसांनीं मोठमोठे लोकही त्याला एकादे कामांत संमति विचारण्यास येऊं लागून त्याची बरीच वाहवा झाली.

रालफला साहाय्य करण्याच्या त्रासांतून सुटका होतांच फ्रँक्लिनानें एका मोठ्या छापखान्यांत नोकरी धरिली. आनंदांत असतां दारूपिणें जरी त्याला मनापासून आवडत असे, तरी ती आहारा बाहेर पिऊन माथे फिरवून घेण्यांत तो मूर्खपणा मानीत असे. त्याचा नेहमींचा पिण्याचा पदार्थ म्हटला ह्मणजे गार पाणीच होय.

जो आमचा देश थोड्या दिवसांपूर्वीं मद्यपानापासून

अलिप्त होता. तोच आतां थोडक्या दिवसांत मद्यपानांत पुढारी होऊन बसेल कीं काय, अशी भीति सर्वांस उत्पन्न झाली आहे; कारण मद्यपान करणाऱ्या देशांत त्यापासून होणाऱ्या भयंकर परिणाम कळून आल्यामुळें मद्यपान निषेधक मंडळ्यांची स्थापना जारीनें होऊन त्यांचे मि. केन-प्रभृति उपदेशक आमच्या देशांत येऊन आपली छातीफोड करून आह्मांस उपदेश करूं लागले आहेत. दिवसानुदिवस दारूच्या गुत्यांची संख्या एकसारखी वाढत जाऊन सरकारच्या दारूपासून होणाऱ्या उत्पन्नांत कोट्यावधि रुपयांची भर पडत आहे, अशा प्रसंगीं दारू पिण्यापासून फायदे दाखविणाऱ्यांची फटफजीती उडविणारा फ्रँक्लिनाचा पुढील लेख सुराभक्तांनीं लक्ष्यपूर्वक वाचला असतां त्यापासून पुष्कळ फायदा होईल, असें आह्मांस वाटतें.—

"छापखान्यांतील माझ्या एका सोबत्यास न्याहारीपूर्वी अच्छेर, न्याहारीच्या वेळीं अच्छेर, न्याहारी आणि दोन प्रहरचें जेवण ह्यांच्यामध्यें अच्छेर जेवतेवेळीं अच्छेर आणि दिवसा काम आटोपल्यावर अच्छेर मिळून दिवसास अडिचशेर दारू लागत असे. मला ही त्याची पद्धति अगदीं निंद्य वाटली. परंतु तो ह्मणाला, पुष्कळ काम करण्याला पुष्कळ शक्ति पाहिजे, आणि पुष्कळ शक्ति येण्याला पुष्कळ दारू प्याली पाहिजे. मीं त्याला ह्मटलें, दारू ही पाण्यांत जवस, तांदूळ किंवा अशाच प्रकारचें एकादें धान्य मिसळून करितात. तेव्हां तिच्यापासून

येणारी शक्ति तितक्याच मानाची असली पाहिजे. तूं जर दोन पैशांची भाकरी खाऊन वर दोन पंचपाऱ्या भुरेखसें पाणी पिशील तर त्यानें येणारी शक्ति तुझ्या शेरभर दारूनेंही येणार नाहीं. कारण त्या भाकरींत अच्छेर दारूंतल्यापेक्षां जास्त धान्य असतें. मी इतकें सांगितलें तरी त्यानें दारू पिण्याचा क्रम सारखा चालविलाच होता. प्रत्येक शनवारीं रात्रीं ह्या घातकी दारूच्या पायीं त्याच्या रोजमुऱ्यांतून निदान दोन अडीच रुपये तरी खर्च होत. हा खर्च मला मुळींच नव्हता."

खरोखर पाहतां, ह्या मद्यसेवनामुळें घरांतील कोट्यवधि रुपयांची मालमत्ता नष्ट होऊन हातांत कटवा घेऊन पोटाकरितां दहा दिशा भटकणारे, कांचेसारखी क्षणभंगुर अब्रू नाहींशी होऊन घरांत तोंडें लपवून बसणारे आणि अतिदुर्लभ व अमोल्य अशा शरीरसंपत्तीचा नाश होऊन आमरण दुःसाध्य अशा रोगांच्या तावडींत सांपडून खाटेवर कुंथत पडणार असे पुष्कळ लोक आपण पाहतों, असें असूनही ह्या भयंकर व्यसनाचें पाऊल दिवसेंदिवस चढत्या वेगानें आपल्या देशाचें आक्रमण करीत असतां त्याचें निवारण करण्याचा आपण प्रयत्न करीत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे!

फ्रँक्लिनाच्या उपदेशानें, त्याच्या मित्रांपैकीं जे कांहीं सुधारले, त्यांविषयीं त्यानें येणेंप्रमाणें लिहिलें आहे.---

"माझ्या सांगण्यावरून, आणि अर्धाशेर दारूच्या किंमतींत ह्मणजे सरासरी एक आण्यांत, शेजारच्या एका

दुकानीं लोणी भाकर आणि आमटी इतकी न्याहारी मिळते असें पाहून, आमच्या, कारखान्यांतील पुष्कळ मंडळीनें आपला दारू पिण्याचा क्रम सोडून दिला. त्यांना हें जेवण जास्त सुखावह, स्वस्त आणि पथ्यकारक आहे, असें दिसून आलें. ज्यांनीं आपला क्रम सोडला नव्हता, व जे नेहमीं अमलांत गुंग रहात, त्यांची पैसे न दिल्यामुळें, पिठ्यावर नेहमीं नापत होई."

**फ्रँक्लिन** हा अगदीं उत्तम पोहणारा होता, हें मागें सांगितलेंच आहे. एकदां तो लंडनपासून **चेलसिया** येथें ह्मणजे बरोबर चार मैलपर्यंत पोहून गेला होता. एकदोन-दांच सांगून त्यानें आपल्या कांहीं मित्रांस पोहण्यांत तर-बेज करून सोडिलें. त्याला सर वुइल्यम **वाइंडहॅम** नांवाच्या गृहस्थानें आपल्या दोन मुलांस पोहण्यास शिकविल्यास पुष्कळ पैसे देण्याचें कबूल केलें, परंतु त्यानें तें नाकारिलें. या व अशाच एक दोन गोष्टींवरून फ्रँक्लि-नानें जर तेथें पोहणें शिकविण्याची शाळा काढिली असती तर त्याला पुष्कळ पैसे मिळाले असते, असें दिसून येतें. त्याला **लंडन**मध्यें राहण्याचा कंटाळा आला होता, ह्मणून त्यानें तेथल्या स्नेह्यांचा प्रीतिपाश तोडण्याचा बेत केला.

**डेनहॅमानें फिलाडेलल्फिया** येथें पुनः जाऊन एक जंगी किताबखाना काढण्याचा निश्चय केला; व **फ्रँक्लिन** यास सालाचे सातशें रुपये घेऊन दुकानावर राहण्याविषयीं विचारिलें. **फ्रँक्लिना**ला खिळे जुळण्याच्या कामांत जरी यापेक्षां जास्त पैसे मिळत होते. तरी पगार वाढेल

या आशेवर आणि विशेषतः लंडनच्या त्रासानें त्यानें ही जागा पतकरिली. ह्यावेळीं त्याचें वय सारें वीस वर्षांचें होतें. **फ्रँक्लिना**चा आयुष्यक्रम अजून ठरला नसावा असें दिसतें, कारण त्याला जशी वेळ पडे तसा तो वागत असे.

इ. स. १७२६ च्या जुलै महिन्याच्या पहिल्या तारखेस **वर्कशायर** गलबतावर बसून तो फिलाडेलफियास जावयास निघाला त्याला अमेरिका सोडून सुमारें दीड वर्ष झालें होतें. ह्या काळांत त्यानें मिळविलेला सर्व पैसा खर्चून टाकल्यामुळें त्याजपाशीं शिल्लक मुळींच नव्हती ह्मटलें तरी चालेल. ह्यावेळीं अटलांटिक महासागरांतून, इंग्लंडाहून अमेरिकेस जाण्यास गलबताला. तीन पासून सात महिने लागत असत, परंतु वर्कशायर तारूं ऐशीं दिवसांत **लाडेल्फियास** जाऊन दाखल झालें.

नेहमीं प्रमाणें त्यानें ह्या दूरच्या प्रवासांतही आपली रोजनिशी नियमित रीतीनें लिहून, तिचीं पानें चातुर्य आणि शहाणपणाच्या खुबीदार वाक्यांनीं भरून काढिलीं होतीं. आमच्या या चरित्रनायकास बुद्धिबळें खेळण्याचा फार नाद होता, ह्मणून तो थोडे श्रम होतांच एकादा डाव टाकीत असे.

***आइल ऑफ वाइट**चा गव्हरनर, जुलमी असल्यामुळें अपकीर्ति होऊन मरण पावला. **फ्रँक्लिन** आपल्या बोस्टन वरील टीकेंत ह्मणतो कीं, " चांगलें किंवा वाईट

---

* हें बेट **इंग्लंड**च्या दक्षिणेस आहे.

कांहीं नाहीं, सर्व गोष्टी ईश्वरीसूत्राप्रमाणें घडतात ह्यामुळें त्याच्या दृष्टीस सर्व सारख्याच " परंतु त्याच्याच एका पत्रांतील खालीं दिलेला उतारा त्याच्या ह्या आध्यात्मिक मतांच्या विरुद्ध आहे, असें वाचकांस आढळून येईल.—

" आईल ऑफ वाईट येथील गव्हरनराच्या मरणसमयीं असें आढळून आलें कीं, तो मोठा लबाड आणि राजकारस्थानी होता. तो आपला हेतु पूर्ण करण्याकरितां करीत नसे अशी अतिनीच गोष्टच आढळणें कठिण. तो इतका वस्ताद होता कीं, बहुतेक लोकांस मरेपर्यंत तो मोठा सज्जन आहे, असेंच वाटत होतें. एकंदरीत मनुष्य कितीही कावेबाज असला तरी सर्व आयुष्य लुच्चेगिरींत घालवून मेल्यावरसुद्धां प्रामाणिक ह्मणवून घेणें त्याला अगदीं अशक्य आहे. कोणीना कोणी तरी त्याच्या लबाड्या बाहेर काढतोच. ज्याप्रमाणें विस्तव आणि त्याची ज्वाला हीं कोणत्याही रंगानें हुबेहुब वठवितां येत नाहींत; त्याप्रमाणेंच सत्य आणि दाक्षिण्य या दोहोंस त्यांचें स्वतःचेंच कांहीं एक विवक्षित तेज आहे, ह्मणून तीं कोणालाही पुर्णपणें बनावट करितां येत नाहींत.

त्याच्या रोजनिशीवरून असें कळतें कीं, डिवोरेशीं केलेलें कपट, आणि लंडन येथें केलेला काळाचा अपव्यय या दोन गोष्टींबद्दल त्याला त्याची विचारशक्ति फार खात होती. त्यानें एका कागदावर, आपण आपल्या वर्तनांवर दाब ठेवण्याची एकादी तजवीज ह्या पूर्वींच योजिली नाहीं. याबद्दल दुःख प्रदर्शित करून आतां आपला आ-

पुष्यक्रम बदलावयाचा, कधीं खोटें बोलावयाचें नाहीं. आणि कोणाची निंदा न करितां आपल्या उद्योगांतच काळ चालवावयाचा, असें लिहून ठेविलें होतें. ह्यावेळीं आमच्या तरुण फ्रँक्लिनास हे नियम पाळणें ह्मणजे कांहींच नव्हतें ह्मटलें तरी चालेल.

**फिलाडेल्फियास** गळवन लागल्यावर वुइल्यम केइथसाहेबांची व याची रस्त्यांत सहज गांठ पडली. **फ्रँक्लिनाला** पाहतांच साहेब अगदीं गांगरून जाऊन एक चकारशब्दही न बोलतां निमूटपणें चालते झाले. पुनः त्या दोघांची मुळींच गांठ पडली नसावी असें दिसतें. ह्या गव्हरनर साहेबांचीं शेवटचीं पंचवीस वर्षें मोठ्या फजीतींत हालांत व दारिद्र्यांतच गेलीं.

इकडे त्या गरीब बिचाऱ्या डिबोरेचें अंतःकरण अगदीं उद्विग्न झालें, व तिला आतां **फ्रँक्लिनानें** आपणास जन्माचें सोडलें असें वाटूं लागून तिनें आपल्या मैत्रिणीच्या ह्मणण्यास अनुमोदन दिलें, व **राजर्स** नांवाच्या एका कारागिराशीं आपलें लग्न लाविलें. तो अगदीं कवडीच्या मोलाचा असून उघड लुच्चेगिऱ्या करी, आणि आपल्या धर्मपत्नीशीं कपटानें वागे. हें पाहून तिनें बरेच दिवस त्याबरोबर काढल्यावर माहेरीं जाण्याचा निश्चय केला. व तो लबाड मनुष्य ही कर्जदारास फसविण्याच्या उद्देशानें वेस्टइंडीज बेटांत निघून गेला. तेथें गेल्यानंतर त्यानें दुसरें लग्न केलें पुढें कांहीं दिवसांनीं फिलाडेल्फिया येथें त्याच्या मरणाविषयीं बातमी उठली.

फ्रँक्लिनानें मि० डेनहॅमच्या कारकुनाचें काम मोठ्या हिमतीनें आणि चातुर्यानें चालविलें, व त्या कामांत आपलें शहाणपण दाखवून त्यानें धन्याचा विश्वास आणि प्रीति हीं संपादन केलीं. तो आणि त्याचा धनी एके ठिकाणींच रहात. कोणत्याही गोष्टीविषयीं-फार तर काय, आपल्या आंगच्या दोषांविषयींही—गुणैक दृष्टीनें विचार करण्याचा परिपाठ ठेविल्यामुळें डिव्रोरेशीं केलेल्या विश्वास घाताबद्दल, त्याला कांहींच न वाटतां तो मोठ्या आनंदांत असे.

फ्रँक्लिनानें हें काम पत्करल्यानंतर चार महिन्यांनीं त्याला व त्याच्या धन्याला वरगडींत कळ निघण्याची भावना झाली. डेनहॅम तर ह्या भयंकर रोगास बळी पडलाच, परंतु फ्रँक्लिन मात्र मोठ्या शिकस्तीनें वांचला.

डेनहॅमच्या मरणामुळें त्याचा सर्व कारखाना अगदीं बसला, आणि फ्रँक्लिनाला निरुद्योगी रहाण्याची पाळी आली, तेव्हां त्याचा पूर्वींचा धनी केइमर यानें त्याला पुनः कामावर लाविलें. तेथें आणखी पांच अडाणी कामकरी होते, परंतु फ्रँक्लिन त्यांना आपल्या कामांत अगदीं पटाइत करून सोडील अशी केइमरची पक्की खात्री होती. ह्यांच्या व आणखी कांहीं असामींच्या सहाय्यानें बेंजामिनानें जंटो नांवाची एक मंडळी तेथें स्थापन केली. प्रत्येक शुक्रवारीं संध्याकाळीं ही मंडळी एके ठिकाणीं जमे, आणि दारूचे पेल्यावर पेले झोंकून मोठी मजा उडवी. त्यांनीं चोवीस प्रश्न काढिले होते, ते प्रत्येक सभेच्या

वेळीं वाचले जात, व त्यांचीं उत्तरें ज्याला सुचत तो देई. एक प्रश्न विचारल्यानंतर त्याचें उत्तर मिळून दुसरा विचारीपर्यंत प्रत्येकानें आपला पेला भरून झोंकावा असा नियम होता. ते प्रश्न कशा प्रकारचे होते, हें समजण्याकरितां त्यापैकीं कांहीं येथें सांगतों:—

१ तुह्मी नुकत्याच वाचलेल्या पुस्तकांत तुह्मांला काय आढळलें ?

२ तुमच्या माहितीच्या एकाद्या मनुष्यास, धंद्यांत अपयश आलें असेल, तर त्याचें कारण तुह्मांला माहीत आहे काय ?

७ फार खाण्यापासून किंवा फार पिण्यापासून होणारे भयंकर परिणाम अलीकडे तुह्मी कधीं पाहिले आहेत काय?

१२ गेल्या सभेनंतर आपल्या गांवांत कोणी योग्य गृहस्थ आले आहेत काय ?

१६ अलीकडे तुमची इजत कोणी घेतली आहे काय?

२२ आतां वादविवाद करण्यासारखी तुमची एकादी शंका आहे काय ?

वादविवाद, व्याख्यानें, निबंधवाचन वगैरे गोष्टींसही ह्या सभेंत हळुहळु सुरवात झाली. गोष्टी सांगणें आणि मजेदार गाणीं गाणें इत्यादि प्रकारही चाललेच असत. बेंजामिनासारखी गोष्ट कोणालाच सांगतां येत नसे, व त्याच्यासारखें गाणें फारच थोडे लोक गात. मनोरंजन अथवा शिक्षण या कामीं आपली सर्व वर्गणी खर्चूं देणारावांचून इतरांस ह्या मंडळीचा योग्य सभासद

मानीत नसत. फ्रँक्लिनानें वादविवादाकरितां ह्मणून कांहीं गोष्टी सुचविल्या होत्या, त्यांपैकीं थोड्या खालीं सांगतों:—

सर्व मनुष्य जातीस फायदेशीर होणारी अशी राज्य-पद्धति कोणती ?

मनोविकारांचें निर्मूलन करणें हाच तत्ववेत्त्यांचा मुख्य उद्देश असावा काय ?

जन्मामध्यें कोणाला कधीं तरी पूर्णत्व संपादितां येईल काय ?

जंटोचे बहुतेक सभासद ज्या स्थितींत आहेत, त्या स्थितींतच असतां कोणत्या प्रकारचें वर्तन जास्त सुखावह होईल ?

जंटोमध्यें बाराच्यावर सभासद घेत नसत, परंतु ही मंडळी इतकी लोकप्रिय झाली कीं, सभासद होण्याविषयीं लोकांचे अर्जावर अर्ज येऊं लागले. फ्रँक्लिनानें अशा रीतीनें सहा महिने घालविल्यानंतर एके दिवशीं हे अनीतीचे पुतळे, कवडीच्या मोलाचे आणि दिवसें दिवस भिकेस लागत चाललेले केइमरसाहेब, दारूच्या लहरींत तिरमिरीसरसे छापखान्यांत येऊन फ्रँक्लिनाला शिवीगाळ करूं लागले. हें सहन न होऊन, पुनः छापखान्यांत पाय घालावयाचा नाहीं असा निश्चय करून फ्रँक्लिन टोपी घालून बिऱ्हाडाबाहेर निघून गेला.

ह्यावेळीं त्याचें वय फक्त एकवीस वर्षांचें असून त्याजपाशीं एका पैशाचीही माया नव्हती. तेव्हां अशा

स्थितींत त्यानें आपल्या मेरिडिथ नांवाच्या एका छापखान्यांतील मित्रास काय करावें ह्मणून विचारिलें. त्याचा बाप चांगला पैसेवाला असल्यामुळें " माझा पैसा आणि तुझी कल्पना, अशा रीतीनें आपण छापखान्याचें काम भागीनें चालवूं, " असें त्यानें सुचविलें.

**फ्रँक्लिना**ची धर्मसंबंधी मतांत बरीच धरसोड झाल्यावर त्यानें त्याबद्दल कांहीं विचार कायम केले, त्यांचा सारांश असा:—

१ ईश्वर एकच आहे, २ तो हें जग चालवितो, ३ त्याला सर्वांनीं पूज्य मानावें, ४ परोपकारी मनुष्य त्याला फार आवडतो, ५ आत्मा अमर आहे ६ परलोकीं आत्म्यास मोठ्या न्यायानें वागवितात.

**फ्रँक्लिना**ची आपल्या धर्मसंबंधी मतांवर चांगली श्रद्धा नसल्यामुळें तो धर्माच्या बाबतींत लिहिणें व बोलणें अगदीं टाळवेल तितकें टाळीत असे; तरी प्रसंग पडल्यास एकाद्या धर्ममतावर तो फारच कडक टीका करी.

---

# भाग ५ वा.

## भाग्योदयाचे दिवस.

भाड्याची जागा—पहिलें काम—वर्तमानपत्र काढण्याचा बेत—उद्योगी बाळ—कागदाचें नाणें (नोटी) चालू करण्याविषयीं खटपट—**फ्रँक्लिन केईमर**चें पत्र विकत घेतो—**मेरिडिथ**चा स्वभाव—**फ्रँक्लिनाचें** जोमदार वर्तन—एका स्त्रीवर प्रीति जडणें व तिच्याशीं लग्न—**फ्रँक्लिनाच्या** नायकोचा स्वभाव —डामडौल —पुस्तकालयाचा बेत—**पेन्सिल्व्हेनियाची** भरभराट—**फिलाडेल्फियांतल्या** रीतिभाती—इ०स० १७२६ मधील पोषाकाची पद्धति—**फ्रँक्लिनाची** कीर्ति—जबरा व्यासंग.

एकाद्याचा अंतेवासी होऊन त्याची चाकरी करण्याचे **फ्रँक्लिनाचे** दिवस आतां संपत आले. त्यानें व **मेरिडिथ** नांवाच्या त्याच्या सोबत्यानें मिळून तीनशें रुपये वर्षाचें भाडें कबूल करून एक जागा घेतली; व तींपैकीं बराच भाग एका व्यापाऱ्यास भाड्यानें दिला. हा व्यापारी जंटोसभेंतील एक सभासद होता. **मेरिडिथ** यास जितकें भांडवल उभारतां येईल, असें वाटत होतें, तितकें उभारतां आलें नाहीं, ह्मणून छापखान्यास अत्यवश्य लागणारे दुसरे पदार्थ विकत घेण्यास बरेंच कर्ज काढावें लागलें.

अशा रीतीनें काम करण्याची सर्व तयारी झाली, इतक्यांत जंटोच्या एका सभासदानें एक अडीच रुपयांचें गिऱ्हाईक आणिलें. ह्या लहानशा कामाबद्दल फ्रँक्लिनानें लिहिलें आहे तें असें:—

"ह्या मनुष्यानें अगदीं वेळेवर आणलेल्या फक्त अडीच रुपयांच्या कामानें मला जो आनंद झाला, तो आतां दहा रुपयांच्यानेंही होणार नाहीं. ह्यावेळेपासून मी जे कोणी एकाद्या कामास आरंभ करितील त्यांस प्रथम थोडी बहुत तरी मदत करण्यास चुकलों नाहीं."

त्या दोघांनीं अगदीं जारीनें काम करण्यास सुरवात केली, आणि त्यावरून पुढें या कामांत त्यांना चांगलें यश येईल असें दिसून आलें. फ्रँक्लिन रात्रीं अकरा वाजेपर्यंत काम करीत बसे. त्याचा उद्योग आणि उत्साह पाहून लोकांचें मन त्याजकडे लागलें. त्याच्या छापखान्याशेजारीं रहाणारा एक गृहस्थ येणेंप्रमाणें लिहितो.—

"फ्रँक्लिनासारखा उद्योगी पुरूष मी आजपर्यंत कधीं पाहिला नाहीं. मी रात्रीं अकरा वाजतां घरीं जातों, त्यावेळीं तो काम करीत असतो, आणि फिरून कोणी उठलें नाहीं तों त्याची कामावर तयारीच!"

या लेखाच्या योगानें एका व्यापाऱ्याच्या मनावर ठसा उमटून त्यानें कागद वगैरे सामान फ्रँक्लिन यास उधार देण्याचें कबूल केलें. फ्रँक्लिनाच्या विद्याभिरुचीमुळें व त्याच्या आंगच्या विलक्षण लेखनशक्तीमुळें आपण एक वर्तमानपत्र काढावें असें त्यास वाटलें, व कांहीं दि-

वसांनीं त्यानें आपला हा बेत अगदीं कायम ठरविला. ही बातमी केइमर यास लागून त्यानें आपण एक वर्तमानपत्र चालू करणार, अशा आशयाचीं प्रसिद्धिपत्रकें काढिलीं. जरी तो लेखकाच्या कामास अगदींच योग्य नव्हता तरी त्याच्या या बेतामुळें फ्रँक्लिनाला आपला बेत तहकूब ठेवणें भाग पडलें.

केइमरचें हें पत्र लोकांस बिलकुल आवडत नाहीं, असें पाहून, फ्रँक्लिनानें आपण पत्र सुरू करण्यापूर्वी, आपली लेखनकीर्ति लोकांत पसरावी ह्मणून, मर्क्यूरी नांवाच्या तेथील एका छोटेखानी पत्रांत ही 'उद्योगीबाळ' अशा सहीनें रसयुक्त व निंदास्पद लेख लिहिण्यास सुरवात केली त्यांतील प्रस्तावना अशी होती.--

"आपले अपराध जगापुढें मांडणाऱ्यास दरसाल पांच रुपये देणें ज्यांना आवडणार नाहीं, असे तुमचे कांहीं वाचक हे लेख वाचून कदाचित् नाखुष होतील खरे, तरी दुसऱ्याची निंदा ऐकण्यांत गोडी मानणारेही पुष्कळ असतात, तेव्हां जर कोणाला आपले दोष जगापुढें मांडल्याबद्दल राग येईल, तर त्याला आह्मीं खात्रीपूर्वक असें कळवितों कीं, त्यांच्या सोबत्यांचीं व त्यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची निंदा ऐकून गार होण्याची संधिही त्याला लवकरच मिळेल."

ह्या सुरेख लेखांकडे लोकांचें लक्ष लागून लेखकाची फारच कितीं झाली. नोटी ( कागदाचें नाणें ) चालू करण्याबद्दल पेनसिल्व्हेनियामध्यें खडाजंगी वाद चालला

असतां " नोटींच्या अवश्यकतेवर चार विचार " ह्मणून एक लहानसें पुस्तक **फ्रँक्लिनानें** लिहिलें.

ह्या लेखानें तर त्या तेवीस वर्षांच्या तरुण छापखानेवाल्याचें सामर्थ्य लोकांस चांगलेंच कळून आलें. त्यांत त्यानें नोटी चालू कराव्या, हें ज्या प्रमाणांनीं सिद्ध करून दाखविलें होतें त्यांचें आतां लोकांस कांहींच महत्व वाटणार नाहीं. त्याचा मुख्य मुद्दा असा होता कीं, " सध्यां **पेनासिल्व्हेनियां**त व्यापार चालविण्यास सोनें व चांदी असावी तितकी नाहीं, ह्याकरितां इतर नाण्यांच्या अभावीं व्यापार सर्वस्वी बुडणार आहे, ह्मणून कागदांचीं नाणीं चालू करणें ही गोष्ट फारच महत्वाची आहे. "

ह्या पुस्तकाच्या विलक्षण वजनामुळें नोटी जिकडे तिकडे चालू झाल्या व त्यामुळें आमच्या स्वदेशाभिमानी **फ्रँक्लिनास** आपल्या देशाचा यामुळें पुष्कळ फायदा झाला असें वाटून फारच समाधान झालें.

**फ्रँक्लिना**ची जसजशी भरभराट होत चालली तसतशी **केइमर**ला वाईट स्थिति येऊं लागली. त्यानें आपल्या जगच्छिक्षकाचे एकूणचाळीस अंक निघतांच, नव्वदावर वर्गणीदार होत नाहींत, जसें पाहून तें पत्र थोडक्या किंमतीस **फ्रँक्लिन** व **मेरिडिथ** यांस विकत दिलें.

पुढें ह्या पत्रांतील लेखांची भाषा व तें छापण्याची शैली या दोहोंतही **बेंजामिनाचें** विलक्षण चातुर्य दिसून आलें. त्यानें या पत्राचें नांव **पेनासिल्व्हेनिया ग्याझेट**, असें

ठेवून त्याचा पहिला अंक ता. २ अक्टोबर सन १७२९ रोजीं प्रसिद्ध केला.

जें काम हातीं घ्यावें, त्यांत चांगलेपणा मिळवावा, असा फ्रँक्लिनाचा स्वभाव असल्यामुळें त्यानें तें पत्र इतक्या उत्तम रीतीनें छापलें कीं, तशी छपाई हल्लींसुद्धां क्वचित्च दृष्टीस पडेल.

सात वर्षें पर्यंत फ्रँक्लिनाला व्हरनानचे पन्नास डालर्स कसे फिटतात, ही मोठी काळजी होती. “ आतां जर पैसे परत कराल तर मला मोठा उपयोग होईल ” अशा अर्थाचें व्हरनाननें त्याला एक अगदीं गरिबीनें पत्र लिहिलें. “ माझ्याच्यानें होईल तितकी मेहनत घेऊन मी लवकरच तुमच्या पैशांची फेड करितों ” असें फ्रँक्लिनानें त्यास उत्तर लिहून थोडेच दिवसांत त्याचा त्यानें व्याजासुद्धां पार उलगडा करून टाकिला.

छापखान्याकरितां आणलेल्या सामानाचे कांहीं पैसे देऊन बाकीचे हप्त्या हप्त्यानें फेडण्याचा करार झाला होता, परंतु त्याप्रमाणें मेरिडिथकडून फेड झाली नाहीं- ह्मणून जिकडून तिकडून तगादे सुरू झाले. तेव्हां अशा प्रसंगीं फ्रँक्लिनाच्या दोघां मित्रांनीं एकमेकांस नकळत त्याजकडे जाऊन मेरिडिथचा संबंध तोडून टाकून स्वतंत्र रीतीनें काम चालविण्यास लागेल तेवढा पैसा त्याला देण्याचें कबूल केलें; कारण मेरिडिथ दारू पिऊन गटारांत पडे, आणि नाहीं नाहीं ते हलकटपणाचे चाळे करी, यामुळें फ्रँक्लिनाला कमीपणा येत होता.

फ्रँक्लिनाला मेरिडिथ याचा संबंध तोडून टाकणें बरोबर वाटेना, परंतु तसें न करावें तर सर्वस्वी नाश होणार असें पाहून तो मेरिडिथला एके दिवशीं ह्मणालाः—

"तुझ्या बाबांस, तूं मजबरोबर ह्या धंद्यांत शिरलास, हें बरोबर न वाटून, त्यांनीं तुजकरितां कबूल केलेले पैसे ते आतां तुला आणि मला देणार नाहींत; आणि खरोखर अशी जर त्यांची इच्छा असेल तर हा तूं आपला कारखाना संभाळ. मी जाऊन कोठें तरी काम पाहतों, ह्मणजे झालें." मेरिडिथ ह्मणालाः—

"माझ्या वडिलांची या धंद्यासंबंधानें अगदीं निराशा झाली आहे, आणि आतां देण्याला त्यांजपाशीं पैसाही पण नाहीं, ह्यामुळें माझ्याच्यानें त्यांच्यावर भार घालवत नाहीं. शिवाय माझ्या हातून हें काम चांगलेंसें होईल असें दिसत नाहीं. मी शेतकऱ्यांमध्यें वाढलेला, तेव्हां इतक्या उशीरां ह्मणजे आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी, जो हा अगदींच नवीन धंदा शिकावयास आरंभ केला तो माझा मूर्खपणाच ! आमच्यापैकीं पुष्कळ वेल्श लोक *नार्थकॅरोलिनाकडे जमीन स्वस्त असल्यामुळें जाऊं लागले आहेत, हें पाहून मलासुद्धां त्यांजबरोबर जाऊन शेतकीचा धंदा करावा असें वाटूं लागलें आहे. तूं जर लोकांचें कर्ज, माझ्या बापाचे हजार रुपये, व माझें स्वतःचें कर्ज, इतकें फेडून मला तीनशें रुपये जास्त देण्याचें कबूल कर-

---

* सं. सं. पैकीं इ. स. १५८५ सालीं वसाहत झालेला प्रांत.

शील, तर आतांच्या आतां ठरावपत्र फाडून सर्व कारखान्याची फारकत मी तुला लिहून देतों."

ह्या अटी अमळ कडकच होत्या, परंतु पार्तीच्या त्रासांतून सुटण्यास दुसरा मार्गच नसल्यामुळें फ्रँक्लिनानें ही सूचना मान्य केली. आणि आपल्या मित्रांपासून कर्ज घेऊन त्या सर्व छापखान्याचा तो आपण एकटा मालक झाला.

**फ्रँक्लिना**च्या उत्साहपूर्वक श्रमानें, मितव्ययानें आणि शहाणपणानें त्याची भरभराट होऊं लागली. लोकांत कीर्ती संपादन करणें मोठ्या महत्वाचें आहे, असें जाणून त्यानें खूप जारीनें मेहनत चालविली, इतकेंच नाहीं तर, **फ्रँक्लिन** आपला इष्ट हेतु साधावा ह्मणून विलक्षण मेहनत घेतो, अशी सर्व शेजाऱ्यापाजाऱ्यांची खात्री त्यानें करून दिली.

त्याचे कपडे सुरेख रीतिनें कापलेले, साधे परंतु अगदीं स्वच्छ असे असत. तो दिसण्यांत बावळा किंवा नेभळा मुळींच दिसत नसे व कितीही मोठ्या कामांत गढून गेला असला तरी एकादा मोठा गृहस्थ त्याजकडे गेला असतां तो त्याचा मोठा सत्कार करी.

**फ्रँक्लिना**चे वाईट दिवस नाहींसे होऊन दिवसें दिवस त्याचा उत्कर्ष मोठ्या सपाट्यानें होऊं लागला. आपलें कांहीं कर्ज फेडून थोडथोडी शिल्लक पाडण्याची त्यानें सुरवात केली. त्याला आपलें स्वतःचें घर असावें आणि गृहकृत्यांची व्यवस्था पहाण्याकरितां धर्मपत्नी असावी, असें वाटूं लागलें.

त्यानें ज्या व्यापाऱ्यास आपले पोटांत भाड्यानें जागा दिली होती, त्याच्या बायकोस याबद्दल विचारिलें. तिची एक नातेवाईक मुलगी फार सुरेख होती, तिची तिनें फ्रँक्लिना जवळ मोठी शिफारस केली. त्याची व तिची तिनें अगदीं सहज पडल्यासारखी गांठ घालून दिली. ती सुरेख नाजुक, व हसतमुख असून तिचे आईबाप खाऊन पिऊन चांगले सुखी होते. फ्रँक्लिन हाही चांगला देखणा व प्रत्येक कामांत मोठा वाकबगार होता, ह्मणून त्या दोघां मधली प्रीति दिवसानुदिवस शुद्ध प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें वृद्धिंगत होऊं लागली.

ह्याबद्दल फ्रँक्लिनानें आपल्या चरित्रांत लिहिलेली हकीकत मोठी मनोरंजक आहे, ती अशीः—

"त्या बाईनें आमची गांठ वारंवार पडेल असें केलें. ती मुलगी मला मनापासून आवडत असल्यामुळें मी तिजवर फार प्रीति करूं लागलों. त्या नवराबायकोंनीं मला नेहमीं जेवणास बोलावून व आमची एकांतांत गांठ पाडून ह्या कामांत मला बरेंच उत्तेजन दिलें. शेवटीं आपले "विचार प्रगट करण्याची वेळ आल्यावर त्या बाईनें आमच्या मधले ठराव कायम करण्याचें पतकरिलें. मी माझें राहिलेलें कर्ज फिटण्याकरितां एक हजार रुपये हुंडा मागितला. ही बातमी त्या मुलीच्या बापास कळवून आमच्या घरच्या बाईनें आमच्या जवळ इतकी रक्कम देण्याला नाहीं, असा त्याचा निरोप आणला. त्यानें आपलें घर गहाण टाकून रक्कम द्यावी असें मीं ह्मटलें. ह्या-

वर त्यांनीं आह्मांला हें लग्न मुळींच पसंत नाहीं असें उत्तर दिलें. आणि छापखान्याच्या धंद्यांत कांहीं एक फायदा होणार नाहीं, सध्यांचे खिळे खराब झाल्यावर दुसरे घ्यावे लागतील आणि अखेरीस जी अवस्था **केइमर** आणि **डेव्हिड्हार्न्हे** यांची झाली तीच आमची होईल असें त्यांना कोणी कळविलें, तेंव्हां तर ती सुंदरी माझ्या दृष्टीआडही झाली."

एकदां सहज **फ्रँक्लिन** त्या दुःखी **डिबोरेच्या** आईकडे गेला असतां त्याचें मन त्या गरीब बिचाऱ्या मुलीशीं केलेल्या विश्वासघातामुळें त्याला फारच खाऊं लागलें. ती बिचारी सर्व दिवसभर दुःखयुक्त मुद्रेनें मोठी उदासीन होऊन आपल्या आईजवळ बसलेली असे; कारण तिजवांचून तिच्या जिवाचें कोणीच उरलें नव्हतें. तिचा राजर्सशीं झालेला विवाह यथाशास्त्र होता किंवा नाहीं याची पुष्कळांस शंका होती, कारण त्यांचें लग्न होण्यापूर्वीं राजर्सचें निदान एक तरी लग्न झालें असावें अशी लोकांत जिकडे तिकडे बोलवा होती; असें नसून जर तें लग्न यथाविधि झालें असेल तर तिला सुखाचे दिवस येण्यास दुसरी एक अडचण अशी होती कीं, राजर्सच्या मरणाविषयींची बातमी विश्वसनीय नसून केवळ लोकवार्ता होती.

**फ्रँक्लिना**ची तिजविषयींची पूज्यबुद्धि प्रत्यहीं वाढत जाऊन शेवटीं त्यानें भावी अडचणींस न जुमानतां तिजशीं लग्न लावण्याचा आपला उद्देश तिला कळविला. त्यानें आपणास एका स्त्रीच्या पोटीं एक मुलगा झाला आहे, व

तो आपण घरीं नेऊन आपल्या धर्मपत्नी पासून झालेल्या मुलाप्रमाणें वाढविणार असेंही तिला स्पष्टपणें सांगितलें.

डिवोरेचा नवरा जिवंत असतां इ. स. १७३० च्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस फ्रँक्लिनानें तिच्याशीं लग्न लाविलें. यामुळें त्याच्या निर्मल कीर्तीस कधींही न जाणारा असा कलंक लागला. हें लग्न झाल्यानंतर राजर्स थोड्याच दिवसांनीं मरण पावला. इकडे तें मूल, त्या दोघांनीं घरीं नेऊन त्याचें मोठ्या ममतेनें व काळजीनें संगोपन केलें. या मुलाच्या आईची वाट काय झाली होती हें कळत नाहीं. त्या मुलानें वयांत आल्यावर राजपक्षाचा स्वीकार करून कृतघ्नपणानें आपल्या बापास फार दुःख दिलें.

मिसेस फ्रँक्लिन ही पुढें चांगली बायको निपजली, यामुळें तिचा तो शांत, तत्वज्ञ आणि गंभीर भ्रतार तिची वारंवार स्तुति करी. एकादा नोकर देखील आपलें हलकें सलकें काम जितक्या उत्तम रीतिनें बजावणार नाहीं, तितक्या किंबहुना त्याहूनही चांगल्या रीतिनें ती जबाबदारीचीं कामें करून आपल्या नवऱ्यास सदोदित संतुष्ट राखीत असे. ती मोठी आनंदी, उद्योगी व व्यवस्थितपणानें संसार चालविणारी स्त्री होती.

छापखान्यास जोडून काढिलेल्या दुकानांत विक्री करणें, वर्तमानपत्राचे कागद मोडून ते वाटण्याच्या कामीं आपल्या प्रिय पतीस मदत करणें आणि मातृवात्सल्यानें त्या

पोरक्या पोरास प्राथमिक शिक्षण देणें हीं कामें ती मोठ्या दक्षतेनें करीत असे.

आपल्या माणसांपैकीं जीं आपलें काम इमानानें करीत त्यांस प्रसंगीं यथाशक्ति योग्य बक्षीस देण्याचा व त्यांची स्तुति करण्याचा फ्रँक्लिनाचा प्रघात असल्यामुळें त्यानें पुढें, तो एकदां इंग्लंडमध्यें असतां, तेथील मंडळीचा तो भपकेदार पोषाक वगैरे पाहून आपल्या पत्नीस लिहिलें तें असें:—

"ज्या ज्या वेळीं एकवेळ नखशिखांत माझ्या बायकोनें आपल्या करामतीनें विणलेला लोंकरीचा व तागाचा पोषाक केला होता, हें माझ्या मनांत येई, त्या त्या वेळीं मला मोठें समाधान वाटत असे. व त्या पोषाकासारखी धन्यता मला इकडील उत्तमांपैकीं कोणत्याच पोषाकानें वाटली नाहीं."

फ्रँक्लिनानें आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—"इंग्रजींत अशी एक ह्मण आहे कीं, ज्याला आपली भरभराट व्हावी असें वाटत असेल त्यानें प्रत्येक कामांत आपल्या पत्नीची संमति घ्यावी. मी आपणाला भाग्यवान् समजतों कीं, मला माझ्या सारखी उद्योगी व दूरदृष्टीनें संसार चालविणारी स्त्री मिळाली. तिनें माझ्या कामांत मला मोठ्या आनंदानें मदत केली. छापलेल्या कागदांच्या घड्या घालून बारीक सारीक पुस्तकें शिवलीं, दुकानाची विक्री चालविली आणि कागद करण्याकरितां जुन्या चिंध्यापांध्या खरेदी करण्यांतही बरीच मेहनत

घेतली. आम्हीं आळशी चाकरास कधींच थारा दिला नाहीं. आमचें खाणेंपिणें अगदीं साधें असून घरांतील सामान सुमानही त्याच मासल्याचें असे. माझी न्याहारी ह्मटली ह्मणजे दूध-चहासुद्धां नाहीं-आणि भाकर आणि हीं मी आण्याभऱ्याच्या थाळींत घेऊन जस्ती चमच्यानें खात असें."

हें वाचून कोणत्या पुरुषास अशी स्त्री आपणास असावी असें वाटणार नाहीं ? आणि कोणत्या बायकोस आपण डिबोरेचा कित्ता उचलावा असें वाटणार नाहीं ? खरोखर हीच खरी 'कार्यपुमंत्री' आणि करणेपुदामी.'

"परंतु डामडौल एकाद्या कुटुंबांत शिरतो कसा व त्यांतील माणसांच्या मतांस न जुमानतां त्यांत तो दिवसेंदिवस वाढतो कसा हें आतां नीट लक्षांत ठेवा. एके दिवशीं सकाळीं मी नेहमींप्रमाणें न्याहारीस उठलों असतां न्याहारीचें सर्व सामान एका चिनी भांड्यांत घालून आणलेलें व तें खाण्याकरितां एक चांदीचा चमचा आणिलला माझ्या दृष्टीस पडला; हें सर्व सामान माझ्या बायकोनें मला नकळत सरासरी बारा रुपये खर्चून मजकरितां ह्मणून आणलें होतें. याचें कारण इतर शेजाऱ्यापाजाऱ्याप्रमाणें आपल्या नवऱ्याला हेंच योग्य आहे, असें तिच्या मनानें घेतलें, या पलीकडे कांहीं नाहीं." ही स्थिति मनुष्यस्वभाव जेथून तेथून एकच असल्यामुळें आपल्याइकडेही दृष्टीस पडते. एकाद्या श्रीमंत गृहस्थाची बायको जर त्याच्या चांगली मर्जींतली असेल व जर तो बाताबेतानें रहात असेल तर त्या बाईस तें न आवडून आपल्या नवऱ्याकरितां व मुलांबाळांकरितां

इतरांप्रमाणें चार चैनीचे पदार्थ आपल्या कुटुंबांतही असावे, असें वाटून संधि सांपडतांच ती ते विकतही घेते. "चिनीभांडें आमच्या घरांत हेंच पहिलें म्हटलें तरी चालेल. यानंतर जसजसा आम्हांला पैसा मिळूं लागला तसतसा या कामांत त्याचा बराच व्यय होऊं लागला."

फ्रॅंक्लिनाच्या मनांत सर्वत्रांच्या वर्गणीनें एक वाचनालय काढावें असें आलें. परंतु तें स्वतःचें नांव पुढें करून काढिलें असतां हा मोठा महत्वाकांक्षी आहे, याला जेथें तेथें आपलें नांव पुढें असावें असें वाटतें, असा मिथ्या आरोप करून लोक आपला द्वेष करितील, आणि असें झालें ह्मणजे आपला उद्देश चांगल्या रीतीनें सिद्धीस जाणार नाहीं. ह्या भीतीनें त्यानें आपला बेत पुष्कळ लोकांस मान्य आहे, असें वाचनप्रिय मंडळीस कळवून त्यांची वर्गणी जमा करण्याचा क्रम चालविला. प्रत्येक वर्गणीदारानें वाचनालयाच्या सुरवातीस वीस रुपये द्यावे व पुढें दरवर्षास पांच रुपये वर्गणी द्यावी असा एक नियम होता. पांच महिनेपर्यंत मेहनत घेऊन त्यानें पन्नास वर्गणीदार जमविले व हल्लीं अमेरिकेंत गाजत असलेल्या संस्थांपैकीं एकीचा पाया घातला. इ. स. १८६१ सालीं या वाचनालयांत सत्तर हजार पुस्तकें होतीं.

हल्लीं शिक्षण एवढ्या जोरानें सुरू असूनही ह्या त्याच्या मुख्य साधनाची उपेक्षा आह्मांकडून कां व्हावी बरें? आधीं आह्मांमध्यें अशा एकाद्या सार्वजनिक उपयोगाचें कृत्यास हात घालणारे फार थोडे, तशांतून जर एकाद्यानें

तसें केलेंच तर गांवांतील अशिक्षित टवाळ व पैशाला प्राणापलीकडे मानून पुरून ठेवून जमिनीची धन करणारे कृपण होईल तितकें करून त्याच्या त्या स्तुत्य उद्योगास विघ्न आणण्याला एका पायावर तयार! महिना आठ आणे तर राहिलेच, पण आठ पैसेही देणारे कोणी मिळत नाहींत! फार काय सांगावें, तालुक्यासारख्याही चांगल्या वस्तीच्या गांवांत फुकट वाचावयाला या ह्मटलें, तरी सुद्धां सरासरीनें रोज एका हाताच्या बोटांइतकी देखील मंडळी वाचन मंदिरांत जात नाहीं! सुधारणेचें व विद्वत्तेचें माहेरघर ह्मणून गाजत असलेल्या आमच्या पुण्यग्रामांतील पुस्तकालयावर अग्नि नारायणानें वक्रदृष्टि केल्यापासून आज सोळा वर्षांतही त्याची नुकसानी भरून निघूं नये, ह्मणजे लज्जास्पद नव्हे काय!

**फिलाडेलफिया**ची यावेळची लोकसंख्या अवघी दहा हजारच होती. **यूरोपांतून** येणाऱ्या प्रवाशांस **पेनसिल्व्हेनिया** हें मध्यवस्तीचें ठिकाण होतें. तेथील हवा उत्तम व जमीन सुपीक असून **वुइल्यम पेन**च्या **इंडियन**लोकांशीं दयाळूपणाच्या वर्तनानें तेथें जिकडे तिकडे आज पन्नास वर्षें शांतता व एकमेकांविषयींची कळकळ वास करीत होती.

तेथील **इंडियन** लोकांमध्यें कोणी इतिहासकार न निपजल्यामुळें गोऱ्या लोकांनीं दिलेल्या माहितीवरच जर भरंवसा ठेविला, तर असें दिसून येतें कीं, प्रत्येक प्रसंगीं इंडियन लोकांनीं अतिशय त्रास झाल्यावांचून हातांत शस्त्र

घेतलें नाहीं. जनरल **ब्रॅडॉक** याचा पराजय होईपर्यंत **पेनसिल्व्हेनिया**ला धोक्याचा असा एकही प्रसंग आला नव्हता. इ. स. १७४९ च्या उन्हाळ्यांत सालाबाद-प्रमाणें बाराहजार **जर्मन** लोक **फिलाडेलफियास** येऊन दाखल झाले, असे लोक येऊन उतरले ह्मणजे **उइल्यम पेन, डेलावर** * नदीच्याकाठीं त्यांस जागा देऊन आंगण व फुलें, भाजी वगैरे करितां लहानसा बाग राखून घरें बांधण्यास सांगत असे. १७३२ सालीं **फ्रँक्लिन** सव्वीस वर्षांचा असतां, येथील घरें बहुतेक विटांचीं अथवा दगडांची बांधलेलीं असून एक मैल लांब व अर्धामैल रुंद जागेंत पसरलीं होतीं.

या ठिकाणीं धान्य आणि फळफळावळीला कांहीं कमी नव्हतें. गांवडुकरेंसुद्धां पीच नावाचीं मधुर फळें खाऊन माजून आनंदानें रहात. येथील प्रत्येक कुटुंबांत निदान एक तरी दुभती गाय असे व हीं सर्व गुरें गांवाबाहेर राखलेल्या सार्वजनिक कुरणांत मोठ्या मौजेनें चरत. ह्यावेळीं **फिलाडेलफिया** हिरवें गार दिसत असून, सुंदर वृक्षांमुळें त्यास फारच शोभा आली होती. आणि ह्यामुळें त्याकडे पाहणारांस घटकाभर आनंद झाल्यावांचून रहात नसे. **प्रोफेसर पिटरकाम** यांनीं सन १७४८ पासून सन १७५१ पर्यंत उत्तर अमेरिकेंत केलेल्या प्रवासाचें वर्णन प्रसिद्ध केलें आहे, त्यांत ते म्हणतात:—

* ही नदी न्यूयार्क व न्यूजर्सी या प्रांतांत पेनसिल्व्हेनिया प्रांतापासून निराळें करते व डेलावेअरचे अखातास मिळते.

फिलाडेलफियांत सर्व शहरभर जिकडे तिकडे अगदीं बागचबाग लागून गेले होते. एकादा स्वीडनमधला अथवा फिनलंडांतला शेतकरी आपल्या भिकारड्या टरनिप फळांची जितकी काळजी घेतो व त्यांची लागवड करण्याकरितां मेहनत जितक्या काळजीनें करितो, तितकी देखील येथील लोक उत्तम फळफळावळीची लागवड करण्यास करीत नाहींत. यावरून येथें फळफळावळ किती व कशी होत असेल याची कल्पना करा. येथील प्रत्येक मनुष्य अगदीं स्वतंत्र असल्यामुळें व त्याला कोणत्याही गोष्टीची वाण नसल्यामुळें तो आपल्या घरांत एकाद्या राजाप्रमाणें सुखासमाधानानें असतो."

ह्यावेळीं **फिलाडेलफियाची** एक तृतीयांश आणि साऱ्या **पेनसिल्व्हनियाची** एक द्वितीयांश वस्ती क्वेकर्स लोकांची असून त्यांना '**मित्र**' ह्मणवून घेणें मनापासून आवडत असे. हे लोक फार उद्योगी व बुद्धिमान् असून मोठ्या योग्यतेस चढले होते. त्यावेळीं तेथील वसाहत करणारांमध्यें त्यांच्या सारखे व्यवस्थित लोक नव्हतेच ह्मटलें तरी चालेल.

ह्या वेळच्या आणि त्या वेळच्या सामाजिक स्थितींत फार अंतर पडलें आहे. ज्या चालीरीति कांहीं काळापूर्वी मोठ्या महत्वाच्या मानीत, त्यांचा आज मागमूसही उरला नाहीं. प्रहारस्तंभ, खोडा, गळफांस ह्या शिक्षासाधनांचा त्या वेळीं वारंवार उपयोग होत असे. पाऊणशें रुपये वर्षासन देऊन एक फटके मारणारा मुद्दाम

ठेविला होता. थोड्या वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. १७६० च्या अखेरपर्यंत स्त्रियांना भर रस्त्यांत खरपूस मार देत असत. सरासरीनें महिन्यांतून दोनदां तरी हा ताडनविधि होत असे असें म्हणतात.

येथील सभ्यगृहस्थांचा पोषाख फ्रान्स व इंग्लंड येथील लोकांपेक्षां मोठा मौल्यवान् व भपकेदार असे. कांहीं लोक आपले स्वाभाविक केंस लपविण्याकरितां टोप घालीत. पायांत घट्ट पायजमा घालून त्यावर रेशमी पायमोजे चढवीत, व वर झकझकीत रुपेरी बकलाचे ऐटींत दिसणारे बूट घालीत. आंगरखे मखमालीचे गुडघ्याच्या खालपर्यंत लोंबणारे असून त्यांवर तऱ्हेतऱ्हेचा कशीदा काढलेला असे. कधीं कधीं तागाचें अतिशय स्वच्छ असें चुणीदार खमीस घालून ते आपला पोषाक मोठा भपकेदार करीत. त्यांच्या कमरेस रत्नखचित म्यानांत घातलेली तरवार लटकाविलेली असे, आणि डोक्यास एक तीन कोणांची टोपी असें.

इ. स. १७४० पासून १७७५ पर्यंत **पेनासिल्व्हेनिया** प्रांतांत जिकडे तिकडे आनंदी आनंद व शांतता नांदत असून, प्रत्येक घरीं सुखानें आपलें ठाणेंच दिलें होतें. बहुतेक लोक मोठ्या नीतीनें वागत व शिक्षणाचा प्रसार सर्व प्रांतांत मोठ्या जारीनें सुरू होता. जे अमेरिकन लोक यूरोपांत जात, त्यांना ह्या दोन्ही खंडांमधील स्थित्यंतर पाहून मोठें आश्चर्य वाटत असे. कारण इकडे बहुतेक दृष्टीसही न पडणारें दुःख आणि दारिद्र्य तिकडे अगदीं पसरलेलें असे.

ह्यावरून त्याठिकाणीं अपयश, पराजय, नुकसान अथवा निर्दयता हीं मुळींच नव्हतीं असें मात्र कोणीं समजूं नये. भांडण कज्जे, अंतःकरण होरपळून टाकणारे प्रसंग अधिकारावर असलेल्या लोकांची वर्तनीविषयींची बलवत्तर इच्छा व इतरांची त्यांच्या सत्ताबंधनापासून मुक्त होण्याची उत्कंठा आणि या दोहोंपासून होणाऱ्या कटकटी यांसही अति क्वचित् प्रसंगीं कां होईना, पण थारा मिळत असे.

फिलाडेलल्फियामध्यें फ्रँक्लिनानें आपल्या आयुष्याचीं वीस वर्षें सतत उद्योगांत घालविलीं, परंतु या काळांत त्याच्या आयुष्यांत ह्मणण्यासारखी कोणतीच गोष्ट घडून आली नाहीं. त्याचा प्रामाणिकपणा, शहाणपणा आणि उत्कर्ष यांमुळें त्यावेळीं त्याची जिकडे तिकडे कीर्ति झाली; तथापि छापण्याच्या व दुकानदारीच्या धंद्यांतच राहिल्यास लोक आपणास उच्च प्रतीच्या लोकांत गणणार नाहींत हें तो पूर्णपणें जाणत होता.

तो वर्तमानपत्र लिहून छापून प्रसिद्ध करीत असे, इतकेंच नाहीं, तर पुस्तकें, कागद, टांक वगैरे लिहिण्याचें सामान विक्रीकरितां त्यानें आपल्या दुकानीं ठेविलें होतें. तो पुस्तकें बांधण्याचा धंदा करी व शाई करून विकी. शिवाय त्याचा चिंध्यांचा मोठा व्यापार होता. साबण व निरनिराळ्या पक्ष्यांचीं पिसेंही त्याजकडे विक्रीला असत. त्याच्या जाहिरातींत बुंद व दुसरा किराणा जिन्नस मिळेल. असेंही लिहिलेलें होतें.

ह्या धंद्यानें आपण उच्चप्रतीच्या लोकांत गणिले जा-

णार नाहीं असा जरी त्याचा समज होता, तरी सुद्धां हळू हळू त्याच्या छापखान्यांतल्या खोलींत मोठमोठे बुद्धिमान् व वजनदार लोक जमून एकाद्या महत्त्वाच्या विषयावर फ्रँक्लिनाचें मत विचारूं लागले. त्याच्या पत्राप्रमाणें उत्तम पत्र सर्व प्रांतांतही नव्हतें.

फ्रँक्लिनाचे लेख मोठे उत्तेजनपर असून ते त्याच्या बुद्धिकौशल्याची साक्ष देत असत. त्याचा स्वभाव फारच उत्तम असून त्याच्या लिहिण्याचा झोंक नेहमीं प्रामाणिकपणा व एकमेकांविषयीं ममता उत्पन्न करण्याकडे विशेषतः असे. तो पत्रव्यवहार या सदराखालीं आपणच कांहीं मनोरंजक मजकूर लिही व त्यास तसें मनोरंजक उत्तरही आपणच देई. या पत्राचे सर्व अंक फिलाडेलफियाचे वाचनालयांत अद्यापही व्यवस्थित रीतीनें लावून ठेविलेले आहेत.

इ० स० १७३२ त फ्रँक्लिनानें पुअर रिचर्ड या नांवाचें एक ज्ञानोदय पंचांगासारिखें पंचांग चालू केलें, त्याची थोडक्याच काळांत जिकडे तिकडे वाहवा होऊन सतत पंचवीस वर्षेपर्यंत सरासरीनें दरवर्षी त्याच्या दहा-हजार प्रति खपत; त्या वेळच्या मानानें पाहतां हा खप फारच मोठा होता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यावेळीं त्या पुस्तकांतील तात्विक व जोरदार ह्मणी ज्याच्या त्याच्या तोंडीं अगदीं बसून गेल्या होत्या, व अजूनही ह्या ह्मणींची किंमत लोकांत फारच मानिली जात आहे.

फ्रँक्लिन मोठा जबरदस्त वाचणारा होता. त्याची स्मरणशक्ती तर फारच विलक्षण होती त्याची धारणाशक्ती

अशी असे कीं, एकादी गोष्ट तावडतोब ग्रहण करून ती आपलीशी करण्यांत त्यास कांहींच जड वाटत नसे, आणि असें असल्यामुळें पूअर रिचर्ड पैकीं कांहीं ह्मणी जरी केवळ त्याच्या कल्पनेच्या असत तरी पुष्कळ जुन्या ह्मणीस आपल्या कर्तृत्वशक्तीनें नवें रूप देऊन त्या तो प्रसिद्ध करी. ज्या ह्मणी थोडकेच दिवसांत सर्व अमेरिकेंत लोकांच्या बोलण्यांत अगदीं घरोवर येऊं लागल्या त्यांपैकीं कांहींचा मतलब आह्मी आपल्या वाचकांकरितां खालीं देतों.

" लहान शत्रु सर्पाच्या अंड्याप्रमाणें होय. तें जसें उबवून वाढविलें असतां वाढविणाराचा प्राण घेतें, त्या प्रमाणें तो करील, म्हणून त्याची उपेक्षा उपयोगाची नाहीं. " " तिघांच्या कानीं झालेली गोष्ट त्यांच्यापैकीं दोघे मेल्यावांचून कधींच गुप्त रहाणार नाहीं. " एकादा मनुष्य नांगर धरितो म्हणून तो मूर्ख नव्हे, तर जो मूर्खत्व करितो तो मूर्ख होय. " " ज्यापाशीं संपत्ति आहे तो श्रीमंत नव्हे, तर जो तिचा उपभोग घेतो तो श्रीमंत होय. " " मी कोणतें सत्कार्य करूं? हा आपला नेहमींचा प्रश्न असला पाहिजे. " " लग्नाच्यापूर्वी तुम्ही आपले डोळे उघडा व मग ते अर्धवट झांका. "

ह्या शेवटच्या उत्तम ह्मणी विरुद्ध आमच्या सर्व समाजाचें वर्तन पाहून कोणत्या देशभक्तास वाईट वाटल्यावांचून राहील! आह्मी आपल्या किंवा जिच्याशीं संबंध घडणार तिच्या स्थितीचा तिळमात्र विचार करण्याची योग्यता नसतां केवळ अज्ञानावस्थेंत हें संसारांतील

अतिमहत्वाचें काम कसें तरी उरकून टाकून मागाहून आपले डोळे उघडितो ! !

**फ्रँक्लिन** हा कवि नव्हता. तो जरी एकाद्याविषयाची पद्यात्मक जुळणी अगदीं ताबडतोब करीत असे तरी त्याचीं यमकबद्ध पद्यें चांगलीं वठत नसत. त्याला शृंगाररसाच्या वर्णनाचें अंग जरी अगदीं नव्हतें तरी त्या काळाप्रमाणें पाहिलें असतां तें बरेंच होतें असें ह्मणावें लागतें.

त्याच्या **पेनसिल्व्हेनियागॅझिट** पत्राच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या खपानें, **'पूअर रिचर्डाच्या'** जबरदस्त विक्रीनें, आणि त्यानें प्रसिद्ध केलेल्या लहान सहान पुस्तकांत झालेल्या किफायतीनें त्याजपाशीं बराच पैसा झाला, व त्या मानानें त्याचा खर्चही वाढला. त्यानें इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झालेलीं सर्व महत्वाचीं पुस्तकें आणविलीं. तो आपला वेळ आळसांत किंवा जनमनोरंजनाच्या एकाद्या ठिकाणीं जाण्यांत मुळींच घालवीत नसे, यामुळें तीं सर्व पुस्तकें लक्षपूर्वक वाचण्यास त्याला पुष्कळ वेळ मिळाला.

आमच्या इकडे या सत्पुरुषाइतके कशाला, परंतु एकादाच धंदा ज्या मंडळीस आहे त्यांच्यांपैकीं बहुतेकांस ज्ञान संपादन करण्याकडे रोज अर्धा तासही खर्च करण्यास सवड होत नाहीं ! बरोबरच आहे; गांवकुटाळकी, गप्पा, सोंगट्या, पत्ते वगैरे खेळ, तमाशे व बुद्धिभ्रष्ट करून शक्ति क्षीण करणारीं भयंकर व्यसनें यांपैकीं एकाद्या

अतिदुष्ट शत्रूच्या पाशांत आमची मंडळी अगदीं गुंतून गेल्यामुळें, त्यांना फ्रँक्लिनासारखे धंदे होणार कसे ? आणि ह्याच क्रम जर अबाधित राहील तर आमच्या देशाची उन्नति तरी कशी होणार ?

ईश्वरानें आमच्या चरित्रनायकास दिलेल्या विलक्षण बुद्धिप्रभावामुळें तो जीं पुस्तकें वाची त्यांतील महत्वाचा सर्व भाग आपल्या डोक्यांत सांठवी. अशा अव्याहत श्रमानें ज्ञान संपादन करून सर्व पृथ्वीवर उत्तम तत्ववेत्ता व मुत्सद्दी बनण्याची फ्रँक्लिनानें मोठ्या झपाट्यानें तयारी चालविली.

पेनसिल्व्हेनिया प्रांताच्या कायदे करणाऱ्या मंडळीच्या कारकुनाची जागा त्यानें आतां पतकरिली. ही जागा मोठ्या महत्वाची होती असें नाहीं; पहिले वर्षी त्याला या जागेवर नेमावें, असें सर्वांचें मत पडलें. परंतु दुसरे वर्षी एक सभासद त्याचे विरुद्ध होता. फ्रँक्लिनाला प्रत्येक मनुष्य आपला सोबती असावा, असें वाटत असल्यामुळें त्या मनुष्याचा स्नेह संपादन केल्यावांचून त्याला बरें वाटेना. तेव्हां त्यानें मोठ्या शहाणपणानें---अथवा वस्तादगिरीनें म्हटलें तरी चालेल.---आपला हेतु शेवटास नेला. त्या मनुष्या जवळ एक मोठ्या किमतीचें व पुनरावृत्ति न निघाल्यामुळें दुर्मिळ असें पुस्तक आहे असें ऐकिल्यावरून फ्रँक्लिनानें त्याला मोठ्या सभ्यपणानें एक स्तुतिपर पत्र लिहिलें, व त्यांतच हें पुस्तकही त्याजपाशीं मागितलें. हें पत्र पाहतांच त्या गृहस्थानें तें पुस्तक फ्रँक्लिनाकडे पाठवून दिलें. खरो-

खरच इतक्या चतुराईनें पत्र लिहिण्याचें काम फ्रँक्लिनां-वांचून दुसऱ्या कोणी एकाद्यास झालें नसतें.

कांहीं दिवसांनंतर **फ्रँक्लिनानें** एका नोकरा बरोबर एक फार खुबीनें लिहिलेली आभारदर्शक चिठी व तें पुस्तक त्या गृहस्थाकडे परत पाठविलें. ह्या वेळीं त्या मनुष्याचें मन प्रेमानें अगदीं उचंबळून गेलें, तो पत्रांतील सभ्यपणाचा रसाळ लेख वाचून त्याला प्रेमाचा पाझर फुटला व पुनः **फ्रँक्लिनाची** गांठ पडतांच मोठ्या स्नेहभावानें त्यानें त्यास सलाम केला तो पूर्वीं जरी कधीं त्याशीं बोलला नव्हता, तरी ह्यावेळीं त्यानें **फ्रँक्लिनाला** आपल्या घरीं येण्याविषयीं प्रेमपूर्वक निमंत्रण केलें.

ह्या विषयीं लिहिताना **फ्रँक्लिन** ह्मणतो:—" ह्या नंतर तो प्रत्येक वेळीं मला साहाय्य करण्याविषयीं तत्पर असल्यामुळें त्याचें माझें चांगलें मित्रत्व जमलें आणि तें त्याच्या मरणापर्यंत सारखें चाललें होतें. " **तुह्मीं ज्यावर उपकार केले आहेत अशा मनुष्यापेक्षां ज्यानें तुह्मांवर उपकार केले आहेत असा मनुष्य पुनः तसें करण्यास जास्त तत्परतेनें तयार राहील.** "

ह्या वृद्ध वचनाच्या सत्यपणाबद्दलचें हें स्पष्ट उदाहरण असून ह्या गोष्टीवरून शत्रुत्व वाढविणें, त्याबद्दल सूड घेणें, व त्याची चिरड येणें यांपेक्षां तें अजीबात मोडून टाकणें किती हितावह आहे, हें स्पष्ट होतें. हा **फ्रँक्लिनाचा** कित्ता आमच्या इकडील प्रत्यक्ष सख्या भावाशीं वैर बांधणारी मंडळी गिरवितील काय ?

———— ————

# भाग ६ वा.

---:o:---

## धार्मिक आणि तात्विक विषयांचा विचार.

विद्याव्यसन—नवाधर्म—फ्रँक्लिनाचें वर्तन—त्याची दिनचर्या—दुर्गुणांचा निषेध—फ्रँक्लिनाचें प्राविण्य—त्याच्या मुलाचा जन्म व मृत्यु—कांहीं शोध—यूरोपची स्थिति—फ्रँक्लिनाच्या लेखांतील उतारा—या लेखाचा व त्याच्या भाषणाचा परिणाम—मुलीचा जन्म—जोसिया फ्रँक्लिनचा मृत्यु—फिलाडेलफिया येथील विद्यालय:—

**फ्रँक्लिन** हा सतत उद्योग व श्रम करणारा विद्यार्थी होता. त्याचें वाचन अगदीं लक्ष्यपूर्वक असे इतकेंच नाहीं, तर तो आपल्या वचनांपैकीं कांहीं पुस्तकांचा चांगला अभ्यासही करी. तो जसजसा वाचूं लागला तसतशी तद्विषयक त्याची अभिरुचि वाढून तिकडे त्याचा बराच वेळ खर्च होऊं लागला. त्याचे वाचावयाचे ग्रंथ मोठे महत्वाचे आणि उपदेशपर असत. तो नेहमीं शास्त्रीय विषयांवरील वादविवाद, इतिहास, चरित्रें आणि प्रवासवर्णनें अशा तऱ्हेचींच पुस्तकें वाची. आह्मांला वाचनाची गोडी नाहीं, आणि आह्मांपैकीं ज्यांस ती आहे, त्याचें वाचन ह्मटलें म्हणजे विचकट प्रहसनें, भिकार नाटकें आणि अतिशयोक्ति

व असंभवनीयता यांनीं ओतप्रोत भरलेल्या कादंबऱ्या व स्त्रियांविषयीं दुष्टभाव उत्पन्न करणारीं स्त्रीचरित्रासारखीं भिकार पातडीं यां पलीकडे जात नाहीं. शिवाय आमच्या भाषेंत वरील महत्वाच्या विषयांवरील ग्रंथसंग्रह ही बराच कमी आहे ह्मटलें तरी चालेल. असो, परमेश्वर आमच्या या हतभाग्य देशांत महत्वाच्या विषयांवर ग्रंथरचना करणारे विद्वान् लेखक व त्यांचे चहाते वाचक ज्यादिवशीं निर्माण करील तो सुदिन होय !

त्याचें मन ह्यावेळीं धार्मिक व तात्विक विषयांच्या विचारांत अगदीं गोंधळून गेल्यासारखें झालें होतें. कांहीं कारणानें ख्रिस्ती धर्माचा त्याला मनापासून तिटकारा आला होता. तरी आपणाला लोकांनीं चांगलें ह्मणावें आणि आपण मोठ्या नीतीनें वागावें असें त्याला मनःपूर्वक वाटत असल्यामुळें त्यानें आपला हेतु सिद्धीस नेण्याची एक युक्ति काढिली, ह्यावेळचा त्याचा लेख असा आहे.

"सार्वजनिक कृत्यांत खटपट करणारांपैकीं, कोणी कितीही गप्पा ठोकिल्या तरी खरोखर मनापासून आपल्या देशाचें हित चिंतणारे त्यांच्यामध्यें अगदीं थोडे असतात. आणि एकंदर मनुष्य जातीच्या हिताकरितां झटणारे तर त्यांत याहीपेक्षां फार थोडे असतात. सर्व राष्ट्रांतील सद्गुणी व चांगल्या माणसांची एक मंडळी स्थापून ती चालविण्याकरितां उत्तम नियम करावे, व ते वरील मंडळीनें ऐक्यभावानें व तत्परतेनें पाळावे, अशी सर्वोत्कृष्ट संधि माझ्यामनें आतां आली आहे. जर एकादा योग्य मनु-

ण्य या कामांत जशी हवी तशी व जितकी हवी तितकी मेहनत घेईल तर परमेश्वर संतुष्ट होऊन त्याला अगदीं खात्रीपूर्वक यश देईल."

या विचारानें **फ्रँक्लिनावर** आपला असा पगडा बसविला कीं त्यानें आपलें सर्व लक्ष्य नवीन धर्मरचना करण्याकडे लाविलें. व नवीन पंथ स्थापना केली ह्या पंथाचे लोकांस त्यानें 'निर्व्यसनी आणि उदार अंतःकरणाची मंडळी' असें नांव दिलें. ह्या पंथाचें मुख्य तत्व व्यसनपरान्मुखता, विचार, व्यवस्थितपणा, दृढनिश्चय, योग्य काटकसर, उद्योग, खरें प्रेम, न्याय, नियमितपणा, स्वच्छता, शांति, धर्म आणि निरभिमान इत्यादि सद्गुणांस पुष्टीकरण आणावें हें होतें.

त्याच्या धर्मपुस्तकांत वरच्यापैकीं प्रत्येक गुणाचे वृद्धीस एक आठवडा खर्च करावा हाच काय तो नियम होता. बाकी रविवार नाहीं, धर्मव्याख्यान नाहीं, उपास नाहीं, तापास नाहीं, कांहीं नाहीं; या त्याच्या एकंदर कृत्याचा परिणाम त्याच्या मनावर चांगला झाला.

ही सद्गुणांची नामावलि पुढें घेऊन **फ्रँक्लिनानें** पूर्णत्व संपादण्याचा यत्न आरंभिला. परंतु त्याचा उद्देश शेवटास न जातां कार्य बाहुल्यामुळें त्याचे हे सर्वच विचार जागच्या जागीं राहिले.

**फ्रँक्लिन** मोठा अभिमानी होता. आपण आपल्या स्नेही मंडळींतील पुष्कळांपेक्षां श्रेष्ठ आहों, असें त्याला वाटत असे, व आपणाला निरभिमानी कधींच होतां येणार नाहीं, असेंही तो सांगत असे. तो ह्मणे कीं, मी

बाहेरून हवा तितका निरभिमानीपणा दाखवीन, परंतु माझें अंतःकरण इतकें अभिमानी आहे कीं, जर मी गर्वहीन झालों तर त्याच सद्गुणाबद्दल मला अभिमान होईल. त्याची दिनचर्या खालीं लिहिल्याप्रमाणें होती.

तो सकाळीं पांच वाजतां उठून शौचमुखमार्जन स्नान वगैरे शरीर स्वच्छतेचे विधी उरकून थोडा वेळ पर्यंत परमेश्वराच्या सद्गुणमूर्तीची आराधना करी. पुढें त्या सर्व दिवसांत, काय करावयाचें याचें टांचण करून थोडा वेळ त्या आठवड्यांत ज्या सग्दुणाची वृद्धि करावयाची असेल त्याविषयीं विचार करी. हें झाल्यानंतर सकाळची तरतरी आहे तोंच फराळाची वेळ होईपर्यंत ह्मणजे अजमासें दीडतास तो वाचनांत घालवी. नंतर फराळ करून आठ वाजल्यापासून बारावाजेपर्यंत तो दुकानांत एक सारखा काम करीत असे त्याचा पुढला एक तास भोजन आणि विश्रांति यांत जाई. एक वाजतां पुन्हा तो दुकानावरच्या कामास लागे. हें त्याचें बहुतेक सामर्थ्य खर्चीं पाडणारें काम त्याला सहा वाजेपर्यंत करावें लागे. अशा रीतीनें सर्व दिवस गेल्यावर रात्रीं जेवण आटोपून तो कोणी स्नेही मंडळी आल्यास त्यांजवळ बोलत बसे. अथवा बहुतकरून वाचनांतच आपला दहा वाजेपर्यंतचा वेळ खर्च करी. दहा वाजल्यानंतर तो बहुधा निजत असे.

आपण काढलेला धर्मपंथ लोकांस पसंत नाहीं असें पाहून **फ्रँक्लिन** त्यांना, मी सांगतों तें तुम्ही आपल्या हिताकरितां करा, असा उपदेश करूं लागला तो ह्मणे,

तुह्मी प्रामाणिक व्हा, ह्मणजे लोकांत तुमची मान्यता वाढेल, व्यसनापासून होणारी हानि, विषापासून होणाऱ्या नुकसानीपेक्षां कमी नसून त्यांत तुमचा नाश आहे, ह्या करितां तुह्मी निर्व्यसनी व्हा. ह्या मतांचें पुष्टीकरण करण्याकरिता त्यानें असें लिहिलें आहेः—

" **दुष्ट कृत्यें करण्याची मनाई केली आहे, ह्मणून तीं दुःख देणारीं आहेत असें नव्हे, तर तीं दुःख देणारीं आहेत, ह्मणून तीं करण्याविषयीं मनाई केली आहे.** ज्याला ज्याला ह्मणून सुख मिळविण्याची इच्छा असेल त्यानें त्यानें सद्गुणाचें अवलंबन केलें पाहिजे, पृथ्वीवरील सर्व बड्या व्यापाऱ्यांस, सरदारांस, संस्थानिकांस व राजेलोकांस त्यांच्या त्यांच्या कामाची व्यवस्था राखण्याकरितां, सद्गुणी मनुष्यांची फार जरूर असते, व तीं त्यांस कष्टसाध्य असतात; ह्मणून मी माझ्या तरुण मित्रांस खात्रीनें असें सांगतों कीं दारिद्र्यविमोचनास सद्गुणासारखा दुसरा मार्गच नाहीं. "

आतां अशा प्रकारचा विचार करून, गुणांचें ग्रहण केल्यानें, खरोखरच एकादा चांगला मनुष्य निपजेल किंवा नाहीं ह्याची मोठी शंकाच आहे. सद्गुण अंगिकारल्यामुळें जरी दुःख उत्पन्न झालें तरी तो सद्गुण आहे येवढ्यावरूनच त्याचा अंगिकार केला पाहिजे. आणि दुर्गुण स्वीकारिल्यानें जरी मोठें सुख उत्पन्न झालें तरी तो सर्वतोपरी वाईट ह्मणून त्याचा त्याग केला पाहिजे.

फ्रँक्लिनानें फ्रेंच, स्पॅनिश, इटॅलियन व लॅटिन

या भाषांचा अभ्यास करून त्यांत चांगलें प्रावीण्य संपादिलें. विद्यार्जनाच्या कामीं तो फार तत्पर असे. जरी एकाद्या देवदूतानें येऊन त्याच्या कानांत सांगितलें असतें कीं, तूं यूरोपियन दरबारांत संयुक्त संस्थानांच्या वतीनें मुखत्यार ह्मणून जाशील तेथें त्या भव्य दरबारांतील उच्च प्रतीच्या बडे लोकांत तुझी गणना होईल; मोठमोठे राजे व त्यांच्या राण्या सन्मानपूर्वक तुला मेजवान्या देतील, आणि त्यावेळीं ह्या भाषांचा हा अभ्यास व तुझें एकंदर ज्ञान तुला सोन्याच्या खाणीपेक्षांही जास्त उपयोगीं पडेल, तरी देखील फ्रँक्लिनानें आपला अभ्यास इतकाच जारीनें व निश्चयानें चालविला असता. ह्या फ्रँक्लिनाच्या ज्ञानसंपादनाच्याच दृष्टीनें, चालविलेल्या अभ्यासक्रमाकडे पाहून आमच्या इकडील, "तुह्मांला परमेश्वरानें काय कमी केलें आहे? मग परदेशीं राहून रात्रंदिवस उरस्फोट करून कां ह्या अभ्यासाची खटाटोप करितां?" असें ह्मणणाऱ्या लोकांनीं व एकादा विद्यार्थी एकाद्या परीक्षेंत उतरला असतां लागलीच त्याच्या मागें नोकरीची टोंचणी लावणाऱ्या त्याच्या पालकांनीं आणि उभयतां मंडळींचें ऐकून पुस्तकांचें बोचकें बांधून तें इतउत्तर न सोडण्याचा ठराव करणाऱ्या आमच्या दृढनिश्चयी होतकरू मित्रांनीं आपल्या मानाच खालीं घालाव्या.

आमचा चरित्रनायक सर्व विद्यांचा मोठा चाहता होता, इतकेंच नाहीं, तर त्या सर्वांत त्यानें आपली गति करून घेतली होती. त्यानें वादनकलेकडे आपलें लक्ष

पोंचविलें व थोडक्याच काळांत तो सारंगी, सतार, बीन वगैरे वाद्यें मोठ्या चतुराईनें वाजवूं लागला.

फ्रँक्लिनाचें लग्न झाल्यानंतर एक वर्षानें त्याला मुलगा झाला. त्याचें नांव त्यानें फ्रँन्सिस फोल्जर असें ठेविलें. ह्याविषयींच्या प्रसिद्ध झालेल्या सर्व लेखांत हा बालक फार सुरेख व बुद्धिमान् होता, असेंच लिहिलेलें आढळतें. फ्रँक्लिन त्याला आपला जीव कीं प्राण करीत असे. इ. स. १७३६ यावर्षी हा बालक आपल्या वयाचे चौथे वर्षी देवी येऊन मृत्युमुखांत पडला. पुत्रशोकाचा झपाटा विलक्षण असल्यामुळें फ्रँक्लिनासारखा तत्ववेत्ताही त्याखालीं अगदीं चूर होऊन गेला, मग साधारण मनुष्याची कथा काय ? अशा वेळीं तात्कालिक समाधान करणाऱ्या धर्म वाक्यांचामुद्धां त्याजवर कांहींच परिणाम झाला नाहीं. तो ह्मणे मला माझा बाळ अजीबात नाहींसा झाला असेल असें वाटत नाहीं, परंतु कोणास माहीत ? पृथ्वीवरील पुष्कळ सुज्ञ लोक पुनर्जन्माची कल्पना अगदींच नादान असें ह्मणतात, तेव्हां त्यांना माझें ह्मणणें अगदींच वेडगळपणाचें वाटेल.

त्या मुलाच्या थडग्यावरील लेख वाचून दुःख सागरांत बुडालेल्या फ्रँक्लिनाची दया आल्यावांचून राहत नाहीं,

फ्रँक्लिनाच्या कोणत्याही पत्रांत, निबंधांत आणि वादविवादांत येशूखिस्ताविषयीं फारसा पूज्यभाव अथवा कृतज्ञता दाखविलेली आढळत नाहीं.

जगांतील ईश्वरी चमत्कारांचें काळजीपूर्वक अवलोकन करून त्यानें **अॅटलॅंटिक** समुद्रावरून वाहणारे ईशान्यवारे नैर्ऋत्येकडे उद्भवून कमजोर होत होत मागें वळतात, ह्या पूर्वी न समजलेल्या तत्वाचा शोध लावला, व **फ्रँक्लिन स्टोव्ह** या नांवाची कमी जळण लागणारी एक चूल शोधून काढिली, आणि घरांमधील उष्णता या विषयावर एक लहानसा निबंध लिहिला.

भरभराटीचे दिवसांचा चांगला उपयोग केला असतां नीतीस पुष्कळ साहाय्य होतें. **फ्रँक्लिनाचें** उत्पन्न दिवसेंदिवस जास्त वाढून त्याचा उत्कर्ष जारीनें होत गेला. व त्याच्या थोर सद्गुणांचा जगाला मोठा उपयोग होईल, असा रंग दिसूं लागला. त्या प्रांतांत किंबहुना सर्व इंग्लिश वसाहतींत सुद्धां त्यावेळीं त्याच्या पत्राइतकें वजनदार दुसरें पत्र चालू नव्हतें. त्याच्या **पूअर रिचर्डाचा** तर विलक्षणच खप होत असे. त्याच्या छापखान्यांतील काम फारच सुबक निवत असल्यामुळें संयुक्तसंस्थानांच्या निरनिराळ्या भागांतून लोक आपापलीं कामें त्यांजकडे पाठवीत; व त्याच्या बारीकसारीक सर्व पुस्तकांचा खपही मोठ्या जारीनें होत असे.

**फ्रँक्लिनाची** ग्रंथाभिरुचि, कार्य तत्परता, आणि तत्वशोधनबुद्धि हीं तर प्रसिद्धच आहेत. याशिवाय तो मोठा आनंदी असल्यामुळें निरनिराळीं मजेदार गाणीं रचून व ती मंडळीमध्यें ह्मणून त्यांची करमणूक करणेंही

त्याला मनापासून आवडत असे. त्याचें वृद्धेच्छा नांवाचें गाणें फारच प्रसिद्ध आहे.

यूरोपांत नेहमींप्रमाणें लढाई चालूच होती. मोठमोठ्या फौजा शहरांची व खेडेगांवाची भाजून राखरांगोळी करीत होत्या, पिकास आलेलीं शेतें तुडवून त्यांवर रक्ताचा सडा घालीत होत्या आणि ह्या त्यांच्या दुष्ट कृत्यामुळें गांवोगांवीं एकच हाःहाःकार माजून राहिला होता. हें पाहून ह्या दुष्ट लोकांच्या एकमेकांविषयींच्या रागानें उद्भवलेल्या वादळाचा परिणाम त्याच्या वसाहती अमेरिकेंत असल्यामुळें **डेलावेराच्या** किनाऱ्यास भोगावा लागतो कीं काय असें तेथील लोकांस वाटूं लागलें. **फिलाडेल्फिया** येथें सैन्याची वगैरे तयारी नव्हती, इतकेंच नव्हे तर साऱ्या **पेनासिल्व्हेनियां**त तोफेचें एखादें नळकांडेंही मिळण्याची मारामारच होती.

**फिलाडेल्फिया**सारखें शहर लुटून फस्त करण्यास एकच लढाऊ जहाज पुरे होतें ! केकर मताचें प्राबल्य तेथें इतकें होतें कीं, कायदे करणाऱ्यांना तेथें तोफखाना ठेवणें बरोबर वाटत नसे. ह्याचवेळीं ‘ खऱ्याला मरण नाहीं ’ या सदराखालीं एक चरचरित लेख **फ्रँक्लिनानें** प्रसिद्ध केला. त्यांत अशीच स्थिति राहिल्यास इंग्रजांचे यूरोपांतील शत्रु हा प्रांत किती अल्पायासानें घेतील हें सांगून त्यांच्या निवारणार्थ कांहीं उपायही मोठ्या मार्मिकतेनें सुचविले होते. या लेखांतील थोडा उतारा खालीं दिला आहे.

" प्रथम हल्ला झाला असतां सर्वत्र भीति पसरेल आणि पुष्कळ लोक पळून आपलें रक्षण करितील. ज्यांची श्रीमंत म्हणून प्रसिद्धी आहे, ते आपल्या शक्तीबाहेर द्रव्य आपणांस देतां येणार नाहीं आणि असें झालें असतां शत्रु आपल्या आंगास जळत्या मशाली लावितील या भीतीनें देशत्याग करितील आणि कोणी वेषधारी बनतील. गृहस्थांच्या बायकापोरांची, आह्मांला पळवा, आह्माला पळवा, असें ह्मणत त्यांच्या भोंवतीं एकच गर्दी होईल. जो उठला तो रडत, ओरडत आणि पळत सुटल्यामुळें जिकडे तिकडे मोठा हाहाःकार उडून एकच घोंटाळा होईल, आणि जे कोणी शहरांत राहतील त्यांजपाशीं हत्यारें नसल्यामुळें त्यांना आपलें रक्षण करितां येणार नाहीं.

" शत्रु प्रथम शहर लुटतील आणि नंतर त्याचा जाळून धुवा उडवितील. वर सांगितलेला सर्व प्रकार जर शत्रूच्या येण्याची तुह्मांला बातमी असेल तरचा झाला. परंतु अशी बातमी नसतां जर का रात्रीच्यावेळीं तुह्मांला शत्रूनें गांठलें तर तुमची काय अवस्था होईल ! घरांतल्या घरांत राहिल्यामुळें पळून जाण्यास संधि न सांपडून शत्रु दया करील तरच सुटका, अशी वेळ येऊन शत्रूंच्या खलाशांवर अम्मल चालविणाऱ्या कप्तानापुढें नाकें घासण्याचा प्रसंग तुह्मांवर आल्यास तुमच्या बेअब्रूची कमालच होईल ! !

" सर्व मनुष्यजातीस कालिमा आणणाऱ्या अतिदुष्ट शिद्धी अक्करमाशी लोकांच्या रागाच्या तडाक्यांत, लुटींत

आणि दुष्टवासनेच्या जाळांत तुह्मी, तुमची संपत्ति आणि बायकापोरें सांपडल्यावर जो प्रसंग तुह्मांवर गुजरेल त्याची नुसती कल्पनाकरणेंही फार भयंकर आहे."

ही फिलाडेल्फियाची स्थिति आमच्या निःशस्त्र देशास कशी अक्षरशः लागू पडते !! सर्व देशांत दहा पांच ठिकाणींच असलेल्या थोड्याशा निव्वळ पगारी सैन्यानें आमच्या एवढ्या विस्तीर्ण देशाचें रक्षण व्हानें कसें? हें सैन्य खेरीज करून आमचे रक्षक म्हटलें ह्मणजे ज्या दिशेस बंदुक धरितील त्या दिशेस हटकून गोळी मारणारे आमचे नेमबाज पोलिस वीर! अशी स्थिति असल्यामुळें वासुदेव बळवंत, हरिबा, तात्या वगैरे सारखी मंडळी दहावीस लोक बरोबर घेऊन दिवसा ढवळ्या बिनदिक्कत गांवच्या गांव लुटून कसा अनर्थ करून सोडतात, याचें वर्णन आमच्या चरित्रनायकानें वरील दोन तीन कलमांत फारच उत्तम रीतीनें केलें आहे! असा प्रकार घडूं नये ह्मणून आमची राष्ट्रसभा अर्जावर अर्ज करून शस्त्रें मागते आहे, आणि आह्माला आपखुषीनें सैन्यांत येण्याची परवानगी द्या असें ह्मणते आहे परंतु सरकारास करुणा येईल तेव्हां खरी!

असो, फ्रँक्लिनाच्या या लेखामुळें जिकडे तिकडे मोठी चळवळ चालून एक मोठी सभा भरली; तींत फ्रँक्लिनाचें मोठें सुरस व्याख्यान होऊन 'प्रांतसंरक्षक मंडळी'ची स्थापना झाली, व तेथल्या तेथें दहाहजार मंडळींनीं आपल्या सह्या दिल्या. आणि थोडक्याच काळांत केकर

शिवाय करून प्रत्येक मनुष्यानें कांहीं तरी युद्धकला शिकण्याची सुरवात केली; कोणीं बंदुक, कोणीं तरवार, कोणीं कांहीं, अशाप्रकारें हत्यारें खरेदी केलीं, व त्यांचा उपयोग कसा करावा हें शिकण्याचा क्रम चालविला. याचें नांव स्वदेशभक्ति! नाहीं तर आमच्या इकडे राष्ट्रीयसभेसारख्या संस्थेसंबंधानें विचार करण्याकरितां सभा भरली तर दहा लाख वस्तीच्या गांवांत हजार पांचशें सुद्धां मनुष्यें जमण्याची मारामार! मग सह्य आणि मदत यांचें नांवच नको!!

ऐशीं निरनिराळ्या कंपन्या स्थापन होऊन त्यांस लष्करी शिक्षण मिळूं लागलें. फिलाडेल्फियांत एक पलटण तयार होऊन त्यावर फ्रँक्लिनाला मुख्य नेमिलें. परंतु मी या कामास योग्य नाहीं असें सांगून त्यानें तें नाकारिलें. बोस्टनाहून कांहीं तोफा मागवून शहरच्या रक्षणासाठीं तोफखाना तयार केला, शेवटीं फ्रँक्लिनानें आपलें नांव अगदीं साध्या शिपायांत दाखल केलें.

या कृत्यास कोणीं अडथळा आणिला नाहीं, इतकेंच नव्हे तर लोकांचा दिवसेंदिवस इकडे विशेषच कल दिसूं लागला. तरुण क्केकर्स वडिलांचा उपमर्द होईल, या भीतीनें जरी उघडरीतीनें आपलें अंग या नवीन बेतांत आहे असें दाखवीत नव्हते, तरी आंतून त्याच्या उत्कर्षासाठीं होईल ती खटपट ते करीत असत. ह्या कृत्यांत दाखविलेल्या हिमतीनें व शहाणपणानें फ्रँक्लिनाचें वजन वाढून पेनसिल्हेनिया प्रांतांत त्याला चांगला मान मिळूं

लागला, व लोकांचा त्यावर मोठा विश्वास बसला. इ. स. १७४८ त एलासापेलीचा[1] तह झाल्यानंतर लोकांची बहुतेक भीति उडाली.

इ. स. १७४२ त फ्रँक्लिनाला एक मुलगी झाली हिचें नांव त्यानें सेरा असें ठेविलें. त्याचा तो आईवेगळा मुलगा आतां बराच मोठा व सशक्त परंतु आळशी आणि स्वच्छंदी झाला होता. त्याचें जन्म केवळ आपल्या बापास दुःख व त्रास देण्याकरितांच झालें होतें, असें ह्मटलें असतां चालेल. फ्रँक्लिन व डिबोरा यांसारख्या मनुष्यांच्या शिक्षेखालीं वाढलेला मुलगा असा निपजावा काय? परंतु ह्या पृथ्वीच्या पाठीवर अशाही विपरीत गोष्टी आपल्या पाहण्यांत येतात. ज्या शिवाजी महाराजांनीं मोठमोठे पराक्रम करून दिगंतरीं कीर्ति गाजविली आणि औरंगजेबासारख्याला चळचळ कापायला लावलें त्याच शिवाजी महाराजांच्या ज्येष्ठ चिरंजीवांना केवळ दुष्ट संगती आणि व्यसन यांमुळें त्याच औरंगजेबाच्या हातून केवढा भयंकर मृत्यु आला बरें! ह्या मुलानें युद्ध सुरू होतांच पळून जाऊन आपलें नांव लढाऊ गलबतावरील मंडळींत दाखल केलें. परंतु फ्रँक्लिनानें त्याला पुष्कळ खटपट करून एकदांचें ह्या कचाट्यांतून सोडविलें. पुढें आतां ह्या पोरानें काय करावें हें त्याला सुचेना. शेवटीं त्यानें त्याच्या

१ हें गांव यूरोपांत बेलजिअम आणि प्रशिया यांच्या सरहद्दीवर कोलोन पासून चाळीस मैलांवर आहे. येथें तह होऊन इ. स. १७४५ पासून फ्रेंच व इंग्रज यांमध्यें उद्भवलेल्या लढाईचा शेवट झाला.

सोळाव्या वर्षी कानड्याच्या स्वारीच्या प्रसंगीं त्याचें नांव शिपायांमध्यें दाखल करून दिलें.

फ्रँक्लिनाची बहीण जेन हिच्या मुलानेंही असाच पळ काढून एका गलबतावर नोकरी धरिली होती, तेव्हां त्यानें स्वतःचें उदाहरण देऊन " मुलें, त्यांना आइबाप निष्ठुरतेनें वागवितात ह्मणून बिघडतात असें नाहीं " अशा आशयाचें पत्र तिला पांठवून तिचें समाधान केलें.

बेंजामिनचा बाप आपल्यावयाच्या एकूणनव्वदाव्या वर्षी परलोकवासी झाला. तो मोठा नीतिमान् व पवित्र असल्यामुळें सर्व लोक त्याला मानीत. बोस्टन येथील न्यूज लेटर नांवाच्या पत्राच्या १७जान्युआरी१७४९च्या अंकांत ' प्रसिद्ध पुरुषांचे मृत्यू ' या सदराखालीं त्याजविषयींची हकीकत खालीं लिहिल्याप्रमाणें दिली आहे.

" गेल्यारात्रीं मेणबत्त्या व साबण करण्याच्या कारखान्याचे मालक जोसिआ फ्रँक्लिन यांस मृत्यूनें गांठिलें. नेहमींच्या नियमितपणामुळें त्यांची शरीरसंपत्ति इतकी उत्तम झाली होती कीं, त्यांना मरेपर्यंत कांहीं म्हणण्यासारखें दुखणेंबाणें झालें नाहीं. त्यांची परमेश्वराच्या ठिकाणीं मोठी भक्ति असल्यामुळें मरण समयीं त्यांना मुळींच यातना झाली नाहीं. ह्या आजन्म प्रामाणिक पुरुषाच्या संततीस आपण अशा मनुष्याच्या पोटीं आलों, हें मोठें भूषण आहे. "

इ. स. १७४३ त फिलाडेल्फियामध्यें एक मोठें विद्यालय स्थापन करावें असा निश्चय करून त्याजविषयींचें

टांचण फ्रँक्लिनानें तयार केलें; परंतु पुढें लढाईमुळें जिकडे तिकडे अस्वस्थता उत्पन्न झाल्यामुळें तें प्रसिद्ध करण्याचें काम इ. स. १७४९ पर्यंत लांबणीवर टाकावें लागलें. पुढें तें " **पेनसिल्व्हेनिया** येथील तरुणांचा शिक्षणक्रम " अशा नांवानें प्रसिद्ध झालें ह्यांतील सूचना पाहिल्या तर हें टांचण करणारा तत्वज्ञानी होता असें वाटे. त्यानें कोणता अभ्यासक्रम चलवावा हें मोठ्या शहाणपणानें व बारकाईनें या लेखांत नमूद केलें होतें.

ह्या शाळेकरितां हूं हूं म्हणतां साठ सत्तर हजार रुपये जमा झाले. सर्व पंथांचे लोक या कामांत झटले. त्यांनीं प्रत्येकीं आपापल्या तर्फे ह्या रकमेच्या व्यवस्थेकरितां एक एक मनुष्य निवडून दिला. इमारत बांधणें व संस्थेची एकंदर रचना करणें हीं कामें फ्रँक्लिनावर सोंपविलीं, व तीं पुढें त्यानें अगदीं योग्य रीतीनें बजाविलीं.

# भाग ७ वा.

## व्यापारी तत्वज्ञानी झाला.

फ्रँक्लिनाला इंडियन कमिशनर नेमिलें-दारूचा परिणाम-इंडियन लोकांचें तर्कशास्त्र-फ्रँक्लिनाचा सन्मान-त्याचा टेनंटला उपदेश-शहर सुधारणेचे प्रयत्न-कांहीं गोष्टी-फ्रँक्लिनाला पोस्टमास्तर नेमितात-लढाईच्या बातम्या-विजेचे प्रयोग--फ्रँक्लिनाचें उत्पन्न वाढतें-विजेच्या धक्याचे प्रयोग-पतंग-नवीन सन्मान-त्याचे भाषणासंबंधीं विचार-पोस्टखात्याची सुधारणा.

इ. स. १७४० त फ्रँक्लिन चौतीस वर्षांचा असतां त्याला इंडियन लोकांशीं तह करण्याचे कामावर नेमिलें. ते लोक व्यसनांत नेहमीं गुंग असत, हें जाणून फ्रँक्लिनानें त्यांना असें सांगितलें कीं, तहाचें काम पुरें होईपर्यंत जर तुह्मी कोणत्याही प्रकारची निशा न कराल, तर तह होतांच तुह्मांला लागेल तितकी दारू पुरवूं. हा ठराव त्या मंडळीनें मान्य केला आणि त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें.

फ्रँक्लिनानें लिहिलें आहे कीं, " तह होतांच या मंडळीनें मोठ्या हक्कानें दारूची मागणी केली, व एके दिवशीं तिसरे प्रहराचे सुमारास आह्मी ती त्यांना दिलीही.

पुरुष, बायका, पोरें वगैरे एकंदर शंभर मंडळी असून ती शहराबाहेर चौफेर पालें देऊन त्यांत उतरली होती. संध्याकाळचे वेळेस त्यांच्यामध्यें मोठा गलबला उडालेला पाहून आम्ही या कामाकरितां आलेली सर्व मंडळी—काय गडबड आहे हें पाहण्याकरितां निघालों."

"चौकामध्यें मोठा परसा पेटलेला होता, व बायका पुरुष दारू पिऊन एकमेकांशीं भांडण करीत होते. त्यांची तीं भिल्लासारखीं काळीं कुळकुळीत अर्धी उघडीं शरीरें, त्या परशाच्या अंधक उजेडांत चांगलीशीं दिसत नव्हतीं. ते ओरडत आरडत, एकमेकांच्या पाठीस लागत आणि एकमेकांस निखारे मारीत. सारांश, तो देखावा पाहून यम लोकाची आठवण झाल्याशिवाय रहात नसे. हें भांडण मिटेल असें वाटेना, ह्मणून आह्मी आपल्या बिऱ्हाडीं निघून गेलों. पुढें सुमारें मध्यरात्रीच्या सुमारास ते आणखी दारू मागण्याकरितां आमच्या बिऱ्हाडीं आले, परंतु आह्मीं तिकडे लक्षच दिलें नाहीं."

"दुसरे दिवशीं सकाळीं, रात्रीं केलेल्या निर्लज्जपणाच्या दंग्याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें आणि त्यांची चूक त्यांच्या अगदीं मनाला लागून राहिली. त्यांनीं आपल्यापैकीं तिघां मुख्य मनुष्यांस कृतापराधाबद्दल क्षमा मागण्यास आमच्याकडे पाठविलें, आणि माना खालीं घालून आपली चूक कबूल केली. परंतु चमत्कारिक तर्कशास्त्र लढवून त्यांनीं आपला सर्व दोष परमेश्वरावर लादला. त्यांच्यापैकीं एकजण ह्मणाला, ईश्वरानें सर्व वस्तु

कांहींना कांहीं उपयोगाकरितां केल्या आहेत, तेव्हां त्यांचा उपयोग करून घेणें आपलें काम आहे. आतां मद्य उत्पन्न करितेवेळीं परमेश्वर ह्मणाला, ही वस्तु इंडियन लोकांच्या निशेकरितां निर्माण केली आहे, तेव्हां त्या प्रमाणें घडलेंच पाहिजे, नाहींतर आपण ईश्वराचे अपराधी ठरूं."

पुढें गव्हरनरानें **फ्रँक्लिनाला** जस्टिस ऑफ धी पीस नेमिलें. अशा रीतीनें एकामागून एक मिळत गेलेल्या सन्मानानें त्याला मोठा आनंद झाला. थोडक्याच दिवसांत त्याला कायदे करणाऱ्या मंडळीचा सभासद निवडिलें. केवळ त्याच्याच आग्रहानें **फिलाडेल्फियांत** आजारी लोकांकरितां एक दवाखाना स्थापन झाला. ह्या **फ्रँक्लिनाच्या** सूचनेस पुष्कळ लोक विरुद्ध होते, तरी त्याचा बेत तडीस जाऊन त्या दवाखान्याचा लोकांस मोठा उपयोग होऊं लागला.

**रे० गिलबर्ट टेनंट** यानें एक सभागृह बांधण्यास पैसे जमा करण्याचे कामीं **फ्रँक्लिनाची** मदत मागितली. तो प्रत्येक सार्वजनिक कामांत लोकांची मदत मागण्यांत पुढारीपणा घेत असल्यामुळें नेहमीं नेहमीं लोकांवर असा

---

१ मोठमोठ्या शहरांतून दस्तऐवज खरे करण्याचीं प्रतिज्ञा घेण्याचीं वगैरे कामें लोकांस विशेष अडचणी वांचून करतां यावीं, ह्मणून सरकार योग्य वाटेल त्या मनुष्यास ह्या अधिकार देतें. त्याचा दिवाणी किंवा फौजदारी कामें चालविण्याचा अधिकार असत नाहीं असे जस्टिस ऑफधी पीस ( जे. पी. ) मुंबई शहरांत बरेच आहेत.

भार घालीत गेल्यानें आपण लोकांस कदाचित अप्रिय होऊं, अशी त्यास भीति पडली व त्यानें हें काम करण्याचें नाकारिलें. तेव्हां टेनंटानें सार्वजनिक कामास हातभार लावणाऱ्या लोकांची एक यादी त्याजपाशीं मागितली. आपण स्वतः आपल्या मित्रांच्या पिशव्या खालीं करून दुसऱ्यांसही त्यांच्या पाठीमागें पैशाचें टुमणें लावण्यास सांगणें त्याला गैर वाटलें, म्हणून त्याच्या या म्हणण्यालाही त्याला नाहीं म्हणणें भाग पडलें. पुढें आतां काय करावें, पैसा कोणत्या मार्गानें मिळवावा, असें टेनंटानें त्याला विचारल्यावर तो म्हणाला: —

" काय केल्यानें पैसा मिळेल, हें मी तुम्हांला मोठ्या खुषीनें सांगतों—प्रथम जे कोणी ह्या कामास मदत करितील, असें तुम्हांस खात्रीपूर्वक वाटत असेल, त्यांजपाशीं मागणें करा. नंतर ज्यांविषयीं तुम्हांस संशय येत असेल त्यांजकडे जा आणि ज्यांनीं मदत केली असेल त्यांची यादी त्यांस दाखवा. आणि अखेरीस जे कांहीं देणार नाहींत असें तुम्हांस वाटत असेल त्यांच्याकडे जा. कारण त्यांपैकीं कांहीं विषयीं तुमचा तर्क खोटा होण्याचा संभव आहे. " हा फ्रँक्लिनाचा उपदेश सार्वजनिक कामांत पुढारीपणा स्वीकारणारांनीं अवश्य लक्षांत वागवावा.

मि. टेनंटाला हें ऐकून खूप हंसूं कोसळलें व ह्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा निश्चय करून पैसा जमा करण्याचें काम त्यानें मोठ्या जारीनें सुरू केलें; व थोड-

क्याच दिवसांत मोठी रक्कम जमा होऊन आर्चस्ट्रीटवर सभागृहाची भव्य इमारत तयार झाली.

फिलाडेल्फियांतील सडका जरी फारच चांगल्या रीतीनें तयार केलेल्या होत्या तरी त्यांना फरसबंदी नसल्यामुळें पर्जन्यकाळीं त्या केवळ दलदली बनत; व त्यामुळें त्यांवरून जाणें येणें फार जड जाई. फ्रँक्लिननें आपल्या मित्रमंडळींत याविषयीं बोलणें काढून व त्याबद्दलची आपल्या पत्रांत पुष्कळ चर्चा करून शहरांतील मुख्य रस्त्याचे बाजूस मनुष्याला जाण्यायेण्याकारितां एक फरसबंदी उपमार्ग असावा असें ठरविलें. व त्याप्रमाणें सडक तयार होऊन लोकांस मोठा आनंद झाला. परंतु पूर्वीच्या रस्त्यांस फरसबंदी नसल्यामुळें गाड्यांनीं नवीन सडकेवर चिखल उडे, तो काढण्याकरितां लोक नेमिले नव्हते; यामुळें पायीं जाणाऱ्या येणाऱ्यांस निर्मळ वाट मिळत नसे.

प्रत्येक घरवाल्यानें महिना चार आणे दिल्यास घरापुढील घाण काढून आठवड्यांतून दोन वेळ एकंदर रस्ता साफ करण्यास एक उद्योगी मनुष्य तयार होता. त्यानें आपली ही इच्छा फ्रँक्लिनाला कळविली.

तत्वज्ञ फ्रँक्लिननें उपमार्गाचें काम आटोपतांच, तो साफ राखिल्यापासून कोणकोणते फायदे आहेत, तें एका कागदावर छापून त्याच्या प्रती घरोघर वांटल्या. सडक साफ ठेविल्यानें घराच्या आंतील बरीच घाण कमी होईल, दुकानापुढें जिकडे तिकडे स्वच्छ दिसल्यास गिऱ्हाइकांना तेथेंच माल घ्यावा असें वाटेल आणि वाऱ्यामुळें उडणाऱ्या

सडकेवरील धुळीनें दुकानांतील मालाची खराबी होणार नाहीं. इत्यादि पुष्कळ प्रकार सदरील लेखांत आमच्या चरित्रनायकानें नमूद केले होते. आमच्या इकडील साधारण गांवांतील गुजर, वाणी, शिंपी व हलवाई मंडळ याचा थोडा तरी विचार करितील काय?

कांहीं दिवसांनंतर फ्रँक्लिन स्वतः महिना चार आणे देण्यास किती लोक तयार आहेत, हें पाहण्याकरितां शहरांतील प्रत्येक दुकानीं व घरीं हिंडला. त्याला या कामांत चांगलेंच यश मिळालें. मुख्य रस्त्यावरील फरसबंदी स्वच्छ राहिल्यानें, सर्वांस मोठा आनंद होऊन त्यांनीं शहरांतील एकंदर मुख्य रस्त्यास फरसबंदी करून ठिकठिकाणीं कंदील लावावे, अशा अर्थाचें बील फ्रँक्लिनकडून कायदे करणाऱ्या मंडळीपुढें आणविलें.

ह्या सडकेवरील दिव्यांची कांच प्रथम वर्तुळाकार बनविली होती, त्यामुळें धूर कोंडला जाऊन उजेड साफ पडत नसे, म्हणून हे दिवे रोजच्यारोज पुसून साफ करावे लागत, आणि अशावेळीं सहज धक्का लागून सर्वच कांच फुटून जात असे. तेव्हां फँक्लिनानें चौकोनी कंदिलाची कल्पना सुचविली. तीमुळें सर्वच कंदील फुटत न जातां एखादेंच भिंग फुटून तें थोडक्या खर्चांत नवीन घालतां येत असे. या कंदिलास हवा येण्याकरितां खालच्या बाजूस छिद्रें राखिलीं होतीं व धूर जाण्याकरितां वर एक दार राखिलें होतें. यामुळें कंदील वारंवार पुसावा न लागून तो फुटण्याचा प्रसंगही क्वचितच येई.

**फ्रँक्लिन** जिकडे जिकडे जाई, तिकडे तिकडे आपल्या-च्यानें होईल ती सुधारणा करण्याचा तो यत्न करी. तो एकदा इंग्लंडमध्यें गेला असतां त्यावेळचे तेथले ते भिकारी घाणेरडे रस्ते एक गरीब बाई एका वाईटशा खराट्यानें झाडीत असतां त्यानें पाहिली व तिची ती श्रमामुळें निस्तेज झालेली मुद्रा पाहून दया येऊन त्यानें तिला विचारिलें, "बाई तुला कोणी या कामावर लाविलें?" ती ह्मणाली, "कोणी नाहीं. मी गरीब व निराधार ह्मणून मोठमोठ्यांच्या घरापुढें झाडून दमडी अधेला कोणी जें कांहीं देईल, तें घेऊन आपलें पोट भरितें."

**फ्रँक्लिनानें** लागलेंच तो सर्व रस्ता झाडण्याची कामगिरी तिला सांगितली. यावेळीं नऊ वाजले होते; तिचा अशक्तपणा पाहून तें काम संपविण्यास तिला सबंद दिवस लागेल, असें **फ्रँक्लिनाला** वाटलें. परंतु तीनवाजतांच ती काम आटोपून आपली मजुरी मागण्याकरितां त्याजकडे आली. तिनें आपलें काम इतक्या थोड्यावेळांत केलें, यावरून तें बरोबर केलें नसेल, असें त्यास वाटून त्यानें आपला नोकर तें काम पाहण्यास पाठविला. परंतु सर्व रस्ता तिनें अगदीं साफ करून ठेविला होता हें पाहून **फ्रँक्लिनाच्या** मनांत एक कल्पना आली. तो ह्मणाला," जर ही अशक्त बाई एवढा मोठा रस्ता एवढ्याशा वेळांत झाडते, तर चांगला सशक्त मनुष्य उत्तम खराट्यानें हें काम निम्मेवेळांत सहज आटपूं शकेल." त्यानें लंडन व वेस्टमिनिस्टर येथील सर्व रस्ते झाडण्याच्या कामा

बद्दल एक मसुदा तयार करून तो लंडन येथील एका सार्वजनिक कामांत पुढारीपणा घेणाऱ्याच्या हातीं दिला.

फ्रॅंक्लिनानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. " थोडक्या, परंतु नेहमीं होणाऱ्या फायद्यांतच मनुष्याचें खरें सुख आहे, क्वचित् प्रसंगीं घडणाऱ्या मोठ्या फायद्यांत नाहीं. एखाद्या गरीब तरुण मनुष्याला एकदम एक हजार रुपये दिल्यानें त्याच्या सुखांत जी भर पडेल, त्यापेक्षां त्याला स्वत: आपली हजामत आपण करण्यास आणि आपला वस्तरा स्वच्छ राखण्यास शिकविल्यानें जास्त भर पडेल. दिलेली रक्कम तेव्हांच खर्च होऊन जाईल, व ती मूर्खपणानें खर्च केल्याबद्दल नेहमीं त्याचें मन त्याला टोंचील. परंतु दुसऱ्या तऱ्हेच्या देणगीनें नेहमीं न्हाव्याची वाट पहात बसण्याचा, त्याच्या घाणेरड्या फडक्याच्या व हातांचा, त्याच्या तोंडाच्या घाणीचा आणि खराब झालेल्या वस्तऱ्याचा त्रास अगदीं नाहींसा होऊन मनास वाटेल तेव्हां चांगल्या हत्यारानें हजामत होऊन मनाला सदोदित आनंद होईल.

इंग्लंडच्या सर्व वसाहतींतील मोठमोठ्या कामदारांची नेमणूक इंग्रजसरकाराकडूनच होत असे. फ्रॅंक्लिन हा कांहीं दिवस पोष्टमास्तर जनरलच्या हाता खालीं जमाखर्ची काम करीत होता. अमेरिकन पोष्टमास्तर मेल्यानंतर इ० स० १७५३ त सर वुइल्यम हंटर आणि फ्रॅंक्लिन या दोघांस त्या कामावर नेमिलें.

हा काळपर्यंत पोष्ट खात्याचा खर्च त्याच्या उत्पन्नांत

भागून त्यापासून सरकारास एका पैचीही किफायत नव्हती. परंतु फ्रँक्लिनाची नेमणूक झाल्यावर थोडक्याच वर्षांनीं सरकारास या खात्याचें निव्वळ उत्पन्न आयर्लंडच्या पोष्ट खात्याच्या तिप्पट होऊं लागलें. परंतु पुढें प्रधानमंडळाच्या अविचारामुळें सरकारास एका दिडकीचेंही उत्पन्न होईना.

फ्रान्स व इंग्लंड यांच्यामध्यें पुन्हा लढाई सुरू होऊन अमेरिकेंत कॅनडा व इंग्रजांच्या वसाहती यांच्यामध्यें तंटा उत्पन्न होण्याचा रंग दिसूं लागला. युरोपांत दोन्ही सैन्यांची तयारी मोठ्या कडाक्यानें सुरू झाली. तेव्हां अमेरिकेंत इंडियन लोकांशीं स्नेह करून त्यांस आपल्या पक्षास आणावें, ह्मणून एक मंडळी नेमिली. फ्रँक्लिन हा या मंडळींतील एक होता. त्याला फार काळजी पडली, तेव्हां सर्व वसाहती जर एकीनें चालतील तरच बचाव होईल, असें वाटून त्यानें एक ऐक्योपाय पत्रक तयार केलें. परंतु ह्या त्याच्या उपायामुळें प्रजेस विशेष हक्क मिळत असल्या कारणानें तें चांगलें असूनही नापसंत ठरलें.

फ्रँक्लिन बोस्टनला गेला असतां तेथें त्यानें इंग्लंडाहून नुकतीच आलेली विद्युन्नलिका व तिचे अपूर्वदृष्ट प्रयोग पाहिले, व त्याविषयांत त्याचें मन अगदीं गढून गेलें. फिलाडेल्फियास परत गेल्यावर त्यानें हे प्रयोग करण्याची खटपट अगदीं मनापासून चालविली. ह्यावेळीं त्यानें आपल्या एका मित्रास लिहिलें तें असें:—

"ह्या अभ्यासांत जितकें माझें मन गढलें आहे, तितकें पूर्वी कोणत्याच दुसऱ्या अभ्यासांत गढलें नव्हतें, व ह्या अभ्यासाइतका वेळ दुसऱ्या कोणत्याही अभ्यासास मीं दिला नव्हता. मी एकटा असतांना हे प्रयोग करून पाहतों व पुढें हे प्रयोग अगदीं नवीन असल्यामुळें ते पाहण्यास माझ्या मित्रांची अगदीं गर्दी होते; व ह्या करितां ते मला पुनःपुनः करावे लागून दुसरें कांहीं करण्यास वेळ मुळींच मिळत नाहीं"

घर्षणापासून वीज उत्पन्न होत नाहीं, पण एकत्र होते असें फ्रँक्लिनाचें मत होतें. त्यानें धन व ऋण विद्युत्संबंधीं विचार लोकांपुढें आणिला. फ्रँक्लिनाजवळ आतां बराच पैसा झाल्यामुळें त्याला मूलतत्वांचा शोध लावण्यास आतां पुष्कळ वेळ मिळूं लागला. त्याचें दुकानचें उत्पन्न सालीना सुमारें सात हजार रुपये होतें. ह्या शिवाय तो दोन ठिकाणीं हुद्यांचीं कामें करी, त्याबद्दल त्याला वर्षाचे पंधराशें रुपये मिळत. त्याचा धंदा मोठ्या भरभराटीनें चालल्यामुळें त्याला छापखान्याचा वर्षाचा फायदा सरासरी वीस हजार रुपये होई तेव्हां एकंदर त्याचें वार्षिक उत्पन्न अजमासें तीस हजार रुपये ह्मणजे एकाद्या वसाहतीच्या गव्हनरच्या उत्पन्नाचे तिप्पट होतें.

अशा भरभराटींत असल्यामुळें फ्रँक्लिनानें दगदगीचें काम सोडून ह्या नवीन शास्त्राचा शोध मोठ्या जारीनें चालविला. त्यानें इ० स० १७४८ त आपल्या न्यूयार्क येथील एका मित्रास लिहिलें कीं :—

"मी आतां शहराच्या अगदीं शांत ठिकाणीं रहावयास गेलों आहें. व थोडक्याच काळांत मी आपल्या वेळाचा मीच मालक होईन, मला वाटतील तीं सत्कार्यें मी करीन आणि ज्या गोष्टींत मला सुख वाटेल त्यांचा अनुभव घेईन. मला सांपडलेल्या वेळांत पुष्कळ ग्रंथ वाचून त्यांपैकीं कांहींचा मी अभ्यास करीन, आणि शास्त्रीय प्रयोग करून पाहीन. ज्या बुद्धिवान् लोकांचा माझ्या सुदैवानें मला संबंध घडला आहे व ज्यांशीं माझी मैत्री जडली आहे. त्यांच्यांशीं स्वस्थ अंतःकरणानें मानवजातीस सुख होणाऱ्या विषयांवर पुष्कळ वेळ बोलत राहीन' ही फ्रँक्लिनाची आपल्या अमोल्य वेळाचा सदुपयोग करण्याची जबर इच्छा आमच्यांपैकीं कितीजणांत वसत आहे !

त्यानें मेघगर्जनायुक्त वादळावर एक लहानसें पुस्तक लिहिलें, त्यांत त्याचा शहाणपणा उघड दिसून येत होता, ह्मणून त्या वेळच्या युरोपियन व अमेरिकन तत्ववेत्यांचें लक्ष या पुस्तकांतील गोष्टींचा विचार करण्यांकडे अगदीं वेधून गेलें. ह्या अतिमहत्वाच्या पुस्तकांत साग्र पदार्थांची विद्युदाकर्षणशक्ति आणि कृत्रिम व स्वाभाविक विजेचें साम्य ह्यांचेंच मुख्य विवेचन होतें. इमारतीजवळ तिच्या आढ्यापेक्षां कांहीं उंच अथवा गलबतास त्याच्या डोलकाठीहून कांहीं उंच अशी धातूची पट्टी लाविली असतां ती ढगांतून वीज ओढून घेईल व त्या योगानें इमारतीस अथवा गलबतास धक्का पोंहोंचणार नाहीं. असें फ्रँ-

क्लिनाचें मत आहे. तो ह्मणतो, " धातूच्या टोंकाच्या ठिकाणीं अशी शक्ति कां असावी हें मला समजत नाहीं, परंतु ती आहे हें अनुभवसिद्ध आहे. "

एकदां त्यानें आपल्या मित्रमंडळीस बोलावून त्यांच्या करमणूकीकरितां एक मोठा थोरला कोंबडा विजेच्या धक्यानें ठार मारण्याची व्यवस्था केली. परंतु चुकून तो धक्का कोंबड्यास न लागतां फ्रँक्लिनालाच लागून त्याला बराच त्रास सोसावा लागला. ह्या चुकीबद्दल त्याला फार वाईट वाटलें व " ही आपल्या मूर्खपणानें घोड्यायेवढी झालेली चूक, दारूगोळ्यानें भरलेल्या पिंपास तापविलेल्या सळईनें भोंक पाडून चोरी करूं इच्छिणाऱ्या ऐरिश मनुष्याच्या चुकीप्रमाणें फार भयंकर आहे. आतां त्याला त्याच्या चुकीबद्दल ेचें प्रायश्चित मिळालें, आणि मी वांचलों एवढेंच कायत. " असें तो ह्मणाला.

इ. स. १७५२ चा जून महिना उजाडला, जिकडे तिकडे वादळें, गडगडाट, विजा आणि पाऊस यांची एकदम गर्दी उडाली, समग्र आकाश अभ्राच्छादित होऊन भगवान् सहस्त्ररश्मि सूर्यनारायणाचें नुसतें दर्शनही होईनासें झालें. अशावेळीं, न जाणो लोक आपली कुचेष्टा करितील; ह्या भीतीनें फ्रँक्लिन आपल्या मुलास बरोबर घेऊन दूर एका शेतांत गेला आणि त्याठिकाणीं आपला जगद्विख्यात पतंगाचा प्रयोग करूं लागला. हा पतंग एका मोठ्या रेशमी रुमालाचा केला असून त्याच्या मधल्या काठीच्या शेवटास धातूची एक अणीदार नळी बस-

विली होती. सर्व दोरी तागाची असून हातांत धरावयाचे ठिकाणीं मात्र रेशमी होती. ह्या दोरीच्या शेवटास एक साधी किल्ली बांधिली होती. अतिशय औत्सुक्यानें पण भीतीनें त्यानें दोरी धरिली. थोडक्याच वेळांत तागाच्या दोरींतील तंतु आपोआप उभारून निरनिराळे होऊं लागले. आणि पुढें त्यानें आपलें एका बोटाचें पेर त्या किल्लीस लावितांच एक ठिणगी पडली; अशा रीतीनें **फ्रँक्लिना**चा यत्न सफल होऊन तो मोठ्या आनंदानें घरीं परत गेला.

इंग्लंड व फ्रान्स या देशांमधील बहुतेक तत्त्ववेत्त्यांस, हल्लींच्या हिंदूंप्रमाणेंच त्यावेळचा अमेरिकन मनुष्य ह्मणजे केवळ रानटी व अडाणी वाटत असल्यामुळें **फ्रँक्लिना**नें तागापासून विद्युल्लतेचें आकर्षण करून आपणास मागें टाकिलें हें त्यांस खरें वाटेना. इंग्रजांपेक्षां फ्रेंच लोक, अमेरिकन लोकांस कांहीं निःपक्षपातानें वागवीत, ह्मणून त्यांच्यांपैकीं तिघां तत्त्ववेत्त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं हा प्रयोग केला व त्यांत त्यांस यशही मिळालें; तेव्हां मात्र त्याच्या सत्यत्वाबद्दल सर्व यूरोपभर **फ्रँक्लिना**चा डंका वाजला.

**फ्रँक्लिना**ची आतां फार कीर्ति होऊन त्यावेळच्या प्रसिद्ध तत्ववेत्त्यांत त्याची गणना होऊं लागली, व त्याचे प्रयोग यूरोपांतील सर्व देशांत तत्ववेत्ते करून पाहूं लागले.

अमेरिकेंतील विद्वान् लोकांनीं त्याच्या सन्मानार्थ त्याला एम्. ए. ची पदवी दिली, व यूरोपांतील रायल सोसायटीनें त्याजपासून नांव दाखल करण्याबद्दल साडेबावन रुपये व

दरसाल सव्वासवीस रुपये घेऊन त्याला सर्वानुमतें आपला सभासद केलें. व पुढील वर्षी काल्पेचें सोन्याचें पदक बक्षीस देऊन त्याचा सन्मान केला.

सात वर्षेपर्यंत या शास्त्राचा एकसारखा अभ्यास केल्यानें फ्रँक्लिन खरोखरच या जगांतील अति विख्यात विद्युच्छास्त्रज्ञांपैकीं एक होऊन बसला. त्याचें लक्ष सदोदित लोकोपयोगी कामांत कांहीं नवीन सुधारणा करण्यांत गुंतलेलें असे. कधीं कधीं तो अगदीं बारीक सारीक गोष्टींपासून मोठमोठे हितावह शोध लावी. एकदां परदेशांतून कांहीं माल भरून आलेलें एक लव्हाळ्याचें शिसर एका खंदकांत पडलें होतें व त्यांतील एक लव्हाळा जमिनींत बुंध धरून फुटूं लागला होता. हें पाहून फ्रँक्लिनानें हलकेच तो मुळासुद्धां काढून घरीं नेऊन लाविला. हाच अमेरिकेंतील पिंवळ्या लव्हाळ्याचें मूळबीज होय. पहा, या यःकश्चित गोष्टीपासून आज त्याचे देशास केवढा फायदा होत आहे!

ज्याला ज्याला ह्मणून फ्रँक्लिनाची चांगली माहिती होती, तो तो त्याला फार पूज्य मानी, आणि हें बरोबरच आहे; कारण तो आपल्या इष्टमित्रांच्या कल्याणासाठीं नेहमीं फार मेहनत घेत असे.

सर्व कामें सोडून जारीनें अभ्यास चालवावा असा फ्रँक्लिनानें विचार केला. परंतु त्याच्या शहाणपणाविषयीं कीर्ति सर्वत्र पसरली होती, यामुळें त्याला आपला बेत सिद्धीस नेतां येईना. तो कांहीं दिवसांनीं जनरल असेंब्लीचा सभासद झाला.

फ्रँक्लिन ह्मणतो कीं, "वक्तृत्व करणें तर लांबच राहिलें, परंतु चांगलेसें व्याख्यान देण्याची शक्ति माझ्या आंगीं नव्हती, आणि शब्दयोजना करीत असतां मी अडखळें, तरी आपल्या ह्मणण्याप्रमाणेंच एखाद्या कामाचा निकाल करून घेई."

फ्रँक्लिनाचे भाषणासंबंधीं उद्गार प्रत्येक तरुण मनुष्यानें हृदयांत सांठवून ठेवण्यासारखे आहेत. तो ह्मणतो, "मला आपले विचार सफाईनें व निश्चयानें बोलून दाखविण्याची संवय होती. ज्या गोष्टीविषयीं वादविवाद होण्याचा संभव आहे, ती गोष्ट, लोकनिदर्शनास आणितेवेळीं 'खात्रीनें' 'निःसंशय' अशा प्रकारचे निश्चयवाचक शब्द न योजितां, 'मला असें वाटतें,' 'अमुक गोष्ट अशी असावी, असा माझा तर्क आहे,' 'मला असें दिसतें,' 'अशा अशा कारणांमुळें मला हें बरोबर वाटत नाहीं,' 'माझी अशी कल्पना आहे,' 'मी ह्मणतों तें जर चुकीचें नसेल तर' अशा प्रकारची वाक्यरचना मी करीत असें. व त्याचा मला, आपल्या मतांचा लोकांचे मनावर ठसा उमटविणाऱ्या प्रसंगीं, व त्यांना आपल्या मताप्रमाणें आचरण करण्यास सांगते वेळीं चांगलाच उपयोग होत असे."

ज्यावेळीं फ्रँक्लिनानें पोस्टखात्याचें काम आपल्या हातीं घेतलें, त्यावेळेस त्या खात्याची फार चमत्कारिक स्थिति होती. ती सुधारून त्यानें पुष्कळ फेरफार केले, त्यांपैकीं कांहीं या काळपर्यंत अबाधित चालू आहेत.

# भाग ८ वा.

## लढाईचीं वादळें.

सरदारमंडळ—वादमूलक नियम—फ्रँक्लिनाचा वसाहतीविषयीं बेत—ब्रिटिश दरबारची सूचना—फ्रँक्लिनाचें उत्तर—ब्रॅडॉक याची मोहीम—फ्रँक्लिन व वाशिंग्टन यांचा उपदेश—फ्रँक्लिनाची कार्यदक्षता—जमीनदारांबरोबर तंटा—इंडियनांचीं कृत्यें—निरुपद्रवी क्केकर्स—त्यांना फ्रँक्लिनाचा उपदेश—मुन्याव्हिपन खेड्यांचा शेवट—फ्रँक्लिनाची मोहीम—गॉर्डन हटनचा तह—जमीनदारांशीं कायदे करणाऱ्या मंडळीनें पुन्हां भांडण किल्याचा नाश—मोठाच वाद.

फिलाडेल्फियाच्या संपत्तीबरोबरच, तेथील श्रीमंत लोकांत एकलकोंडेपणा वाढला. कांहीं बड्या मंडळींनीं मनोरंजनासाठीं नाचण्याचा उपक्रम चालू केला. त्यांचे जे नियम होते त्यांतच, कारागीर लोकांस त्यांच्या बायकांस अथवा मुलींस या समारंभास बोलावूं नये, असा एक नियम होता. हे नियम ज्यावेळीं फ्रँक्लीनाला दाखविण्याकरितां आणिले, तेव्हां तो मोठ्या जोरानें व्यवस्थापकांस ह्मणाला:—

“अहो, हे तुमचे नियम प्रत्यक्ष सर्व शक्तिमान् जो

परमेश्वर त्यालाही प्रतिबंध करितात काय ? एका व्यवस्थापकानें विचारिलें, " असें कसें ? " फ्रँक्लिन हाणाला, " उघडच आहे, अहो, ईश्वर हा असा कारागीर आहे कीं, त्यानें हें जग फक्त सहा दिवसांत उत्पन्न केलें, आणि तुह्मी तर कारागीर लोकांस बोलावीत नाहीं !" हें फ्रँक्लिनाचें बोलणें ऐकतांच व्यवस्थापकांनीं तो नियम काढून टाकिला.

फ्रेंच लोकांना उत्तरअमेरिकेंतून घालवून देण्याची खटपट इंग्रजांनीं सतत सत्तर वर्षें चालविली होती. त्यांचीं जहाजें ॲटलँटिक महासागराच्या किनाऱ्यावर प्रथम आल्याकारणानें ते, ॲटलँटिकपासून पॅसिफिकपर्यंत सर्व देशांवर आपला हक्क सांगत होते. कारण नवीन सांपडलेल्या मुलुखांत ज्याचें जहाज प्रथम जाईल, त्याचा त्या मुलुखावर हक्क राहील, असा सर्व राष्ट्रांचा ठराव होता.

फ्रेंच लोक, त्यांचा ॲटलँटिक महासागरापर्यंत हक्क कबूल करीत. परंतु जें राष्ट्र एकाद्या नवीन नदीचा शोध लावील, तिचा मुखापर्यंतचा प्रदेश शोधून काढील व तिजवर आपला ताबा ठेवील त्याची मालकी त्या नवीन नदीवर राहील, असा सर्व राष्ट्रांचा दुसरा ठराव असल्यामुळें व त्यांच्या खलाशी लोकांनीं **ओहिवो** व **मिसिसिपी** ह्या नद्यांचा उगमापासून मुखापर्यंत शोध लावून त्या ठिकाणीं आपल्या व्यापाराचीं व लष्कराचीं ठाणीं बसविल्यामुळें, ते ह्या दोन्ही नद्यांच्या कांठांवरील सर्व प्रदेशावर आपला हक्क सांगत. असा ह्या दोन्ही नद्यांच्या

कांठावरील प्रदेशांच्या हक्कासंबंधानें इंग्रज व फ्रेंच यांच्यांत तंटा उपस्थित झाला.

ह्या भांडणांतच धर्मवाद उपस्थित होऊन फ्रान्समधले रोमन क्याथोलिक लोक ब्रिटनच्या प्रोटेस्टंट लोकांशीं, लढण्यास तयार झाले, आणि त्यामुळें जो रक्तपात व जीं भयंकर कृत्यें घडलीं, त्यांचें वर्णन कोण करूं शकेल ?

इंग्रजांचा हक्क सर्व प्रदेशांवर आहे, असें गृहीत धरून **फ्रँक्लिनानें** पश्चिमेकडील सर्व नद्यांवर शंभर शंभर घरांची लहान लहान खेडीं वसवावीं, असें त्यांस सुचविलें, परंतु इंग्रज पडले दुराग्रही. तेव्हां अमेरिकन लोकांनीं सांगितलेल्या मसलतीचा ते कसा अंगीकार करितील ?

**बोस्टन** येथील गव्हरनर शर्लें यांनीं इंग्लंडाहून तयार होऊन आलेलें लढाईच्या बेताचें एकंदर पत्रक **फ्रँक्लिनाला** दाखविलें, त्यावरून अडचणीच्या ठिकाणीं लढाई चालविण्याविषयींचें त्यांचें अज्ञान, तसेंच अमेरिकन लोकांच्या राजकीय हक्कांविषयींची त्यांची उपेक्षा हीं अगदीं स्पष्ट होत होतीं. ह्या कागदांत, ब्रिटिश सरकारानें लढाई चालवून तो खर्च भागविण्याकरितां अमेरिकन लोकांवर जरूर वाटतील ते कर बसवावे असें कलम होतें. अमेरिकन लोकांचे वतीनें पार्लमेंटांत सभासद नव्हते, व जी कराची रकम त्यांना भरावी लागे, ती बद्दल किंवा तिच्या व्यवस्थेबद्दल कांहींच मत देण्याचा अधिकार त्यांस नव्हता. सारांश, त्या वेळची अमेरिकन लोकांची

स्थिति या एका बाबतींत हल्लींच्या आपल्या स्थितीशीं अगदीं तंतोतंत जुळत होती.

फ्रँक्लिनानें तो सर्व कागद मनापासून वाचून आपल्या लेखी हरकतींसह परत केला. त्यानें ह्या लेखांत स्टँप ॲक्टाच्या ( छापील कागदांचा कायदा चालू करण्याच्या ) वेळीं राजकारस्थानी व तर्कशास्त्रज्ञ लोकांनीं जीं प्रमाणें पुढें आणिलीं होतीं तींच आणिलीं त्यांचा सारांश असाः—

"वसाहत करणारे सर्व लोक इंग्रज आहेत, तेव्हां ते कांहीं कारणानें इकडे येऊन राहिले, ह्मणून त्यांना *मॅग्नाचार्टानें मिळालेले सर्व हक्क नसावे, असें ह्मणणें अयुक्तिक आहे. ज्या इकडील लोकांवर शत्रु हल्ला करून त्यांचे प्राण घेणार, व त्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणार, ते लोक लांबून गप्पा ठोकणाऱ्या इंग्लिश पार्लमेंटांतील सभासदांपेक्षां सैन्य किती असावें ह्मणजे आपलें रक्षण होईल, व आपल्यामध्यें किती सैन्य पोसण्याचें सामर्थ्य आहे, ह्या गोष्टी जास्त चांगल्या रीतीनें सांगतील. वसाहतींतील लोकांपासून त्यांच्या समतीवांचून

* इंग्रज लोकांच्या स्वातंत्र्याची मोठी सनद. ही इ. सन १२१५ सालीं त्यांनीं जॉनराजाकडून घेतली. या सनदेंत पुरोहित वर्गाचे व बऱ्या लोकांचे हक्क नियमित करून अगदीं नांगर धरणाऱ्या कुळंब्यालाही न विसरतां सर्व साधारण लोकांना पुष्कळ सवलती दिल्या होत्या. इंग्रज लोकही सनद मिळाल्यानंतर सुमारें तीन चारशें वर्षांनीं अमेरिकेंत वसाहत करूं लागले. तेव्हां अर्थातच या आणि यानंतर वेळोवेळीं त्यांनीं राजापासून घेतलेल्या दुसऱ्या अनेक सनदांतील हक्क त्यांना असले पाहिजेत.

पैसा घेणें, या गोष्टी तेथल्या इंग्रज लोकांपासून त्यांच्या हिताकरितां कर घेणें ह्मणण्यापेक्षां, शत्रूंच्या मुलुखांत खंडणी गोळा करणें ह्मणणेंच जास्त शोभेल. अशा रीतीनें पैसा काढणें ह्मणजे त्यांना खरी इंग्रजांची प्रजा समजून वागविणें नाहीं तर त्यांना जिंकलेले समजून वागविणेंच होय." प्रत्यक्ष स्वदेशीयांशीं ज्यांचें हें वर्तन, त्यांचें परकीयांशीं कसें असेल बरें ?

शेवटीं शूर परंतु आत्मस्तुति करणारे दुराग्रही जनरल **ब्रॅडाक** साहेब अमेरिकेंत येऊन ठेपले. हे साहेब फ्रेंच, इंडियन आणि अमेरिकन यां सर्वांस तुच्छ मानीत. यांचें सर्व सैन्य **मेरिलंड** प्रांतांत * **फ्रेडरिक** शहरामध्यें जमा झालें.

ह्या अज्ञानी इंग्रज सेनानायकाचा बेपरवाईचीं व भीतिप्रद कृत्यें करण्याचा संकल्प पाहून अमेरिकेंतील बुद्धिमान गृहस्थांस मोठी भीती पडली. त्याचे बेत **पेनसिल्व्हेनियांतील** लोकांस न आवडल्यामुळें त्याला मोठा राग आला. व त्या रागाच्या सपाट्यांत फ्रेंच लोकांचा पराभव करण्यापेक्षां **पेनसिल्व्हेनियांतील** लोकांसच आधीं पार करावें, असे उद्गार त्यानें काढिले, असें ह्मणतात.

त्या दुराग्रही इंग्रजी अधिकाऱ्यास भेटून त्यांचा राग शांत करावा, व त्याला असलीं कृत्यें करूं नको, अशी विनंति करावी ह्मणून **फिलाडेलफियांतील** सभेनें, फ्रँक्लि

* फिलाडेलफियापासून येथें जाण्याला रानांतून फक्त घोडे जाण्यासारखी वाट असून या दोन ठिकाणांत साठ कोसांचें अंतर आहे.

न, त्याचा मुलगा आणि **न्यूयार्क** व **मासाचुसेट्स** येथील दोघे गव्हरनर असे चार लोक निवडले. ही गोष्ट एप्रिल महिन्यांत घडली. या दिवसांत तिकडील हवा फारच उत्तम असते, झाडांस कोंवळी पालवी फुटते आणि नानाप्रकारच्या पुष्पांचा सुवासिक परिमल मनुष्यांच्या चित्तवृत्ति सुप्रसन्न करीत असतो.

आमचे चौघे मुखत्यार सुंदर घोड्यांवर बसले व त्यावेळच्या चालीप्रमाणें त्या प्रत्येकाच्या बरोबर बराच लवाजमा होता. ते घोड्यांवर बसून मार्गक्रमण करीत असतां, रात्र झाली ह्मणजे, ज्या ठिकाणीं उतरण्याचा त्यांचा बेत ठरला असेल. तेथील एकाद्या मोठ्या जमीनदारास आगाऊ सूचना पाठवीत. नंतर तो आपले एक दोन चाकर बरोबर घेऊन घोड्यावर बसून सामोरा येई, व त्यांस आपल्या घरीं नेऊन त्यांचा मोठा सत्कार करी.

**ब्रॅडॉक** साहेबानें इंग्रज लोकांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून **फ्रॅंक्लिन**चा मोठा सन्मान केला. **फोर्ट डिकनी** येथें जाणाऱ्या त्याच्या सैन्याचा मार्ग शेंकडों मैल पर्यंत **अलेघानी** पर्वताच्या भयंकर आणि दुर्गम कड्यांवरून व दऱ्यांमधून जात असून जिकडे तिकडे जंगल असल्यामुळें दिसतही नव्हता; हा मार्ग क्रमीत असतां, मध्येंच वेळोवेळीं **फ्रेंच** व **इंडियन** लोकांपासून त्यास त्रास होण्याचा संभव होता कारण **कॅनड्याहून** गलबतांत बसून फ्रेंचास **ओहिओ** पर्यंत सहज येववत असून **इंडियन** लोक अगदीं त्यांच्या तर्फेचे होते.

जार्ज वाशिंग्टन नांवाच्या एका अनुभवी, उच्चप्रतीच्या व वजनदार तरुण सैनिकाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून ब्रॅडॉक साहेबानें वर सांगितलेल्या भर जंगलांतून मार्गक्रमण करण्याचा दृढ निश्चय केला.

त्यानें सामानासुमानाकरितां अडीचशें गाड्या आणि पुष्कळ घोडीं मिळविण्याचा प्रयत्न जारीनें चालविला परंतु आपल्या जनावरांची खराबी होणार आणि त्याचा मोबदला इंग्रजांकडून मिळणार नाहीं, अशी लोकांची पक्की खात्री असल्यामुळें जनरल साहेबांस चोविसावर एकही गाडी मिळाली नाहीं. तेव्हां त्यांनीं हें काम फ्रँक्लिनाच्या गळ्यांत घातलें.

" ब्रॅडाकानें दिलेला सर्व पैसा खर्च करून आणि त्याशिवाय दोन तीन लाख रुपयांचें जोखीम आपल्या आंगावर घेऊन एकशें चोवीस घोड्यांच्या गाड्या आणि दोनशें एकूणसाठ ओझ्याचीं घोडीं फ्रँक्लिनानें जमा केलीं. तो ब्रॅडॉक साहेबास ह्मणालाः---

" हल्लींच्या थाटानें तोफा वगैरे बरोबर घेऊन जर तुम्ही डिक्वेनीपर्यंत सुखरूप पोंचलां, तर तो किल्ला सर्व बाजूंनीं मजबूत बांधिलेला व पुष्कळ सैन्यानें रक्षण केलेला आहे तरीसुद्धां तुह्मांस फारसे प्रयास न पडतां तुमचे हातीं लागेल अशी माझी खात्री आहे. परंतु मार्गांत इंडियन लोकांच्या गुप्तवसाहतींची मोठी अडचण आहे. ह्या जागा तयार करण्यास व मोडण्यास नेहमींच्या सहवासामुळें त्यांना मुळींच वेळ लागत नाहीं. तुमच्या सैन्याची एकेरी

रांग ते छापा घालून हूं हूं ह्मणतां एकाद्या धाग्याप्रमाणें तोडून टाकितील."

हें फ्रँक्लिनाचें बोलणें मूर्खपणाचें वाटून ब्रॅडॉक साहेब हंसून ह्मणाले, "हे रानटी लोक तुमच्या अर्धकच्चा अमेरिकन सैन्याला मोठे भयंकर वाटतील तर वाटोत, पण आमच्या सुशिक्षित इंग्रज सैन्यापुढें त्यांचें काय चालणार ?"

गाड्याघोड्यांच्या मोठ्या परिवारामुळें हें सैन्य अगदीं सावकाश जाऊं लागलें, व पुढें लवकरच त्यावर हल्ला होऊन त्याचा अगदीं पराभव झाला. गाड्या हांकणारांनीं घोड्यांच्या रशा तोडून निवडक घोड्यांवर बसून आपला मार्ग सुधारिला. कांहीं गाड्या थोडीं त्यांवरील सामानसुमानासुद्धां इंडियन लोकांच्या हातीं लागलीं. ह्या भयंकर हल्ल्यापासून रक्षण व्हावें म्हणून फ्रँक्लिनानें फार मेहनत घेतल्यामुळें त्याची कीर्ति जिकडे तिकडे पसरली.

**वुल्यम पेन** याच्या औदार्यानें आज ऐशीं वर्षें ज्याठिकाणीं शांतता वास करीत होती, त्या **पेनसिल्व्हेनिया** प्रांतांत देखील या भांडणाचे परिणाम आतां दृष्टीस पडूं लागले.

इ. स. १७५५ च्या जुलई महिन्यांत **ब्रॅडॉक**च्या पराजयाची बातमी **फिलाडेलफियांत** येऊन पोहोंचली. त्याबरोबर गव्हरनर **मॉरिस** व तेथील कायदे करणारी मंडळी यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला. कायदे करणाऱ्या मंडळीच्या मतें राष्ट्रसंरक्षणासाठीं बसविलेला कर शेतकऱ्यांप्रमाणें जमीनदारांवरही निःपक्षपातबुद्धीनें बसवावा असें

होतें. हें वुइल्यम पेनच्या दोघां वड्या जमीनदार मुलांस रुचलें नाहीं. गव्हरनरची नेमणूक त्यांजकडूनच झाली होती. तेव्हां अर्थातच तो त्या मंडळीच्या विरुद्ध झाला. अशा रीतीनें हें भांडण पुष्कळ दिवस चालून सैन्याची मदत न झाल्यामुळें लोकांस फार नुकसान सोसावें लागलें.

फ्रँक्लिनानें प्रजापक्ष स्वीकारून स्वमतप्रतिपादनाचें काम मोठ्या झपाट्यानें चालू केलें. ब्रॅडॉकची छावणी लुटून मिळविलेल्या द्रव्यावर जूलै आणि आगष्ट हे दोन महिने इंडियन लोकांनीं पुष्कळ मजा मारिली. पुढें सप्टें-बर व अक्टोबर महिन्यांत ह्या इंडियनांनीं कत्तलीसारखीं भयंकर कृत्यें करून जे अनर्थ उडविले, त्यांचें वर्णन करि-तांना आंगावर कांटा उभा राहतो. त्यांनीं खेड्यापा-ड्यांची जाळून राखरांगोळी उडविली, घरेंदारें जमीनदोस्त करून टाकिलीं, कितीएक कुटुंबें ठार केलीं. आणि पुष्कळ लोकांचे केंस मुळासकट उपटून टाकिले. बायकापोरांना धरून गुलाम केलें आणि कित्येकांस सुळीं दिलें. सारांश त्या राक्षसी लोकांनीं त्यांना सुचले ते दुष्ट उपाय करून लोकांचे जीव घेतले.

इतकें झालें तरी क्वेकर्स लोकांनीं आपलें उलट शासन न करण्याचें तत्व सोडिलें नाहीं, व लढाईच्या कामास पैसा न देतां ते एकाही सैन्याच्या टोळींत सामील झाले नाहींत. • हें क्वेकर्स लोकांचें तत्व जर इंग्रजांनीं मनांत वागविलें असतें तर हा सर्व अनर्थ अगदीं सहज टळला असता. कारण ही लढाई त्यांनीं आपणच होऊन उक-

रून काढिली होती. आपल्या हत्यारांच्या बळावर फ्रेंच लोकांस नदीकांठच्या सर्व प्रदेशांतून पर्वताच्या पार हांकून देण्याचा त्यांनीं अगदीं दृढ निश्चय केला होता. तेव्हां वरील सर्व संकटांची जबाबदारी अमेरिकन लोक आपल्या इंग्रज बहादरांवर घालितात, यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

**क्वेकर्स** लोकांना त्यांच्या कृतीची शरम वाटावी ह्मणून नष्ट झालेल्या एका कुटुंबांतील छिन्नभिन्न व रक्तबंबाळ झालेलीं प्रेतें एका उघड्या गाड्यांत घालून तो **फिलाडेल्फियांत** गल्लोगल्लीं फिरविला. नोव्हेंबर महिन्यामध्यें फ्रेंच लोकांच्या तर्फेच्या इंडियनांनीं आपला क्रम पुन्हा चालविला, हें पाहून **फिलाडेल्फियाच्या** सभेनें सैन्याची तयारी चालविली. इतकें होऊनही **क्वेकर्स** लोक हालचाल करीत नाहींत, हें पाहून **फ्रँक्लिनानें** आपली लेखणी हातांत घेतली व एक लहानसें परंतु जोरदार असें पुस्तक लिहिलें, त्यांत तो ह्मणाला:—

"मित्रहो, दुसऱ्यानें आपल्या उपयोगीं पडून आपलें रक्षण करावें, त्यापेक्षां आपणच दुसऱ्याच्या उपयोगीं पडून त्याचें रक्षण करणें विशेष श्रेयस्कर आहे. आपल्या देशाची सेवा करण्याकरितां आपण निश्चयानें व उदार अंतःकरणानें एकत्र होऊं या. कारण देशसेवेकरितां आलेलें मरण फारच उत्तम गणिलें आहे. आणि तुम्ही असें कराल तर समरदेवता तुम्हांस खास खास यश देईल."

**पेनसिल्व्हेनियांतील** लोकांनीं आपलीं हत्यारें घेऊन लढाईची तयारी केली. सरहद्दीवर **मोऱ्याव्हिअन**

ह्मणून, ख्रिस्ती धर्माच्या एका विशेष पंथांतील लोकांचीं भरभराटींत आलेलीं कांहीं खेडीं होतीं, त्यांवरून जात असतां प्रवाशांना नेहमीं प्रार्थनेचा ध्वनि व स्तोत्रपठणाचे स्वर ऐकूं येत. ह्यांपैकीं **गॉडेन हटन** नांवाच्या एका प्रख्यात खेड्यावर **इंडियन** लोकांनीं हल्ला करून तें जाळून फस्त केलें, व तेथील कांहीं लोकांची कत्तल उडवून कित्येकांस कैद करून नेलें. हें पाहून दुसऱ्या खेड्यापाड्यांस आपलीही एकादे दिवशीं अशीच अवस्था होणार ह्मणून मोठी दहशत पडली.

अशा वेळीं गव्हरनरानें आपखुषीनें बनलेल्या पांचशें चाळीस शिपायांची एक टोळी तयार करून **फ्रँक्लिन** यास तीवर मुख्य नेमिलें व त्याच्या हाताखालीं त्याचा मुलगा **व्रुइल्यम** याची नेमणूक केली. हा चांगला शूर आहे, असें **फ्रँक्लिन** यास पुढें कळून आलें.

डिसेंबर महिन्याच्या पंधराव्या तारिखेस त्यानें ह्या लहानशा सैन्यानिशीं **नार्थ्यांम्टन** परगण्याच्या रक्षणार्थ तिकडेच मोर्चा वळविला. टेंकड्यांवर जिकडे तिकडे बर्फ पडल्यामुळें त्या अगदीं पांढऱ्या शुभ्र दिसत होत्या. झाडीमधून थंडगार वाऱ्याची झुळूक वाहून सूं सूं शब्द करीत होती. एकादे प्रसंगीं मोठा झपाट्याचा वारा वहात असे, व त्यामुळें आमच्या या छोट्याशा सैन्याच्या गतीस मोठें विघ्न येई. ह्या प्रदेशांत ठिकठिकाणीं वस्ती अगदीं पातळ होती. रस्ता आडचणीचा असून ह्यावेळीं **फ्रँक्लिनाला** नव्वद मैल कूच करावयाचें होतें. अशा

रीतीनें ह्या सर्व विघ्नांचा प्रतीकार करून इच्छित ठिकाणीं जाण्यास फ्रँक्लिनाला बरोबर एक महिना लागला.

इंडियन लोकांच्या गुप्त ठिकाणापासून आपणावर एकादा हल्ला होईल या भीतीनें हें सैन्य मोठ्या दक्षतेनें चालत होतें. आमच्या चरित्रनायकाला लष्करी शिक्षणाचें नुसतें वारेंही नव्हतें व सैन्याच्या बाबतींत एका काडीचाही अनुभव नव्हता, असें असून जनरल ब्रॉडॅक साहेबांनें सैन्य ज्या संकटजालांत गुंतलें होतें त्यांत तो मुळींच सांपडला नाहीं, हें मोठें आश्चर्य होय.

मोठ्या व्यवस्थित रीतीनें हें सैन्य कत्तल उडाल्यामुळें भयाण दिसणाऱ्या * गॅडन हटन गांवीं एकदांचें येऊन पोहोंचलें. जें खेडें एकदां मोठ्या आनंदांत होतें तेंच आतां अगदीं ओसाड होऊन राहिलें होतें व त्याची ती स्थिति पाहून त्यास तसें करणाऱ्यांचा तिटकारा आल्यावांचून राहत नसे. भयंकर किंकाळ्या फोडणाऱ्या लांडग्यांनीं, आणि त्यांच्या पेक्षांही ज्यांची कृति भयंकर आहे, अशा त्या राक्षसी लोकांनीं छिन्नविच्छिन्न करून टाकलेल्या प्रेतांनीं तेथली जमीन भरून टाकिली होती. फ्रँक्लिनानें आपल्या सैन्यास तेथल्या घाणेरड्या हवेपासून त्रास होऊं नये म्हणून एक प्रकारचीं घरें तयार करण्याचा हुकूम फर्माविला.

फ्रेंच लोकांच्या तोफखान्यांवांचून इंडियन लोकांच्या कसल्याही हल्ल्यास न जुमानणारा असा एक किल्ला तयार

* सं. सं. पैकीं पेन्सिलव्हेनिया प्रांतांतील एक खेडेंगांव.

करून **फ्रँक्लिनानें** त्याला **फोर्ट अलेम** असें नांव दिलें. **फ्रँक्लिनाचे** लोक काय करीत आहेत. हें पाहण्याकरितां **इंडियन** लोकांच्या टोळ्या फिरत्या घालीत होत्या, परंतु **फ्रँक्लिनानें** त्यांचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं.

कायदे करणाऱ्या मंडळींत व त्या दोघां जमीनदारांत पुनः उत्पन्न झालेलें भांडण मोडण्याकरितां **फ्रँक्लिन** आपली मोहीम सोडून **फिलाडेल्फियाला** निघून आला. येते वेळीं त्यानें आपलें काम **कर्नल क्लॅफम** यांस सांगितलें. **फिलाडेल्फिया** येथें त्याचा मोठा सत्कार झाला आणि तेथील लोकांनीं आपल्या सर्व टोळ्या एकत्र करून त्या पलटणीवर **फ्रँक्लिन** यास मुख्य नेमिलें.

"एकाद्या मोहिमेंत आलेल्या संकटांपैकीं, केवळ मूर्खपणानें आलेलीं संकटें कितीं हें पाहणें अत्यवश्य आहे. **फ्रँक्लिन** गेल्यानंतर कांहीं महिन्यांनीं नोव्हेंबर महिन्यांत एके दिवशीं थंडी पडून वारा सुटला असतां पुष्कळ सैनिक लेहा नदीवरील बर्फांत खेळत होते, ही संधि साधून **इंडियन** लोकांनीं टपलेल्या लांडग्याप्रमाणें किल्ल्यावर चाल केली आणि आंत शिरून कांहीं लोकांस कैद केलें व कांहींस ठार मारिलें. हें पाहून खेळणाऱ्या मंडळीनें तडक जंगलाचा मार्ग सुधारला. परंतु **इंडियन** लोकांनीं त्यांचा पाठलाग करून कित्येकांस ठार मारिलें व कित्येकांस बंदिवान केलें. राहिलेल्या लोकांपैकीं कांहीं थंडीनें व भुकेनें मरून गेले व फारच थोडे लोक ही भयंकर हकीकत सांगण्यास जिवंत राहिले. त्या दुष्ट विजयी लोकांनीं तो

सर्व किल्ला लुटून त्याला आग लावून दिली आणि अशा रीतीनें **गॉडनहटन**ची पुन्हां राखरांगोळी उडविली.

सरकार व कायदे करणारी मंडळी यांच्यामधलें भांडण दिवसें दिवस वाढतच चाललें. हें भांडण ज्या गोष्टी-बद्दल चाललें होतें त्यांत अमेरिकन स्वातंत्र्याचें तत्व मुख्य होतें. ह्या कामांत **फ्रँक्लिनानें** आपली लेखणी चाल-वून आणि आपल्या वक्तृत्वाचा प्रभाव दाखवून सतत पंधरा वर्षेंपर्यंत कष्टी मेहनत घेतली. इंग्रजी जुलुमाचा प्रतीकार करून आपलें स्वातंत्र्य गाजविण्याविषयीं, वसाह-तींतील लोकांस उद्युक्त करणारा त्यावेळीं **फ्रँक्लिना**-सारखा दुसरा कोणीही नव्हता, असें ह्मटलें असतां प्रमाद होणार नाहीं.

इ० स० १६८१ त दुसऱ्या **चार्लस** राजानें सर्व **पेनसिल्हेनिया** प्रांत वुइल्यम **पेन** यास दिला होता, तेव्हां तो तेथील कायदे करणाऱ्या मंडळीच्या अनुमतानें त्या प्रांतावर आपला अंमल चालवूं लागला. पुढें त्याच्या पश्चात् हा सर्व हक्क त्याच्या वंशजांकडे आला होता.

त्याच्या तिघां मुलांपैकीं **जॉन** मरून गेल्यामुळें **रि-चर्ड** व **थॉमस** हे दोघे दुर्बळ सरदार **पेनसिल्व्हेनियाचे** मालक झाले. पुढें कांहीं दिवसांनीं लोकांचा व त्यांचा बेबनाव झाला व कायदे करणाऱ्या मंडळीशीं त्यांचें भां-डण चालू झालें, ही हकीकत मागें आलीच आहे.

---

# भाग ९ वा.

---

## फ्रँक्लिन इंग्लंडला जातो.

फ्रँक्लिनाचा फारच मोठा सन्मान—साई लाउडन गव्हरनर—डेनी व फ्रँक्लिन इंग्लंडास जाण्याचा बेत—त्याचें कुटुंब—त्याचें वर्तन—प्रवास—पालमाऊथ येथील हकीकत—त्याचें स्वागत लंडनमधें त्याची वागण्याची पद्धति—त्याचे विजेचे प्रयोग—बड्या शिक्षकांचा शिक्षक—त्याचा सन्मान डेनीला कामावरून काढितात त्याला यश मिळतें—तिसरा जॉर्ज फ्रँक्लिनच्या मुलाचें वर्तन—त्याला गव्हरनराची जागा मिळते—लोकांची नाखुषी—फ्रँक्लिनचें घरीं येणें—रानटी लोकांचा त्रास—इंग्रजांच्या पक्षाकडील इंडियनांचें तो रक्षण करितो.

ह्या तंट्याच्या योगानें ते दोघे जमीनदार अगदींच निर्बल आहेत, असा अमेरिकेंत सर्वत्रांचा ग्रह झाला. लंडनमध्येंही त्यांना कोणी फारसा मान देत होते असें दिसत नाहीं.

मार्च महिन्यांत फ्रँक्लिन पोष्ट ऑफिसच्या कामाकरितां निघाला असतां त्याच्या सैन्यापैकीं चाळीस कामदार एकसारखा मौल्यवान् पोषाक करून व घोड्यावर

असून प्रवासांत त्याला सहाय्य करण्याच्या इच्छेनें त्याला नकळत निघाले, ह्याविषयीं तो लिहितो :—

" मला अशा प्रसंगीं डामडौल मुळींच आवडत नस-ल्यामुळें, त्यांचा उद्देश कळता तर मी त्यांस असें करूं दिलें नसतें. "

ही **फ्रँक्लना**च्या सन्मानाची हकीकत ऐकून दोघां ज़मीनदारांस फार वाईट वाटलें. ते ह्मणाले, इतक्या मानास राजपुत्रच काय तो पात्र. आह्मांलाही असा सन्मान कधीं मिळाला नाहीं !

सरकारांतून लार्ड लाउडन याची अमेरिकेंतील मुख्य सेनाधिपतीच्या जाग्यावर नेमणूक झाली. हे सेनानायक एकाद्या साधारण शिपायापेक्षांही दुर्बळ व निरुपयोगी होते. **पेनसिल्व्हेनिया**चा गव्हरनर, लोकांशीं भांडून अगदीं त्रासून गेल्यामुळें त्या दोघां जमीनदारांनीं वुइल्यम डेनी यांस आपला नोकर ह्मणून तेथील काम पाहण्यास नेमिलें. ह्या नवीन गव्हरनर साहेबांस अनुकूल करून घेण्याच्या इच्छेनें **फिलाडेल्फियां**तील लोकांनीं त्याचें चांगलें स्वागत केलें. त्याला दिलेल्या मेजवानीच्या शेवटीं बहुतेक मंडळी दारूच्या नादांत अगदीं गुंग होऊन गेली असतां **डेनी** साहेबानें **फ्रँक्लना**चा हात धरून त्याला एका खोलींत नेलें व त्यानें जमीनदारांचा पक्ष धरावा ह्म-णून त्याची पुष्कळ हांजी हांजी चालविली आणि त्याला पैशाचीही पुष्कळ लालूच दाखविली. परंतु अमल्या उ-

पायांनीं फ्रँक्लिन कधींही वश होणार नाहीं, हें साहेबांस लवकरच कळून आलें.

डेनी साहेबांस स्वतःची कांहींच अक्कल नसून ते आमच्या इकडील, खाविंदचरणारविंदीं सदा मिलिंदायमान होऊन राहणाऱ्या सरकारी नोकरांच्या तोडीचेच असल्यामुळें अमेरिकेंतील कायदे करणाऱ्या मंडळीच्या विरुद्ध येणारे आपल्या वरिष्ट अधिकाऱ्यांचे चरचरीत हुकूम अगदीं शिरसा मान्य करीत. यामुळें माजी गव्हरनरानंतर कांहीं दिवस उत्पन्न झालेली शांतता मोडून पुनः तंट्यास सुरवात झाली.

फ्रँक्लिन लोकपक्षाचा अध्वर्यु असून त्याच्या वर्तनांत जी खुबी होती, तिचें दिग्दर्शन बरोबर रीतीनें करितांच येत नाहीं ह्मटलें तरी चालेल. त्याजवर दुःखाचे डोंगर जरी कोसळले, तरी त्याच्या आनंदी वृत्तींत तिळमात्रही चलबिचल होत नसे. शत्रूंच्या जुलमाविषयीं राग न दाखवितां तो हंसून आणि विनोदपर भाषणें बोलून त्यांच्या हृदयास अशा रीतीनें घेर पाडी कीं, त्यांचा तो क्रम पाहून त्याचे शत्रू आणि मित्र पोट धरधरून हंसत. कायदे करणाऱ्या मंडळींत तो जरी डेनीचा कट्टा शत्रु होता तरी त्यावांचून कोणाशींही साहेब मजकुरांचें जमत नसे. फ्रँक्लिन त्याच्या भेटीस जाई, आणि कधीं कधीं त्याजकडे जेवावयासही राहत असे.

गव्हरनर डेनी कुलीन असून सुशिक्षित होता, तरी पारतंत्र्यानें त्याला त्या जमीनदारांच्या हुकुमांचा अगदीं

बंदा बनविलें होतें. आमच्या इकडेही कुलीन, सुशिक्षित आणि सधन लोकसुद्धां केवळ अविचारानें आणि अधिकार मिळविण्याच्या बलवत्तर इच्छेनें रुपेरी बेडी पायांत अडकवून मापाप सरकारचे असेच दासानुदास बनतात. असो, डेनी साहेबांचें अंतःकरण फार चांगलें होतें व फ्रँक्लिनाविषयीं त्यांच्या मनांत मोठी प्रीती होती तरी नोकरीच्या योगानें बद्ध झाल्यामुळें वरिष्ठांचे मनमानेल तसे सुटलेले हुकूम त्याला बजवावे लागत.

फ्रँक्लिन मंडळीला फारच चांगला होता. त्याची बोलण्याची विलक्षण शक्ति, त्याचा गोड स्वभाव आणि त्याच्या आंगचा श्रीमंती डौलाचा अभाव, यामुळें तो आपल्या श्रीमंत आणि गरीब, विद्वान् आणि अविद्वान् अशा सर्वच मित्रांस फारच प्रिय झाला होता.

गव्हरनर डेनीचा, कायदे करणाऱ्या मंडळीबरोबर असलेला कार्यभाग घडेना, तेव्हां त्यानें लंडन येथें राजास कळविण्याचा विचार केला. कायदे करणाऱ्या मंडळीनें ही तोच मार्ग पतकरून आपल्या वतीनें नारिस व फ्रँक्लिन या दोघांस मुखत्यार पाठविण्याचें ठरविलें. परंतु नारिसानें तें काम करण्याचें नाकारिल्यामुळें सर्व भिस्त फ्रँक्लिनावरच येऊन पडली. त्याच्या खर्चाकरितां मंडळीनें वीसबावीस हजार रुपये जमविले, शिवाय त्याचा खासगी पैसा होताच ! इंग्लंड व फ्रान्स येथील शास्त्रज्ञ लोकांशीं आमच्या चरित्रनायकाची पत्रद्वारें फारच ओळख झाली असल्यामुळें तो ज्या मंडळींत जाई तींत त्याचा

चांगला सत्कार होईल, असेंही सर्वांस अगदीं खात्रीपूर्वक वाटत होतें.

त्यावेळीं सर्व अॅटलँटिक महासागर चांचे लोकांच्या लुटारू गलबतांनीं आणि लढाऊ जहाजांनीं भरून गेला असल्यामुळें त्यांतून पार पडून जाणें मोठ्या धोक्याचें होतें. जेथें सव्वीस वर्षे राहून गृहसुखाचा अनुभव घेतला, तें ठिकाण सोडून जातेवेळीं **फ्रँक्लिनानें** आपल्या मनाचा उल्हास किंचित्‌ही कमी होऊं दिला नाहीं. तो ता. ४ एप्रिल १७५७ रोजीं आपल्या मुलाला बरोबर घेउन **फिलाडेल्फियाहून** निघाला. त्याच्या मागें त्याच्या कुटुंबांत, त्याची बायको, तिची वृद्ध आई, त्याची बारा वर्षांची सुंदर गोजिरवाणी मुलगी **सेरा**, एक दोन पुतण्या आणि म्हातारी कुणबीण इतकीं माणसें होतीं.

**फ्रँक्लिनानें** गलबत केव्हां निघणार ह्या विषयींची माहिती गव्हरनराकडून आणविली व त्याप्रमाणें तो निघाला. त्यावेळीं त्याची पुष्कळ मित्रमंडळी त्याला पोंचविण्याकरितां * ट्रेंटनपर्यंत गेली होती, तेथें सर्वांनीं मिळून ती रात्र मोठ्या आनंदांत घालविली, आणि नंतर तो पुढें चालता झाला.

न्यूयार्कास पोंचल्यावर गलबत आज निघेल, उद्यां निघेल, असें करितां करितां जवळ जवळ तीन महिने निघून गेले, तरी फार जरूरीचें काम असतांही, त्रासाचा एकसुद्धां शब्द आमच्या तत्वज्ञ चरित्रनायकाच्या तोंडून निघाला नाहीं,

---

* सं सं. पैकीं न्युजर्सी प्रांतांतील एक शहर आहे.

इतकेंच नाहीं तर, उदयिक गलबत खास निघणार असें खात्रीलायक आधारावरून समजल्यामुळें फ्रँक्लिन आपल्या मित्रांसह त्यावर चढला असतांही पुढें सहा आठवडे गलबत बंदरांतून हांकारलें नाहीं आणि त्यामुळें जरी त्याची प्रवासाकरितां आणलेली सर्व सामुग्री खलास झाली, तरी तो एक चकारशब्दही बोलला नाहीं. यावरून सर्व प्रसंगीं मनाची समता ठेवून आनंदानें राहण्याचें त्याच्या आंगवळणीं कसें पडलें होतें, हें उघड दिसतें.

सूचनेची तोफ होतांच फ्रँक्लिनाचें गलबत पुढें आणि त्यामागून फ्रेंचांवर हल्ला करण्याकरितां निघालेलें नव्वद गलबतांचें आरमार चालू झालें. अशा थाटानें पांच दिवसपर्यंत गलबतें चाललीं; आणि नंतर फ्रँक्लिनाच्या गलबतानें आरमारास सोडून इंग्लंडाकडे आपला रोंख धरिला.

वाटेनें जात असतां * फालमाऊथ नजीक मोठें वादळ होऊन दीपगृहामुळें फ्रँक्लिनाच्या गलबताचा बचाव झाला. ह्यामुळें त्याच्या मनांत अमेरिकेच्या उत्तर किनाऱ्यावर दीपगृह बांधण्याविषयीं कल्पना येऊन इंग्लंडाहून परत येतांना तो किनारा दीपगृहानें सुशोभित झालेला असा पाहण्याचा त्यानें निश्चय केला.

ह्या हकीकतीसंबंधानें त्यानें एका पत्रांत लिहिलें आहे तें असें:—"फॅल माऊथयेथें आमची सुटका झाली ती वेळ सकाळची असल्यामुळें तेथील देवळांमधून प्रार्थनेच्या घांटा वाजत होत्या. आम्ही तसेच तेथें गेलों आणि झा-

---

* इंग्लंडांतील कॉर्नवॉल परगण्यांत एक मोठें बंदर आहे.

लेल्या सुटकेबद्दल कृतज्ञतापूर्वक ईश्वराचे आभार मानिले."

असें करण्याविषयीं त्यानेंच सुचविलें किंवा एकाद्या धर्मभोळ्या मित्राच्या सूचनेस मान देऊन सर्वांबरोबर तोही प्रार्थनेला गेला, हें कसेंही असलें तरी याच पत्रांतील पुढील वाक्य आपणा सर्वांस विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "मी जर रोमन क्याथोलिक असतों तर अशाप्रसंगीं कदाचित् एखाद्या साधूची समाधि बांधण्याचा निश्चय केला असता. परंतु मी तसा नाहीं, यांमुळें निश्चयच करावयाचा तर तो दीपगृह बांधण्याचा करितों."

फॉलमाउथाहून लंडनाला पोंचण्यास त्याला अडीचशें मैल प्रवास करावयाचा होता, ह्मणून तो आपल्या मुलासह तिकडे जाण्याकरितां टपालाच्या गाडींत बसून निघाला; त्यावेळीं त्यापेक्षां जलद प्रवास करण्याचें दुसरें साधनच नव्हतें; आणि आतां पाहिलें तर हा अडीचशें मैलांचा प्रवास ८।१० तासांत होतो! केवढीही फक्त एका शतकांतील सुधारणा!!

ह्या सुंदरपुष्पांनीं फुललेल्या आणि हिरव्यागार शेतांनीं सुशोभित दिसणाऱ्या प्रदेशांतून प्रवास करीत असतां त्यांत आणि अमेरिकेंतील पूर्वारण्यांत झालेल्या नवीन वसाहतींत असलेलें महदंतर फ्रँक्लिनाच्या चांगलें लक्ष्यांत आलें.

आमच्या ह्या प्रवाशांनीं वाटेनें कांहीं प्रसिद्ध ठिकाणें पाहिलीं. इंग्लंडाची त्यावेळची शोभा फारच मजेदार होती "डेव्हान आणि हॅम्प या दोन परगण्यांप्रमाणें मनोहर

प्रदेश त्यावेळीं जगांत नव्हताच असें म्हटलें तरी चालेल." असें इंग्रज ग्रंथकार ह्मणतात.

लंडनमध्यें **पीटर कालिन्स** या नांवाचा एक सभ्य व श्रीमंत गृहस्थ प्रवाशी लोकांस आपल्या वाड्यांत बोलावून त्याचा मोठा सत्कार करी . ह्या ठिकाणीं इंग्लंडच्या प्रख्यात शास्त्रज्ञ लोकांनीं व इतर सभ्य गृहस्थांनीं **फ्रँक्लिनाचें** मोठ्या सन्मानानें स्वागत केलें. **फ्रँक्लिन** त्या जुन्या छापखान्यांत—ज्या ठिकाणीं चाळीस वर्षांपूर्वी तो काम करीत असे—गेला आणि तेथील लोकांस त्यानें दारू करितां कांहीं पैसे दिले.

**मिसेस स्टव्हेंसन** ह्मणून एक मोठी मनमिळाऊ बाई होती, तिच्या घरीं **फ्रँक्लिन** यानें बिऱ्हाड केलें. तो डौलानें न राहतां मोठ्या सभ्य रीतीनें राहत असे. त्याजबरोबर एक व त्याच्या मुलाबरोबर एक असे दोन चाकर त्यांनीं अमेरिकेंतून येतांनाच आणिले होते. पार्लमेंटाचे सभासद वगैरे बडे लोकांच्या आपल्या इतमामाप्रमाणें भेटी घेतां याव्या ह्मणून त्यानें एक गाडी ठेविली होती.

मागें सांगितलेल्या दोघां जमीनदारांनीं त्याचें मुळींच स्वागत केलें नाहीं, एवढेंच नव्हे तर उलट त्याचा थोडा अपमानच केला.ते दोघे ही मोठे दुराग्रही, एकलकोंडे आणि **फ्रँक्लिनाच्या** मुद्देसूद भाषणानें ही न वळणारे असे होते. त्यानें कायदे करणाऱ्या मंडळीचा उद्देश त्या दोघांस स्पष्ट रीतीनें लिहून कळविला, तो असा:——

" १ राजाच्या सनदेप्रमाणें या मंडळीस कायदे कर-

ण्याचा अधिकार आहे, परंतु तो आपल्या हुकुमानें काढून घेतला आहे. २ सरकारास पैशाची मदत करणें व न करणें हे अधिकार त्या सनदेनें सभेकडे ठेविले आहेत. परंतु हुकुमावरून ते तिजकडे रहात नाहींत. ३ आपल्या जमीनदारांच्या जमिनींवर कर नसणें हा थोडा अन्यायच आहे. ४ आपण या तक्रारींचा लक्ष्यपूर्वक विचार करून त्या दूर कराव्या आणि उभयपक्षांत सख्य करावें, अशी आपणांस विनंति आहे.

त्या दोघा भावांनीं ह्या कागदाचा अगदीं धिक्कार केला व तो निरर्थक आहे असें समजून त्यास मुळींच मान दिला नाहीं. फ्रँक्लिनाला त्या दोघांपासून कांहीं फायदा होणार नाहीं हें पक्कें माहीत होतें, ह्मणून त्यानें तो नाद सोडून बडे व्यापारी व राजदरबारी लोक यांस शेवटीं हें प्रकरण निकालाकरितां त्यांजकडे जाणार ह्मणून आपले बाजूकडे ओढण्याचा प्रयत्न चालविला. एक दोन वर्षें निघून गेलीं तरी कामाचा जम बरोबर बसेना. हा बहुतेक वेळ त्यानें विद्वान् आणि शास्त्रज्ञ लोकांच्या सहवासांत घालविला. त्याचे विजेचे प्रयोग पाहून सर्व मंडळी अगदीं खुष झाली. त्यानें केलेल्या विद्युद्यंत्रानें नऊ इंच लांबीच्या ठिणग्या पडत इतकें तें मोठें होतें. ह्या वेळांत त्यानें आर्मोनिका नांवाचें आपल्या इकडील जलतरंगाप्रमाणें एक वाद्य तयार केलें.

ह्या वाद्यांतून फारच मंजूळ स्वर निघत. फ्रँक्लिनानें

तें आपल्या मित्रांपैकीं पुष्कळांस वाजवून दाखविलें, तेव्हां त्यांनीं त्याची फार तारीफ केली.

फ्रँक्लिनाला नाटकें पाहण्याचा फार नाद असे. त्यापासून त्याचें फार मनोरंजन होई. नाटकें पाहून लोक बिघडतात असें सांगणारांनीं याचा अवश्य विचार करावा. जगद्विख्यात नट ग्यारिक हा याचवेळीं आपल्या कीर्तिमंदिरांत मजा मारीत होता. अलीकडे दोन चार वर्षांत आमच्या इकडे चांगले चांगले नट बरेच दृष्टीस पडूं लागले आहेत. परंतु गुणांच्या वृद्धीबरोबर व्यसनांची वृद्धि न होईल तर बरें !

इंग्लंडामध्यें फ्रँक्लिनानें पुष्कळ प्रवास केला. तो केंब्रिजचें विश्वविद्यालय पाहण्याकरितां गेला असतां तेथील अधिकारी लोकांनीं त्याचा मोठा सन्मान केला. इंग्लंडमध्यें असतां तो प्रत्येक उन्हाळ्यांत तेथील रमणीय स्थळें पाहण्याकरितां आपल्या मुलासह हिंडत असे.

उष्णता, बाष्पीभवनक्रियेनें कमी करितां येते हें अश्रुततत्व फ्रँक्लिनानें केंब्रिज पाठशाळेंतील अध्यापकांस सुचविलें आणि त्याप्रमाणें त्यानें एके दिवशीं त्यांस आपल्या बिऱ्हाडीं नेलें; व * ईथरमध्यें एक गोटी बुडवून तीवर बाष्पीभवन जलदीनें चालावें ह्मणून भात्यानें वारा

---

* हा अतिशय हलका, वायुरूपानें उडून जाणारा आणि सहज पेटणारा असा एक पातळ पदार्थ असून तो अलकाहोल् नांवाच्या मद्यांत तेजाप घालून त्याच्या वाफेपासून तयार करतात. त्याचें वजन अल्कहोलापेक्षां कमी असतें, त्याचा वास उग्र असतो व त्याची चव तिखट असून तो रुचकर लागतो.

घालण्यास सुरवात केली. यामुळें उष्णतामापक यंत्रांतील पारा गोठण्याच्या अंशाखालीं पंचवीस अंश उतरला. हें पाहून अध्यापकांस विशेषतः रसायनशास्त्रज्ञ शिक्षकांस मोठें आश्चर्य वाटलें. वाचकहो! एका मेणबत्त्या करणाऱ्याचा हा यःकश्चित् मुलगा अध्यापकांचा अध्यापक झालेला पाहून तुम्हांला मोठें आश्चर्य वाटेल. परंतु यांत कांहीं विशेष नाहीं. हें केवळ त्याच्या दृढनिश्चयाचें आणि सतत प्रयत्नांचें फळ होय.

**फ्रँक्लिन** आपल्या मुलास घेऊन आपल्या पूर्वजांचीं ठिकाणें पाहण्यास गेला, व तेथें आपल्या नातेवाईकांचा तपास करून तेथील थडग्यांवरील लेख त्यानें लक्ष्य लावून वाचले. इ. स. १७६९ चा सर्व उन्हाळा त्यानें स्कॉटलंडांत घालविला. सेंट अँड्र्यू * येथील विश्वविद्यालयाकडून त्याच्या सन्मानार्थ त्याला 'डाक्टर' ही पदवी मिळाली व ह्याच उपपदानें हल्लीं तो आपणां सर्वांस माहीत आहे. दुसऱ्या विश्वविद्यालयांनींही त्याचा चांगला सत्कार केला. **एडिनबरो**च्या लोकांनीं तर त्याच्या स्वागताकरितां मोठी तयारी केली होती. तेथील अतिविख्यात विद्वानांची त्याच्या भोंवतीं एकच गर्दी उडाली. ह्यूम, राबर्टसन आणि लॉर्ड केम्स हे तर त्याचे अगदीं जिवलग स्नेही झाले.

इतका सन्मान मिळाल्यावर साधारण लोक चढून अगदीं वेडे होतील, यांत संशय नाहीं. परंतु वाईट स्थितींत

---

* स्कॉटलंडांतील "फाईफ" परगण्यांत, पूर्वकिनाऱ्यावर विद्यापीठ म्हणून प्रसिद्ध शहर.

मुळींच चलबिचल न पावणार फ्रँक्लिन चांगल्या स्थितींत चढून गेला नाहीं, यांत आश्चर्य नाहीं !

स्काटूलंडच्या प्रवासाविषयीं फ्रँक्लिन येणेंप्रमाणें लिहितो, "एकंदरींत त्या ठिकाणीं ( स्काटूलंडांत ) घालविलेला दीड महिना मला माझ्या आयुष्यांत फारच सुखाचा गेला."

इतकें असूनही त्याला कधीं कधीं ज्याठिकाणीं त्याच्या प्रियपत्नीनें मोठी काटकसर करून चातुर्यानें संसाराचें गाडें चालविलें, त्या घराची आणि तेथें पत्नीच्या सहवासांत भोगिलेल्या सुखाची आठवण झाल्यावांचून रहात नसे. याचें नांव प्रेम ! आणि गृहसुख ! ! याविषयीं फ्रँक्लिन यानें आपल्या पत्नीस लिहून कळविलें तें येणेंप्रमाणें:—

"येथील सभ्यमंडळी मला मानितात आणि माझ्याशीं प्रेमभावानें वागतात, ह्यामुळें माझा वेळ जरी पुष्कळ आनंदांत जातो, तरी ह्या वयांत गृहसौख्यच विशेष आवश्यक आहे. मी मंडळीमध्यें मोठ्या आनंदानें बोलत असतां एकादे वेळीं तिकडे येण्याची उत्कटेच्छा व कुटुंबविरहव्यथा यांची मनामध्यें एकच गर्दी उडून दुःखानें सुस्कारा टाकल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं."

फ्रँक्लिन फिलाडेल्फियाहून इंग्लंडास आल्यावर तिकडे कायदे करणारी मंडळी आणि डेनी साहेब यांच्यामधला तंटा फारच वाढला. शेवटीं ह्या भांडणास त्रासून गव्हरनरानें त्यांचें कांहीं ह्मणणें कबूल केलें. तेव्हां अ-

र्थात् त्या जमीनदारांस मोठा राग आला आणि त्यांनीं त्याला कामावरून दूर करून मि. जेम्स हॅमिल्टन ह्यास त्याच्या जाग्यावर नेमिलें.

राजानें दिलेल्या सनदेंत गव्हरनरानें केलेले कायदे कायदेकरणाऱ्या मंडळीनें मंजूर करून गव्हरनराच्या सहीसह ते राजाच्या मंजुरी करितां पाठवावे असें होतें. एकदां लोकांवर ओढवणाऱ्या संकटाकरितां एक कायद्याचा खर्डा तयार करून तो गव्हरनरास आपल्या सहीनिशीं कायदेकरणाऱ्या मंडळीकडे पाठविणें भाग पडलें. ह्या खर्ड्यांत सर्व मालमत्तेवरचा कर वाढवून बारा लक्ष रुपयांची रक्कम उभारण्याचा अधिकार त्यानें मंडळीस दिला होता. इंग्लंडच्या सरदारमंडळानें, हा कायदा अधिकारी लोकांच्या हक्कांवर पाणी आणणारा आहे, असें समजून तो रद्द करविला. हा कायदे करणाऱ्या मंडळीच्या हक्कावर मोठाच प्रसंग आला. हें पाहून तिच्या अध्यक्षानें फ्रँक्लिनाला लिहिलें तें असें:—

"आमची फारच दुर्दशा उडाली आहे! आह्मांस ह्या प्रसंगीं साहाय्य करणारा तुमच्यावांचून दुसरा कोणीच नाहीं, तर तुह्मांला होईल ती मदत तुह्मीच करा, आह्मी तुह्माला साहाय्य करावें, अशी वेळ आतां राहिली नाहीं."

फ्रँक्लिनाला कायदे करणाऱ्या मंडळीविरुद्ध ही खटपट कळली त्यावेळीं तो, उन्हाळा असल्यामुळें ऐर्लंडांत जाण्याकरितां निघाला होता. त्यानें तो बेत रहित केला आणि भावी अनर्थ टाळण्याच्या खटपटीस लागला. त्यानें

कमिशन मधील बड्या बड्या इंग्रजांची मनें केलेला ठराव फिरविण्याविषयीं वळवून कायदे करणाऱ्या मंडळीचें करणें कायम केलें.

फ्रँक्लिनाला आपल्या देशाच्या कल्याणाकरितां मुलांमाणसांच्या वियोगांत ह्यावेळीं पुरीं पांच वर्षें काढावीं लागलीं. आमच्या पैकीं किती लोक आपला वेळ अशा रीतीनें खर्च करण्यास तयार होतील?

ता. २९ अक्टोबर १७६० रोजीं दुसरा जार्ज मरण पावला आणि त्याचे जागीं त्याचा मूर्ख आणि हट्टी नातू तिसरा **जार्ज**, असें नांव धारण करून गादीवर बसला. ह्याच्या हट्टीपणानें आणि महत्वाकांक्षेनें **युरोप**, **एशिया** आणि **अमेरिका** ह्या तिन्ही खंडांतील किती सैन्यांचा समरांगणांत फन्ना उडाला, त्याची गणती करण्याचें कामही फार कठिण आहे.

तो चांगला राजकारस्थानीं असून शास्त्रीय विषयांचा त्याला मोठा व्यासंग असे. सर्व राष्ट्रें एकमेकांचे गळे कापण्यास अगदीं एका पायावर तयार असतां त्यानें मोठीं कडक आणि टीकापर अशीं राजकारस्थानाविषयीं लहान लहान पुस्तकें लिहिलीं. त्यानें 'सद्गुणाची कला' या विषयावरील आपले विचार एकत्र करण्यांत पुष्कळ वेळ खर्चिला, परंतु शेवटीं तें पुस्तक लिहून झालें नाहीं. आमच्या इकडील किती राजांस विद्याव्यासंग आहे, आणि कितीकांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत? त्यांच्यापैकीं बहुतेकांस चैन आणि वैभव यांच्या पलीकडे कांहींच दिमत नसावें असें वाटतें.

फ्रँक्लिनानें आपल्या मुलाचें---हा मुलगा लग्नाच्या बायकोपासून झाला नव्हता---**स्टिफनसन** नांवाच्या एका तरुण रूपवती स्त्रीशीं लग्न लावण्याविषयीं खटपट चालविली. परंतु **वुइल्यम फ्रँक्लिन** याचें वर्तन चांगलें नसून तो पति होण्यापूर्वींच पिता बनला आहे असें तिला कळल्यावरून तिनें ह्या कामांत **फ्रँक्लिनाचें** ऐकिलें नाहीं. **फ्रँक्लिनाला** हा नातू इ० स० १७६० मध्यें झाला असून त्याचें नांव **वुइल्यम टेंपल फ्रँक्लिन** असें होतें. त्याची आई कोण, व तिची वाट काय झाली, तें बरोबर कळत नाहीं. असो, आमच्या चारित्र नायकानें आपल्या कर्तव्यास अनुसरून आपलें नातवंड घरीं आणिलें, आणि त्यावर तो प्रीती करूं लागला. ह्यामुलाच्या वर्तनाची व एकंदर आयुष्य क्रमाची हकीकत प्रसंगानुसार आमच्या वाचकांस कळेलच.

इ० स० १७६२ च्या उन्हाळ्यांत फ्रँक्लिनानें घरीं परत जाण्याची तयारी चालविली. परंतु हिंवाळा संपत आला तेव्हां तो घरीं जाऊन पोंचला. तो परत गेल्या नंतर **ऑक्सफर्ड** विश्वविद्यालयाकडून त्याला एक किताब मिळाला.

**वुइल्यम फ्रँक्लिन** हा नीतिमान् नव्हता तरी त्याच्या अंगीं दुसरे सन्माननीय गुण पुष्कळ होते. त्याच्या वर्तनानें दुसऱ्यास आनंद होत असे व तो आपल्या मित्रमंडळीशीं मोठ्या प्रेमानें वागे. अधिकारारूढ प्रधान **लॉर्ड ब्यूट** हा डाक्टर फ्रँक्लिनचा अत्यंत स्नेही असल्यामुळें त्यानें **न्यूजर्सि**च्या गव्हरनराची जागा वुइल्यम-

ला देण्याविषयीं मोठा आग्रह धरिला. **बेंजामिनानें** ही गोष्ट नाकारिली होती, परंतु अखेर **व्यूटचें** ह्मणणें त्याला कबूल करावें लागलें. आजपर्यंत **अमेरिकेंतील** वसहातींतल्या गव्हरनराची जागा, बड्या इंग्रजांच्या मुलांवांचून कोणासही मिळाली नव्हती.

**वुइल्यम फ्रँक्लिन** याचा विवाह मिस **इलिजाबेथ डानेज** हिजशीं ता० २ सप्तेंबर स० १७६२ रोजीं झाला. ह्या लग्नाच्या आणि त्याला गव्हरनराची जागा मिळाल्याच्या बातमीनें लंडनमध्यें बरीच चळवळ उत्पन्न झाली.

**फ्रँक्लिन** वाटेनें कांहींएक त्रास न होतां नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेस घरीं येऊन पोंचला. तो आज सहा वर्षांनीं घरीं आल्यामुळें घरची सर्व मंडळी सुखरूप पाहून त्याला मोठें समाधान वाटलें. तो गेला त्यावेळीं त्याची लाडकी मुलगी फक्त बाराच वर्षांची होती, परंतु, आतां ती अठरावर्षांची होऊन तारुण्यानें फारच सुंदर दिसत होती. तो घरीं गेला त्यावेळीं सर्वांनीं मोठ्या अभिमानानें आणि प्रीतीनें त्याचें स्वागत केलें. कायदे करणाऱ्या मंडळीनें त्याच्या ह्या देशसेवेबद्दल त्याला पस्तीस हजार रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें.

**वुइल्यम फ्रँक्लिन** आपल्या बापाला बरोबर घेऊन **न्यूजर्सिला** गेला त्यावेळीं तेथील लोकांनीं ह्या नवीन गव्हरनराचें मोठें स्वागत केलें. असो पुढें **वुइल्यमानें** **फिलाडेल्फिया** पासून पंधरा मैलांवर **बर्लिंग्टन** येथें आपलें ठाणें दिलें.

फ्रँक्लिनाच्या वयास सत्तावन वर्षें पुरीं झालीं, तरी त्याची शरीर प्रकृति फारच चांगली असे. शिवाय त्याजपाशीं संपत्तिही पुष्कळ होती. सारांश, त्याच्या सारखा सुखी मनुष्य क्वचितच आढळेल. तो शास्त्राच्या अभ्यासाकडे आपला बराच वेळ खर्च करी. राजकीय उलाढाली सोडून तत्वज्ञानाचा अभ्यास करण्याचा त्याचा विचार होता, परंतु तो कधींच शेवटास गेला नाहीं.

इ० स० १७६३ त सप्तवर्षात्मक युद्धाचा शेवट होऊन युरोपांत जिकडे तिकडे शांतता होऊं लागली परंतु अमेरिकेंतील जंगली प्रदेशांत तसा प्रकार मुळींच नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. इंग्लिश आणि फ्रेंच हजारों रानटी लोकांस परस्परांच्या वसाहतींवर पाठवीत ह्यामुळें ते तेथील गरीबगुरीबांस फार त्रास देत. एकाद्या बुभुक्षित लांडग्याप्रमाणें ते रक्त प्राशन करीत, लूट करण्यांत तर त्यांना कांहींच वाटत नसे इ० स० १७६३ च्या उन्हाळ्यांत पेनसिल्व्हेनियाच्या पश्चिमेस या लोकांनीं फारच धुमाकूळ माजविली, हजारों लोकांस त्यांच्या घरांतून हांकून लाविलें, त्यांचीं घरें जाळून खाक केलीं आणि त्यांचीं शेतें तुडवून उध्वस्त केलीं.

ह्या विनाकारण माजलेल्या दंग्यांत जे लोक बळी पडले

* ही लढाई फ्रान्स, रशिया, आणि पोलंड हीं तीन राष्ट्रें एका बाजूस व इंग्लंड आणि प्रशिआ हीं दोन एका बाजूस होऊन त्यांच्यामध्यें इ. स. १७५६ सालापासून १७६३ पर्यंत चालली होती. तेव्हां इंग्रज आणि फ्रेंच यांच्या वसाहती हिंदुस्थान आणि अमेरिका येथें असल्यामुळे तिकडे ही ती चालली.

आणि ज्यांचें अनन्वित नुकसान झालें, त्यांच्या करितां सर्व देवालयांतून वर्गणी गोळा होऊं लागली. एकट्या **क्राइस्टचर्च** नावाच्या देवालयामध्यें आठ नऊ हजार रुपये जमा झाले व ते उपासमार होणाऱ्या दुःखी लोकांकरितां खर्च करावे, म्हणून एका पाद्र्याची नेमणूक झाली. तो म्हणतो कीं, फक्त **पेनसिल्व्हेनिया** "प्रांतांत साडेसातशें शेतें ओसाड पडलीं आहेत आणि अडीचशें बायकापोरें निराश होऊन प्राणरक्षणाकरितां **फोर्टपीट**मध्यें पळून गेलीं आहेत!" अशा प्रसंगीं आमच्या हिकडेही वर्गणी गोळा होते परन्तु तिचा उपयोग अभिषेक आणि ब्राह्मणभोजनें घालण्यांपलीकडे बहुधा होत नसतो. हजारों गरीबगुरीब कुळंबी माळी आणि लाखों जनावरें भुकेनें मरत असतां अशा तऱ्हेनं वर्गणीचा पैसा खर्चकरणें म्हणजे त्याचा दुरुपयोग करणें नाहीं काय?

ह्याच धांदलींत **हॅमिल्टन** यानें राजीनामा दिल्यामुळें **जॉन पेन** याची त्या जागेवर नेमणूक झाली.

वर सांगितलेल्या रानटी **इंडियनां**चा पुढें अगदीं नाश होऊन त्यांच्या इंग्रजाशीं मित्रत्वानें वागणाऱ्या टोळीपैकीं कांहीं लोक शिल्लक राहिले होते त्यांस ही **प्याक्स्टन** येथील ऐरिश लोकांनीं मोठ्या निष्ठुरतेनें ठार मारिलें. **फ्रँक्लिनानें** गव्हरनराच्या विनंतीवरून त्या गरीब मृत्युमुखीं पडलेल्या लोकांचा पक्ष धरिला, हें पाहून विरुद्ध बाजूचे लोक अर्थातच त्याचा द्वेष करूं लागले.

# भाग १० वा.

## फ्रॅंक्लिन पुनः इंग्लंडाला जातो.

दोनपक्ष–इंग्लंडचें कर्ज–इंग्रजसरकाराशीं भांडण व त्याचीं कारणें–फ्रॅंक्लिनाचा आपल्यामुलीस उपदेश–इंग्लंडचा प्रवास–मुख्य प्रधानाची भेट-स्टॅंम्प ॲक्ट ( छापील कागदाचा कायदा ) अमेरिकन लोकांचा–निश्चय एडमंड बर्क–फ्रॅंक्लिनाची साक्ष–लॉर्ड च्याथ्यामचें भाषण-मुख्यप्रधानास लढाईचें भय—स्टॅंम्प ॲक्ट रद्द करितात—अमेरिकेचा आनंद---रोकिंग्याके आणि टॉंच—नवीन कर—तिसरा जॉर्ज राजा—फ्रॅंक्लिनाचा लेख—त्याला अधिकार मिळतात—लढाईची तयारी—वुइल्यम फ्रॅंक्लिन--सराचें लग्न–फ्रॅंक्लिनानें केलेल्या कांहीं सुधारणा–स्यांडविच बेटें सुधारण्याचा प्रयत्न--

लोकांमध्यें आतां दोनपक्ष झाले. त्या इंडियन लोकांची झालेलीकत्तल चांगली झाली असें मानणाऱ्यांचा एक, आणि ती वाईट झाली असें मानणाऱ्या फ्रॅंक्लिन प्रमुख मंडळीचा दुसरा.

ह्या उभयपक्षांत एकमेकांविषयीं द्वेष उत्पन्न होऊन विरुद्ध पक्षानें फ्रॅंक्लिन हा अति नीच मनुष्य आहे.असें प्रसिद्ध केलें. त्यानेंही नेहमींच्या क्रमास अनुस-

रून इंग्रजसरकारानें आपल्या हक्काचा उपयोग करून हा प्रांत जमीनदारांपासून विकत घ्यावा असें प्रतिपादन करणारें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. अमेरिकन लोक अंतःकरणापासून इंग्रज असून आपलें सत्व राखण्याविषयीं नेहमीं दक्ष असत, आणि खराखरा स्वदेशाभिमान त्यांच्यांत जागृत असे. ते इंग्लंडास आपलें घर मानीत. कायदे करणाऱ्या मंडळीची सभा भरली त्यावेळीं **फ्रँक्लिनाच्या** या लहानशा पुस्तकानें ज्यांचीं मनें फिरलीं होतीं अशा तीन हजार लोकांनीं हा प्रांत राजसत्तेखालीं जावा, अशा आशयाचा एक अर्ज आपल्या सह्यांनिशीं लंडनास पाठवून दिला. विरुद्ध पक्षानें ही याच्या विरुद्ध अर्ज तीनशें सह्यांनिशीं तिकडे रवाना करून दिला.

सर्व पृथ्वी जिंकण्याविषयीं अतितृष्णा करणारें आमचें सरकार, पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळविण्याच्या इच्छेनें किंवा दुसऱ्या सरकारचे आपल्यावर झालेले हल्ले दूर करण्याच्या इच्छेनें लढाऊ जहाजें आणि सैन्य घेऊन जळींस्थळीं गोंधळ घालीत होतें. ह्यामुळें मोलमजुरी करणाऱ्या गरीबगुरिबांपासून दुष्ट करांच्या रूपानें घेतलेला सर्व पैसा खर्च होऊन त्यांस ऱ्याहत्तर कोटि रुपये कर्ज झालें!

इंग्रजसरकारानें ह्या कर्जाचें व्याज फिटावें ह्मणून अमेरिकन लोकांवर कांहीं कर बसविण्याचा निश्चय केला. परंतु **फ्रेंच** आणि **इंडियन** लोकांशीं लढाई चालविण्याच्या कामांत ह्या लोकांवर आधींच त्यांच्या शक्तीबाहेर कराचा बोजा बसला होता.

फ्रेंच लोकांस उत्तर अमेरिकेबाहेर हांकून लावावें असा इंग्रजसरकारचा विचार असल्यामुळें त्यांनींच या लढाईचा घाट मुद्दाम घातला होता. अमेरिकन लोकांच्या मनांत ही लढाई करण्याचें मुळींच नव्हतें. तरी ही ह्या लढाईमुळें झालेली खजिन्याची दुर्दशा भरून काढण्याकरितां. त्यांच्यावर त्यावेळीं करांचा बोजा लादण्याचा विचार इंग्लंडच्या पार्लमेंटांत कायम ठरला. अमेरिकन लोकांना आपणाप्रमाणेंच ह्या राजकारणी परिषदेचे सभासद निवडून देण्याचा हक्क नसून सध्यां ज्याप्रमाणें आपणावर त्याप्रमाणें त्यावेळीं त्यांच्यावर आमचें दयाळु सरकार लहर लागेल तसे कर बसवीत असे.

जमीनदार लोकांशीं भांडत असणाऱ्या अमेरिकन लोकांस "नवे नवे कर बसवून त्यांची व्यवस्था लावणाऱ्या पार्लमेंटमध्यें सभासद नेमण्याचा अधिकार ज्या लोकांस नाहीं, त्यांजवरही कर बसवावा." हें नीतिमान् इंग्रजांचें तत्व मोडून काढण्याकरितां प्रत्यक्ष सरकाराशीं वाद घालण्याचा प्रसंग आतां आला. त्यावेळच्या कांहीं अविचारी मंडळीप्रमाणें जर सर्वच अमेरिकन हें तत्व कबूल करिते तर आह्मांप्रमाणेंच इंग्रज सरकार त्यांजवरही वाटेल तेव्हां वाटेल तेवढ्या कराचा बोजा लादतें.

यावेळीं पेनचे सर्व साथीदार, सरकारी कामदार, त्यांचे मित्र आणि दुसरे कांहीं लोक यांनीं फ्रँक्लिनाच्या विरुद्ध पक्ष धरून त्याच्याशीं अगदीं उघड वाद मांडिला. अमेरिकेंतील कायदे करणाऱ्या मंडळीनें बहुमतानें,

" पार्लमेंटमध्यें सभासद पाठविण्याचा हक्क ज्या लोकांस नाहीं त्यांवर कर बसविणें रास्त नाहीं, " हें तत्व प्रतिपादन करण्याकरितां फ्रँक्लिन यास पुनः इंग्लंडला पाठविण्याचा विचार केला.

**फ्रँक्लिनाला** तिकडून येऊन पुरीं दोन वर्षेंही झालीं नव्हतीं तरी विद्वान मंडळीच्या समागमाचें सुख तो विसरला नव्हता आणि यामुळें त्याच्या स्वदेशभक्तींत जास्त भर पडून हातांत घेतलेलें काम तडीस नेण्याचा त्यानें पक्का निश्चय केला. त्यानें आपल्या निघण्याची सर्व तयारी फक्त बारा दिवसांतच केली. खजिन्यांतला सर्व पैसा खर्च झाल्यामुळें **फ्रँक्लिनाच्या** प्रवासाकरितां कर्ज काढावें लागलें. लंडनास जाणारें जहाज **फिलाडेल्फिया**पासून पंधरा मैलांवर नांगरलें होतें, तेथपर्यंत **फ्रँक्लिनाला** पोंचविण्याकरितां **फिलाडेल्फियाचे** तीनशें लोक घोड्यावर बसून मोठ्या थाटानें गेले होते.

तो जरी स्वतः देवालयांत क्वचित् जाई तरी आपल्या बायकोला आणि मुलीला तसें करण्याविषयीं नेहमीं उपदेश करी, हें त्याचें करणें मोठ्या खुबीचें होतें. कारण धार्मिक लोकांत बाह्यात्कारीं तरी धर्मप्रमाणें वागल्याशिवाय मान कधींच मिळत नाहीं, हें तो पूर्णपणें जाणून होता. **फ्रँक्लिनाचें** कुटुंब ज्या देवालयांत जात असे, तेथील उपदेशक पेनचा साथीदार होता. **फ्रँक्लिनानें** आते वेळीं गलबतावरून जें वियोगपत्र लिहिलें त्यांत तो आपल्या मुलीस ह्मणतोः --

"कोणीही धर्मोपदेशक असला तरी तूं नेहमीं देवाळयांत जात जा. त्या ठिकाणीं गेल्यावर नेहमींच्या प्रार्थना पुस्तकाकडे नीट लक्ष देऊन तें वाचीत जा. ह्मणजे त्या योगानें जसें तुझें मन सुशिक्षित होईल तसें उपदेशकांच्या व्याख्यानांनीं होणार नाहीं. कारण ते पुस्तककर्ते आमच्या ह्या शहाणपणाचा व पवित्रतेचा डौल मिरविणाऱ्या उपदेशकांपेक्षां पुष्कळ पटीनें शहाणे आणि पवित्र होते. ह्मणून माझी अशी इच्छा आहे कीं तूं प्रार्थनेचा एकही दिवस चुकवूं नये."

वाटेनें वादळ झाल्यामुळें लंडनाला जाण्यास फ्रॅंक्लिन यास तीस दिवस लागले. तारीख १० दिसेंबर इ. स. १७६४ रोजीं तो लंडन येथे स्टिफनसन याजकडे जाऊन उतरला. त्याला पाहून तेथील मंडळीस मोठें समाधान वाटलें. इंग्रज सरकार लहर लागेल तशा रकमा अमेरिकन लोकांपासून त्यांस एका शब्दानेंही न पुसतां जुलमानें घेतें, तेव्हां या जुलमाच्या प्रतिकारार्थ सरकारापाशीं तक्रार करण्याकरितां अमेरिकेंतील निरनिराळ्या वसाहतींतूनही मुखत्यार आले होते, त्यांची व फ्रॅंक्लिनाची गांठ तेथें पडली.

ह्या वेळेस ग्रेनव्हिल नांवाचा मनुष्य प्रधान होता. त्याच्या मनांत सुरवाती दाखल अमेरिकन लोकांवर स्टॅम्प ॲक्टाचा अंमल बजवावा असें होतें. हा कायदा अगदीं क्षुल्लक असून त्याच्या योगानें लोकांवर कराचाही बोजा फारसा बसत नव्हता. परंतु अमेरिकेंतील लोक

निवडणुकीच्या हक्कावांचून कर देण्यास तयार होतात कीं नाहीं, हें पाहण्याच्या उद्देशानेंच तो चालू करावयाचा होता. एकदां ते तसे कबूल झाले, कीं मग लागेल तसा पैसा ओढण्यास हरकत पडणार नव्हती. हा कर बसूं नये ह्मणून **फ्रँक्लिनानें** आपली शिकस्त केली. तो ह्या करास ' खोड्यांचें बीज ' ह्मणत असे. निरनिराळ्या वसाहतींचे आणखी चार मुखत्यार बरोबर घेऊन त्यानें **ग्रेनव्हिलची** गांठ घेतली त्या वेळीं नेहमींचीं प्रमाणें पुढें येऊन उभयपक्षांचे बरेंच बोलणें झालें. **लार्ड ग्रेनव्हिल** हा दयाळु असून मोठा दुराग्रही होता, तो ह्मणाला, " इंग्लंडचें कर्ज फेडण्याच्या कामांत अमेरिकेनें मदत केलीच पाहिजे आणि ती काय करावी, हें ठरविण्याचा अधिकार फक्त ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटालाच आहे. "

प्रत्यक्ष इंग्रजी हाडामासाच्या मनुष्यास जर हा जबाब, तर आमच्या सारख्या परकीयांनीं, असलें उत्तर मिळतें ह्मणून खेद करण्यांत काय अर्थ ? शेंवटीं छापीव कागदाच्या कायद्याचा मसुदा पार्लमेंटापुढें येऊन बहुमतानें पसंत होऊन राजे साहेबांनीं त्याजवर वेड्या वांकड्या अक्षरांनीं आपली सही ठोकली.

या कायद्यानें गोळा होणारी रक्कम वर्षास फक्त दाहा लाख रुपयांचीच होती, तेव्हां येवढीशी रक्कम देण्यास अमेरिकन लोक तक्रार करितील, असें कोणास वाटलें नव्हतें. या विषयीं **फ्रँक्लिन** आपल्या मित्रास लिहितोः—

" **स्टँम्प अॅक्ट** मंजूर होऊं नये ह्मणून माझ्यानें

करवली तितकी खटपट मीं केली, परंतु विरुद्धपक्षाचा जोर जास्त पडला. कारण अमेरिकन लोकांच्या ह्या स्वतंत्रतेविषयींच्या मागणीनें सर्व राष्ट्र अगदीं रागानें संतापून गेलें आहे, आणि ह्मणूनच सर्व पक्षाच्या लोकांनीं एकवटून हा कायदा मंजूर केला."

असो, ह्याप्रमाणें छापीव कागदांचा कायदा मंजूर होऊन फ्रँक्लिनानें केलेली सर्व खटपट व्यर्थ होऊन प्रथम तो मंजूर झाला. तसेंच जमीनदारांकडून सर्व सत्ता सरकारानें आपल्या हातांत घ्यावी, ह्या उद्देशानें त्यानें जे प्रयत्न केले, त्यांतही त्यास यश मिळालें नाहीं. तथापि त्यानें भाषणें करून, लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध करून अमेरिकेंत त्याच्याविरुद्ध झालेल्या खटपटींच्या नातम्या जिकडे तिकडे पसरून आणि वर्तमानपत्रांतून लेख लिहून त्यानें ह्या कायद्याविरुद्ध लोकमत इतकें उत्पन्न केलें कीं, अखेरीस पार्लमेंटाला हा कायदा रद्द करावा लागला. हा कायदा मंजूर झाल्याची बातमी प्रथम अमेरिकेंतील विद्वान् लोकांत पसरतांच त्याबद्दल सर्वांनीं खेद प्रदर्शित करून त्याचा अंमल न चालूं देण्याविषयीं होईल तितका प्रयत्न चालविला होता.

अमेरिकेंतील अज्ञानी लोकांनीं मोठ्या शहाणपणानें या कायद्याचा अंमल न बसूं देण्याचा केलेला निश्चय पाहून इंग्लंडांतील बड्या मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें. कारण अमेरिकेंत वसाहतीकरितां गेलेले लोक मूर्ख, भिकारी, खोपटांत राहणारे, जंगलांत भटकणारे आणि युरोपांतील

शेतकऱ्यांपेक्षांही समाजव्यवस्थेंत अगदीं मागें पडलेले असे आहेत, अशी त्यांची कल्पना होती. हीच कल्पना पुष्कळ इंग्रजलोकांची आह्मांविषयींही असलेली पाहण्यांत व ऐकण्यांत येते.

ता. १० नोवेंबर सन १७६५ रोजीं त्या कायद्याचा अम्मल बजवावयाचा होता, त्यापूर्वींच फ्रँक्लिनानें इंग्लंडांतील कारागीर, व्यापारी वगैरे लोकांची अशी खात्री करून दिली कीं, " अमेरिकेंत याचा अम्मल बसविल्यानें सरकारास जो फायदा होईल त्याच्या दसपट नुकसान त्या विरुद्ध खटपटीनें बंद पडणाऱ्या व्यापारानें तुमचें होईल." त्यानें एकी करून, इंग्लंडांत तयार केलेलें सामान वापरूं नये, इंग्लंडचा माल विकत घेऊं नये आणि होईल तितकें करून अन्नवस्त्र आणि घरांत नेहमीं लागणारें सामान ह्याकरितां दुसऱ्या देशांवर अवलंबून न राहतां तें आपल्याच देशांत उत्पन्न करावें, असा निश्चय अमेरिकन लोक करीत आहेत, ही बातमी सर्व इंग्लंडांत प्रसिद्ध केली. आपल्या कपड्यांना पुरे इतकी लोंकर उत्पन्न होण्याकरितां मेंढरांचे कळप वाढावे ह्मणून अमेरिकन लोकांनी मेंढरें न खाण्याचा निश्चय केला होता. आज कोट्यवधि रुपये परदेशी मालाकरितां दरसाल आपल्या देशांतून कित्येक वर्षें सारखे बाहेर जात आहेत. सुईदोऱ्यापासून सर्व परदेशी माल आपल्या घरामध्यें भरला आहे. आज परदेशांतून माल येणें बंद झालें तर उद्यां आमचें कसें होईल, ही काळजी उत्पन्न होते. अशी

आमची स्थिति झाली आहे. तरी सुद्धां कच्चा माल आपल्या देशांत उत्पन्न होत असून तो यंत्राच्या साहाय्यानें तयार करण्याची खटपट आह्मी करीत नाहीं, हें आमचें केवढें अज्ञान ! ह्या कल्पना आमच्या सारख्या कफल्लकांस सुचतात. आणि ज्यापाशीं पैसा आहे, त्यांना तो उत्पादक भांडवलांत घालण्याची इच्छा होत नाहीं. तेव्हां ही दुफळी नाहींशी होऊन कल्पक आणि साधक ज्यावेळीं एकमतानें वागूं लागतील, त्याच वेळेस आह्मांला चांगले दिवस येतील नाहींपेक्षां आह्मी असेच दिवसें दिवस भिकारी होत जाणार !

वीस पासून तीस लाख वसाहतींतील लोकांस आजपर्यंत इंग्लंडानें लागेल तो माल पुरविला होता, परंतु अमेरिकन लोकांच्या ह्या एकाएकीं झालेल्या निश्चयानें वखारींत मोठी हाकाटी उडाली. कोणी माल मागवीना, त्यामुळें मालाच्या राशीच्या राशी शिल्लक पडल्या. तेव्हां उद्योगी लोकांनीं मोठमोठ्या सभा भरवून सरकारच्या ह्या ठरावाविरुद्ध एकच गहजब उडविला. एडमंड बर्क नांवाच्या प्रसिद्ध वक्त्यानें पार्लमेंटमध्यें ह्या ठरावाविरुद्ध पक्ष उचलून भाषणांचा सपाटा चालविला. पहा एकीचा प्रभाव कसा आहे तो !

बर्क आणि फ्रँक्लिन यांचें मोठें सख्य असल्यामुळें आमच्या प्रसिद्ध तत्ववेत्त्यानें त्या प्रसिद्ध वक्त्यास पुष्कळ प्रमाणें आणि मनास चटका लावणारे दाखले सांगितले. ते बर्कनें आपल्या अमोलिक वक्तृत्वानें पार्लमेंट सभेपुढें

बोलून दाखवितांच इंग्लंडच्या सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि हें अमेरिकेंत समजतांच तेथील मंडळीस मोठा आवेश चढला; सर्व कामाचा अगदीं घोंटाळा उडाला, कांहीं ठिकाणच्या लोकांनीं टिकिटें व छापील कागद फाडून टाकिले, कांहीं ठिकाणीं त्याची विक्री करण्यास कोणीच मिळेना. पार्लमेंटानें एक कमेटी भरून अमेरिकेंत कायद्याचा अंमल कसा चालला आहे, ह्याचा पुरावा घेण्याचें काम एकसारखें सहा आठवडेपर्यंत चालविलें. सर्व जागा उत्सुकश्रोतृसमाजानें अगदीं भरून गेली होती. इंग्लंडचे व्यापारी तर अगदीं एकेरीवर आल्यासारखे दिसत होते. फ्रँक्लिनाच्या साक्षीनें सर्व पुराव्यावर मात्रा केली हें पाहून सर्व प्रेक्षकांस मोठा आचंबा वाटला. कां नाहीं वाटणार? अशा प्रसंगांत इतकी वाहवा अद्याप कोणाचीही झाली नव्हती म्हटलें तरी चालेल.

मोठमोठ्या कावेबाज सरकारी वकिलांनीं त्या भव्य सभेंत त्याची साक्ष घेऊन उलट तपासणी केली व त्याला बोलण्यांत चुकवून घोंटाळ्यांत घालावा म्हणून त्यांनीं आपची कमाल केली, परंतु एक क्षणभरही तो गडबडला नाहीं. हें पाहून त्याच्या मित्रांनीं त्याजकडून कांहींच चूक झाली नाहीं ह्मणून त्याला शाबासकी दिली. कितीही कडक रीतीनें प्रश्न विचारिले तरी त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें देण्याची त्याची तयारी असून, सर्व प्रकारची माहिती त्याजपाशीं ओतप्रोत भरली होती. त्याविषयीं बर्कनें आपल्या एका मित्रास लिहिलें आहे तें असें:--

" ज्यावेळीं फ्रँक्लिन पार्लमेंट सभेपुढें उभा राहिला, त्यावेळीं त्याच्या चेहऱ्यावर दृष्टीस पडणाऱ्या मोठेपणानें आणि बुद्धिमत्तेनें मला एकादा हुशार विद्यार्थी आपल्या गुरूजीस त्याच्या प्रश्नांचीं उत्तरेंच देतो आहे कीं काय असें वाटलें."

रे. जॉर्ज व्हिटफील्ड म्हणतो कीः—

" आमचा सन्माननीय मित्र डा. फ्रँक्लिन याचें पार्लमेंटमधील वर्तन त्याला अक्षय्य मान देतें. त्याचें उत्तर पृच्छकाच्या वरचढ नसलें तरी बरोबरीचें खास असे. तो अगदीं निर्धास्त उभा असल्यामुळें त्याच्या मित्रांस मोठा आनंद होई, आणि त्याच्या देशाची कीर्ति लोक गात."

पुष्कळ चळवळ आणि मोठा वादविवाद झाल्यावर दुराग्रही इंग्रजसरकारास व्यापारी लोकांचें ह्मणणें कबूल करून मागें सांगितल्याप्रमाणें हा कायदा रद्द करावा लागला. इंग्लंडामध्यें, तो रद्द करावा ह्मणून हाकाटी करणारे जे लोक होते, त्यांच्यापैकीं अमेरिकन लोकांची कळकळ बाळगणारे अथवा त्यांचें बोलणें न्यायाचें आहे ह्मणून त्यांचा पक्ष स्वीकारणारे असे फारच थोडे होते. परंतु व्यापार बंद पडल्यामुळें येणाऱ्या दारिद्र्यानें आणि आपलें हित साधण्याच्या उत्कट इच्छेनेंच काय तें त्यांनाही चळवळ करण्यास लाविलें होतें.

असाच ह्या कावेबाज इंग्लिश व्यापाऱ्यांचा आपणास गिरण्यांच्या व्यवस्थेंत व स्वदेशी कापडावरील जकातींत नुकताच अनुभव आलेला आहे. गिरणींतील कामकरी लोकांविषयीं जी त्यांनीं एवढी कळकळ दाखविली व हिं-

दुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या फक्त कापडावरच जकात बसवावी ह्मणून जो त्यांनीं आग्रह धरला त्याचें कारण हिंदुस्थानांत माल उत्पन्न होऊन मॅन्चेस्टरच्या गिरणी-वाल्यांस स्वस्थ बसावें लागेल, हें नसून इंग्रजलोकांची भूत-दया आहे, असें कोण ह्मणेल ?

अमेरिकन लोक इंग्रज आहेत आणि अमेरिका इंग्र-जांचे राज्याचा एक भाग आहे, असें समजून मनापासून अमेरिकन लोकांविषयीं कळकळ बाळगणारे व त्यांच्या हक्कासाठीं भांडणारे हल्लींच्या आमच्या मि. ग्लॅडस्टन व मि. डिग्बी वगैरे सारखे महात्मेही त्यावेळीं पार्लमेंटांत आणि पार्लमेंटाच्या बाहेर पुष्कळ होते. अमेरिकन लो-कांनीं इंग्लंडच्या प्रत्येक कायद्यास जुलमानें तरी मान डोलवावी, ह्मणून त्यांजवर आरमार आणि सैन्य पाठवि-ण्याचा निंद्य ठराव ज्यावेळीं मंजूर झाला आणि जवळ जवळ तीस लाख वसाहतवाल्यांस जगांतील अति बलाढ्य राष्ट्राशीं सामना देऊन सर्व इतिहासांत मोठ्या धैर्याचें आणि शूरत्वाचें कृत्य करण्याचा प्रसंग ज्यावेळीं आला त्यावेळीं स्वसंरक्षणार्थ त्यांनीं हत्यारें उचलिलीं, हें पाहून लोकोत्तर नीति धैर्यवान् लॉर्ड चॅथाम यानें बड्या लोकांच्या सभेंत ( हौस ऑफ लार्डसमध्यें ) असें ह्मणून दाखविलें कीं, “ मी इंग्रज नसून जर अमेरिकन असतों, तर यावे-ळीं मी आपलीं शस्त्रें कधीं ! कधीं ! ! कधीं ! ! ! खालीं ठेविलीं नसतीं ! ”

अमेरिकन लोकांस गुलामांप्रमाणें आज्ञाधारक बनवि-

ण्याच्या कामांत तिसऱ्या जार्ज राजाप्रमाणें सर्व इंग्लंडांतही दुसऱ्या कोणाचा आग्रह नव्हता. हा कायदा रद्द होतांच त्याला मोठा राग आला. त्याच्या सारखाच वितंडवादी परंतु थोडे जास्त विद्वान् जे राजाचे मंत्री होते त्यांनीं, इंग्लंडांतील सरदार मंडळ आणि व्यापारी लोक यांच्यामध्यें आपसांत लढाई उद्भवण्याचा संभव आहे, असें जाणूनच कायदा रद्द करण्याविषयीं आपलीं मतें दिलीं होतीं. लढाई सुरू झाली असती तर सरदार मंडळीस फार दुःखें भोगावीं लागतीं, यांत तिळमात्र संशय नाहीं. *होरेस वालपोल ह्मणतोः—

"व्यापाराची रड, व्यापारी लोकांची हाकाटी आणि व्यापाराच्या ठिकाणची ओरड, ह्या सर्व गोष्टी एकत्र होऊन कायदा रद्द झाला. कायदा रद्द न होईल तर मोठें बंड होईल, अमेरिकेचे लोक मोठा पुंडावा माजवितील आणि व्यापाराचा नाश होईल, अशी सर्वांस भीति पडली होती."

इतकें झालें तरी कायदा रद्द करण्यास पार्लमेंटमध्यें कायतीं एकशें आठच मतें जास्त पडलीं. हें झाल्यानंतर सहज फ्रँक्लिनानें घरीं येण्याविषयीं अमेरिकेंतील कायदे करणाऱ्या मंडळीची परवानगी विचारिली. परंतु, सभेनें

* हा हरफर्ड येथील अर्ल असून, निरनिराळ्या घराण्यांच्या तर्फे तीन वेळां इंग्लीश पार्लमेंटमध्यें याची नेमणूक झाली होती. परंतु राजनीतीपेक्षां वाचन लेखन वगैरेचाच विशेष नाद असल्यामुळें त्यानें राजकीय गोष्टींचा विचार सोडून विद्यादेवीची एकनिष्ठ सेवा चालविली. त्याचे पुष्कळ लेख प्रसिद्ध आहेत.

त्यास दुसऱ्या वर्षाकरितां मुखत्यार नेमिलें, तरी त्याला त्याबद्दल मुळींच वाईट वाटलें नाहीं.

लोकांच्या प्रतिनिधींच्या ( हौस ऑफ कामन्सच्या ) सभेपुढें उत्तम रीतीनें झालेली त्याची साक्ष आणि त्यानें तेथें प्रसिद्ध केलेलीं लहान लहान पुस्तकें, ह्यांमुळें तो फारच लोकप्रिय झाला. कायदा रद्द झाल्याची बातमी कळतांच सर्व अमेरिकेंत जिकडे तिकडे आनंदप्रदर्शक घंटा आणि तोफा यांचे आवाज होऊं लागले.

यावेळीं एका मुलीनें आपल्या बापास पाठविलेल्या पत्रांत लिहिलें कीं, "मी आजपर्यंत एवढा गजर कधींच ऐकिला नव्हता." यावरून तिकडील मुलांचें लक्षही याविषयाकडे कसें लागलें होतें हें स्पष्ट होतें.

आपला बेत फसला असें पाहून राजपक्षियांस मोठा राग आला. राजपक्षाचा पक्का अभिमानी डा. जान्सन पेनसिल्व्हेनियाच्या व्हाइट नांवाच्या धर्माधिकाऱ्यास लिहितो कीं, "मी जर मुख्य प्रधान असतों, तर हा कायदा रद्द करण्याच्या ऐवजीं एकादें लढाऊ गलबत पाठवून अमेरिकेंतील लोकांचीं मोठमोठीं शहरें जाळून खाक केलीं असतीं."

राजाला तर अगदीं वाईट वाटलें. त्यानें कायदा रद्द करण्याविषयीं मतें देणाऱ्यांवर शिव्यांचा इतका वर्षाव केला कीं, त्याच्या कांहीं मित्रांस शेवटीं हा त्याचा असभ्यपणा त्याला सुचनावा लागला. खरोखर राजाच्या अर्थात प्रांतींतल्या व अमेरिकन लोकांच्या विरुद्ध मंड-

ळीस देखील मागें सांगितलेल्या प्रकारामुळें कायदा रद्द करण्याविषयींच आपलें मत देणें भाग पडलें.

'निर्दय आणि अर्धवेडा बनलेल्या राजाचें व त्याच्या हट्टवादी प्रधान मंडळाचें समाधान व्हावें ह्मणून, अमेरिकेंतील वसाहतींवर पार्लमेंटाची पूर्ण सत्ता आहे, असा स्पष्टरीतीनें उल्लेख करणारा एक ठराव मंजूर करण्यांत आला त्याला, 'डिक्लेरेटरी ॲक्ट' ह्मणजे जाहिर करणारा कायदा असें ह्मणतात.

यावेळीं पार्लमेंटसभेंत बराच घोंटाळा माजला होता. पैसे देऊन मतें मिळविण्याचें काम जारीनें सुरू होतें. '**सर न्याथेनियल रॅग्झल**' नांवाच्या ह्यावेळच्या पार्लमेंटामधील एका सभासदानें आपल्या विश्वसनीय टिपणांत असा उल्लेख स्पष्ट केला आहे कीं, " लार्ड ब्यूट प्रधान असतां त्यानें रोझ म्याके नांवाच्या मनुष्याची नेमणूक करून त्यास पार्लमेंटांतील सभासदांना लांच देऊन त्यांजकडून महत्वाचे सरकारी ठराव मंजूर करविण्याची कामगिरी सांगितली " या गोष्टीच्या पुष्टीकरणार्थ त्यानें एक भोजन समारंभाच्या वेळीं मॅकेचें आपल्याशीं झालेलें भाषण या टिपणांत दिलें आहे तें असें:—

**मॅके.** मला ह्मणाला:—

"' इ. स. १७६३ चा तह ठरून तो लोकांना आवडला, यांतलें इंगित पैशाच्या उधळपट्टीवांचून दुसरें कांहींच नव्हतें. ह्यावेळचा पैसा वाहणारा कालवा काय तो मी. प्रधान मंडळीस अति महत्वाच्या अशा कृत्यांत

मी स्वतः सरासरी सत्तांशें मतें आपल्या बाजूला ओढलीं. ह्या कामासाठीं आठ लाख रुपये एकीकडे काढिले होते. प्रतिनिधींच्या ( कामन्स ) सभेंतील चाळीस सभासदांस प्रत्येकीं दहा दहा हजार रुपये ह्या हातांनीं मोजून दिले आणि दुसऱ्या ऐंशी जणांस प्रत्येकीं पांच पांच हजार भरले."

अमेरिकन लोकांस निवडणुकीचा हक्क न देतां त्यांजपाशीं आह्मी मागूं त्या रकमा त्यांनीं आह्मांस दिल्या पाहिजेत, असें तो निर्दय राजा अद्याप ह्मणतच असे. त्यानें कांहीं चतुर कामदार बोलावून त्यांजकडून ज्या ठरावास अमेरिकन लोक विरुद्ध जाणार नाहींत, असा ठराव करवून आपला हेतु सिद्धीस नेण्याचा विचार केला. त्या सर्वांनीं मिळून कागद, रंग, कांचकाम आणि चहा या जिनसांवर कर बसवावा आणि वसाहतींतील ज्या बंदरांत हा माल उतरेल, त्या ठिकाणच्या जकात खात्यांतील लोकांनीं त्यावरील जकात गोळा करावी असें ठरविलें. ह्या करानें वसूल होणारा पैसा चार लाख रुपयांहून जास्त नव्हता. तेव्हां एवढ्याशा रकमेकरितां अमेरिकन लोक तक्रार करणार नाहींत, असें त्या सर्वांस वाटत होतें.

परंतु ह्या कराच्या योगानें अमेरिकन लोकांस पार्लमेंटमध्यें सभासद धाडण्याचा हक्क न देतां त्यांजपासून कर घेण्यास इंग्रजसरकारास अधिकार आहे, एवढें तत्व सिद्ध होत होतें. एकदां अशा रीतीनें चार लक्ष रुपये मिळविण्याचा हक्क शाबीत झाला असता कीं आमच्या इंग्रज

सरकारास जरूर पडेल तेव्हां चार कोटि रुपये उभारण्या-सही कांहीं हरकत पडली नसती.

अमेरिकन लोक दिवसेंदिवस मोठे हुशार होत चालले होते परंतु हें इंग्रजलोकांस कसें कळलें नाहीं, ह्याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. सर्व वसाहतींत आणि विशेषतः "न्यूइंग्लंडांत" एकही असा शेतकरी नव्हता कीं ज्याला इंग्रजांची ही लुच्चेगिरी माहित नव्हती व जो तिचा तिट-कारा करीत नसे. इंग्रज लोकांनीं असें करणें ह्मणजे आपल्याला अगदीं मूर्ख समजणें आहे, असें ते मानीत.

सर्व प्रांतांतील लोकांनीं ह्या नवीन ठरावाविरुद्ध मोठी खटपट चालविली. ही जकात ह्मणजे स्टॉपांच्या कायद्यांत थोडा फेरफार करून तोच चालविण्यासारखें होतें. हा ठराव न्याय्य आहे, असें जर ते कबूल करिते, तर मागचा कायदा नाकबूल करण्यांत त्यांनीं अक्षम्य अपराध केला असें झालें असतें.

ह्या तिसऱ्या जॉर्जराजाच्या कारकीर्दींत सर्व पृथ्वी-वर भयंकर लढाया चालल्या होत्या आणि त्यांतील पुष्क-ळांचें मूळ इंग्रजच होते. कोट्यावधि लोक या लढायांत मृत्युमुखीं पडले, आणि जिकडे तिकडे बायकापोरांची आरडाओरड ऐकूं येऊं लागली. या दुष्ट ख्रिस्ती राजानें, अमेरिकन लोकांनीं आपल्या जुलमी अमलास क-बूल व्हावें ह्मणून त्यांस मारण्याकरितां आणि त्यांचीं घरें-दारें जाळून त्यांचा फन्ना उडविण्याकरितां आरमार, आणि इतर सैन्य त्यांजवर पाठविलें. इंग्लंडचे बहुतेक लोक दुसऱ्या लढायांमध्यें गुंतून गेल्यामुळें त्या राजानें यूरोपांतील दुसऱ्या राजांस पैसे भरून अमेरिकन लोकांचीं

घरें जाळण्याकरितां सैन्याची जमवाजमव केली; एवढेंच नाहीं तर त्यानें आपले लोक रानोमाळ पाठवून वरील कामा करितां रानटी लोकांच्या टोळ्या त्यांना पैसे भरून आणण्याचीही खटपट चालविलीच होती.

स्टँप ॲक्टाप्रमाणें ह्याही ठरावाविरुद्ध **फ्रँक्लिनानें** मोठ्या जारीनें तयारी चालविली. त्यानें या विषयीं असें लिहिलें आहे:—

"माझी अमेरिकेंत थोडी मालमत्ता आहे, तेव्हां मी वीस शिलिंगांपैकीं एकादाही शिलिंग माझी खुषी नसतां दुसऱ्यास देण्याचा अथवा न देण्याचा आपला हक्क राखण्याकरितां बाकीचे एकोणीस शिलिंग मोठ्या खुषीनें खर्च करीन. आणि इतकेंही करून जर माझा हक्क मला राखतां आला नाहीं, तर मी आपल्या लहानशा कुटुंबासह अमेरिकेंतील विस्तीर्ण अरण्यांत जाऊन शिकार करण्यावर अथवा मासेमारण्यावर आपल्या कुटुंबाचें पोट भरून स्वातंत्र्यानुभव घेईन. पण असली ताबेदारी पतकरणार नाहीं." याचें नांव स्वातंत्र्यप्रेम! आणि स्वदेशाभिमान!!

**पेनसिल्व्हेनियाचा** मुखत्यार या नात्यानें **फ्रँक्लिनानें** इंग्रजी न्यायासनापुढें दाखविलेल्या विलक्षण सामर्थ्यामुळें सर्व वसाहतींत त्याची मोठी कीर्ति झाली. इ. स. १७६८ त आपणास * **जार्जियाच्या** तर्फे लंडनचा मुखत्यार नेमिल्याचें ऐकून त्याला मोठा आनंद झाला. पुढचे वर्षींही * **न्यूजर्सीनें** तोच सन्मान त्याला अर्पण केला. आणि या पुढील सालीं * **म्यासाचुसेट्स** प्रांता-

---

* हीं तीनही सं. सं. पैकीं संस्थानें (प्रांत) आहेत.

नेंही त्यास मुखत्यार नेमिलें. ह्या सर्व कामगिऱ्यांकरितां यावेळीं दहावर्षें पर्यंत त्याला इंग्लंडामध्यें रहावें लागलें.—

तरी देखील त्याच्या मनाची आनंदवृत्ति मुळींच ढळली नाहीं. त्यानें तेथील सुंदर देखाव्याचें वर्णन लिहून ठेविलें आहे. त्याला त्या ठिकाणीं चैन पडत नसे, अथवा मी कधीं घरीं जाईन असें झालें होतें, अशा विषयीं कोठेंच कांहीं दाखला मिळत नाहीं.

इंग्रजी राष्ट्राचें अमेरिकेविषयीं शत्रुत्व प्रत्यहीं वाढत होतें. स्वातंत्र्याभिमानी अमेरिकन लोकांस पक्के परतंत्र करण्याविषयींचा राजाचा उद्देश कमी न होतां एकसारखा बळावतच चालला होता. अमेरिकन लोक जर हा ठराव मान्य करणार नाहींत, तर इंग्रजी सैन्याची आणि त्यांची मोठी चकमक झडेल, अशीं चिन्हेंही आतां दिसूं लागलीं. पुष्कळ सैन्य बोस्टनांत येऊन उतरलें व त्याच बंदरांत चौदा लढाऊ गलबतेंही येऊन थडकलीं. त्यां सर्वांवरील तोफा, अमेरिकन लोकांनीं एकादी खोडी करितांच त्या शहरावर उडून त्याची क्षणार्धांत राखरांगोळी करून टाकितील, अशा रीतीनें त्यांत दारूगोळा खचून भरून त्या अगदीं तयार करून ठेविल्या होत्या. ह्या जहाजांनीं संरक्षित अशा दोन गोऱ्या शिपायांच्या पलटणी, सूर्यकिरणाप्रमाणें चकाकणाऱ्या संगिनी लाविलेल्या बंदुकी खांद्यावर टाकून रस्त्यांत हारीनें उभ्या राहिल्या होत्या. भीतिप्रद कुलपी गोळ्यांचा मारा करण्याकरितां भरून ठेविलेल्या तोफांचा जंगी तोफखाना अगदीं तयार करून ठेविला

होता. सैन्यांतील मगरूर बडे कामदार इकडून तिकडे व तिकडून इकडे थयथया घोडे नाचवीत हिंडत असून शिपाई आणि दुसरे कामदार एक सारखा पोशाख करून आपापल्या दर्जाप्रमाणें उभे राहिले होते. या सुशिक्षित शिपायांच्या अजिंक्य सैन्यानें शांतता राखण्याकरितां म्हणून तेथलीं मोठमोठीं ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतलीं होतीं.

या गोष्टीला आज जरी एक शतकावर वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी अमेरिकन लोकांस तिची आठवण होतांच या अपमानाबद्दल त्यांना संताप आल्यावांचून रहात नाहीं. मग त्यावेळच्या अमेरिकन लोकांस ती प्रत्यक्ष पाहतांना काय वाटलें असेल बरें !

फ्रँक्लिनाचा दिवसेंदिवस इंग्लंडमध्यें अपमान होऊं लागला. अमेरिकेसंबंधीं काम चालविणारा लार्ड हिल्सबरो यानें त्यास स्पष्ट किंवा उद्धटपणानें असें सांगितलें कीं, " मी अधिकारारूढ आहें तोंपर्यंत अमेरिकन लोकांची दाद लागण्याचें नांव देखील नको, कारण राजानें स्वीकारिलेल्या मार्गाचें अवलंबन करण्याचा माझा अगदीं दृढ निश्चय झाला आहे. " राजा, प्रधानमंडळानें नेहमीं वेष्टित असल्या कारणानें, त्याचें खरें स्वरूप फ्रँक्लिनास कळण्याचा मार्ग नव्हता.

फ्रँक्लिनाबरोबर त्याचा नातु वुइल्यम टेंपल हा होता. तो मोठा बुद्धिवान् असून होतकरू असे. आणि आजोबाच्या देखरेखीमुळें त्याचें वर्तन मोठें नावाजण्यासारखें झालें होतें.

न्यूजर्सीचा गव्हरनर वुइल्यम फ्रँक्लिन हा अलीकडे आपल्या बापाच्या दुःखास कारण होत चालला होता. यावरून फ्रँक्लिनानें पूर्ववयांत केलेल्या पापाबद्दल ईश्वर त्याला शिक्षाच करीत आहे असें दिसलें. त्याची नेमणूक इंग्रजसरकाराकडून झाली असल्या कारणानें ती जागा न जावी ह्मणून तो सरकारचा पक्ष धरून सरकारच्या शक्तीपुढें वसाहतींतील लोकांचें काय चालणार आहे ? असें ह्मणे.

अशा रीतीनें होतां होतां तो राजपक्षाचा मोठा अभिमानी झाला. सध्या हीच स्थिति आमच्या इकडील बऱ्या सरकारी कामदारांची झाली आहे—फ्रँक्लिनानें इ. स. १७७३ त आपल्या मुलास पत्र लिहिलें, त्यांत तो ह्मणतो:—

"तूं कपटी स्वभाव टाकून प्रामाणिकपणानें सरळ वागावें, असें मला वाटतें. जर तूं लोकांना पूर्वीपेक्षां जास्त सुखी करण्याचा प्रयत्न करशील तर ते, तुझी राजकीय व्यवस्थेसंबंधी काय मतें आहेत, याचा विचार न करितां तुला नेहमीं स्मरतील"

फ्रँक्लिन इंग्लंडमध्यें असतां फिलाडेल्फियाचा तरुण व्यापारी रिचर्ड ब्याचे यानें त्या पिताविरहांत बहुतेक आयुष्य घालविलेल्या फ्रँक्लिनाच्या मुलीशीं लग्न लाविलें. सेरा हिचें वय त्यावेळीं तेवीस वर्षांचें असून तीं फार सुंदर दिसत होती व सर्वप्रकारच्या कसबांत मोठी विख्यात झाली होती. मि. ब्याचे याला व्यापारांत यश न आल्या

मुळें तो आठवर्षेंपर्यंत फ्रँक्लिनाकडेच राहिला. त्याची संतति वाढत चालली, तेव्हां त्यानें आपल्या सासऱ्यास मला कोठें तरी सरकारी नोकरी लावून द्या ह्मणून पत्र लिहिलें, त्यावर फ्रँक्लिनानें आपल्या मुलीस येणेंप्रमाणें लिहिलें कीं:—

"एकाद्या मनुष्यास ज्या धंद्याचें शिक्षण मिळालें असेल तोच त्यानें करावा. नोकरी करणें ह्मणजे आपलें स्वातंत्र्य गमावून परतंत्र बनणें आणि वरिष्ठ अधिकाऱ्याच्या लहरीप्रमाणें वागणें होय. मला वाटतें कीं, तुह्मी राहतां तेथेंच एकादें किराण्या जिनसांचें दुकान सुरू कराल, तर मला जसें तुझ्या आईचें सहाय्य झालें, तसें तुझें तुझ्या नवऱ्याला होईल. कारण तूं हुशार असून तुला गर्वाचा ताठा नाहीं, तुला जमाखर्च शिकण्याला वेळ लागणार नाहीं, तसेंच तूं पत्राच्या नकला करशील. इतकेंच नाहीं तर प्रसंगीं पत्रें देखील लिहिशील, असें मला वाटतें. तुह्मी तरुण असल्यामुळें उद्योग करून बेतावातानें खर्च ठेवाल, तर तुह्मांला जगांत पुढें सरसावण्याला उशीर लागणार नाहीं. तसेंच आमच्या जवळ असलेला पैसा जरी एका कुटुंबाच्या पोटापाण्यास पुरण्यासारखा नाहीं, तरी तो आमच्या मरणोत्तर तुमच्या पैशांत भर पडून तुमचें चांगलें चालेल."

माल खरेदी करण्याकरितां फ्रँक्लिनानें आपल्या जांवयास एक हजार डालर्स दिले. ह्या जोडप्याची संतति सुंदर असून मोठी बुद्धिवान् होती. ह्या मुलांस पाहून

त्यांच्या ममताळू आजीस मोठें समाधान होई. इ. स. १८६२ मध्यें रिचर्ड ब्याचे आणि सारा फ्रँक्लिन यांच्या वंशांतील एकशेंदहा मंडळी जिवंत असून ह्यांपैकीं दहाजण त्यांच्या सर्व प्रसिद्ध पूर्वजांनीं स्थापित केलेल्या राष्ट्राचें संरक्षण करणाऱ्या "युनियन आर्मी" मध्यें (एकत्र झालेल्या फौजेंत) चाकरी धरून आपले प्राण खर्ची घालण्यास तयार होते. फ्रँक्लिनाचें लक्ष्य कधीं एकाच गोष्टीकडे नसे तो चांगला मुत्सद्दी, आणि 'वसुधैवकुटुंबकम्' असें समजून वागणारा व मोठा तत्वज्ञानी होता.

ह्या दशवर्षात्मक इंग्लंडवासांत त्यानें तेथील दवाखाने व त्यांची व्यवस्था पाहून त्यांची सर्व हकीकत स्वदेशीं कळविली. फिलाडेलिफयाच्या वैद्यशालेनें हल्लीं जें नांव मिळविलें आहे, त्याचें मूळ कारण हेंच होय. तो रेशमाच्या कारखान्यांत गेला, व तसले कारखाने चालू करण्यास अमेरिकेची हवा व लोकस्थिति योग्य असल्यामुळें ते चालू करण्याविषयीं आपला विचार तिकडील लोकांस त्यानें कळविला. इंग्लंडमध्यें रेशीम होत नव्हतें ह्मणून सरकारानें हे कारखाने सुरू करण्यास अमेरिकन लोकांस आडकाठी आणिली नाहीं. *हार्टफर्डच्या पाठशाळेकरितां त्यानें पांचशें रुपयांची दुर्बीण विकत घेतली, ही गोष्ट त्यावेळीं कमी महत्वाची नव्हती.

* सं. सं. पैकीं, कनेक्टिकट प्रांतांत व्यापार व कारखाने यांकरितां प्रसिद्ध शहर असून येथें एक पाद्री लोकांकरितां पाठशाला आहे.

ह्याच वेळीं प्रसिद्ध नाविक कुक हा पहिली पृथ्वीप्रदक्षिणा करून परत आला. त्यानें या सफरींत कांहीं नवीन* बेटें आणि नवीन प्रकारचे लोक शोधून काढिले, हें ऐकून इंग्लंड व अमेरिका येथील प्रत्येक मनुष्यास मोठा चमत्कार वाटला. फ्रँक्लिनानें पुढारी होऊन ह्या अज्ञान रानटी लोकांस कोंबड्या, बकरीं वगैरे भक्ष्य प्राणी व युरोपांत उत्पन्न होणारीं धान्यें पाठविण्याकरितां पंचाहत्तर हजार डालर्सची रक्कम उभारावी, अशी सूचना लोकांपुढें आणिली. याविषयीं त्यानें मोठ्या जोरानें लिहिलें आहे तें असें:—

" लुटीच्या, सूड घेण्याच्या किंवा फायद्याच्या दृष्टीनें आजपर्यंत पुष्कळ पर्यटणें लोकांनीं केलीं; परंतु मी ह्मणतों ही सफर पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूवरील लोकांस फसविण्याकरितां नाहीं, त्यांना लुटण्याकरितां नाहीं किंवा त्यांचा देश काबीज करून त्यांना गुलाम बनविण्याकरितां नाहीं; तर त्यांना भेटून त्यांचें कल्याण करावें व आपल्या शक्त्यनुसार आपण त्यांस सुखी करावें, अशी खटपट करण्याकरितां होय." ह्याचें नांव भूतदया आणि साधुत्व.

सद्गुणावांचून राष्ट्राची उन्नति कधींही होत नाहीं. जे लोक न्यायानें वागत नाहींत आणि ज्यांना दया हा काय पदार्थ आहे हें माहीतही नसतें, त्यांना सुखप्राप्ति होत

---

* स्यांडविच नांवाचीं बेटें. प्यासिफिक महासागरांतील मायक्रोनेशिया नांवाच्या बेटांच्या समुहापैकीं एक समूह.

नाहीं. ह्या नवीन सांपडलेल्या नग्न वृत्तीनें राहणाऱ्या रानटी लोकांकरितां धान्य, शेतकीचीं आउतें व जनावरें, डुकरें आणि कोंबडी पाठविणें, हें मोठें औदार्य होतें, यांत शंका नाहीं. परंतु इतकेंही करून अमेरिकन लोक राहिले नाहींत. त्यांनीं, त्या रानटी लोकांकडे त्यांचीं मुलें शिकविण्याकरितां त्यांना कुटुंबस्थितींत राहण्याचा उपदेश करण्याकरितां आणि त्यांच्या मनांत ख्रिस्ती धर्माचीं तत्वें ठसविण्याकरितां, आपले पाद्री उपदेशक पाठविले.

---

# भाग ११ वा.

## इंग्रजांची कमाल.

इंग्लंडांतील पक्ष–अधिकारभ्रष्ट मंडळीचा आवडता फ्रँक्लिन–राजपक्षीयांचे नेत–फ्रँक्लिन पारिसला जातो. पंधरावा लुई–आयर्लंडाला जाणें–त्याचें पत्र–अमेरिकेहून आलेलीं भयंकर पत्रें–जॉन ॲडम्सचे उद्गार–अमेरिकन लोकांचा अर्ज–फ्रँक्लिनाविरुद्ध कट–त्याचा जबाब–वेडरबर्ननें त्याजवर केलेला भयंकर आरोप–फ्रँक्लिनाचें पत्र–त्याची भीति.

ज्याठिकाणीं सरकार ह्मणून कांहीं आहे, त्याठिकाणीं भांडण तंटे हे असणारच. ज्या लोकांना अधिकार नाहीं

ते, अधिकारी लोकांचा हेवा करितात आणि त्यांना पद-च्युत करून त्यांच्या जागा बळकावूं पाहतात. ह्यावेळीं इंग्लंडांत अधिकारभ्रष्ट मंडळीचा जमाव मोठा होता, परंतु तो निराळ्याच हेतूनें होता. अधिकारारूढ मंडळींत बुद्धि-वान्, मोठ्या मनाचे आणि सद्गुणी असे लोक पुष्कळ असून त्यांना, दुराग्रही राजपक्षीय लोक अमेरिकन लोकांविषयीं करीत असलेला अन्याय मुळींच खपत नव्हता. विरुद्ध पक्षाला बहुतेक व्यापारी असून त्यांना अमेरिकन लोकांची मुळींच परवा नव्हती, आणि सरकारचें करणें बरोबर आहे किंवा नाहीं, या-विषयीं ते बेफिकीर असत. आपल्या टोप्या, शिकलगि-रीचें सामान आणि कापसाचा व लोंकरीचा माल, अमेरि-केंत खपावा, हीच काय ती त्यांची इच्छा होती. सरकार जर स्टॅंपाचा आणि वसुलाचा कायदा मंजूर करितें, तर ही त्यांची इच्छा सफल होतीना. तिसऱ्या एका मंडळीं-तील लोकांजवळ माल वगैरे कांहीं नसून त्यांचें आणि विचारशक्तीचें उभें वैर होतें, तरी त्यांची महत्वकांक्षा फार जबर होती. त्यांच्या मनांत राजपक्षीय लोकांस अधिकारावरून काढून त्यांच्या जागा आपण पट-काव्या व मोठा मान आणि पुष्कळ अधिकार संपादन करावा, असें फार होतें.

**फ्रँक्लिन** अधिकारभ्रष्ट मंडळीच्या गळ्यांतील केवळ ताईत बनला होता. त्यानें त्या पक्षाचे मोठमोठ्या व-क्त्यांस मोठमोठीं प्रमाणें आणि सुरेख उदाहरणें व

लोकस्थितीची पुष्कळ माहिती देऊन पार्लमेंटांत पाठविलें. पार्लमेंटामधील पुष्कळ वक्त्यांच्या तोंडीं, फ्रँक्लिनाचीं ठसा उमटविणारीं वाक्यें अगदीं बसून गेलीं. त्यानें प्रजापक्षाच्यातर्फे पुष्कळ छोटेखानी पुस्तकें प्रसिद्ध केलीं. तीं लोकांत ठिकठिकाणीं वाचलीं जाऊन त्यांच्यामुळें सरकारी ठरावाविरुद्ध पुष्कळ लोक तयार होऊं लागले. ह्याप्रमाणें प्रजापक्षी यांस फ्रँक्लिन प्रिय होऊन ते त्याचा मोठा सन्मान करूं लागले. तो ह्या पक्षाचा जितका मित्र झाला तितकाच राजपक्षाचा शत्रु बनला. राजपक्षाची मंडळी ह्मटली ह्मणजे बडे लोक, सरकारी कामदार आणि त्यांवर अवलंबून असणारे कांहीं लोक अशी असल्यामुळें तो पक्ष मोठा संपत्तिमान् आणि वजनशीर असा झाला होता. हे लोक फ्रँक्लिनाचा अपमान करण्याची, त्याची अब्रू घालविण्याची आणि साधल्यास त्याला लोकांच्या तिरस्कारास पात्र करण्याची संधि पाहत होते.

ह्यावरून एक पक्ष त्याचा सन्मान राखण्यास आणि दुसरा अपमान करण्यास कसा झटत होता हें वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. कधीं कधीं राजपक्षाचे लोक फ्रँक्लिनाला आपले बाजूस ओढण्याकरितां त्याची हांजी हांजी करीत; एखाद्या मोठ्या जागेची त्याला लालूच दाखवीत; अधिकार देतों ह्मणून त्याच्या पाठीस लागत; आणि कोणत्यातरी मार्गानें त्याला पैसा देऊं पहात. सारांश जर तो ह्यावेळीं मनांत आणिता तर मोठ्या हुद्याची जागा आणि पुष्कळ पैसा त्याला मिळाला

असता. परंतु आपली भर करून देवाचा नाश करणाऱ्या आमच्या कांहीं मंडळी पैकीं तो नव्हता.

ह्यावेळच्या वड्या गृहस्थांच्या मुलांना मेजवान्या झोडून दारूच्या धुंदींत पडत झडत घरीं जाण्यांत कांहींच हलकटपणा वाटत नसे व त्यांची आपसांत चाललेली थट्टा एखाद्या खऱ्या सभ्य गृहस्थानें ऐकण्यासारखीही नसे. ह्यामुळें असल्या मंडळींत जाणें फ्रँक्लिनाला कधींही बरें वाटलें नाहीं. लंडनमध्यें फ्रँक्लिनाचे खरे मित्र ह्मटले ह्मणजे एका ईश्वरावर भरंवसा ठेवणारे पाद्री आणि ख्रिस्ती धर्माचा त्याग केल्याबद्दल त्याला शाबासकी देणारे त्याच्या जोडीचे दुसरे तत्वज्ञ हे होत ह्यांपैकीं डा. रिचर्ड प्राईस आणि डा. जोसेफ प्रीस्टले हे दोघे बुद्धिवान् आणि सद्गुणी गृहस्थ त्याचे अगदीं प्रिय मित्र होते.

प्रत्येक उन्हाळ्यांत फ्रँक्लिन प्रवासाकरितां बाहेर पडे. इ. स. १७६७त सर जान प्रिंग्ले याज बरोवर तो पारिस येथें गेला, तेव्हां तेथें यःकश्चित् मजुरापासून सर्व लोक मोठ्या सभ्यतेनें वागणारे आहेत, असें पाहून त्याला मोठा आनंद झाला. तो परकीय आहे असें कळतांच गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व लोकांनीं त्याचा मोठा आदर केला. तो ह्मणतो, "आमच्या झालेल्या आदरावरून फ्रेंच लोकांच्या सभ्यपणाविषयीं आमची पक्की खातरी झाली. परकी मनुष्याचा सन्मान राखणें ह्यास, ते आपल्या कर्तव्यापैकीं एक कर्तव्यच समजतात."

ज्या ठिकाणीं इतरांस जाण्याचा प्रतिबंध, त्या ठिका-

णीं हे परकी असल्यामुळें यांना सदर परवानगी मिळाली. तेथल्या कायद्याप्रमाणें ह्यांच्या हातून घडलेला अन्याय हे परकी समजून यांना माफ केला. असल्या कामांत परकीयांचें अनुकरण करूं नये असें कोण ह्मणेल ?

फ्रँक्लिन आणि त्याचा मित्र या दोघांची व पंधराव्या लुई बादशहाची *व्हरसेल येथें भेट झाली. तो अतिशय दुष्ट होता तरी त्याच्या आंगीं सभ्यपणा असल्यामुळें आमचे तत्वज्ञ त्याविषयीं फक्त एवढेंच ह्मणतात. "तो आह्मांजवळ मोठ्या आनंदानें बोलला. हा राजा चांगला सुरेख असून त्याचा चेहरा मनास आनंद देणारा आहे, व तो दिसतो त्यापेक्षां कमी वयाचा असावा असें वाटतें."

इ. स. १७७२ त फ्रँक्लिन आयर्लंडाला गेला असतां त्या ठिकाणीं त्याचा मोठा सन्मान झाला, परंतु ऐरिश लोकांची दीनावस्था पाहून त्याच्या उदार अंतःकरणास मोठें वाईट वाटलें.

त्यावेळीं फ्रँक्लिनाची जिकडे तिकडे वाहवा चालली होती. त्याच्या इतका लोकप्रिय मनुष्य साऱ्या यूरोपांत आणि अमेरिकेंत नव्हताच ह्मटलें तरी चालेल. यूरोपांतील सुज्ञ लोकांच्या प्रत्येक सभेनें त्याला आपला सभासद नेमिलें. त्यानें लिहिलेल्या सर्व पुस्तकांच्या अनेक सुंदर आवृत्ति लंडनमध्यें प्रसिद्ध झाल्या व पारिसमध्येंही त्याच्या लेखाच्या तीन अवृत्ति प्रसिद्ध झाल्या.

---

* सीन नदीच्या काठीं फ्रान्सच्या राजाचें पूर्वीचें राहण्याचें ठिकाण. येथें एक जुना राजवाडा आहे.

फ्रान्समध्यें त्याला पाहून सर्वांस मोठा आनंद झाला, आणि त्याच्या कानीं त्याचा स्तुतिवादच पडला.

तो मोठा नीतिवान् आणि बुद्धिवान् असल्यामुळें त्याच्या देशबांधवांनीं त्याचा अतोनात सन्मान केला, ह्मणून इंग्लंडमध्यें त्याच्या शत्रूंसही त्याचें वैर करण्याची लाज वाटूं लागली.

त्यानें लंडनाहून आपल्या मुलास पत्र लिहिलें त्यांत तो ह्मणतोः—

" माझी या ठिकाणची स्थिति फार मजेदार आहे. येथल्यापेक्षां परके ठिकाणीं माझी कीर्ति फार गाजत असल्याकारणानें बाहेरून येणारे सर्व सुशिक्षित लोक माझी भेट घेतल्यावांचून जातच नाहींत. ह्या दरबारी असणाऱ्या दुसऱ्या राष्ट्रांच्या वकिलांनीं अमेरिकेंतील माहिती कळावी ह्मणून माझें मित्रत्व संपादिलें आहे.' कारण ही माहिती त्यांना फार महत्वाची वाटते. इंग्लंडच्या वसाहतीनें जर बंड केलें तर इंग्लंडचा फार नाश होईल, असें त्यांना खास वाटूं लागलें आहे. "

इ. स. १७७२ च्या अखेरीस प्रधानमंडळानें बोस्टनला सैन्य पाठविण्याच्या केलेल्या भयंकर ठरावाबद्दल फ्रँक्लिनाचें पार्लमेंटाच्या एका वजनदार सभासदाशीं नम्रपणानें परंतु जोरानें बोलणें चाललें असतां तो सभासद ह्मणाला, " प्रधानमंडळानें हे ठराव केले असें ह्मणतांना तुह्मी चूक करितां. सैन्य पाठविण्याबद्दल आणि शत्रुत्व उत्पन्न करणाऱ्या ज्या दुसऱ्या गोष्टींबद्दल तुह्मी तक्रारी

करितां, त्या करण्याविषयीं तुमच्याच देशांतील मुख्यमुख्य मंडळीनें आह्मांला सुचविलें, इतकेंच नाहीं तर त्यांच्या सूचनेवरहुकूम आह्मीं केलेल्या ठरावाचें त्यांनीं अभिनंदन केलें. आह्मीं सैन्य पाठवावें आणि आमच्या लढाऊ गलबतांनीं तुमच्या बंदरांत शिरावें. हा त्यांचाच आग्रह. असें केल्यावांचून अमेरिकन लोकांना आपल्या चुका कळणार नाहींत आणि ते सरकारची आज्ञा पाळणार नाहींत, असें त्यांनींच आमच्या कानीं कपाळीं ओरडून सांगितलें."

**फ्रँक्लिनानें** ह्या गोष्टीविषयीं आपला संशय दाखवितांच तो गृहस्थ ह्मणाला "मी प्रमाणें दाखवीन" नंतर कांहीं दिवसांनीं अमेरिकेंतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या आणि अमेरिकेंत उपजलेल्या इंग्रजांच्या पत्रांचें एक पुडकें घेऊन तो पुनः **फ्रँक्लिनाला** भेटला. ह्या पत्रांवरील सह्या पुसटल्या होत्या. परंतु त्यानें हीं अमुक अमुक मनुष्यांनीं लिहिलीं आहेत, असें **फ्रँक्लिन** यास खात्रीनें सांगितलें. हीं पत्रें **वुइल्यम व्होले** नांवाच्या पार्लमेंटाच्या सभासदाच्या नांवें पाठविलीं होतीं.

तीं पत्रें वांचून **फ्रँक्लिनाला** मोठें आश्चर्य वाटलें, आणि फार राग आला. त्याला त्या गृहस्थाचें बोलणें अगदीं खरें वाटलें. ह्या पत्रांपैकीं सहा पत्रें **टामस हचिन्सन मासाचुसेट्स**चा गव्हरनर यानें लिहिलीं होतीं. आणि या गृहस्थाचा जन्मही त्याच वसाहतींत झाला होता. तो **प्युरिटन** धर्माचा असून **हर्टफर्ड** येथील पाठशालेचा पदवीधर होता.

**फ्रँक्लिनाला** ज्या मनुष्यानें हीं पत्रें दाखविलीं, त्याला आपलें आंग ह्या कृत्यांत आहे असें लोकांस कळूं नये, असें वाटत होतें. ह्मणजे पुष्कळ विचारांअंतीं त्यानें तीं पत्रें अमेरिकेंत पाठविण्याची **फ्रँक्लिनाला** परवानगी दिली, परंतु त्यांचे उतारे तो त्याला घेऊं देईना. पत्रें तिकडे पाठविलीं असतां, राजसत्ता नाहींशी झाल्यानें होणारा देशाचा नाश न व्हावा म्हणून अमेरिकेंतील वड्या कामदारांनीं सुचविलेल्या उपायांची योजना करणाचें कामच फक्त प्रधानमंडळ करीत आहे, असें तिकडील मंडळीला कळून इंग्रजांविषयींचें शत्रुत्व त्यांच्या मनांतून अजीबात नाहींसें होईल असें त्या मनुष्याला वाटलें.

**फ्रँक्लिनानें** हीं पत्रें एका सरकारी लिफाफ्यांत घालून ता. २ दिसेंबर १८७२ रोजीं तीं **थॉमस कुशिंग** यास पाठविलीं व त्यांत कांहीं मंडळीशिवाय हीं कोणासही दाखवूं नयेत व वाचून होतांच परत पाठवावीं अशा अर्थाचें एक पत्र पाठविलें.

अमेरिकेंतील लोक हीं पत्रें वाचून त्या लेखकावर अतिशय संतापले आणि त्याचा तिरस्कार करूं लागले. जॉन **ॲडम्सनें** हीं पत्रें वाचून हाचिन्सन हा बडा काफर, खुनशी आणि असूयेनें भरलेला आहे, असा उल्लेख आपल्या रोजनिशींत करून ठेविला. व तीं पत्रें आपल्या सर्व मित्रमंडळीस दाखवून त्यांवर चांगली खरपूस टीका केली.

त्यानें दुसऱ्या एका ठिकाणीं ह्मटलें आहे, आमच्या

हाडामांसाच्या, आह्मांमध्यें वागलेल्या, आमच्यांत शिकलेल्या, ह्या दुष्ट सर्पावर आणि त्याच्या ब्रॅटल नामक साथीदारावर नजर ठेवणें हन्काक आणि मेजर हावले यांस अगदीं भाग पडून त्यांनीं तसें करण्याचा अगदीं दृढनिश्चय केला आहे.

ह्या पत्रांची पुष्कळ दिवसपर्यंत गुप्त रीतीनें चौकशी होऊन थामस हचिन्सन व अँड्रु आलिव्हर यांस कामावरून दूर करून त्यांच्या जागीं सरकारांतून वाटेल त्या चांगल्या मनुष्यांची योजना व्हावी, असा अर्ज म्यासाचुसेट्सच्या सभेनें इंग्लंडच्या राजाकडे करण्यांकरितां फ्रँक्लिनाकडे पाठविला. त्यानें "आपल्या जन्मभूमीशीं मिळून राहण्याची अमेरिकन लोकांस मोठी आवड आहे. सरकारानें आजपर्यंत केलेले घातक ठराव, ह्मणजे केवळ वसाहतींतील कांहीं लोकांच्या आग्रहाचेंच फळ होय, असें समजून आल्यापासून सरकाराविषयींचा त्यांचा राग आतां अगदीं नाहींसा झाला. या करितां त्यांचें व सरकारचें समेट होण्याला ही वेळ आतां फारच सुरेख आली आहे." अशा अर्थाचें एक पत्र सोबत देऊन तो अर्ज तांबडतोब लार्ड डार्टमाऊथ याजकडे रवाना केला.

ह्या पत्राचें उत्तर डार्टमाऊथ यानें मोठ्या गौरवानें लिहिलें परंतु अर्ज तसाच बाजूला ठेवून पांच महिनेपर्यंत त्याविषयीं कोठेंही एक शब्द काढिला नाहीं किंवा एक टांकही ओढला नाहीं.

फ्रँक्लिनाची या सर्व व्यवहारांत कांहींच चूक नव्ह-

ती. परंतु सरकारचा उद्देश तंटा वाढविण्याचा असल्या-मुळें त्यानें हीं पत्रें मिळविणारा आणि प्रसिद्ध करणारा कोण वगैरे संबंधानें पुष्कळ चौकशी चालविली व ज्यांचा या कामांत मुळींच संबंध नव्हता अशा दोन इसमांस संशयावर पकडलें. **फ्रँक्लिन** लंडनांत नव्हता, त्याला ही बातमी कळतांच त्यानें लिहिलें कीं—

" ज्या पत्रांबद्दल सध्यां वाटाघाट चालू आहे तीं मीं स्वतःमिळवून बोस्टन येथें पाठविलीं. हें स्पष्ट सांगणें माझें अगदीं कर्तव्य आहे. " याचें नांव सत्यप्रीति ! ह्या जगांत परस्पर चाललें आहे तें ठीक आहे, असें ह्मणून आपल्या कर्माबद्दल दुसऱ्यांस प्रायश्चित भोगण्यास लाव-णारेच फार ! आमच्या चरित्रनायकाप्रमाणें सत्याकरितां प्राणाचीही परवा न बाळगणारे फार थोडे !

**हाचिन्सन** आणि **आलिव्हर** यां विरुद्ध झालेल्या अर्जाचीं कारणें सांगण्याकरितां फ्रँक्लिनाला वसाहतीची व्यवस्था पाहणाऱ्या मंडळीसमोर बोलाविण्याविषयीं सर-कारचा ठराव झाला. ही मंडळी मोठ्या जारीनें चौकशी करणार, व त्यांनीं त्या दोघांस दोषमुक्त करण्याकरितां एक चांगला कायदेपंडित आणिला आहे, असें ऐकून फ्रँक्लिनाला मोठें आश्चर्य वाटलें.

फ्रँक्लिनानें **म्यासाचुसेट्स**च्या सभेचा अर्ज पुढें केला, एवढ्यावरूनच फक्त त्याला फिर्यादी केलें होतें. विरुद्ध पक्षाची असली जाडी तयारी पाहून त्यानेंही एक उत्तम वकील केला. इंग्रजसरकार **फ्रँक्लिना**चा नाश करण्या

विषयीं अगदीं तत्पर होतें, हें त्याच्या मित्रांस कळलें होतें.

ता. ११ जानेवारी इ. सन १७७३ रोजीं ही सभा भरली. प्रिव्हि कौन्सिलचे कांहीं बडे लोक व मंत्री मंडळापैकीं चौघे इसम हजर होते. वसाहतींतील विश्वासू सरकारी नोकरांवर निंदास्पद दोष आणणारा, असें त्यांनीं फ्रँक्लिनाला म्हटलें. त्याचा त्यांनीं अपमान केला, एवढेंच नव्हे, तर त्याशीं दांडगाई केली. आपमतलबी लोक आपला हेतु साधण्याकरितां कोणाला काय करितील याचा नियम नाहीं. परंतु आमच्या फ्रँक्लिनानें असल्या ह्या ऐन आणीबाणीच्या प्रसंगींही आपल्या मनाची शांतता वाढविली नाहीं.

पुढें कांहीं दिवस मध्यें गेल्यावर ता. २९ जानेवारी रोजीं दुसरी सभा भरली. ह्या अवकाशांत राजपक्षांतील एका कृतघ्न गृहस्थानें फ्रँक्लिनाच्या विरुद्ध एक अर्ज केला, व त्यांत फ्रँक्लिनानें हीं पत्रें चोरून छापविलीं व त्यांपैकीं पुष्कळ विकून आलेला पैसा आपल्या घशाखालीं उतरला, असें लिहिलें. परंतु हें सर्व फ्रँक्लिनानें अगदीं शपथेवर नाकारिलें व शेवटीं हे सर्व आरोप घाणेरडे असून अगदीं खोटे असल्यामुळें हा अर्ज त्याच्या शत्रूंनींच आपण होऊन काढून घेतला. परंतु फ्रँक्लिनाला शिक्षा होऊन त्याचा अपमान झाला नाहीं. म्हणून सरकारची कुरकुर होती, हें फ्रँक्लिन पक्कें जाणून होता.

ह्या चमत्कारिक गोष्टीनें उत्पन्न झालेल्या चळवळीमुळें

सर्व लंडनशहरांत मोठी गडबड उडून राहिली आणि ठरलेल्या दिवशीं पुनः सभा भरली.

सभा मोठ्या दिवाणखान्यांत भरली असून त्याच्या एका टोंकास प्रवेशद्वार आणि दुसऱ्या टोंकास अग्निकुंड ( थारळें ) होतें. प्रवेशद्वारापासून या थारळ्यापर्यंत एक मोठें मेज मांडिलें असून त्याच्याजवळ बाजूला प्रिव्हीकौन्सिलचे पसतीस सभासद बसले होते. ते कट्टे राजपक्षीय असून अमेरिकन लोकांस जेरीस आणून फ्रँक्लिनाची पुरी फजिती करावी, असा त्यांचा संकल्प ठरला होता. खुनशी मुख्य प्रधान **लार्ड नार्थ** तेथें होताच. * **क्यांटरबरी** येथील मुख्य धर्माधिकारीही सभेला आलाच होता. तेथें असल्या दीर्घद्वेष्ट्या मंडळीकडे प्रथम दृष्टि गेल्यामुळें पुढें फ्रँक्लिनाला प्रत्यक्ष आपल्या मित्रांकडेही पहावेना.

बाकीची सर्व जागा प्रेक्षकांनीं गच्च भरून गेली होती. त्यांपैकीं पुष्कळांनीं फ्रँक्लिनाकडे मोठ्या दयार्द्र दृष्टीनें पाहिलें. उघडच आहे कीं, असल्या मनुष्यावर दुष्टांनीं विनाकारण आणिलेला प्रसंग पाहून कोणास बरें वाईट वाटणार नाहीं ? **प्रिस्टले** आणि **बर्क** यांनीं निमुटपणें एकवार त्याच्या तोंडाकडे पाहिलें. यांचा व अमेरिकेंतील कांहीं मंडळीचा यावेळीं फ्रँक्लिनाला मोठाच आधार होता. तो शेकोटीच्या झांकणावर कोंपर ठेवून आणि आ-

* इंग्लंडांतील केंट परगण्यांत स्टूर नदीच्या काठीं मुख्यधर्माधिकाऱ्याची जागा आहे.

पल्या हातावर गाल टेंकून चित्रासारखा स्तब्ध उभा राहिला होता; व त्याचा पोषाक साधा असून व्यवस्थित होता.

वर सांगितलेल्या दोघां अधिकाऱ्यांस दोषमुक्त करण्याकरितां मंत्रिमंडळानें वेडरबर्न म्हणून वकील नेमला होता. ह्याच्या अंगीं साक्षीदारांस चकविण्याची कला असून हा शिवीगाळ करण्यांत मोठा बहादर, अशी याची कीर्ति होती. साक्षीदारांच्या जबान्या घेण्यापूर्वीं त्यानें एक मोठें लांबलचक भाषण केलें, त्यांत हाचिन्सची राजभक्तीविषयीं मोठी स्तुति गाइल्यानंतर तो फ्रँक्लिनाकडे वळला; आणि त्यावर त्यानें निंद्य शब्दांचा जो प्रहार केला तो फारच विलक्षण! कौन्सिलच्या मंडळीस हें वक्तृत्व ऐकून मोठें समाधान वाटलें आणि वकील साहेबांचें असूयेचें भाषण ऐकून त्यांना मोठा आनंद झाला.

तिसऱ्या जार्ज राजाच्या प्रिव्ही कौन्सिलपुढें हा प्रसिद्ध सन्माननीय अमेरिकन मनुष्य समेट करून शांतता करावी, या उद्देशानें आपल्या जन्मभूमीची तरफदारी करण्याकरितां मुखत्यार होऊन गेला असतां त्याची प्रत्यक्ष त्याच्या जुन्या भावंडानीं अशी टर चालविली, तर आमच्या दादाभाईस लॉर्ड सॅलिस्बरी यांनीं काळा मनुष्य ह्मटल्याबद्दल आह्मांस आश्चर्य कां वाटावें?

वेंडरबर्नने फ्रँक्लिनावर आरोप ठेविले ते येणें प्रमाणें होतेः—

त्यानें खासगी पत्रें चोरिलीं व सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध लोकमत उत्पन्न होईल, अशा तऱ्हेनें तीं लोकांस

समजावून सांगितली. असें करण्यांत त्याचा उद्देश ते अधिकारी पदभ्रष्ट होऊन त्यांच्या जागा आपणास व आपल्या मित्रांस मिळाव्या असा होता हीं पत्रें त्यानें आपलें छापण्याचें चातुर्य लोकांत प्रसिद्ध व्हावें ह्मणून छापविलीं, ह्यावरून तो किती हलकट आहे हें स्पष्ट होतें. आणि शेवटीं त्यांच्या प्रति विकल्या याचें कारण अर्थातच पैसे कमाऊन आपली पोतडी भरावी हें होय.

हे आरोप आमच्या चरित्र नायकानें मोठ्या शांतपणानें सहन केले.

त्याच दिवशीं त्या एकंदर हकीकतीचा खलिता तयार करून त्या नियुक्त मंडळीनें राजाकडे पाठविला, तो असा. " ह्या सभेंतील सर्व लोक विनंतिपूर्वक आपलें मत हुजूर जाहीर करितात कीं, हा अर्ज कांहीं तरी वेडीं वांकडीं प्रमाणें धरून केला असल्यामुळें निवळ खोटा आहे. व तो करण्याचा हेतु सदरील प्रांतांत कुरकुर आणि सरकाराविषयीं नाखुषी उत्पन्न व्हावी हाच दिसतो. " हा खलिता राजे साहेबांस मंजूर झाला, हें सांगणें नकोच !

यानंतर एक दोन दिवशींच पोस्टमास्तर जनरलचें पत्र फ्रँक्लिनाला आलें, त्यांत राजास जरूर वाटल्यावरून त्यानें तुह्मांला अमेरिकेंतील डेप्युटी पोस्ट मास्तराच्या जागेवरून कमी केलें आहे, असें लिहिलें होतें.

ग्रेटब्रिटनच्या एका वसाहतींतील लोकांनीं राजाला भेटून त्याशीं एकी करून मित्रत्व जुळविण्याच्या चांगल्या हेतुनें पाठविलेल्या मुखत्याराचा त्या देशच्या प्रिव्ही कौ-

न्सिलनें केलेला हा अपमान, दारूबाज लोक तर्र होऊन एकमेकांच्या करीत असलेल्या अपमानाच्या तोडीचाच होता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. तरी सुद्धां फ्रँक्लिनानें ही हकीकत म्यासाचेट्स येथें मोठ्या उदात्त-भाषेनें लिहून पाठविली. तो ह्मणतोः—

" माझ्या झालेल्या अपमानाबद्दलचें दुःख माझ्या देशबांधवांविषयीं मला झालेल्या दुःखापुढें कांहींच नाहीं. प्रजेनें, आपलीं दुःखें राजाला कळावीं ह्मणून केलेले अर्ज सरकारास आवडत नाहींत, इतकेंच नव्हे, तर ते अर्ज पुढें करणारा सरकारचा गुन्हेगार ठरतो, अशी ज्या राष्ट्राची स्थिति, त्याच्या सर्व प्रांतांत सारखी शांतता कशी रहावी हें मला कळत नाहीं. दुःखाचा प्रतिकार, तीं काय आहेत हें कळल्यावांचून करितां येत नाहीं; आणि तीं कळण्याला अर्ज अथवा तक्रारी यावांचून अन्य मार्ग नाहीं, असें असून अर्ज करणें ह्मणजे गुन्हा, आणि तक्रारी करणें ह्मणजे अधिकाऱ्यांचा अपमान, असें होऊन प्रजेच्या मुखत्यारांना जर शिक्षा मिळूं लागल्या, तर अर्ज कोण पाठवील, आणि ते सरकारांत हजर तरी कोण करील ! " फ्रँक्लिनाच्या या लेखाकडे सरकारची दृष्टि जाईल, तर बरें होईल.

ही बातमी अमेरिकेंत कळतांच तेथील लोकांत इंग्रजांविषयीं उत्पन्न होत असलेलें वैर जास्तच बळावलें. फ्रँक्लिनाला डांक खात्यांतून काढून टाकिलें, ह्मणजे तें अति महत्वाचें खातेंच सरकारानें आपल्या हातांत घेतलें,

असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सरकारच्या तर्फेचेच लोक या खात्यांत येऊं लागल्यामुळें अमेरिकन लोकांस आपलीं पत्रें विश्वासानें डाकेंत टाकितां येईनात. ह्मणून त्यांनीं पत्रें पाठविण्याची खासगी व्यवस्था केली. व ती इतक्या उत्तम रीतीनें चालली कीं, ज्या खात्यांत उत्पन्नांतून दर-साल पंधराहजार रुपये सरकार तिजोरींत भर पडत होती, त्यापासून आतां एक दिडकीचेंही उत्पन्न सरकारास मिळे ना. वसाहतींशीं व्यापार करणें हें इंग्लंडाला एक फाय-द्याचें कलम झालें होतें, कारण हा व्यापार दरसाल साडे-सहा कोट रुपयांपर्यंत वाढला होता.

फ्रँक्लिननें तेथें असतां इ. स. १७७४ च्या अक्टो-बर महिन्यांत अमेरिकेंतील आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें तें असें:—

अमेरिकेंत जर तंटा उत्पन्न झाला तर येथील प्रधान-मंडळी मीच तंट्याचें मूळ आहें असें समजून मला ताबड-तोब कैद करितील. ह्यावरून माझी येथली स्थिति फारच धोक्याची आहे असें समजून पुष्कळ लोक मला येथून गाशा गुंडाळण्यास सांगतात, आणि कांहीं, आपल्या कामाचा निकाल होईपर्यंत येथेंच रहावें असें ह्मणतात. मी निरपराधी असल्यामुळें मला भीति वाटत नाहीं, आणि ह्मणूनच मीं येथें राहण्याचें धाडस केलें आहे. तरी कदा-चित् ते मला संशयावरून सुद्धां कैद करितील, तेव्हां हें टळावें, अशी माझी फार इच्छा आहे."

# भाग १२ वा.

## गोष्ट परिणामाला आली.

जोसिआ क्विन्स—अमेरिकन लोकांचें इंग्लंडावरील प्रेम राजाकडे अर्ज—त्याची वाट—फ्रँक्लिनाच्या बायकोचा मृत्यु—लॉर्ड च्याथाम—त्याचें अमेरिकन लोकांच्या वतीनें भाषण—लॉर्ड हाऊ—फ्रँक्लिनाची व त्याची भेट—फ्रँक्लिनाचा निश्चय—त्याचा राग—त्यानें रचलेली एक गोष्ट—तो फिलाडेल्फियास जाण्याकरितां निघतो—इंग्रजांचाच भ्रम—फ्रँक्लिनाचें स्वागत—पहिली चकमक—राष्ट्रीयसभा—डाकेची व्यवस्था—त्याचा थट्टेखोरपणा—वुइल्यम फ्रँक्लिन—त्याची मृत्यु.

क्षयानें पीडित झालेला जोसिआ क्विन्स नांवाचा एक अमेरिकन तरुण मनुष्य मोठा स्वदेशाभिमानी होता, तो फ्रँक्लिनाच्या कामाची मजल कोठपर्यंत येऊन ठेपली आहे, हें पाहण्याकरितां लंडनास गेला. व त्या ठिकाणची एकंदर स्थिति पाहून त्यानें फ्रँक्लिनाच्या आंगचा आवेश, शहाणपणा आणि त्याची स्वदेशहितार्थ मेहनत यांविषयीं आपल्या देशांत मोठ्या गौरवानें लिहून कळविलें.

फ्रँक्लिनाची काम करण्याची शैली सर्वांस माहीत होती तो आपल्या देशबांधवांस ह्मणे, "बाबांनो, तुह्मी

सरकारच्या विरुद्ध एकाद्या कारस्थानांत पडूं नका, त्यांच्या विरुद्ध कांहीं बोलूं किंवा लिहूं नका आणि त्याच्यावर उठूं नका; परंतु दृढनिश्चयानें इंग्लंडचा माल न वापरण्याविषयीं सतत काळजी घ्या, कारण असें केलें असतां हें कृत्य गैरकायदेशीर आहे असें कोणालाही ह्मणतां येणार नाहीं आणि अमेरिकेशीं व्यापार बंद पडल्यामुळें एकाच वर्षांत इंग्लंड, आयर्लंड आणि स्काटलंड येथील पैसेवाल्यांत आणि व्यापारी लोकांत मोठी चळवळ उडून जुलमी सरकारास आपलें पाऊल मागें घ्यावें लागलें."

फ्रँक्लिनाच्या या सदुपदेशाचा आमचे इकडील लोकांनीं अवश्य विचार करून त्या प्रमाणें वागण्याची त्वरा करावी.

असो, इतकें झालें तरी इंग्रज सरकारचा संबंध तोडावा असें अमेरिकन लोकांस मुळींच वाटत नव्हतें. ते इंग्लंड हें आमचें घर आहे असें ह्मणत, इंग्रज लोकांना ते आपले बंधु समजत, इंग्लंडमध्यें आपल्या वाडवडिलांनीं दिवस काढिले हें ते विसरले नव्हते, त्यांनीं इंग्रज हें नांव अजूनही सोडिलें नव्हतें, प्रसिद्ध इंग्रजी पार्लमेंटाचे सभासद होण्यांत ते मोठें भूषण मानीत असत. अशा सर्व गोष्टी असतांही दयाळु इंग्रज सरकारांनीं त्यांच्याशीं या प्रकारचें वर्तन केलें, ही फार लाजीरवाणी गोष्ट होय.

अमेरिकन राष्ट्रीय परिषदेनें, आपल्या जन्मभूमीशीं सख्य करण्याच्या उद्देशानें आजवर पूज्य मानिलेल्या राजास व इंग्रजांस विनंति करण्याचा ठराव केला.

राजाकडे पाठविलेलें विनंति पत्र, अपवित्र, जुगारी आणि दारूबाज अशा बड्या लोकांपुढें येऊन एखाद्या पदार्थ संग्रहालयांतील संगमरवरी पुतळ्यापुढें वाचल्या-प्रमाणें केवळ निष्फळ झालें—नाहीं, यापेक्षांही वाईट झालें ह्मटलें तरी चालेल—कारण पुतळ्यांनीं तें निमूटपणें ऐकून तरी घेतलें असतें, ह्या बड्या लोकांप्रमाणें तिरस्कारानें हं-सून त्याची टेर उडविली नसती, किंवा तें लिहिणाराचा सूड घेण्याविषयीं उद्गारही त्यांच्या तोंडून निघाले नसते.

ह्या विनंतिपत्राचा अखेरचा उतारा खालीं दिला आहे, त्यावरून त्याचा मतलब काय होता व तें कोणत्या झोंकानें लिहिलें होतें हें वाचकांच्या सहजच लक्षांत येईल.

“ अहो दयासागर महाराज, ईश्वराची भीति मनांत धरून, अथवा प्रजेस संतुष्ट राखून ऐक्यभावानें वागवि-णारा राजा वैभव पावतो हें जाणून, किंवा अपरिहार्य संकटाच्या आणि असह्य दुःखाच्या भावी आगमनानें भय-भीत झालेल्या राष्ट्रास धीर देण्याची इच्छा बाळगून तरी, आमची विनंति ऐकाः—निरनिराळ्या देशांत राहणाऱ्या परंतु एकाच कायद्यानें, एकाच राजाविषयींच्या भक्तीनें आणि परस्परांच्या बंधुप्रीतीनें बद्ध झालेल्या प्रजाजनांचें लेंकरांप्रमाणें पालन करणाऱ्या आपणासारख्या लोकप्रिय राजानें, प्राप्त्यर्थ केलेल्या प्रयत्नांचीही फेड करण्यास असमर्थ, व अनिश्चियात्मक, असें फळ मिळविण्याकरितां वरील प्रकारचा दृढ संबंध तोडून टाकणें अगदीं बरोबर नाहीं. ”

हा अर्ज नेहमींप्रमाणें सभेकडून, फ्रँक्लिन, अर्थरली वगैरे मुखत्यारांकडे येतांच त्यांनीं तो राजाजवळ हजर करण्याकरितां ह्मणून लॉर्ड डार्टमाऊथ याजकडे दिला पुढें राजानें त्याजपासून तो कृपा करून घेतला व पार्लमेंटमध्यें त्याचा विचार करूं ह्मणून सांगितलें. परंतु राजा व त्याचें मंत्रीमंडळ अमेरिकेसंबंधीं प्रत्येक कामाची उपेक्षाच करीत असल्यामुळें सदर अर्जाची तीच वाट होऊन तो सभेपुढें न आणितां किरकोळ कागदपत्रांत जाऊन पडला! फ्रँक्लिनासारख्या मनुष्य तेथें असतां अमेरिकन लोकांच्या असल्या महत्वाच्या अर्जाची ही दशा व्हावीना!!! असो, या प्रमाणें तीन दिवस होऊन गेले, तरी सुद्धां अर्ज पार्लमेंट पुढें येत नाहीं, असें पाहून आमच्या फ्रँक्लिन आदिकरून मुखत्यारांनीं अर्ज घेण्याविषयीं पार्लमेंटास विनंति केली.

ह्यावेळची साधारण लोकांची सभा ह्मणजे केवळ बड्या लोकांच्या सभेचें प्रतिबिंबच होतें, असें ह्मटलें तरी चालेल कारण तींत बहुतकरून बड्या लोकांचे चिरंजीव आणि त्यांच्या चरणारविंदीं लीन होऊन रहणारे त्यांचे चाकरच असत व ही सारी मंडळी राजपक्षीय असे. तेव्हां तो अर्ज पुढें येतांच त्यावर शिव्यांचा गहजब उडून, त्याबद्दल विशेष विचार होऊं नये, असा शेरा मिळाला यांत विशेष नाहीं.

अग्निप्रलय, रक्तपात आणि शोकपर्यवसायी लढायांची चिन्हें, इंग्लंडमध्यें दृष्टीस पडूं लागलीं असतां अमेरिकेंत फ्रँक्लिनाच्या घरीं एक मोठा भयंकर प्रसंग घडून आला.

त्याच्या बायकोचा आणि त्याचा वियोग होऊन दहा वर्षे पुरीं होऊन गेलीं होतीं. ती सदा आनंदी असून वांकडा शब्दही तोंडावाटे कधीं काढीत नसे आणि मुलीं-बाळींच्या सहवासांत आपला काळ मोठ्या आनंदानें घालवी. तिच्या वयाला सत्तरवर्षे पुरीं झालीं असून ती चांगली धट्टीकट्टी असे. नवऱ्याच्या वाटेकडे जरी तिचे डोळे सारखे लागले होते तरी त्याच्या वियोगाबद्दल तिनें कधीं दुःख केलें नाहीं. उन्हाळ्यांत, तिला आपली व आपल्या पतीची गांठ हिंवाळ्यांत पडेल असें वाटत असे, परंतु तसें झालें नाहीं ह्मणजे पुनःउन्हाळ्यांत गांठ पडेल, असें तिला वाटे.

इ. स. १७७४ च्या डिसेंबर महिन्यांत एकाएकीं वायूची लहर येऊन ही साध्वी पडली, ती पांच दिवसपर्यंत तशीच बेसावध होती. पांचवे दिवशीं तर तिला शेवटची झोंप लागली. नगरांतील पुष्कळ लोक मोठ्या सन्मानानें तिचें उत्तरकार्य करण्याकरितां जमा झाले. फ्रँक्लिनाच्या मित्रांनीं खांद घालून त्या निष्कलंक कुलस्त्रियेचें आणि ममताळू मातेचें प्रेत स्मशानाकडे चालविलें आणि तेथें नेल्यावर तिच्या आईबापांस आणि प्रियपुत्रास जेथें पुरलें होतें, त्याच्या शेजारींच तिला मूठमाती दिली. इकडे फ्रँक्लिनाला आपलें गृह अगदीं शून्य झाल्याची कल्पनाही नव्हती; त्यानें इंग्रजांशीं वादविवाद करून अगदीं त्रासल्यामुळें फिलाडेल्फियाला परत जाण्याची तयारी चालविली.

वयोवृद्ध प्रख्यात वक्ता आणि इंग्लंडचा हुशार व मोठा महत्वाकांक्षी पुत्र **अर्ल आफ चॅथ्याम** यानें **फ्रँक्लिना**-ला भेटून त्याजपाशीं **ब्रिटिश** मंत्रीमंडळाच्या वर्तनावर बरीच कडक टीका केली. त्याला अमेरिकन लोकांबद्दल जो एवढा कळवळा होता, तो नुसत्या राजकारणावरूनच होता असें नाहीं, तर न्यायालाही तो अनुसरून होता. राजा आणि प्रधानमंडळ यांनीं जर हा क्रम सोडिला नाहीं, तर लढाई उत्पन्न होऊन अमेरिका स्वतंत्र होईल आणि इंग्लंड-च्या सर्व वसाहती नाहींतशा होऊन तेथील व्यापारास अगदीं उतरती कळा लागेल, शिवाय राष्ट्राचें बलही कमी होईल अशी त्याची पक्की खात्री होती. **फ्रँक्लिनानें** या भेटीविषयीं असें लिहिलें आहे:—

"यूरोपच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत एक दोन सफरी मारल्या, निरनिराळ्या लोकांशीं स्नेहसंबंध केले, त्यांच्यांशीं खाणें, पिणें, बोलणें वगैरे व्यवहार केले, परंतु एकानेंही शुद्धींत किंवा गैर शुद्धींत अमेरिका इंग्लं-डपासून निराळी झाली तर चांगलें असे उद्गार काढिले नाहींत. अशी मीं **चॅथ्याम** साहेबांची अगदीं पूर्ण खा-त्री केली."

**चॅथ्याम** अमेरिकन राष्ट्रीयसभेस मोठा मान देत असे व तिचें मागणेंही योग्य आहे असें ह्मणे. त्यानें बोस्टन येथें थोडीशी चकमक उडाल्याचें कळतांच तेथील सैन्य हलवि-ण्याविषयींचा ठराव करण्याचा निश्चय केला. प्रसिद्ध वक्ता आणि इंग्लंड देशांतील प्रसिद्ध पुरुष **अर्ल ऑफ चॅथम** हा

अमेरिकेच्या तर्फे वरील विषयावर भाषण करणार, ही बातमी चोहोंकडे पसरली, व नियमित दिवशीं सारा दिवाणखान लोकांनीं व विशेषतः अमेरिकेच्या शत्रूंनीं अगदीं गच्च भरून गेला. फ्रँक्लिनही चॅथ्यामच्या निमंत्रणावरून तेथें गेला होता.

ह्यावेळीं चॅथ्यामचें जें भाषण झालें, तें विचार आणि वाक्पांडित्य यांनीं ओतप्रोत भरलेलें असें होतें. फ्रँक्लिनानें त्याची अशी पक्की खात्री केली होती कीं, "जर सरकार आरमारें आणि पलटणी पाठवून अमेरिकन लोकांस त्रास देईल, तर ते आपल्या हक्कासाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं जंगलांत भटकण्याचें पतकरितील, परंतु त्याच्या अमलांत राहणार नाहींत." ही कल्पना डोक्यांत पक्की भिनल्यामुळें चॅथ्यामनें एकाद्या भविष्यवाद्याप्रमाणें पुढील भाषण मोठ्या जोरानें केलें, तो ह्मणाला,

"अशा रीतीनें अमेरिकन लोक जर रानोमाळ भटकूं लागले, तर आपण राज्य तरी कोणावर करणार? मग तर आपल्याला पाय मागें घ्यावा लागणारना? असें आहे तर आपणच पिछेहाट करणें चांगलें कीं दुसऱ्यांनीं भाग पाडल्यावर ती करणें चांगलें? मी असें ह्मणतों कीं, आपण हे जुलमी कायदे अगदीं साफ मोडून काढिले पाहिजेत, आणि माझी खात्री आहे कीं, तुह्मी ते मोडून टाकाल, खास मोडून टाकाल. फार काय सांगूं! तुह्मी ते मोडले नाहींत, तर मी आपलें नांव बदलीन. असें न झालें तर मला वेडा ह्मणा."

फ्रँक्लिन लिहितो, " हा सर्व प्रकार उपड्या घड्यावर पाण्यासारखा होऊन चॅथ्यामची सूचना मुळींच पसंत पडली नाहीं. " हें जरी खरें आहे, तरी ह्या भाषणामुळें लोकांत मोठी चळवळ उडाली, अमेरिकेंतील पाठशाळांतून मोठमोठ्या कारखान्यांतून आणि शेतकऱ्यांच्या खोपींतून सुद्धां हें भाषण वाचीत असतां लोकांस जो आनंद झाला तो अवर्णनीय होय. "

हलके हलके प्रधानमंडळाची अशी पक्की खात्री होत गेली कीं, अमेरिकन लोकांच्या कामाचा निकाल लौकर न लागेल तर आपणाला फारच त्रास होईल. ह्मणजे त्यांनीं निरनिराळ्या उपायांनीं फ्रँक्लिनाला वश करण्याची खटपट चालविली.

फ्रँक्लिन सांगेल, त्याप्रमाणें त्याचे सर्व देशबांधव वागतील, हें त्यांना जरी चांगलें माहीत होतें, तरी त्याला अधिकाराची, पैशाची किंवा कोणत्याही प्रकारची लालूच दाखविण्याचें कोणास धैर्य होईना.

पुढें एकदां लार्ड हाऊ यानें स्वतः फ्रँक्लिनाला असें सांगितलें कीं, प्रधानमंडळांपैकीं दोन वजनदार गृहस्थ तुह्मी विचारपूर्वक सांगाल, त्या अटी कबूल करण्यास तयार आहेत. ही स्वप्नींही न येणारी आनंददायक बातमी आपल्या व आपल्या देशाच्या हितचिंतकाच्या तोंडची ऐकतांच फ्रँक्लिनाच्या डोळ्यावाटें आनंदाश्रु वाहूं लागले, व ते त्याला लपवितां येईनात. याचें नांव स्वदेश प्रेम !

हें पाहून लार्ड हाऊ पुनः ह्मणाला, "आपण इंग्लंड आणि अमेरिका या देशाचा समेट घालून देत असाल तर सरकार तुह्मांला हवा तो अधिकार देण्याला तयार आहे." फ्रँक्लिन ह्मणाला, "हें तुमचें बोलणें केवळ पंचपक्वान्नांत विषाप्रमाणें आहे.

पार्लमेंट सभा पुनः भरली त्यावेळीं सुद्धां प्रधानमंडळ अमेरिकेंतील लोकांस गुलाम न बनविणारी एकही अट कबूल करण्यास तयार नव्हतें. लार्ड चॅथ्यामनें हें सख्य करण्याचा प्रयत्न पुनः एक वार केला, परंतु लोकांस तो न आवडून त्यांनीं त्याचा धिक्कार केला. इतक्या वेळांत फ्रँक्लिनानेंही ऐक्य करण्याच्या उद्देशानें कांहीं सूचना पुढें आणिल्या, परंतु त्यांत "अमेरिकन लोकांवर जो कर बसविणें तो त्यांच्या सल्ल्यावांचून बसवूं नये" हें मुद्याचें तत्व न सुटल्यामुळें त्या नापसंत ठरल्या, हें सांगण्याची आवश्यकता नाहींच.

अमेरिकन लोकांच्या हिताची अशी एकही गोष्ट करण्यास सरकार कबूल नाहीं, हें पुढें थोड्याच दिवसांत सर्वांस कळून आलें. त्यांनीं सैन्य माघारें बोलाविण्याचें नाकारिलें. वसाहतीच्या गव्हरनराकडे येणाऱ्या जाणाऱ्या मालावरील जकात वसूल करण्याचें काम ठेवूं नये. असें ठरविलें, लोकांना ताब्यांत ठेवण्याच्या उद्देशानें किल्ले बांधण्याविषयीं आग्रह धरिला आणि लोकांसंबंधीं कायदे ठरविण्याविषयीं पार्लमेंटास पूर्ण अधिकार आहे, हें तत्व अखेरपर्यंत सोडिलें नाहीं.

मि. बर्क्ले यांस फ्रँक्लिन एकदां ह्मणाला, "आह्मांला वाटेल त्याप्रमाणें अमेरिकन लोकांस वागविण्याचा हक्क जोंपर्यंत पार्लमेंट सांगेल, तोंपर्यंत ऐक्य होण्याचा मुळींच संभव नाहीं." यावर बर्क्ले साहेब मोठ्या आढ्यतेनें ह्मणाले, "इंग्रज लोकांशीं सलोख्यानें वागण्यांतच अमेरिकन लोकांचें खरें हित आहे. कारण त्यांचीं लढाऊ जहाजें अमेरिकन बंदराचा बोलतां बोलतां अगदीं विध्वंस करून टाकितील."

ह्यावर फ्रँक्लिन त्यास रागानें ह्मणाला, "आमचीं घरें जाळून टाकण्याच्या भीतीमुळें आह्मी पार्लमेंटच्या गैरहक्का आड येण्याला बिलकूल डगमगणार नाहीं; आपण अमेरिकेचें नुकसान केलें आहे, ही गोष्ट इंग्लंडानें विसरतां कामानये. कारण हें नुकसान त्या देशाला सव्याज भरून द्यावें लागेल."

लार्ड हाऊ यास इंग्रजांनीं अमेरिकेंत मुखत्यार नेमून पाठविण्याचें ठरविलें, तेव्हां कोणालाही पैशानें भुरळ पडते, असें मानणाऱ्या या गृहस्थानें अधिकाराची आणि प्रधानमंडळीच्या मेहेरबानीची लालूच दाखवून फ्रँक्लिनाला आपणाबरोबर अमेरिकेंत येऊन आपणांस मदत करण्याविषयीं विनंति केली. हाऊ हा अमेरिकेचा हितचिंतक असल्यामुळें फ्रँक्लिन किंचित् आदबीनें त्याला ह्मणाला:—

"महाराज, असल्या महत्वाच्या कामाकरितां मीं आपल्या बरोबर यावें हें योग्य आहे. परंतु असलीं आशा दाखवून हें घडून यावें, अशी जर आपली इच्छा असेल

तर, प्रधानमंडळीच्या मेहेरबानीवर आणि आपल्या अधिकारांवर हें मी आतांच पाणी सोडतों. ह्या आपल्या मेहेरबान्या ह्मणजे आमच्या देशाला गुंतविण्याचे पाश होत, हें मी चांगलें जाणून आहें. मला कशाचीही इच्छा नाहीं. आपण तेथें जाऊन काय करणार तें कळवा, ह्मणजे मी निघालोंच. एका घटकेचाही अवकाश लावीत नाहीं."

बड्या लोकांच्या सभेंत एकदां अमेरिकेविषयीं चर्चा चालली असतां इंग्रजलोकांनीं अमेरिकन लोकांवर शिव्यांचा वर्षाव केला. ते म्हणाले, 'अमेरिकन लोक अगदीं नीच असून ब्रिटनच्या इंग्रजांहून फार भिन्न असे आहेत. तसेच ते सर्व लुच्चे असून कांहीं तरी कुरापत काढून आपलें क़र्ज फेडण्यास नाकबूल आहेत."

हें ऐकून फ्रँक्लिन शांतवृत्तीचा असतांही त्याला राग आल्यावांचून राहिला नाहीं. तो घरीं परत आला, आणि आजपासून ह्या शत्रुत्व धारण करणाऱ्या सरकारापाशीं संबंध ठेवावयाचा नाहीं, असा त्यानें निश्चय केला. अमेरिका इंग्रजीराज्याचा भाग असल्यामुळें त्या राज्याबद्दल फ्रँक्लिनाला मोठा अभिमान असे, परंतु आतां हातांत शस्त्र घेण्यावांचून दुसरी तोडच नव्हती. अमेरिकन लोकांस असें करणें जरा धोक्याचेंच होतें, तरी ते गुलामगिरी पतकरण्यापेक्षां अवर्णनीय दुःखें भोगण्यासही तयार होतील हें आमच्या चरित्रनायकास पक्कें माहीत असल्यामुळें त्यानें त्यांचा पुढारी होण्याचें पतकरिलें.

आतां मात्र फ्रँक्लिनानें आपली घरीं परत जाण्याची तयारी चालविली. खात्रीलायक पुराव्यावरून असें दिसतें कीं, आतांपर्यंत सांगितलेल्या चिनतोल प्रसंगींसुद्धां तो मोठ्या आनंदांत असे. कारण ‘ रागावणें म्हणजे दुसऱ्याच्या अपराधाबद्दल स्वतःला शिक्षा करून घेणें ’ हें तो पक्कें जाणून होता. तो नेहमीं मोठ्या आनंदांत असे, तो मोठ्या खुबीचीं भाषणें करी, वर्तमानपत्रांत मनोरंजक लेख लिही आणि ह्यामुळें सर्व लोक त्याच्या सहवासाची अपेक्षा करीत असत.

एके दिवशीं संध्याकाळीं एका अमेरिकन हितेच्छु बड्या गृहस्थाच्या घरीं पुष्कळ मोठमोठीं मंडळी जमा होऊन गप्पा ठोकीत बसली असतां ‘ इसाप नीतिविषयीं बोलणें निघालें त्या वेळीं एक गृहस्थ ह्मणाले, “ दाखल्यांचें भांडार आतां मात्र अगदीं खलास झालें. ” नंतर **फ्रँक्लिन** थोडा विचार करून म्हणाला, “ इसाप, गे अथवा **लॉ फोन्टेन** यांच्यासारख्या नीतिपर गोष्टी अजून देखील पुष्कळ रचितां येतील, ” ह्यावर एक बडे गृहस्थ म्हणाले, “ तुम्ही एकादी तसली गोष्ट रचाल काय ? ” **फ्रँक्लिन** “ साधतें कां पाहूं ” असें म्हणून तेथल्या तेथेंच कागद व पेनसिल घेऊन खालीं बसला, व होईल तितक्या जलदीनें खालीं सांगितलेली गोष्ट त्यानें लिहिली.

## गरुडपक्षी आणि मांजर.

‘ एके दिवशीं एक गरुडपक्षी झाडावर बसला असतां कांहीं अंतरावरून एक ससा जात आहे, असें त्याच्या

दृष्टीस पडलें. आणि त्याबरोबर त्यानें त्याजवर झडप घालून, त्यास आपल्या पंजांत धरून उंच उड्डाण केलें. पुढें लौकरच ह्या प्राण्याच्या आंगची शक्ति व धैर्य पाहून हा ससा नसून मांजर आहे, असें त्यास कळून आलें. त्याच्या त्या गुरगुरण्यानें आणि झटापटीनें गरुडास मोठा त्रास होऊं लागला. तें मांजर त्याच्या पंजांतून सुटलें आणि त्यानें आपल्या चारही पायांनीं त्याच्या शरिरास विळखा देऊन त्याचा श्वासोच्छ्वास बंद केला आणि त्याची मान आपल्या दांतांनीं आंवळली. तेव्हां गरुडपक्षी अगदीं घाबरून ह्मणाला,—

"गड्या, मेहरबानी करून ह्या पाशांतून मला सोडीव, ह्मणजे, मी तुझी सुटका करितों." मांजर ह्मणालें, "फार चांगलें. परंतु इतक्या उंचीवरून खालीं पडल्यास माझ्या चिंधड्या चिंधड्या उडतील याकरितां खालीं उतर, ह्मणजे तुझी आणि माझी अशी दोघांचीही सुटका होईल." शेवटीं निरुपायानें गरुडास खालीं उतरावें लागलें.'

ही गोष्ट ऐकून तेथें जमलेले सर्व लोक अमेरिकेचे हितचिंतक असल्यामुळें त्यांना मोठें समाधान झालें आणि त्यांनीं टाळ्यांचा गजर केला. कारण, हीच गोष्ट इंग्रज आणि अमेरिकन यांस अक्षरशः लागू पडत होती. हें चाणाक्षवाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

आपसांत लढाई उद्भवण्याचा प्रसंग आला असूनही **फ्रँक्लिन** मंडळीमध्यें मोठ्या चैनींत असे, यावरून पुष्कळ लोक त्याला निर्दय ह्मणत; परंतु डा. **प्रिस्टले** लिहितो,

" अमेरिकेंतील पत्रांमधला इंग्लंडांत प्रसिद्ध करण्यासारखा मजकूर शोधून काढीत असतां फ्रँक्लिनाच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते, त्यामुळें त्याला वाचवेना देखील." यावरून त्याचें मन कशा प्रकारचें होतें, हें सहजच लक्षांत येईल. फ्रँक्लिनानें अमेरिकेंत परत जातेवेळीं आपलें काम आर्थरली यास करावयास सांगितलें. ता. ११ मार्च १७७५ रोजीं तो पोर्ट्स माऊथ येथें गलबतांत बसला.

वाटेनें जात असतां त्यानें जाड्या कागदाचे अडीचशें बंद आपल्या मुखत्यारी कारकीर्दीच्या सविस्तर हकीकतीनें भरून काढिले आणि हा खर्डा त्यानें नोकरी देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची हांजी हांजी करून दिवसेंदिवस पक्का राजपक्षाकडील बनत चाललेल्या आपल्या चिरंजीवास पाठविला.

इंग्लंडांतील बहुतेक मंडळी असा गर्व वहात होती कीं, हजार मेंढरांचा कळप पळवून लावण्यास जसे फक्त दहाच लांडगे पुरे होतात तसे बोस्टनापासून* चार्लसपर्यंतचा सर्व बंडावा मोडण्यास आमच्या सुशिक्षित लोकांची फक्त एकच पलटण पुरे आहे. ह्या अविचारी लोकांच्या मनांत, वाशिंग्टन, फ्रँक्लिन, अडॅम्स जेफरसन वगैरे अमेरिकन लोकांच्या पुढाऱ्यांस धरून फांशीं देण्याला आणि इतर अमेरिकन लोकांच्या मालमत्ता जप्त करून सरकारच्या मर्जीतल्या लोकांस सधन करण्याला आपली

---

+ सं. सं. पैकीं दक्षिण कॅरोलेना प्रांतांत बंदर आहे.

एक दोन लढाऊ जहाजें आणि दोन तीन शिपायांच्या टोळ्या अगदी बस्स आहेत, असल्या वेडगळ कल्पना येऊन, ते आनंद सागरांत गटंगळ्या खात होते.

हे लोक भ्रमांत असल्यामुळें असेंही ह्मणत कीं, "लढाई मुळींच होणार नाहीं, तिकडे जाणें ह्मणजे सुटीच्या दिवसांत चैनीनें फिरावयास जाण्यासारखें आहे. हे मूर्खत्वानें खवळून गेलेले अमेरिकन लोक लौकरच शुद्धीवर येतील आणि कोडग्याप्रमाणें आह्मीं एवढें केलें तरी आमची हांजी हांजी करूं लागतील."

फ्रँक्लिनाला अॅटलांटिक महासागरा मधून जाण्याला दीड महिना लागून तो ता. ५ मे रोजीं संध्याकाळीं डेल्वेरा येथें येऊन उतरला व काळोख पडला असतांही तसाच पुढें चालता झाला. यावेळीं त्याच्या मनांत उठत असलेल्या तरंगांची कल्पनाही करणें फार कठीण! त्याला घर सोडल्यास दहा वर्षे होऊन गेलीं होतीं. इतक्या अवकाशांत त्याच्या पत्नीनें दुसरें बिऱ्हाड बदलून तेथें रहावयास गेल्यानंतर लवकरच परलोकचा मार्ग धरला होता व त्याची कन्या तो गेला त्यावेळीं लहान असून आतां तिला मुलें बाळें ही झालीं होतीं.

फिलाडेल्फियाच्या लोकांनीं भक्तिपुरःसर त्याचें मोठें स्वागत केलें आणि दुसरे दिवशीं सकाळींच तेथील सभेनें त्याला ता. १० रोजीं भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचा मुखत्यार नेमिलें. फ्रँक्लिन येण्यापूर्वी सोळा दिवस अमेरिकन शेत—कऱ्यांनीं आपल्या पांखरें मारण्याच्या बंदुकां-

नीं *लेग्झिंक्टन इंग्रज शिपायांस पाडाव करून वाट फुटेल तिकडे पळण्यास लाविलें होतें. ही बातमी पोंहोंचतांच इंग्लिश प्रधान मंडळ अगदीं चकित झालें. ह्या लढाईत फक्त त्र्यायशीं अमेरिकन व दोनशें त्र्याहात्तर इंग्रज शिपाई पडले.

मे महिन्याच्या दहाव्या तारिखेस राष्ट्रीय परिषद् भरली. अजूनही दोनपक्ष होतेच—एकापक्षाचें मत हातघाईवर न येतां सरकाराशीं स्नेहभावानें रहावें व दुसऱ्या पक्षाचें मत युक्तिवादानें सख्य करण्याचे प्रयत्न आतां व्यर्थ आहेत, करितां एकदम लढाईस सुरवात करावी, असें होतें.

**जार्जवाशिंग्टन** यास सर्वानुमतें अमेरिकन सैन्याचा मुख्य अधिकारी नेमिलें. उभयपक्षांची पहिली लढाई ता. १७ जून रोजीं × **बंकर्स** हिल येथें झाली. यांत अमेरिकन लोकांचा जरी पराभव झाला, तरी इंग्रजांचें भ्रमनिरसन होऊन अमेरिकन लोकांस जिंकणें वाटत होतें तितकें सोपें नाहीं, अशी त्यांची खात्री झाली.

कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार आतां इंग्रज अधिकाऱ्यांवर सोंपविणें बरोबर नाहीं असें वाटून राष्ट्रीय सभेनें आपली स्वतःची डाक स्थापण्याचा ठराव करून **फ्रँकलिनाला** त्यावरील मुख्य अधिकारी नेमिलें; त्याचें वय

---

* म्यासाच्युसेट प्रांतांत बोस्टनच्या वायव्येस अकरा मैलावर एक शहर आहे.

× **बोस्टन**च्या उत्तरेस ही एक उंच टेकडी आहे.

यावेळीं एकूणसत्तर वर्षांचें होतें. फ्रँक्लिनाचा स्वभाव दिवसें दिवस फारच थट्टेखोर बनत चालल्यामुळें मोठ्या महत्वाच्या कागदिपत्रांतदेखील एकादें थट्टेचें वाक्य घुसडून दिल्या वांचून तो रहात नसे आणि ह्मणूनच त्यावेळीं त्याच्यासारखा लेखक अमेरिकेंत नसूनही 'अमेरिकन स्वातंत्र्यलेख' लिहिण्याचें काम दुसऱ्यास सांगावें लागलें.

ह्या राष्ट्रीय सभेंत फ्रँक्लिनानें केलेल्या एका कोटिक्रमावरून त्याचा स्वभाव तेव्हांच सर्वांच्या लक्षांत येईल. पाद्रीभटांनीं असल्या जुलमी राजाच्या कल्याणाकरितां ईश्वराराधना करूं नये हा मुद्दा पुढें आला असतां तो ह्मणतो, "ह्या सुचनेची मुळींच जरूर नाहीं. कारण, हे आमचे लोक राजाला आणि त्याच्या प्रधानमंडळाला चांगलें ज्ञान दे, ह्मणून आज वीसवर्षें सारखी ईश्वराची करुणा भाकीत असतां त्यांची प्रार्थना परमेश्वरानें मुळींच मनावर घेतली नाहीं, हें सर्व आपण पहातच आहों. यावरून त्या लोकांचें ईश्वराच्या दरबारीं मुळींच वजन नाहीं हें स्पष्ट होतें."

डा. फ्रँक्लिनाला आपल्या मुलांचें वर्तन पाहून फार दुःख झालें. न्युजर्सिच्या लोकांची त्याजवर मोठी भक्ति बसली होती, परंतु पुढें तो जसजसा इंग्रजांविषयीं पूज्यबुद्धि आणि अमेरिकनांविषयीं द्वेषभाव दाखवूं लागला. तसतसें लोकांचें त्यावरील प्रेम उडून तेथील सभेनें त्याला पाहऱ्यांत देऊन बर्लिंग्टन येथें रवाना केलें. तेथेंही त्याचा तसाच क्रम चालूं लागल्यामुळें राष्ट्रीयसभेनें त्याला

* कानेक्टिकट येथें पाठविलें. तेथेंही त्यानें पुष्कळ दंगल चालविल्यामुळें सदर सभेनें त्याला लिचफील्डच्या तुरुंगांत पाठविलें. तेथें त्यानें आपल्या कर्माला योग्य अशी कैद दोन वर्षें भोगिली.

इकडे फ्रँक्लिन, त्याच्या कुटुंबाच्या खर्चाकरितां पैसे पाठवीत असे. याची स्त्री पतिविरहानें दुःखी होऊन आजारी पडली आणि इ. स. १७७८ च्या जुलै महिन्यांत न्यूयार्क येथें मरण पावली.

नंतर हे गव्हरनर कैदेंतून सुटले, व थोडें बहुत पेनशन मिळालें तें घेऊन अमेरिकन लोकांशीं लढण्याची खटपट करूं लागले. फ्रँक्लिन आपल्या मुलाच्या ह्या वर्तनाविषयीं पुढें कांहीं वर्षांनीं लिहितोः—

" मला माझ्या एकुलत्या एका मुलानें ऐन वृद्धापकाळीं सोडिलें एवढेंच नव्हे, तर ज्या गोष्टींकरितां मीं आपलें तनमनधन खर्ची घातलें, त्यांत ह्यानें उलट पक्ष घेतला. यामुळें मला जें दुःख होत आहे, तें आजपर्यंत दुसऱ्या कशानेंही झालें नाहीं." हा फ्रँक्लिनचा वैवाहिक संबंधाचा पुत्र नव्हता तेव्हां परमेश्वरानें फ्रँक्लिनला त्याच्या अन्यायाबद्दल तर हें शासन केलें नसेलना ?

हे प्रतापी गृहस्थ इ. स. १८१३ मध्यें आपल्या वयाच्या ब्यायशींव्या वर्षीं लंडन येथें स्वर्गलोकवासी झाले !

* संस्थानें पैकीं पूर्वेकडील एक प्रांत.

# भाग १३ वा.

---

## लढाई व वकिली.

इंग्रज व अमेरिकन यांचीं परस्परांविषयीं मतें—फ्रँक्लिनाचें डा. प्रीस्ट्ले यास पत्र—फॉलमाऊथची आग—मिसेस ॲडम्सचें पत्र—फ्रँक्लिनाचा प्रवास—स्वातंत्र्यलेख—टोपीवाल्याची गोष्ट—संस्थानांचें ऐक्य व त्याची रचना—लार्ड हाऊचा जाहीरनामा—त्याला फ्रँक्लिनाचें उत्तर—तिघां कमिशनरांचीं हाऊ यास उत्तरें—फ्रान्समधून आलेलें पत्र—फ्रँक्लिनाची नेमणूक—त्याची फ्रान्सदेशांत सफर.

अमेरिकेंत मोठमोठ्या मुत्सद्यांपासून अगदीं साधारण लोकांपर्यंत सर्वांच्या मनांत हा वेळ पावेतों इंग्लंडाविषयीं अत्यंत प्रीति होती, असें तेव्हांच्या अनेक प्रसंगीं दिसून आलें.

आपल्या पूर्वजांच्या गृहांपासून भिन्न होण्याचा दुःखकारक प्रसंग टाळण्याकरितां वाशिंगटन, ॲडम्स, जे, वगैरे लोकांनीं आपल्या स्वतःच्या हिताहिताकडे मुळींच पाहिलें नसतें. परंतु ब्रिटिशप्रधानमंडळाचें वर्तन फक्त अतिशय जुलमीच नसून अपमानकारक, तिरस्करणीय आणि हरतऱ्हेनें अक्षम्य असेंच होतें. ते, आपल्या लहानग्या

बेटांत न उपजतां भव्य अशा उत्तर अमेरिकेंत जन्मलेल्या मनुष्यांस अगदीं तुच्छ मानीत आणि त्यांस गुलामांप्रमाणें लेखीत. अमेरिकन लोकांस अपमान करून घेतल्याशिवाय इंग्रजांची भेटच अशक्य! असा प्रकार झाल्यामुळें ह्या दोन्ही लोकांमधील प्रीति नाहींशी होऊन द्वेष मात्र दिवसेंदिवस जास्त जास्त दृष्टीस पडूं लागला.

ता. १३ सप्तंबर १७७५ रोजीं **फिलाडेलफिया** येथें राष्ट्रीयसभा भरली. **लेग्झिंग्टन, बंकरहिल** वगैरे ठिकाणीं उडालेल्या चकमकीमुळें सर्व देशांत मोठी गडबड उडून राहिली. बंदुकी व दारूगोळा करण्याचे नवीन नवीन कारखाने निघूं लागले, आणि बायका जखमा बांधण्याकरितां कापड तयार करण्याच्या कामांत गुंतून गेल्या. याचें नांव एकी आणि हातांत घेतलेलें काम शेवटास नेण्याची आवड! ज्या या गडबडीमुळें अमेरिका एकसारखी सात वर्षेंपर्यंत दुःख आणि रक्तपात यांचें ठिकाण बनून राहिली होती, तिचें कारण काय बरें?

अमेरिकेंतील आपल्या बंधुवर्गावर वाटेल तेवढा कर बसविण्याचा आपला हक्क इंग्रजांतील दुराग्रही आणि दुसऱ्याचा अपमान करणारे लोक सांगूं लागले, हेंच तिचें कारण नव्हे काय? " तुम्हां अमेरिकन लोकांवर लागेल तेवढ्या पैशाची मागणी करण्याचा आम्हां इंग्रजांस हक्क आहे. जर तुम्ही बंद्यागुलामाप्रमाणें कांहीं एक कुरकुर न करितां आमच्या मागणीबरहुकूम पैसे देणार नाहीं तर आम्ही तुमचीं शहरें जाळून टाकूं आणि साऱ्या देशाला

रक्तस्नान घालूं यांत तिळभरही चुकणार नाहीं." असें म्हणण्यास त्यांना बिलकूल शंका वाटत नसे.

वाशिंग्टन यानें बोस्टन भोंवतीं अमेरिकन सैन्य जमवून तेथेंच इंग्रजांस वेढा घातला होता. तेव्हां सैन्य कमी जास्त करण्याच्या कामांत त्याला सल्लामसलत देण्याकरितां राष्ट्रीयसभेनें एक तिघां गृहस्थांचें कमिशन पाठविलें. त्यांत फ्रँक्लिन हा होताच असल्या आणीबाणीच्या प्रसंगींही आमच्या चरित्रनायकाचा विनोदी स्वभाव दिसून येत होता. त्यानें या नवीन कामगिरीवर जाण्यापूर्वींच एक दिवस डा० प्रीस्ट्ले यांस इंग्रजांनीं आजवर काय केलें, हें थोडक्यांत लिहून कळविलें होतें तें असें:—

"ब्रिटननें या मोहिमींत तीन कोट रुपये खर्च करून फक्त दीडशें यांकिस्स् लोक मारिले यावरून माणशीं दोनलाख रुपये पडले. बंकरहिलच्या लढाईंत त्यांना अर्धा एक मैल जागा मिळाली, परंतु पुनः आह्मीं फ्लाऊडहिलवर जाऊन राहिल्यामुळें त्यांतली अर्धी जमीन आमच्याकडेच आली. हा घोंटाळा चालला आहे इतक्यांत सर्व अमेरिकेंत साठ हजार नवीन मुलें जन्मास आलीं. या एकंदर हकीकतीवरून आह्मां सर्वांचा निःपात करण्यास आणि आमचा सारा देश काबीज करण्यास इंग्रजांस किती खर्च येईल आणि किती वेळ लागेल, याचा हिशेब डाक्टरसाहेब, आपल्यासारख्या गणितज्ञानेंच करावा." या थट्टेंतच असणारा निश्चय आणि स्वदेशाभिमान जर आमच्या मंडळींत असता, तर आजपर्यंत वेळों-

वेळीं आलेले प्रसंग अनुभविण्याची पाळी या हतभाग्य देशावर कधींच आली नसती.

हे तिघे मुखत्यार तेरा दिवसांनी ह्मणजे ता. ४ आक्टोबर रोजीं केंब्रिज[1] येथें आपल्या छावणींत जाऊन पोहोंचले. तेथें चौघांजणांची सभा भरून तिनें पुष्कळ मोठमोठालीं कामें उरकून टाकलीं. इतक्यांत पोर्टलंड जाळल्याची खबर छावणींत येऊन पोहोंचली. त्या शहरच्या रक्षणाला सैन्य वगैरे मुळींच नसल्यामुळें शत्रूंना हें राक्षसी कृत्य करिते वेळीं कोणींच हरकत आणिली नाहीं. इंग्रजांचें एक लढाऊ गलबत बंदरांत शिरलें आणि त्यावरील लोकांनीं शहरांतील सर्वांस आजारी माणसें व बायकामुलें दूर नेण्याविषयीं एक दोन तास आगाऊ सूचना देऊन गरिगुरिबांचीं आणि सुखासमाधानानें राहणाऱ्या दुसऱ्या कुटुंबांचीं एकशें तीस घरें जाळून त्यांची राखरांगोळी करून टाकिली. ह्या आगिडवाळांनीं तीं घरें, त्यांतील सर्व सामानसुमान कपडेलत्ते आणि नजीक येऊन ठेपलेल्या हिंवाळ्याकरितां जमविलेलें धान्य, यांचा अगदीं फन्ना उडविला. ह्या आगीच्या तडाक्यांतून वांचलेल्या थोड्याशा घरांस त्या खलाशी लोकांनीं कृतकृत्य होण्याच्या संकल्पानें मशाली पेटवून आग लाविली!

घरदार नसल्यमुळें थंडीमध्यें कुडकुडणाऱ्या आणि उपासमार काढणाऱ्या अमेरिकन लोकांच्या बायकामुली आंगांत

---

१ सं. सं. पैकीं म्यासाच्युसेट्स प्रांतांत विद्या आणि व्यापाराविषयीं हें अत्यंत प्रसिद्ध शहर असून याची लोकसंख्या दोनलक्षांवर आहे.

शक्ति नसल्यामुळें एकादा आधार पाहून दूर रहाण्यास न जातां बंदरांत असलेल्या अनेक गलबतांवर येऊन राहतील, हें बरें न वाटून युरोपियन पठ्यांनीं त्यांचीं झाडून सारीं गलबतें जाळून टाकिलीं! एकंदरींत इंग्रज युक्तिवान् खरे! हें मनुष्य जातीला कालिमा आणणारें इंग्रजांचें कृत्य अमेरिकन लोकांच्या काळजाला झोंबलें. जरी या गोष्टीस शंभरांवर वर्षे होऊन गेलीं, तरी अद्यापही ही हकीगत वाचतांना अमेरिकन रागानें अगदीं लाल होऊन जातात, आणि त्यांच्या डोळ्यास पाणी येतें. **जॉन अडॅम्स** याची पत्नी आपल्या पतीप्रमाणेंच स्वदेशाभिमानी होती; ती लिहिते:—

"ज्यांचा आमचा यापुढें कांहीं एक संबंध राहणार नाहीं, असे आमचे जुलमी इंग्रज सरकार आणि इकडील वसाहती यांचा संधि व्हावा, म्हणून मला आतां देवाची विनवणी करवत नाहीं. इंग्रज आमच्या बंधुत्वाला आतां खचितच योग्य नाहींत. त्यांचा संबंध आपण तोडून टाकूं, आणि त्यांचा उत्कर्ष होऊन त्यांना सुख मिळावें, अशा विषयीं परमेश्वराची प्रार्थना न करितां, त्यांच्या सभा मोडून त्यांच्या युक्ति निष्फळ व्हाव्यात, अशा विषयींच त्या सर्व शक्तिमान् प्रभूस आतां आपण आळवूं." अशा रीतीनें राजकीय गोष्टी कळणें तर लांबच. पण नुसतें शिक्षण तरी निर्वेधपणें आमच्या स्त्रियांस कधीं मिळेल, तें खरें!

**फ्रँक्लिन** जरी मोठ्या आनंदी स्वभावाचा होता, तरी ज्यावेळीं तो **केंब्रिजहून फिलाडेल्फियाला** परत आला त्यावेळीं त्याला, आपल्या देशाच्या या राक्षसी शत्रुचा

मोठा राग आला होता. यापुढें कांहीं दिवस त्याच्या तोंडांतून अथवा लेखणींतून थट्टेचा असा एकही शब्द निघाला नाहीं. त्याला पुनः लौकरच *कानड्यासंबंधीं बोलणें करण्याचा मंडळीचा सभासद नेमून पाठविलें.

ह्या मंडळीला पांचशें मैलपर्यंत मोठ्या जिकीरीचा प्रवास करावयाचा होता, तरी मुद्दां सत्तर वर्षांच्या वयांत आमच्या चरित्र नायकानें हें काम पतकरिलें, यावरून त्याची स्वदेश सेवा करण्याची आवड व्यक्त होते.

मार्च महिना सरतां सरतां ही मंडळी फिलाडेल्फियाहून निघाली आणि दोन दिवसांत न्यूयार्कला जाऊन पोहोंचली. एक दोन तासांत, इंग्रज त्या शहरावर मोठा भडिमार करणार अशी वदंता असल्यामुळें सर्व नागरिक आपण कोठें जात आहोंत, व आपलें पोट पुढें कसें भरणार यावियीं कांहीं एक विचार न करितां केवळ भीतीनें घरेंदारें आणि उपजीविकेचीं साधनें सोडून शहरा बाहेर पडले. थोडेसे शिपाई मात्र रक्षणासाठीं ह्मणून तेथें राहिले होते. तेव्हां हा देखावा पाहून आमच्या या देशभक्त मंडळीस किती वाईट वाटलें असेल बरें ?

तेथून ऑलबनी व आलबनीहून साराटोगा असें

---

* ही इंग्रजांची अमेरिकेंतील सर्वांत मोठी वसाहत आहे. ती त्यांनीं इ. स. १७६३ मध्यें फ्रेंचांपासून आपल्या ताब्यांत घेतली.

१ सं. सं. पैकीं न्यूयार्क प्रांताची राजधानी. येथील विश्व विद्यालय फार प्रसिद्ध आहे.

२ न्यूयार्क प्रांतांत आलबनपासून ३२ मैलांवर एक लहानसें गांव आहे.

करीत सावकाश सावकाश व वाटेनें हाल सोशीत ही मंडळी एकदांची मांट्रीललाा येऊन पोहोंचली. फ्रँक्लिनाच्या आजपर्यंतच्या प्रवासांत एवढा त्रास त्याला कधींच पडला नव्हता

तेथें पोहोंचल्यावर या मंडळींची सभा भरली आणि कानडा प्रांत आपल्या हातून गेल्यामुळें सैन्य माघारें बोलवावें, असें तिनें ठरविलें. नंतर जून महिन्यांत फ्रँक्लिन फिलाडेल्फियाला परत गेला. त्याला एकंदर अडीच महिने या प्रवासांत काढावे लागले.

पेनसिल्व्हेनियाच्या लोकांनीं जमीनदार आणि इंग्रज यांची सत्ता झुगारून देऊन आपल्या प्रांताकरितां कोणती राजपद्धति योजावी याचा विचार करण्यासाठीं एक मंडळी नेमिली. तींत फ्रँक्लिन होताच, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच राष्ट्रीयसभेनें स्वातंत्र्यलेख तयार करण्याकरितां एक मंडळी नेमिली, तींतही फ्रँक्लिन होताच. ह्या दुसऱ्या मंडळींत जेफरसन, अडॅम्स लिव्हिंग्टन आणि शेअरमन हेही नेमिले होते.

हा अविनाशी दस्तऐवज जेफरसननें लिहिला हें सर्व जगास माहीत आहेच. तो राष्ट्रीय सभेपुढें आला त्यावेळीं बारीक सारीक आक्षेप निघून, कोणी हें वाक्य जरा कडक आहे, कोणी तें फार नम्रपणाचें आहे, असें ह्मणू

---

३ उत्तर अमेरिकेंत कॅनड्यामध्यें ओटोवा आणि सेंट लारेन्स या नद्यांच्या संगमावर मोठें शहर आहे.

लागले. असा प्रकार चालला असतां फ्रँक्लिन जेफरसन जवळ बसला होता, तो त्याजकडे वळून ह्मणालाः—

" मी छापखान्याचें काम करीत असतां टोप्या करणाऱ्या माझ्या एका मित्रास दुकान घालावयाचें होतें ह्मणून त्यानें दुकानावर लावण्याच्या पाटीवर लिहिण्याकरितां असा मजकूर जुळिला कीं, ' जान टाम्सन् टोपीवाला रोख पैसे घेऊन टोप्या करितो व विकितो. ' परंतु शुद्धाशुद्ध पाहण्याकरितां त्यानें तें वाक्य जेव्हां आपल्या मित्रांस दाखविलें, तेव्हां प्रथम ज्यानें पाहिलें तो ह्मणाला, ' या वाक्यांत टोपीवाला या शब्दाची मुळींच जरूर नाहीं. कारण टोप्या करितो व विकितो या वाक्यांत टोपीवाला हा ध्वनितार्थ आहेच. ' तेव्हां तो शब्द त्यानें गाळिला. दुसरा ह्मणाला, टोप्या करितो, या वाक्याचें कांहींच प्रयोजन नाहीं. गिऱ्हाइकांच्या मनाप्रमाणें टोपी असली ह्मणजे ते, ती कोणीही केली असली तरी विकत घेतात. यानें तें वाक्यही खोडून टाकिलें. तिसरा ह्मणाला, आपल्या येथें उधार माल देण्याघेण्याची वहिवाटच नसल्यामुळें ' रोख पैसे घेऊन ' हे शब्द अगदीं निरुपयोगी आहेत. जो माल घेईल, तो रोख पैसे देणारच. तेव्हां तेही शब्द गाळून टाकिले. बाकी ' जॉन टॉम्सन् टोप्या विकितो ' इतकेंच वाक्य राहिलें. पुढें त्याचा एक मित्र येऊन ह्मणाला, ' टोप्या विकतो ' याचा अर्थ काय ? तुझ्या टोप्या कोणी फुकट का मागतो ? कोणी झालें तरी विकतच घेणार. तेव्हां ' टोप्या विकितो ' या वाक्याचा

काहीं उपयोग नाहीं. हें मित्राचें बोलणें ऐकून त्यानें तेंही वाक्य गाळून टाकिलें. राहतां राहिलें 'जॉन टॉम्सन्' आणि त्यापुढें एक टोपीचें चित्र !"

पूर्वी फ्रँक्लिनानें गरुडपक्षी आणि ससा याची गोष्ट जशी अगदीं तात्वडतोब समयोचित लिहिली, तशी हीही प्रसंगाला अनुसरूनच त्यानें आपल्या बुद्धिप्रभावानें तेव्हांच रचून सांगितली.

इ. स. १७७६ च्या जुलै महिन्याच्या विसाव्या तारिखेस फ्रँक्लिन यास पेनसिल्व्हेनियाच्या तर्फे राष्ट्रीय सभेकरितां पाठविलेल्या नऊ मुखत्यारांपैकीं एक नेमिलें. सर्व संस्थानें एकत्र करितांना मोठ्याचें महत्व मोठ्यास आणि लहानाचें लहानास देण्याची मोठी अडचण होती, परंतु लहानमोठ्या सर्व संस्थानांनीं सेनेट * ( महाजन सभा ) मध्यें प्रत्येकीं दोन मुखत्यार पाठवावे व हाऊस * ( सामान्यजनसभा ) मधील मुखत्यार, लोक संख्येच्या मानानें पाठवावे, अशी व्यवस्था करून ती दूर केली.

कोणत्याही कामाचा योग्य निकाल लावण्याच्या कामीं

---

* सामान्यजन सभेंत पुष्कळ लोक असून, त्यांच्या कुळाकडे किंवा संपत्तिकडे विशेष लक्ष न देतां विद्वत्ता वगैरे पाहूनच त्यांची निवड होते परंतु महाजन सभेचें तसें नाहीं. तिचे सभासद थोडे असून, त्यांची निवड वरील सर्व गोष्टींवर लक्ष देऊन होत असते. या दोन सभा ह्मणजे इंग्लंडांतील साधारण व वडे लोकांच्या सभेप्रमाणेंच आहेत. मात्र इंग्लंडमध्यें वडे लोकांच्या सभेचे सभासद लोकनियुक्त नसून केवळ वारसाच्या हक्कानें होत असतात.

**फ्रँक्लिन** अगदीं निष्णात होता. त्यानें लहान संस्थांनें मोठ्यांच्या बरोबरीचे हक्क मागत असतां खालीं लिहिलेलें उत्तर देऊन त्यांचीं तोंडें बंद केलीं. तो ह्मणालाः— " लहान वसाहतींनीं मोठ्या वसाहतींच्या बरोबरीनें लोक आणि पैसा पुरविला असतां, त्यांस त्यांच्या इतकीं मतें देण्याचा अधिकार मिळेल. परंतु बरोबरीनें ओझें न घेतां हक्क मात्र हवा असेल तर, अशा असमतेवर रचलेल्या ह्या ऐक्यरूपी इमारतीचा पाया लवकर ढांसळेल, यांत संशय नाहीं. "

**फ्रँक्लिना**चा जुना मित्र आरमारावरील मुख्य अधिकारी **हाऊ** यानें इंग्रज व अमेरिकन यांचें सख्य करण्याचा हेतु धरून " जर अमेरिकन लोक तंटा सोडून शरण येतील, तर इंग्रज सरकार त्यांना सर्वापराध क्षमा करून कांहीं गुन्हेगार खेरीज करून बाकींच्यावर पूर्ववत् कृपा ठेवील " अशा अर्थाचा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या बिचाऱ्याला असें केल्यानें सरकारची अमेरिकन लोकांवर मोठी मेहेरबानीच होईल, असें वाटलें असावेंसें दिसतें.

ह्या जाहिरनाम्यास **फ्रँक्लिनानें** लिहिलेलें उत्तर विलक्षणच होतें, त्यांतून तें हजारों इंग्लिश लढाऊ शिपायांवरील अधिकाऱ्यांस व एकशेंवीस मोठमोठ्या व भरगच्च सामानांनीं भरलेल्या लढाऊ गलबतांवरील मुख्यास उद्देशून लिहिलें होतें. हें मनांत आणिलें असतां तें फारच विलक्षण होतें असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. **ॲडमिरल** ( आरमारावरील मुख्य अधिकारी ) **हाऊनें** मोठ्या प्रयत्न-

णानें फ्रँक्लिनाला खासगी पत्र लिहून त्यांतही जाहीरनामा पाठविला होता. राष्ट्रीय परिषदेच्या परवानगीनें ह्याला त्यानें उत्तर लिहिलें, तें असें:---

"आपण सरकारी रीतीनें पाठविलेल्या जाहीरनाम्यांत शरण आल्यास क्षमा करूं या पलीकडे कांहींच नाहीं. ज्या वसाहतींनीं आजपर्यंत दुःख सोंशिलें त्यांना अशा रीतीनें क्षमा करितों ह्मणून सांगणें ह्मणजे त्यांच्या अज्ञानाविषयीं, नीचपणाविषयीं आणि मूर्खपणाविषयीं तुमच्या अज्ञानी व गर्विष्ठ राष्ट्रानें मेहेरबानीकरून धारण केलेलेंच मत प्रगट करणें होय. ज्या सरकारानें लहर लागेल तसा रानटीपणा आणि दुष्टपणा करून भर हिंवाळ्यांत आमचीं निराश्रित शहरें जाळिलीं, आमच्या शेतकरी लोकांस मारण्याकरितां रानटी लोक उद्युक्त केले, आणि आमचे गुलाम आह्मांवर उठविले व जे आमच्या वसाहती रक्तमांसानें भरून काढण्याकरितां परकीय लोकांची मदत मागत आहेत, त्यांना आह्मीं शरण जाऊं, ही गोष्ट कधींच संभवनीय नाहीं."

हें पत्र येथें साद्यंत घेण्यास स्थल नाहीं. लॉर्ड हाऊ यास तें दहा दिवसांनंतर न्यूयार्क बंदरांत गलबतावरच मिळालें. तें वाचीत असतां त्याला मोठें आश्चर्य वाटलें. व "माझ्या जुन्या मित्रानें आपले विचार फारच कडक रीतीनें लिहिले." इतकेंच तो बोलला. लॉर्ड हाऊ यानें फिलाडेलफिया येथें राष्ट्रीयसभेस मुद्दाम निरोप पाठविला तो असाः---

राष्ट्रीयसभा सर्व-लोकनियुक्त नसून कायदेशीर नव्हीं, असें इंग्रज सरकार मानितें व आपल्या कायदेशीर राजाविरुद्ध दुष्ट भावानें एकत्र जमलेल्या मंडळीचा हा बंडखोर समाज आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. तरी देखील कांहीं सभासदांशीं मीं बोलणें करून चांगली व्यवस्था जुळल्यास पहावी, अशी सरकारची इच्छा आहे.'

या निरोपाचा विचार करण्याकरितां राष्ट्रीयसभेनें **बेंजामिन् फ्रँक्लिन, जॉन अॅडम्स** आणि **एडवर्ड रुट्लेज** या तिघांस नेमून **लार्ड हाऊ** यास आपण केलेली व्यवस्था कळविली.

ह्या मंडळीसमोर **लार्ड हाऊ** यानें मनुष्यवाणीला साध्य तितकें मधुर भाषण केलें आणि शेवटीं तो ह्मणाला, "अमेरिका इंग्लंडपासून निराळी झाल्यास मला माझ्या बंधुविरहाचें दुःख होईल." यावर **फ्रँक्लिनानें** दिलेलें उत्तर थोडें असभ्यतेचें होतें. तो हंसून चेष्टेच्या स्वरानें ह्मणाला, "महाराज, असा प्रसंग आपणावर येऊं नये, ह्मणून आमच्यानें होईल तें करण्याला आह्मीं कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं."

ह्या सेनाध्यक्षाला थट्टेची मोठी चीड असे. **फ्रँक्लिना**च्या उत्तरांत उघड दिसणारी निंदा त्याच्या मनाला अगदीं झोंबून गेली. परंतु **पोर्टलंड** येथील कुटुंबांशीं इंग्रजसरकारानें केलेल्या दांडगेपणाच्या भयंकर वर्तनानें **फ्रँक्लिनाला** आलेला राग अद्याप शांत झाला नव्हता, हें विसरतां कामा नये. शिवाय इंग्लिश आपल्या साहाय्य-

कारी लोकांसह वसाहतींत शिरून गरीब गुरिबांच्या झों-पड्या जाळून बायकांचा चुराडा उडवीत आणि पोरांना उभे सोलीत, ह्या बातम्या नेहमीं त्याच्या कानीं येत होत्या. आहे कीं नाहीं आह्मांला हंसणारांची आमच्यावर कडी ! असो, तेव्हां अशा सरकाराला जर तुह्मी शरणयाल व सरकारच्या मागण्यास कुरकुर न करितां रुकारदेण्याचें कबूल कराल, तर तुमच्यावर होणाऱ्या जुलमास प्रतिबंध कर-ण्याच्या या अपराधाबद्दल सरकार दयाळू होऊन तुह्मांला क्षमा करील, अशाप्रकारचे अपमान करणारे निरोप घेऊन येणारांपैकीं **लार्ड हाऊ** हा एक आहे, असें समजणें त्यां-ला भाग होतें.

राष्ट्रीयसभेचे मुखत्यार या नात्यानें, नाहीं तर खास-गीरीतीनें मीं तुमची गांठ घेतली आहे. कारण राष्ट्रीय-सभेंत कांहीं तथ्य आहे असें मी मुळींच समजत नाहीं, असें त्या तिघांच्या मनांत भरविण्याचा **लार्ड हाऊनें** मोठा प्रयत्न केला.

फ्रँक्लिनानें यावर जरा कडक जबाब दिला. तो ह्मणाला, " रावसाहेब आपण आह्मांला वाटेल त्या दृष्टीनें लेखा. आह्मी आपली स्वतःची किंमत जाणण्याला अ-गदीं मुखत्यार आहों."

**जॉन अॅडाम्सचा** स्वभाव बराच कडक असल्यामुळें तो रागानें ह्मणाला, " मेहेरबान, आपण मजकडे वाटेल त्या दृष्टीनें पहा. इंग्रजसरकारची प्रजा याशिवाय मी वाटेल तें ह्यावेळीं तुमच्याकडून ह्मणवून घेण्याला तयार आहें."

आणखी बोलणें चाललें असतां **फ्रँक्लिन** ह्मणाला, "सभेच्या विचाराकरितां आपण कोणते ठराव पुढें आणणार आहां, याची चौकशी करण्याकरितांच राष्ट्रीय परिषदेनें आह्मांस आपणाकडे पाठविलें आहे. इंग्रजी सैन्यानें आमच्या देशांत कहर उडवून आमचीं शहरें जाळून उद्ध्वस्त केलीं आहेत. **ग्रेटब्रिटन**च्या सत्तेखालीं आह्मांला आतां सुख मुळींच होणार नाहीं. त्यांच्याविषयीं आमच्या मनांतील प्रीति समूळ नष्ट झाली आहे. अमेरिका **ग्रेटब्रिटन**च्या पार्लमेंटची आतां मुळींच पर्वा करीत नाहीं."

मि. **अँडाम्स** ह्मणाला, "महाराज स्वतंत्र संस्थानावांचून दुसऱ्या रीतीनें वागणें आतां आमच्या हातांत नाहीं. मजविषयीं ह्मणाल तर स्वतंत्रतेच्या कल्पनेला न झुगारण्याचा माझा दृढ निश्चय झाला आहे."

ह्या निश्चयात्मक शब्दांस **रुट्लेज**च्या बोलण्यानें जास्तच जोर आला. तो ह्मणाला, "लोकांचें इंग्रजी अमलाला अनुकूल मत पडणें अगदीं अशक्य आहे. * **साऊथ क्यारोलेना**विषयीं मी असें सांगतों कीं, त्याठिकाणीं ह्या सरकारचा फारच जुलमी अंमल चालू होता. शेवटीं आह्मीं आपल्या हातांत सर्व कारभार घेतला. आतां लोकसत्तात्मक राज्याखालीं लोक स्वस्थ असून सुख भोगीत आहेत. ह्मणून आतां राष्ट्रीयसभेनें जरी इंग्रजांचा अंमल कबूल केला, तरी लोक कबूल करणार नाहींत."

* सं. सं. पैकीं प्रांत. यांत कोळंबीया मोठें शहर आहे.

ह्या एकंदर बोलण्यावरून अमेरिकन लोकांचीं मतें इंग्रजांविरुद्ध किती व कां झालीं होतीं, हें वाचकांच्या लक्षांत येईलच! असो, यानंतर लार्ड हाऊनें, जर तुह्मी स्वतंत्रतेविषयीं इतका आग्रह धरीत असाल, तर कांहीं जुळावयाचें नाहीं, असें ह्मटल्यावर सभेचें काम आटोपलें व ह्या मुखत्यारांची लार्ड हाऊनें मोठ्या सन्मानानें पाठवणी केली.

डा. ड्यूबर्ग नांवाच्या फ्रेंच तत्वज्ञानें फ्रँक्लिन यास पत्र लिहिलें कीं, फ्रान्स येथील प्रधानमंडळ व लोक अमेरिकेच्या पक्षाचे आहेत. यांच्या मनांत इंग्रजांशीं प्रत्यक्ष युद्ध करण्याचें जरी नाहीं, तरी गुप्त रीतीनें परंतु मोठ्या आनंदानें अमेरिकन लोकांस हें; पैसा, दारूगोळा, तोफा वगैरे सामान पुरविण्यास तयार आहेत. तसेंच पुष्कळ फ्रेंच सरदार अमेरिकन सैन्यांत मिसळून आपल्या अनुभवाचा फायदा त्यांस देण्याला अगदीं सिद्ध आहेत.

हें ऐकून कांहीं निराश झालेल्या मंडळीस मोठा आनंद झाला व सर्वांनीं फ्रान्सांत एक वकील पाठविण्याचें ठरविलें. हें नाजूक, कठीण आणि जबाबदारीचें काम करणारा सत्तर वर्षांच्या वृद्ध फ्रँक्लिनावांचून दुसरा कोणी नसल्यामुळें सर्वानुमतें त्याची अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा लेख लिहिणारा ह्मणून फ्रान्सांत प्रसिद्ध झालेल्या जेफरसनची व त्यांच्या साह्यार्थ × सिलाडीन याची नेमणूक झाली.

---

+ हा चांगला विद्वान् आणि मोठा व्यापारी कानिक्टिकट येथें राहत असे.

इंग्रजी सैन्याचा त्रास असल्यामुळें प्रवास करण्याचें काम मोठें अवघड झालें होतें. फ्रॅंक्लिन, जेफरसन वगैरे पैकीं कोणी इंग्रजांच्या हातीं लागते तर पुढें ज्या प्रमाणें मि. *हेनरी लारेन्स यास भयंकर कारागृहवास कंठावा लागला, अथवा राजद्रोही ह्मणून फांशीं जावें लागलें, त्याप्रमाणें यांनाही झालें असतें. तेव्हां फ्रॅंक्लिनानें आपणास आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी धोक्यांत घालून घेतलें, तें केवळ देशसेवेकरितांच होय.

जेफरसन आपल्या पत्नीवर अप्रतिम प्रेम करीत असे. ती एकाएकीं आजारी पडून मरावयास टेंकल्यामुळें त्याला हें काम नाकारावें लागलें. तेव्हां आर्थर ली त्यावेळीं युरोपांत होता. त्याची त्याच्याबद्दलीं नेमणूक झाली. हा मनुष्य कामाला अगदीं अयोग्य होता.

दिवसेंदिवस भरभराट पावणाऱ्या वसाहतींशीं चालत आलेला इंग्रजांचा जंगी व्यापार बंद पडून कृतज्ञता बुद्धीनें अमेरिकन लोक आपणाशीं तो चालू करितील, अशी फ्रेंचांस मोठी आशा होती.

फ्रॅंक्लिनानें आपल्या लोकप्रिय उदार स्वभावाचा शेवटचा मासला ह्मणून अमेरिकेचा खजिना रिकामा हो-

---

* हेनरी लारेन्स हा पूर्वी अमेरिकेंत राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष होता. तो सभेच्या तर्फे वकीली करण्याकरितां इ. स. १७८० सालीं चालला असतां इंग्रजी आरमारानें त्याच्या गलबताचा पांच तासपर्यंत पाठलाग करून त्याला धरलें व ब्रिटनच्या अर्वाचीन इतिहासांत कोठेंही न आढळणाऱ्या भयंकर रीतीचा कारागृहवास भोगावयास लावलें.

ण्याची वेळ आली असतां बारा हजार डालर्सची रकम मोठ्या मेहनतीनें जमवून आपल्या देशबांधवांस दिली. ह्या अडचणीच्या प्रसंगींही लहानशीच रकम त्यांना अति मोठी वाटली.

**फ्रँक्लिन** आपल्या मुलाचा अठरा वर्षांचा मुलगा **वुइल्यम टेंपल फ्रँक्लिन** आणि मुलीचा सात वर्षांचा मुलगा **बेंजामिन फ्रँक्लिन बॅचे** अशा दोघा नातवंडांसह जलद चालणाऱ्या लढाऊ गलबतांत बसून फ्रान्सला जाण्याकरितां निघाला. वुइल्यम टेंपलचीं राजकीय गोष्टीसंबंधीं मतें आपल्या आजोबांच्या मतांस पूर्ण अनुसरून होतीं. डा. फ्रँक्लिनाच्या मनांत आपल्या छोट्या नातवास पॅरिसच्या शाळेंत घालावें, असें होतें.

राजपक्षीय मंडळीचा अमेरिकन राष्ट्रीय परिषदेवर सारखा डोळा असे. **फ्रँक्लिन**, फ्रान्सला जाणार, ही बातमी जर इंग्रजास कळती, तर त्यांनीं आपलें सर्व आरमार त्याच्या पाठीस लाविलें असतें. ह्मणून ही बातमी न फोडण्याविषयीं बंदोबस्त करून ता. २६ अक्टोबर १७७६ रोजीं फिलाडेल्फियाहून तो निघाला.

मागील आठही सफरींपेक्षां या सफरींत वृद्ध फ्रँक्लिनाला फारच त्रास पडला. वाटेंत मोठें वादळ झालें. परंतु परमेश्वर कृपेनें सर्व विघ्नें टळून त्याचें गलबत * कि-

---

* हें अखात अटलांटिक महासागरांतील विस्केच्या उपसागरांत आहे. येथून अॅटिस सुमारें ४० मैल दूर आहे फ्रान्सांत लॉयर नदीच्या काठीं व्यापाराची मोठी जागा आहे.

वरानच्या आखातांत येऊन लागलें. तेथून ॲंठिसला जाण्याकारितां फ्रँक्लिन टपालाच्या गाडींत बसला. तो लिहितोः—

" गाडी भिकार होती, व तिचे घोडे अगदीं दमून गेले होते. व रात्र काळोखी असल्यामुळें वाटेंत चिट-पांखरूंही दृष्टीस पडत नव्हतें. अशावेळीं एका जंगलाच्या तोंडाशीं जाऊन त्या गाडीवानानें गाडी थांबविली. व तो मला ह्मणाला, ह्या रानांत पुष्कळ चोरटे रहात असून त्यांच्या एका टोळीनें पंधरा दिवसांपूर्वी या जागेवर कांहीं प्रवासी लोकांस ठार मारिलें. अशा वेळीं असले शब्द ऐकून आह्मांला केवढें समाधान झालें असेल बरें !"

---

# भाग १४ वा.

---

## अमेरिका स्वतंत्र झाली.

**गिबनची गोष्ट**—फ्रँक्लिनाचा प्यारिस येथें सन्मान—त्याचा इंग्रजांवर परिणाम·**फ्रँक्लिन** एका खेड्यांत जाऊन राहतो—**इंग्रजांचीं** कृत्यें—फ्रँक्लिनाचें पत्र—बरगायनी—फ्रान्स व **अमेरिका** यांचा संधि—इंग्लंडांत चळवळ—**फ्रेंच राजाची** व **फ्रँक्लिनाची** भेट—

अमेरिकेंतील आनंद—इंग्रजांचा निरोप—वुइल्सनचें विलक्षण पत्र—फ्रँक्लिनाचें उत्तर—त्याचें आपल्या नातवावरील प्रेम—फ्रान्सची मदत—जॉन अॅडाम्स—कॉर्नवालीस—फ्रँक्लिनाचीं आणखी दोन उत्तरें—तहाचे मुद्दे—इंग्लंड व अमेरिका यांमधील तह—

नॅन्सिहून प्यारिसला जात असतां फ्रँक्लिन वाटेंत एका खाणावळींत उतरला. तेथेंच 'रोमन राष्ट्राचा अपकर्ष व ऱ्हास' या नांवाचा प्रसिद्ध इतिहास लिहिणारा इंग्रज मि. गिबनही उतरला होता. ही बातमी फ्रँक्लिनाला कळतांच त्यानें सदर गृहस्थास चार घटका आपण एके ठिकाणीं बोलत बसूं, ह्मणून मोठ्या विनयानें चिठी लिहिली. तीस गिबननें "डा. फ्रँक्लिनच्या विषयीं माझी जरी पुष्कळ पूज्यबुद्धि आहे तरी मी इंग्लंडच्या राज्याची प्रजा असल्यामुळें त्याविरुद्ध बंड करणाऱ्या जवळ बोलावें, अशी माझी इच्छा नाहीं." अशा अर्थाचें उत्तर लिहिलें.

यावर फ्रँक्लिनानें त्याला लिहून पाठविलें कीं, "आपल्या मताप्रमाणें आपण जरी आपल्या भाषणाचा फायदा मला दिला नाहीं, तरी आपणाविषयीं माझ्या मनांत इतकी पूज्यबुद्धि आहे कीं, सध्याच्या चिन्हांवरून "ब्रिटिश राज्याचा अपकर्ष व ऱ्हास" हा इतिहास आपणांस लौकरच लिहावा लागेल व त्यावेळीं माझ्या संग्रहीं असलेली पुष्कळ माहिती मी आपणास मोठ्या आनंदानें देईन." या जोडीच्या मनांत खरा-

स्वदेशाभिमान बाणत होता. याबद्दल कोणाला तरि शंका येईल काय ?

तो पॅरिसला गेल्यावर तेथें त्याचा मोठा सन्मान झाला. मि. डिने लिहितो कीं, "शूरत्व, तत्वज्ञान आणि स्वदेशाभिमान हे गुण, प्राणांतिक संकटें सोसूनही स्वदेशसेवा करणाऱ्या या प्रसिद्ध अमेरिकनांच्या ठिकाणीं त्याच्या वयाच्या ७४ व्या वर्षी पूर्ण पणें वास करीत आहेत."

फ्रँक्लिनाच्या ह्या सन्मानाबद्दल सर्व इंग्रजांस फार वाईट वाटलें. प्रत्यक्ष अर्ल आफ चॅथ्याम हा आपल्या एका भाषणांत ह्मणतो:—

"सभ्यहो, फ्रॅान्सनें तुमचा मोठा अपमान केला. आणि अमेरिकेला उत्तेजन देऊन चांगला आश्रयही दिला. आतां अमेरिकेची चूक असो वा नसो, परंतु फ्रान्सनें केलेल्या या मध्यस्तीबद्दल त्याचा आपण तिटकाराच केला पाहिजे. ज्यांना आपण बंडखोर ह्मणतों, त्यांचे वकील आणि प्रधान आज पॅरिसमध्यें असून उभय राष्ट्रांसंबंधीं ठराव करीत आहेत, ह्यापेक्षां राग आणणारा अपमान आणि आमच्या प्रधानमंडळाची फजीती ती कोणती ?"

इंग्लंड मधील एक पत्रकर्ते त्यावेळीं लिहितात, "फ्रँक्लिनाचा दासीपुत्र आपल्या बापापेक्षां पुष्कळच विश्वासू होता. त्याच्या आईला तिला भ्रष्ट करणाऱ्या फ्रँक्लिनानें सोडिलें आणि रस्त्यावर तिचा अन्नपाण्यावांचून शेवट झाला, इतकेंच कळतें." ह्या व अशाच प्रकारच्या फ्रँक्लिनाच्या

तरुणपणांत घडलेल्या अपराधांची उजळणी करून त्याज-वर तेथल्या मंडळीनें शिव्यांचा एकसारखा भडिमार चाल-विला. परंतु त्याच्या व अमेरिकेच्या तर्फेनीही पुष्कळ मंडळी इंग्लंडांत होती, हें विसरतां कामा नये.

इ. स. १७७७ त **फ्रँक्लिन** पारिस पासून दोन मै-लांवर एका खेड्यांत जाऊन राहिला व अमेरिकेंत परत जाईपर्यंत तो तेथेंच होता. त्याजपाशीं चाकरमाणसें पुष्कळ असून तो आल्यागेल्याचा चांगला सत्कार करी. गुलामांस बंड करण्याला प्रवृत्त करून अमेरिकन जमीन-दारांचे वाडे जाळावे, ह्मणून आठ दहा हजार लोकांनिशीं **जनरल बरगायनी** अमेरिकेला जाण्याकरितां निघणार असें जरी खास ठरलें तरी फ्रेंच प्रधान इंग्रजांशीं सामना करण्यास तयार होईना. तो फक्त आपले देशाचें नांव न फुटेल तर वीस लक्ष **फ्रँक*** लढाई संपेपर्यंत उसने देण्यास तयार होता.

असल्या धोक्याच्या प्रसंगीं, ही मदत ह्मणजे पुष्कळच समजली पाहिजे. शिवाय **लाफायेट** नांवाचा एक फ्रेंच सरदार आपलें द्रव्य आणि आपला प्राण हीं अमेरिके-करितां खर्ची घालण्यास तयार झाला होता.

° स्वभावतः आनंदी मनुष्याला अतिशय राग, त्याचे पुष्कळ अपराध केल्यावांचून येत नाहीं. आणि एकदां आला ह्मणजे मग तो रागाच्या सपाट्यांत हवींतशीं कामें

* **फ्रान्स** व **बेलजियम** देशांत चालणारें चांदीचें नाणें याची किंमत सरासरी १० पेन्स किंवा दहा आणे आहे.

करितो. इंग्लिश लोक अमेरिकेंतील गुलामांस पैसे देऊन त्यांना त्यांच्या धन्यावर उठवीत होते, रानटी लोकांस अमेरिकन लोकांची कत्तल उडविण्यास उद्युक्त करीत होते, अमेरिकेंतील निराधार बंदरें लहरीप्रमाणें तोफांच्या भडिमारानें उडवून टाकीत होते, आणि सुधारलेल्या युद्ध-कलेंत पूर्वी घडून न आलेल्या अशा गोष्टी करून निर्दय-पणानें खेडींपाडीं जाळून बायकापोरांस उपासमार पाडून अन्नान्न करीत घरोघरीं हिंडावयास लावीत होते, इतकेंच नाहीं तर अमेरिकेंतील प्रसिद्ध पुरुषांस कैदेंत घालून अपूर्व दुःखाचा मासला ते त्यांस भोगावयास लावीत होते. साधारण खलाशी लोकांस माराची भीति दाखवून इंग्रज आपल्या गलबतावर चढवीत आणि प्रत्यक्ष त्यांच्या देशबंधूंशीं लढण्यास लावीत. आह्मी तर आपखुषीनें शत्रूस मिळून आपसांत यादवी करणें आपलें कर्तव्यच समजत आलों. असो, ह्या व अशाच अनेक गोष्टींमुळें फ्रँक्लिनाचें चित्त अगदीं खवळून गेलें आणि त्यानें डेव्हिड हार्टले नांवाच्या आपल्या इंग्रज मित्रास एक पत्र लिहिलें. हा गृहस्थ पार्लमेंटचा एक सभासद होता; हें पत्र बरेंच लांबलचक असल्यामुळें त्याच्या शेवटचा थोडा भाग मात्र येथें दिला आहे.

" लिहिलेला मजकूर पुनः वाचीत असतां त्यांतील बराच भाग कडक असल्यामुळें गाळावा, असें मला वाटलें, परंतु त्यामुळें खालीं लिहिलेले विचार तरी तुमच्या मनांत येतील असें वाटल्यावरून तो तसाच ठेऊन दिला. ते विचार असे."

"एकादा मनुष्य स्वभावानें शांत व म्हातारपणामुळें विशेष शांत झाला असतांही त्याला त्याच्या देशाशीं आपण केलेल्या वर्तनानें जर एवढा संताप आला आहे, तर त्या देशाचे इतर लोक आपणावर किती खवळले असतील?

"×आल्हाचें किंवा एकंदर स्पेन देशांतील लोकांचें नांव ऐकिल्यावर हालंडांतील मुलांस जसा हल्लीं संताप येतो, त्याप्रमाणेंच आमचें नांव ऐकितांच ज्यांच्या तळपायाची आग मस्तकास पोहोंचावी, अशारीतीचें शत्रुत्व दुष्कृत्य करून आह्मी हल्लींच्या अमेरिकन लोकांशीं व त्यांच्या वंशजांशीं कां संपादन करीत आहों?" असेंही तुह्मांस वाटूं लागो.

वुइल्यम टेंपल फ्रँक्लिन याची चालचर्या सर्व डा. फ्रँक्लिनप्रमाणेंच असल्यामुळें तो सर्वांचा फार आवडता झाला. जेव्हां पराजयाच्या बातम्यावर बातम्या धडकूं लागल्या त्यावेळीं आमचा वृद्ध चरित्रनायक चोवीस तासांपैकीं बारा तास आपल्या देशाची पतकरलेली चाकरी करण्यांत खर्चीत होता. केवढीही विलक्षण शक्ति आणि कार्यतत्परता!

एके दिवशीं पॅरिस मधील एक इंग्रज मोठ्या अदबीनें फ्रँक्लिनाला ह्मणाला कीं, "डाक्टर साहेब, हाऊनें फिलाडेल्फिया काबीज केला!"

तो ह्मणाला, "महाराज असें नाहीं. उलटें फिला-

× आल्हा हा स्पेनच्या सेनेचा मुख्य होता. इ. स. १५६७ सालीं हालंड व बेलाडिआलच्या लोकांनीं स्पेन विरुद्ध बंड केलें तें यानें हजारों लोकांस मोठ्या क्रूरतेनें ठार मारून मोडून टाकलें.

डेलिफयानेंच हाऊला काबीज केलें. " आणि खरोखरच शेवटीं फ्रँक्लिनाची थट्टा खरी झाली.

जनरल वरगायनी अमेरिकनांस शरण आला, ही बातमी कळतांच फ्रँक्लिनाला जो आनंद झाला, तो सांगतां येत नाहीं. दुसरे दोघे मुकत्यारही त्याकडे येऊन म्हणाले, " जनरल वरगायनी आणि त्याचें सर्व सैन्य लढाईंत कैद केलें. "

हे तिघे मुखत्यार एके ठिकाणीं मिळतांच त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. आतां फ्रान्स आपणास उघड रीतीनें मदत करील आणि अशा रीतीनें आपण स्वतंत्र होऊं, असें त्यांना खात्रीपूर्वक वाटूं लागलें. ते फ्रँक्लिनाच्या दिवाणखान्यांत बसले आणि आनंदाच्या बातम्या वाचण्यांत व फ्रेंच लोकांशीं समेट करण्याच्या बेतांत, त्यांनीं तो सर्व दिवस तेथें घालविला. फ्रान्सला ही मोठा आनंद होऊन फ्रान्स व अमेरिका या दोन राष्ट्रांमध्यें लवकरच तह झाला.

आतां वसाहतींशीं असणारा आपला व्यापार फ्रान्सच्या हातांत खास जाणार, असें वाटून इंग्लंडला मोठी भीति उत्पन्न झाली, आणि लढाईच्या पूर्वींच्या अमेरिकन लोकांच्या सर्व मागण्या कबूल करण्याकरितां इंग्रजांनीं आपले मुखत्यार फ्रँक्लिनाकडे पाठविले परंतु गेलेली वेळ

* वारगायर्न हा अमेरिकेशीं झालेल्या युद्धांत इंग्रजांचा सेनापति होता त्याचा दोन लढायांत पराभव होऊन तो इ. स. १७७७ सालीं अमेरिकन लोकांच्या स्वाधीन झाला.

पुन्हीं येत नाहीं. अमेरिकन लोक आतां स्वातंत्र्यावांचून कोणतीच अट कबूल करीनात.

हा फ्रान्स व अमेरिका या दोन राष्ट्रांमधला स्मरणांतून कधींही न जाणारा तह ता. ९ फेब्रूआरी १७७८ रोजीं झाला. त्याचा मुख्य उद्देश अमेरिका स्वतंत्र व्हावी, असा असून त्यांत एकमेकांच्या संमतीवांचून इंग्रजांशीं तह करूंनये, असें ठरलें.

ह्या तहाची वातमी इंग्लंडमध्यें पोहोंचतांच मोठी चळवळ उडाली. इ. स. १७७८ त फेब्रुआरीच्या १७ व्या तारिखेस पार्लमेंट सभागृहांत एकच गर्दी जमली. जिकडे तिकडे शांतता झाल्यावर लार्ड **नार्थनें** फ्रँक्लिनच्या पूर्वींच्या सर्व अटी कबूल करून ऐक्य करावें, अशा अर्थाचा कायद्याचा खरडा सभेपुढें आणिला. **फॉक्स** जरी पूर्वी विरुद्ध पक्षाचा होता, तरी त्यानेंही या तहा विषयीं आपली संमति दिली.

अमेरिकन मुखत्यारांस फ्रान्सच्या बादशाहाच्या भेटीस बोलाविलें. **फ्रँक्लिनानें** त्यावेळच्या अति उच्चप्रतीच्या अमेरिकनाप्रमाणें सुंदर व व्यवस्थेशीर पोषाख केला होता, व बाकीच्या दोघांनीं ही राजदर्शनसमयास योग्य असे पोषाख चढविले होते. हा समारंभ ता. २० मार्च रोजीं झाला. तिघेही मुखत्यार बरोबर नेहमींचा परिवार घेऊन आपआपल्या गाडींतून बादशाहाच्या भेटीस चालले असतां वाटेनें लोकांनीं त्यांच्या विषयीं मोठी पूज्यबुद्धि दाखविली. हें पाहून त्यांना फार आनंद झाला. सोळाव्या

लुई राजानें आणि त्याच्या पत्नीनें त्यांचा मोठा सत्कार केला. या सर्व गोष्टींमुळें लार्ड टारमन्ट नांवाच्या इंग्लिश वकिलास मोठा राग आला आणि तो बादशहालाही न विचारितां इंग्लंडला निघून गेला.

ही तहाविषयींची आनंदाची बातमी ऐकतांच अमेरिकन लोकांच्या मनाची झालेली स्थिति कोण वर्णन करील? ता. ६ मे रोजीं जार्ज वाशिंग्टनानें ही बातमी आपल्या लोकांकडून जिकडे तिकडे पसरविली, आणि ह्या घडलेल्या गोष्टी बद्दल त्यानें आपल्या लहानशा टोळीनिशीं ईश्वराची प्रार्थना करून जगन्नियंत्याचे फार फार आभार मानिले. आतां इंग्लिशांचे विचार अगदीं बदलले. त्यांनीं अमेरिकनांस भीति दाखविण्याचें सोडून त्यांच्याशीं सख्य करण्याचा प्रयत्न चालविला. त्यांचे पुष्कळ प्रतिनिधी निरोप घेऊन फ्रँक्लिनाकडे आले, त्या सर्व निरोपांचा सारांश असा होताः—

"आमच्या प्रियकर वसाहत वाल्यांनो, तुह्मीं आपला परंपरागत आजन्मशत्रु जो फ्रान्स देश त्याच्याशीं सख्य करावें, हें आह्मांला मुळींच बरोबर वाटत नाहीं. तुह्मी प्रोटेस्टंट असून रोमन क्याथोलिकांशीं सख्य करणें तुह्मांला आवडतें काय? जर तुह्मी इंग्लंडशीं मिळून रहाल, तर आह्मीं तुमच्या मागण्याप्रमाणें किंबहुना कांहीं जास्त अधिकार सुद्धां तुह्मांला देऊं, परंतु आपल्या जन्मभूमीचा त्याग करून आणि त्या दुष्ट फ्रान्साच्या गर्विष्ठपणास उत्तेजन देऊन त्याच्या सामर्थ्यांत भर पाडूं नका."

हे सर्व प्रयत्न आतां अगदीं व्यर्थ होते. कारण वसाहतींतील लोकांच्या मनांत इंग्लंडाविषयीं पक्का तिटकारा उत्पन्न झाला होता. त्यांना आपल्या ह्या बंधुत्वाच्या नात्यास नालायक ठरलेल्या मंडळीबरोबर सख्य करण्याची इच्छा नव्हती. व इंग्लंडनें कितीही प्रयत्न केला, तरी आतां आपण स्वतंत्र होणार, हें त्यांना पक्कें कळून चुकलें होतें; ह्मणून सर्वांनीं ह्या वड्या देणग्या नाकारिल्या.

पुढें फ्रँक्लिनाला चार्लस डी वुइसेन्स्टेन या सहीचें एक विलक्षण पत्र आलें. परंतु फ्रँक्लिन पडला पक्का शोधक, त्याला शोधांअंतीं तें, तिसऱ्या जार्ज राजानें स्वतः पाठविलें होतें असें समजलें. ह्यांत, ' दुष्ट फ्रेंच लोक खोटीं अभिवचनें देऊन अमेरिकन लोकांस फशीं पाडतील ' असें लिहिलें होतें. आणि अमेरिकन लोकांस उदारपणें अधिकार दिल्यावर जर ते पूर्वीप्रमाणें इंग्रजांची प्रजा होऊन रहातील, तर ज्या लोकांवर पूर्वीं राजद्रोही ठरण्याचा प्रसंग आला होता, त्यांस या पत्रांत पुढील वचन दिलें होतें.

" फ्रँक्लिन, वाशिंग्टन, ॲडाम्स हॅन्काक आदिकरून मंडळींनें अव्याहत परिश्रम करून देशसेवेंत काळ घालविला, तेव्हां त्यांना त्यांच्या बुद्धिप्रभावाचें योग्य बक्षीस मिळूं नये, ही चूक आहे, असें जाणून सरकार त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणें अधिकार किंवा आमरण पेन्शन करून देईल. तसेंच हल्लींचा राजा किंवा त्याचे मागून त्याच्या गादीवर बसणाऱ्यांपैकीं कोणास केव्हांही सत्ताधारी सरदार निवडण्याचें कारण पडल्यास यांस किंवा त्यांच्या

वंशजांस प्रथम निवडलें जाईल." अमेरिकेच्या झालेल्या अपमानामुळें आणि तिनें भोगिलेल्या दुःखामुळें फ्रँक्लिनाचा प्राण तिळ तिळ तुटत होता. त्यानें आपल्या मित्रांचें मत घेऊन इंग्रजांस एक पत्र लिहिलें, त्याच्या शेवटचें कलम आ ी येथें देतों. "अमेरिकेला स्वातंत्र्य मिळालें आहे आतां तें नाहींसं करण्याविषयीं इंग्लंडनें कितीही श्रम केले, तरी ते फुकट आहेत. कारण, इंग्लंड हें स्वातंत्र्य कबूल करो वा न करो, त्याची अमेरिकन लोक मुळींच फिकीर करीत नाहींत." ह्यापुढें तो लिहितो,—

"आह्मी आपल्या मुसक्या आणि हातपाय बांधून सुळावर चढण्याच्या तयारीनें हां कीं चूं न करितां सर्व जगांत आपला वाली नाहीं असें समजून केवळ पार्लमेंटच्या वचनावर भरंवसा ठेऊन तुमच्या स्वाधीन व्हावें, ह्या तुमच्या लिहिण्यावरून तुह्मीं आह्मांस अजून पुरतें ओळखिलें नाहीं, व आह्मीं तुह्मांस ओळखिलें नाहीं, असा तुमचा ग्रह असावा, असें स्पष्ट होतें. आम्हाला पार्लमेंटच्या या पोकळ वचनावरच भरंसा ठेवावयाचा आहे, असें नाहीं. तर तुम्हीं आम्हास अधिकाराच्या जागा, आजन्म पेन्शन आणि सरदारीचा हक्कही अशा अनेक लुचपती देण्याच्या आशा दाखविल्या आहेत."

"तुमच्या मतें ह्या वरच्या अधिकाराच्या आशा म्हणजे केवळ न तोडतां येण्यासरखे पाश आहेत, असें दिसतें. ही आम्हाला भ्रष्ट करणारी आपली देणगी तुमची खासगी नसून तुमच्या राजाच्या सहीनिशी

पत्ररूपानें मजपाशीं आहे. परंतु अमेरिकेंतील लोकांनीं हें पत्र कोणत्या दृष्टीनें पाहिलें असेल याचा एक क्षणभर तरी विचार करा."

"आह्मांला, आपण आमच्यावरच, अधिकार देणार. कारण तुमच्यावरील अधिकार तुह्मीं आपणाकरितांच राखून ठेविले आहेत. तेव्हां आह्मीं असल्या बढतीच्या जागा मिळवून आपले पगार आपल्याच पैशांतून घ्यावयाचे, तसेंच तुह्मी आह्माला आम्ही योग्य ठरल्यास अथवा निर्दोष चाकरी केल्यास जें पेन्शन देणार, तेंही आमच्यापासून तुम्हांस मिळणाऱ्या उत्पन्नांतूनच असावयाचें!"

"आमच्या एवढ्या दिवसांच्या अनुभवावरून आपली सरदारी तर आह्मांस केवळ गुलामगिरी वाटते. कारण या सरदारांना प्रधानमंडळाच्या प्रत्येक सूचनेस–ती कितीही निंद्य असली तरी—नंदीबैलांप्रमाणें माना हालवाव्या लागतात. मग त्यांत आमचा मान तो काय राहिला! तेव्हां नाटकी सरदारपणा अथवा नीचत्व आणि मूर्खत्व यांच्या या संमिश्रणाचा आमच्यापैकीं जो कोणी स्वीकार करील, त्याला त्याचा त्याग करणें भाग पडेल. नाहीं पेक्षां आपला आजन्म बदलौकिक तरी करून घ्यावा लागेल."

जें पुस्तक राजानें पुष्कळ वेळां वाचलें होतें त्या पुस्तकांतील एक गोष्ट, पुनः वाचण्यास सांगितली होती; ती गोष्ट अशीः—

याच पत्रांत त्यानें तिसऱ्या जार्ज राजास "एका

राजानें आपल्या राज्यांत झालेला बखेडा मोडण्याकरितां त्यांतील पुढाऱ्यांस मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांचे अपराध माफ करण्याविषयीं वचन दिलें व यामुळें सर्व बखेडा मोडला. आतां दिलेलीं वचनें पाळावीं किंवा नाहीं, असा राजानें आपल्या मुत्सद्यांस प्रश्न विचारला. ते ह्मणाले, ' वचनें दिल्याशिवाय बंड मोडणें अशक्य असल्यामुळें तीं देणें हें रास्त होतें, परंतु बंडखोरांना शिक्षा झालीच पाहिजे, याकरितां तीं पाळणें मात्र रास्त होणार नाहीं "

फ्रँक्लिनाला दुष्ट शत्रु बरेच होते. त्यांपैकीं एकानें त्याचा व त्याच्या प्रिय नातवाचा वियोग करण्याचा घाट घातला; हें समजल्यावर त्या पाऊणशें वर्षांच्या वृद्ध फ्रँक्लिनाच्या मनाची जी स्थिति झाली, ती त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें लिहून ठेविली आहे :—

" माझा मुलगा तिकडे आहे, तेवढेंच पुरे. नातवालाही ते आणखीं ओढणार काय ! त्याच्याच जिवावर मीं ह्या ह्मातारपणीं केवळ राष्ट्रीयसभेच्या सांगण्यावरून थंडीच्या दिवसांत हा प्रवास पतकरिला. मीं ह्या परकी देशांत आजारी पडलों तर त्याच्यावांचून समाधानाला मला दुसरी जागाच नाहीं. मरतेवेळीं मला मांडी देण्यास आणि पुढें माझी उत्तरक्रिया करण्यास हा या ठिकाणीं मला मोठाच आधार आहे. माझी आज्ञा पाळण्याविषयींची त्याची दक्षता आणि कर्तव्यतत्परता पाहून मला फार आनंद वाटतो, याच्यासारखा मला खासगी

चिरंजीस मिळणें नाहीं, आणि माझी पक्की खात्री आहे कीं, आमची राष्ट्रीयसभा माझी व याची कधींच तुटातुट करणार नाहीं."

अमेरिकेच्या आरमारांत आणि सैन्यांत भरती करण्याकरितां पैसा पाहिजे होता, तो मिळविण्याची फ्रँक्लिनानें मोठ्या जारीनें खटपट चालविली. फ्रान्सचा खजिना रिकामा पडून दिवाळें वाजण्याचा समय आला होता. ह्यापुढील तीनवर्षांत त्याला जितक्या अडचणी आल्या तितक्या पूर्वी कधींच आल्या नव्हत्या. फ्रान्स, देशांतील राजसत्ता फ्रँक्लिनानेंच मोडिली असें ह्मणतात, तें खोटें नाहीं. असें करण्याची त्याची इच्छा नव्हती. सैन्याच्या मदतीवांचून बक्षीस किंवा उसने या रूपानें फ्रान्सनें एक कोटि साठलक्ष फ्रँक अमेरिकेच्या राष्ट्रीयसभेस दिले.

फ्रान्समधून आलेली सैन्याची मदत पाहून अमेरिकन लोकांस अमर्याद आवेश चढला. ह्या सैन्याला मिळालेलें शिक्षण खरोखरच आश्चर्यकारक होतें. हे सैनिक शेतेंभातें, बागबगीचे यांचें महत्व चांगल्या प्रकारें जाणत असल्यामुळें नासधूस मुळींच करीत नसत.

एकदां इंग्लंडच्या मनांत तह करण्याचें आलें, त्यावेळीं जॉन ॲडाम्स यास, तो ठरविण्याचे कामीं फ्रँक्लिनाला मदत करण्याकरितां पाठविलें. तो फारच योग्य व सुज्ञ मनुष्य होता. परंतु जातीचा इंग्रज असल्यामुळें फ्रेंचांशीं उद्दामपणानें वागणें व त्यांना तुच्छ मानणें यांत

त्याला कांहींच वाटत नसे, व हा त्याचा ग्रह कशानेंही दूर होण्यासारखा नव्हता. त्याच्या आंगची सभ्यपणाची उणीव आणि फ्रेंच लोक अमेरिकनांस केवळ स्वार्थबुद्धीनें मदत करीत आहेत, याकरितां त्यांचे त्यांवर मुळींच उपकार नाहींत, अशा रीतीचे स्पष्टोद्गारही फ्रँक्लिनाला नेहमीं घोंटाळ्यांत पाडीत. एकदां ह्या खरमरित मनुष्यानें एका फ्रेंच गृहस्थाशीं अपमान करण्यासारखा जरी नव्हे तरी असभ्यतेचा पत्रव्यवहार केला. त्याबद्दल राष्ट्रीयसभेनें व फ्रँक्लिनानें त्याला पुष्कळ दोष दिला. परंतु त्याच्या स्वदेशाभिमानाविषयीं व पूज्य हेतूविषयीं सर्वांस चांगली माहिती असल्यामुळें ह्यावेळीं जास्त कांहीं झालें नाहीं.

फ्रँक्लिनाला हा पत्रव्यवहार राष्ट्रीयसभेपुढें आणण्या विषयीं पुष्कळांनीं विनंति केल्यावरून त्यानें आपलें कर्तव्य समजून तो सभेकडे पाठविला. हें पाहून ॲडाम्सला फारच राग आला. त्या घोंटाळ्याच्या प्रसंगीं फ्रँक्लिनाचा शहाणपणा आणि दूरदृष्टि चांगलीच दिसून आली. अमेरिकेंतील ब्रिटिश सैन्यानें अद्यापि आपला राक्षसीपणा चालविलाच होता. राष्ट्रीयसभेनें इंग्रजलोकांचें अमेरिकनांशीं पशुतुल्य वर्तन दाखविणारीं पस्तीस चित्रें घालून, इंग्रजांचा दुष्टपणा लहान मुलांच्या मनांत भरविणारें एक पुस्तक तयार करण्यास फ्रँक्लिनला सांगितलें, परंतु हा बेत शेवटास गेला नाहीं.

आपल्या आयुष्याचीं पन्नास वर्षें लोककार्यांत खर्चून

वयाचे पंचाहत्तराव्या वर्षी ह्मणजे इ. स. १७८१ त फ्रँक्लिनानें पतकरलेल्या महत्वाच्या कामांतून मुक्त होण्याची आपली इच्छा राष्ट्रीयसभेस कळविली. सभेला त्याचें काम होतें, ह्मणून तिनें त्याला मुक्त न करितां एक जास्तच कामगिरी सांगून जो तह होईलशीं चिन्हें दिसत होतीं, त्याचे ठराव करण्यास नेमिलें व ॲडाम्स आणि जे ह्या दोघांस त्याच्या मदतीस दिलें.

लार्ड कार्नवालिस अमेरिकनांस शरण गेला, ही बातमी मुख्य प्रधान लार्ड नार्थ यास कळतांच त्याच्या उरांत धडकी भरली आणि " हे परमेश्वरा, आमचा सर्वस्वी नाश झाला ! " असें ह्मणत तो आपल्या दिवाणखान्यांत इकडे तिकडे फिरूं लागला.

इंग्लंडमध्यें सर्व लोक लढाई झाली नसती तर बरें, असें ह्मणूं लागले. कारण तेथले हजारों लोक बळी पडले आणि पुष्कळ पैसा खर्च झाला. फ्रेंच लोकांचा संबंध तोडून टाकून आपणाशीं तह करावा, ह्मणून पारिस येथील अमेरिकन वकिलांस पैसे भरण्याची इंग्रज लोकांनीं खटपट चालविली. त्यावर फ्रँक्लिनानें उत्तर लिहिलें:—

" दुष्ट आणि अन्यायी शत्रूंशीं तह करण्याकरितां आपल्या उदार आणि सभ्य मित्रांशीं वांकडें होणें ज्याला पसंत पडेल, असे मनुष्य कांहीं इंग्रजवर्गीयांशिवाय साऱ्या अमेरिकेंत मुळींच सांपडणार नाहींत. "

फ्रान्स आणि अमेरिका यांचा संबंध तुटावा ह्मणून इंग्रजांनीं आपली शिकस्त केली. त्यावेळचे दिवाण ग्रेनव्हिल

यांनीं फ्रँक्लिनाला भेटून " फ्रान्स हा आपमतलबानें तुह्मांस साहा करीत आहे. तेव्हां त्याबद्दल तुह्मांस एवढी कृतज्ञता दाखविण्याची जरूर नाहीं, " असें सांगितलें. त्यावर **फ्रँक्लिन** ह्मणाला:—

" आह्मांवर आलेल्या ऐन प्रसंगीं कोणत्याही रीतीच्या हक्कासाठीं अडवून न धरितां अथवा कोणत्याही प्रकारच्या फायद्याकडे लक्ष न देतां फ्रान्सनें दिलेल्या मदतीबद्दल उतराई होण्याचें टाकून असल्या प्रकारचे विचार मनांत आणणें आह्मांस मुळींच आवडत नाहीं. "

इ. स. १७८२ च्या फेब्रुआरी महिन्याच्या २८ व्या तारिखेस **जनरल कान्वे** यानें **हाऊस ऑफ कॉमन्स** सभेपुढें हत्यारांच्या बलानें वसाहतींतील लोकांस हटविणें फार कठिण आहे अशा आशयाचा एक ठराव आणिला. तो बहुमतानें मंजूर होऊन अमेरिकेशीं चाललेल्या लढाईचा शेवट झाला. ही हकीकत राजास कळतांच त्याला मोठा संताप आला. परंतु अखेर दुराग्रह सोडून *लिबरल पक्षास मिळण्याची त्याला पाळी आली.

---

\+ लिबरल व कान्सरव्हेटिव असे समाजांत दोन पक्ष आहेत. लिबरल ह्मणजे प्रचलित धार्मिक सामाजिक किंवा राजविषयक तत्वांप्रमाणेंच न वागतां स्वतःच्या विचारांस योग्य वाटतील त्या तत्वांप्रमाणें वागून प्रजास्वातंत्र्याचा अभिमान वाळगणारा आणि याच्या उलट कान्सरव्हेटिव ह्मणजे धार्मिक सामाजिक किंवा राजकीय गोष्टींत अंधाप्रमाणें रूढीचें अवलंबन करून केवळ राजाचा अभिमान वाळगणारा.

"आतां तहाच्या कलमांसंबंधीं वादविवाद चालू झाला; त्यांत सरहद्दीसंबंधीं, मासे मारण्यासंबंधीं व उत्तर अमेरिकेंतील ज्या राजपक्षाकडील लोकांचीं उत्पन्नें जप्त केलीं होतीं, त्यांच्या मोबदल्यासंबंधीं. असे मुख्य तीन प्रश्न होते.

ह्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां खासगी, खासगी आणि सरकारी, आणि निव्वळ सरकारी अशा सभा पुष्कळच भरल्या. **फ्रँक्लिन** ह्मणेल त्याप्रमाणें त्याचे सर्व देशबांधव वागतील, असा लोकांचा समज दृढ असल्यामुळें हर प्रयत्न करून पुष्कळांनीं त्याच्या भेटी घेतल्या. आणि फ्रेंच लोकांच्या नकळत स्वतंत्र रीतीनें तह करण्याविषयीं त्या अमेरिकन मुखत्यारांचीं मनें वळविण्याची तर त्यांनीं आपली शिकस्त केली.

ह्यांपैकीं एके प्रसंगीं **ग्रेनव्हिल** साहेब ह्मणतात. "इंग्लंडानें होऊनच जर अमेरिकेला स्वातंत्र्य दिलें तर?" ह्यावर फ्रेंच प्रधान हंसून ह्मणतो, "अमेरिका आतां तुमच्याजवळ स्वातंत्र्य मुळींच मागत नाहीं, कारण तिनें आपलें स्वातंत्र्य तुह्मांपासून हिसकावून घेतलें आहे. आतां याबद्दल **फ्रँक्लिन** आपणाला उत्तर देतील."

**फ्रँक्लिन** ह्मणाला, "जें आतां आमचेंच आहे, त्याबद्दलचें बोलणें करण्याची आह्मांला अगदीं जरूरी नाहीं. आह्मीं आमचे प्राण आणि धन खर्चीं घालून आपलें स्वातंत्र्य पूर्णपणें खरेदी केलें आहे."

बरोबरचे मुखत्यार गैरवाकब असल्यामुळें ह्या प्रसंगीं

एकंदर व्यवस्था चालविणाऱ्या मनुष्याच्या अंगीं पुष्कळच शहाणपणा पाहिजे होता खरोखरच अशा प्रसंगीं निभावून नेणारा साऱ्या अमेरिकेंत **फ्रँक्लिना**वांचून दुसरा कोणी मिळाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे. आपल्या देशाचें नुकसान करून फ्रेंच लोकांना **फ्रँक्लिन** संतुष्ट राखीत आहे, आणि असें करण्याचें कारण फ्रेंचांनीं त्याला लांच लुचपत देऊन आपल्या बाजूला ओढिला आहे, असा त्याविषयीं कांहीं लोकांस संशय येऊन त्यांनीं त्याप्रमाणें अमेरिकेंत पत्रें पाठविलीं. परंतु तिकडे चौकशी अंतीं त्याच्या निःसीम स्वदेश भक्तीविषयीं व फ्रेंचांच्या निरपेक्ष साहाय्य करण्याच्या बुद्धीविषयीं सर्व अमेरिकन लोकांची पूर्ण खात्री झाली.

इंग्लिश प्रधानमंडळाचें असें मत होतें कीं, ज्या अमेरिकन राजपक्षाकडील लोकांचीं उत्पन्नें जप्त झालीं; तीं त्यांचीं त्यांस परत द्यावीं व त्यांचें आजवर झालेलें नुकसान भरून द्यावें. ह्यावर **फ्रँक्लिनानें** तहाच्या एकंदर कलमांत घालण्या करितां खालचें कलम देऊन त्यांचें तोंड बंद केलें.

" **बोस्टन**येथील ज्या व्यापाऱ्यांचा व दुकानदारांचा माल त्यांच्या कोठ्यांतून वखारींतून अथवा दुकानांतून जनरल **गेझ** व दुसरे अधिकारी यांनीं बाहेर काढून आपल्या सैन्याकडून त्याची वाताहत करविली त्यांस, **फिलाडेलफिया**मधील ज्या लोकांचा माल सैनिकांनीं उठ-

विलें त्यांस, व लढाई चालू होण्यापूर्वी व्हर्जिनिया, उत्तर व दक्षिण कॅरोलिना आणि जार्जिया वगैरे संयुक्त वसाहतींतील ज्या लोकांची नीळ, तंबाखू आणि तांदूळ नेले, ज्यांना गुलाम बनविलें आणि ज्यांचीं जहाजें वगैरे जनरल ऑरनाल्ड कार्नवालिस वगैरेच्या सैनिकांनीं पळविलीं त्यांस, त्यांच्या नुकसानीची भरपाई करण्याविषयीं इंग्लंडच्या राजानें आपल्या पार्लमेंट सभेस शिफारस करावी व संयुक्त संस्थानांतील जीं खेडींपाडीं व शहरें जाळलीं असतील व ज्या शेतांची नासधूस केली असेल त्यांची नुकसानीही राजानें भरून देववावी."

हें ऐकून त्या तिघां इंग्लिश मुखत्यारांचीं तोंडे बंद झालीं व फ्रेंचांच्या संमतीनें ह्या उभय राष्ट्रांत अमेरिकेस अनुकूल असा तह ता. ३० नोव्हेंबर १७८२ रोजीं पारिस येथें ठरून अमेरिकेस पूर्ण स्वातंत्र्य देण्याचें इंग्लंडनें कबूल केलें. पुढें ता. १२ जान्युआरी १७८३ रोजीं व्हरसेल येथें फ्रेंच व इंग्लिश यांच्यामध्यें तह झाला.

ही बातमी कळतांच अमेरिकेंतील लोकांस कृतकृत्य झालों असें वाटून फार आनंद झाला. व इंग्लंडमध्येंही राजा आणि त्याच्या प्रधानमंडळांतील थोडी मंडळी याशिवाय सर्वांस मोठें समाधान वाटलें. इंग्लंडनें दिलेलीं सर्व दुःखें विसरून जाऊन आपल्या थोड्याशा दुर्बळ संस्थानांचें एक बडें लोकसत्तात्मक संयुक्त राष्ट्र बनलें, याबद्दल अमेरिकन मुत्सद्यांनीं मोठा आनंद प्रदर्शित केला व असें करणें इंग्लंडास मोठें भूषण होय, असेंही ह्मणून

दाखविलें. असो. सारांश, याप्रमाणें इंग्रज लोकांनीं भलत्याच अभिमानाच्या भरीस पडून आपल्याच हातानें आपलें नुकसान करून घेतलें.

# भाग १५ वा.

## शेवट !

आपल्या कृत्यांशीं ईश्वराचा संबंध—**थॉमस पेन** यास उपदेश—**फ्रँक्लिना**ची योग्यता—मुलाचें परत येणें—प्रवास समुद्रावर झोंप—अमेरिकेला परत येणें—त्याचा सन्मान—गव्हरनराचे जागीं त्याची नेमणूक—त्याचीं धर्ममतें—मरणाची इच्छा—मृत्यु !

ह्या वेळेच्या सुमारास डा. **फ्रँक्लिना**चे धर्मसंबंधीं विचार जाणणाऱ्या एका गृहस्थानें मनुष्याच्या कृत्यांशीं ईश्वराचा कांहींच संबंध नाहीं, अशा अर्थाचा एक लेख लिहून तो **फ्रँक्लिना**चे अभिप्रायास पाठविला. जरी **फ्रँक्लिन** येशूख्रिस्तास ईश्वरी अंश मानीत नव्हता व ख्रिस्ती शास्त्रास ईश्वरप्रणित समजत नव्हता, तरी मनुष्यांच्या कृत्यांवर नजर ठेवणारा परमेश्वर असून त्याची भक्ति सर्वांनीं करावी, असें त्याचें मत अलीकडे झालें होतें. वरील लेख लिहिणारा **थॉमस पेन** असावा असें पुष्कळांचें मत आहे.

त्या लेखावर फ्रँक्लिनानें लिहिलेलें उत्तर सर्वांनीं लक्षांत वागविण्यासारखें आहे; तें असें:—

"मी आपला लेख मन लावून वाचला. ईश्वराचें अस्तित्व आपण कबूल करितांच. परंतु त्याचा मनुष्याच्या कृत्याशीं संबंध नाहीं. हें सिद्ध करून देतांना जें प्रमाण पुढें आणितां त्याच्या योगानें सर्व धर्माच्या मूळावरच घाव घालण्याचा आपला उद्देश दिसतो. ईश्वराचा आपल्या कृत्यांशीं कांहीं संबंध असून तो आपल्या पापपुण्याचा झाडा घेणारा आहे, असा मनुष्याचा समज असल्याःवांचून त्याची भक्ति कोणीही करणार नाहीं, अथवा त्याची भीतिही कोणी बाळगणार नाहीं. तुमच्या या खर्ड्यावर मीं टीका करावी अशी जरी तुमची इच्छा दिसते तरी मला त्याची जरूर नाहीं. सध्यां मी इतकेंच ह्मणतों कीं, तुमचे विचार जरी साधारण बरे आहेत, व त्यांच्या योगानें कांहीं मंडळीवर जरी थोडाबहुत परिणाम होईल, तरी लोकमत फिरविण्याचें त्यांच्या आंगीं मुळींच सामर्थ्य नाहीं. आणि जर हा लेख तुम्ही छापून प्रसिद्ध कराल तर लोक तुमचा द्वेष करितील, तुमचें नुकसान होईल आणि लोकांचाही फायदा होणार नाहीं. हें तुमचें करणें, सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न करून आपल्याच आंगावर थुंकी उडवून घेण्यासारिखें अज्ञानपणाचें होय.

"शेवटीं माझें तुह्मांला इतकेंच सांगणें आहे कीं, हा लेख प्रसिद्ध करून तुह्मी सर्पाच्या फडेवर पाय देऊं नका. तो लेख दुसऱ्या कोणीं पाहिला नाहीं तोंच त्याची जाळून

राख करा. असें केलें असतां तुमच्या भावी शत्रूंकडून तुमची हुर्यो होणार नाहीं, आणि तुह्मांवर पश्चात्तापानें दुःख करण्याची पाळी येणार नाहीं. धर्मबंधनें आणि ईश्वराची भीति असतांही इतके दुष्ट लोक जगांत आहेत, तर ह्या दोन्ही गोष्टींच्या अभावीं काय स्थिति होईल, याचा विचार करा."

मागील भागांत सांगितलेला तह ठरून ता. १४ जानेवारी सन १७८४ रोजीं तो अमेरिकेच्या राष्ट्रीयसभेनें मोठ्या आनंदानें मान्य केला व पुढील एप्रिलमध्यें इंग्लंडच्या राजानें त्यावर आपली सही केली. अशा रीतीनें सव्वादोन वर्षांपूर्वी लाविलेलें बोलणें पुढें कायम झालें.

लढाई संपल्यावर पुष्कळ इंग्लिश लोक **पॅरिसला** गेले. त्यावेळीं **फ्रँक्लिना**सारखा मनुष्य सर्व युरोपखंडांतही सांपडणें कठिण, अशी त्यांची पक्की खातरी झाली. सर्व राष्ट्रांतील प्रख्यात लोकांची त्याच्या बिऱ्हाडीं एकच गर्दी उडाली. त्याचें वय ह्यावेळीं अठ्याहत्तर वर्षांचें असून तो संधिवात आणि अशाच दुसऱ्या रोगांनीं जेरीस आला होता. ह्मणून मंडळीस आपल्या निजण्याच्या खोलींत आंगावर बनांत घेऊन गादीवर पडल्या पडल्याच भेटत असे. अशी स्थिति असतांही त्याच्या मनाची उमेद जशीच्या तशीच होती. जो जो त्याला पाही त्याला त्याला आनंद झाल्यावांचून रहात नसे. मि. **वेन्स** ह्मणतो:—

" माझ्या आयुष्यांत जे जे प्रसिद्ध गृहस्थ पाहण्याचा

म्हा योग आला, त्या सर्वांपेक्षां फ्रँक्लिन दिसण्यांत आणि बोलण्या चालण्यांत श्रेष्ट होय. त्याला पाहतांच मनांत पूज्यभाव उत्पन्न होतो. त्याचें वर्तन किती सभ्य आणि त्याचें बोलणें किती साधें! त्याचा कोटिक्रम तर फारच विलक्षण!!"

ह्या वेळेस फ्रँक्लिनानें लिहिलेले कांहीं निबंध फारच उत्तम वठले आहत. तो अमेरिकेंत जाण्याकरितां राष्ट्र-सभेच्या परवानगीची अगदीं वाट पहात होता. त्याचा मुलगा, इंग्रज सरकारापासून गव्हरनरच्या जागेचें पेन्शन घेऊन पुष्कळ वर्षांनीं आपल्या बापाला भेटून त्याची क्षमा मागण्याकरितां त्याकडे गेला. त्याच्या एकुलत्या एक मुलानें ह्यातारपणांत त्याला सोडून, त्यानें ज्या कामांत तन मन धन अर्पण केलें होतें, त्याविरुद्ध शस्त्र धरल्यामुळें जरी फ्रँक्लिनाला अतोनात दुःख झालें होतें तरी यावेळीं तो त्याला तोडून बोलला नाहीं.

यानंतर एक वर्षानें फ्रँक्लिनला अमेरिकेंत बोलाविलें, त्यावेळीं त्याला चालण्याची मुळींच शक्ति नव्हती. डो-लींत बसून मात्र त्याला जाववत असे. त्याच्या जाग्या-वर मि. जेफरसनची नेमणूक झाली असल्यामुळें तो पारिस. येथें येऊन दाखल झाला होता; त्याला एका फ्रेंच सरदारानें विचारिलें, "आपण डा० फ्रँक्लिनची जागा भरून टाकण्याकरितां आलां आहां काय?"

जेफरसन ह्मणाला, "छे! छे!! डाक्टर साहेबांची

जागा कोण भरून काढील? मी फक्त त्यांच्या पश्चात् त्यांचें काम करण्या करितां आलों आहें."

फ्रँक्लिन इतका अशक्त झाला होता कीं, तेथील राजाचा किंवा प्रधानाचा निरोप घेण्यास त्याला समक्ष जाववलें नाहीं. कृतज्ञताप्रदर्शक पत्रद्वारेंच त्यानें तें काम उरकून घेतलें. राजानेंही या पत्राचें उत्तर मोठ्या ममतेनें पाठवून चारशेंआठ हिरे जोडून आपली तसबीर त्याला पाठविली. हिची किंमत आजमासें तीस हजार रुपये होती.

फ्रँक्लिन अमेरिकेस जाण्याकरितां निघाला. हार्वेपर्यंत तो होडींतूनच गेला. त्याला पोहोंचविण्यास मंडळीची एकच गर्दी उडाली होती. वाटेनें ठिकठिकाणीं लोकांनीं त्याचा फारच सत्कार केला. इंग्रजसरकारानेंही त्याच्या सामानावर बंदरांत जकात घेऊंनये असा सर्वत्र हुकूम फरमाविला होता.

तो उत्तम पोहणारा होता, हें आमचे वाचक विसरले नसतीलच. वाटेनें जात असतां एके ठिकाणीं त्याच्या विलक्षण पोहण्याच्या शक्तीची एक गोष्ट घडून आली ती अशी :—समुद्राचें पाणी तापवून त्यानें स्नान केल्यावर फ्रँक्लिननें समुद्रपृष्ठावर एक तासपर्यंत यथेच्छ झोंप काढिली, अशी गोष्ट त्यानें आजपर्यंत कधींही केली नव्हती व तशी शक्य आहे असेंही तोंपर्यंत कोणास वाटलें नव्हतें.

तारीख ८ जूलै सन १७८९ रोजीं त्याचें गलबत

*सौथ्याम्टनहून निघालें, तें बरोबर सात आठवड्यांनीं ह्मणजे ता. १४ सप्टेंबर रोजीं फिलाडेलफियाच्या समोरच्या किनाऱ्यावर येऊन लागलें. या मुदतींत आमच्या ऐंशी वर्षांच्या चरित्रनायकानें तीन अत्युत्तम निबंध लिहिले. नाहीं तर आह्मी! आमच्या चाळीसाव्या वर्षी आमचे नेत्र आह्मांस सोडूं लागतात. पन्नास पंचावन वर्षांचे आह्मी झालों कीं, आह्मांस पोंक येऊन आमची सर्व शक्ति लुप्तप्राय होते आणि आह्मांस सुदैवानें साठी आलीच तर आमच्या बुद्धीचा नायनाट होऊन कोणतें ही काम करण्यास आह्मी निरुपयोगी बनतों! असो, फ्रँक्लिन लिहितो,-:

"माझा जांवई मजकरितां होडी घेऊन आला होता तींत बसून आह्मी बाजाररस्त्यावरील धक्यावर येऊन उतरलों. तेथें जमलेल्या हजारों लोकांनीं आनंदप्रदर्शक जयघोष करीत मला माझ्या घरापर्यंत नेऊन पोहोंचविलें. माझ्या घरचीं सर्व मनुष्यें खुशाल होतीं, याबद्दल परमेश्वराचे मीं फार फार आभार मानिले."

तेथील कायदे करणाऱ्या सभेनें त्याला मानपत्र दिलें व वाशिंग्टनानें त्याचें पत्रद्वारें मोठें अभिनंदन केलें. इतक्या लांबीच्या जलपर्यटनानें अपाय न होतां उलट त्याची प्रकृति पुष्कळच सुधारली. त्याला कारभारी मंडळीचा सभासद व लगेच अध्यक्ष निवडिलें, त्यामुळें त्याला फारच आनंद झाला. तो आपल्या एका मित्रास लिहितो:—

"माझ्या देशबांधवांनीं एकमतानें दर्शविलेली इच्छा

* उत्तरअमेरिकेंतून हडसनच्या आखातांत एक बेट आहे.

भंग करण्याचें माझ्या आंगीं धैर्य नसल्यामुळें मी त्यांची ही चाकरी आणखी एक वर्ष पतकरिली आहे. त्यांनीं माझ्या तरुणपणीं मजकडून काम घेतलें, माझ्या आयुष्याची मधली स्थिति आपल्या उपयोगांत आणिली व आतां वृद्धपणींही मला सोडण्याचा त्यांचा विचार दिसत नाहीं."

पुढें सत्याहत्तर मतांपैकीं शहात्तर मतें अनुकूळ पडून त्याची **पेनसिल्व्हेनियाच्या** गव्हरनराच्या जाग्यावर नेमणूक झाली. लढाई झाल्यावर तिचीं शेपटें कांहीं दिवस पर्यंत देशाला त्रास देत असतात, परंतु येथें तसें न होतां जिकडे तिकडे शांतता दृष्टीस पडूं लागली. परंतु इंग्लंडमधील राजपक्षाचे पत्रकार, अमेरिकन लोक इंग्रजी सत्तेस मुकल्यामुळें त्यांचें फार नुकसान झालें, असें आपल्या पत्रांतून लिहूं लागले. तेव्हां **फ्रँक्लिनानें** आपल्या तिकडील एका मित्रास अमेरिकेंतील खरी हकीकत लिहून कळविली.

नंतर संयुक्त संस्थानांचे पहिले अध्यक्ष **जार्ज वाशिंगटन** याच्या अध्यक्षतेखालीं एक जंगी सभा भरून एकंदर राजव्यवस्था चालविण्याचे नियम वगैरे कायम करण्यांत आले. ह्यावेळीं **फ्रँक्लिन** एक्यायशीं वर्षांचा असतांही रोज पांच तासप्रमाणें सतत चार महिने या सभेस जात असे. याचें नांव आरोग्य! त्याचीं धर्मसंबंधीं मतें शेवटपर्यंत जशींच्या तशींच कायम होतीं.

अमेरिकन लोक **वाशिंगटनाच्या** खालोखाल **फ्रँक्लिनाचेही** आपण ऋणी आहों असें मानितात. जसा सैन्याच्या कामांत **वाशिंगटनाचा** हात खंडा, तसा राजकीय

व्यवस्थेंत फ्रँक्लिन पूर्ण निष्णात, असा त्यांचा दृढ समज आहे.

त्याच्या कित्येक ख्रिस्ती मित्रांस त्याचीं धर्मसंबंधीं मतें आतां बदललीं असतील असें वाटल्यावरून त्यांनीं ख्रिस्त हा ईश्वरी अंश आहे किंवा नाहीं, हा नेहमींचा प्रश्न त्याला केला, तेव्हां तो ह्मणाला:—

" मी जगत्कर्त्या परमेश्वरावर भरंवसा ठेवितों, त्याला पूज्य मानितों आणि त्याच्याच हातांत या जगाचीं सर्व सूत्रें आहेत, असें समजतों. त्याच्या इतर मुलांवर ह्मणजे एकंदर मनुष्य जातीवर उपकार करणारा मनुष्य त्याला मनापासून आवडतो आणि आत्मा अमर असून त्याच्या कर्माप्रमाणें त्याला परलोकीं फळें भोगावीं लागतात. हींच सर्व धर्माचीं मूलतत्वें मला मान्य आहेत. ख्रिस्ताच्या दैविकांशाविषयीं मला कांहीं लोकांप्रमाणें संशयच आहे. "

त्यानें आतां आपला बहुतेक वेळ आत्मचरित्र लिहिण्यांत घालविला. त्याला वारंवार दुखण्यापासून त्रास सोसावा लागे, तरी आपण आतां लवकरच मरणार असें वाटून त्याला मोठा आनंद होत असे. एकदां त्याच्या मुलीनें आपला व त्याचा आणखी कांहीं दिवस सहवास असेल तर बरें, असें ह्मटलें; तेव्हां तो ह्मणाला, " माझी आतां जगण्याची मुळींच इच्छा नाहीं. "

एकदां त्याला दुखण्यांत आलेली कळ पाहून त्याला भेटण्याकरितां आलेला एक त्याचा उपाध्याय मित्र तसाच

जाऊं लागला, त्याला तो ह्मणाला, "थांबाहो, ही वेदना आतां नाहींशी होईल. शिवाय ती माझ्या कल्याणाकरितांच आहे. चिरकालिक सुखाकरितां क्षणिक दुःख सोसावें लागलें ह्मणून काय झालें?" ह्याच दिवशीं ह्मणजे ता. १७ एप्रिल इ. स. १७९० रोजीं रात्रीं सुमारें ११ वाजतां त्यानें परलोकचा मार्ग स्वीकारला. त्याचें वय ह्यावेळीं ८४ वर्षे ३ महिने आणि ११ दिवस इतकें होतें.

ह्याच्या आंगचे अत्यल्प दोष खेरीज करून फ्रँक्लिन हा सर्व मनुष्य जातींत एक जाडा विद्वान् दृढ निश्चयी आणि आपल्या जन्मभूमीचा पूर्ण अभिमानी असा होता, असें कोणीही वाचक कबूल करील, यांत शंका नाहीं. तो मेल्यापासून सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत त्याचें नांव सारखें गाजत आहे. व तें असेंच चिरकाल गाजत राहील यांत शंका नाहीं.

# भाग १६ वा.

## उपसंहार.

थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें
पहा जरा ॥ आपण त्यांच्या समान होऊं
हाचि सांपडे बोध खरा ॥ १ ॥

लॉंगफेलो ( भाषांतर )

चरित्र वाचना पासून होणाऱ्या अनेक फायद्यांत वाचकांच्या मनांत उत्पन्नहोणारी चरित्रनायकाच्या गुणांची अनुकरणेच्छा हाच मुख्य फायदा होय. आतां प्रस्तुत चरित्र वाचनापासून आपणाला काय शिकावयाचें ? अर्थात्, आमच्या चरित्र नायकाच्या कोणत्या गुणांचें अनुकरण आह्मीं करावयाचें ?—या बद्दल ह्या भागांत चार शब्द लिहून पुस्तक संपवावें असा आमचा विचार आहे.

अत्यंत गरीब कुलांत जन्म झाला असून, कोणत्याही प्रकारच्या साधनांची विशेषशी अनुकूलता नसतां, ज्या महात्म्यांनीं उदयाला येऊन आपला देश पारतंत्र्याच्या

दृढ श्रृंखलांपासून मुक्त केला; त्यांचींच चरित्रें या दिवसें दिवस वाढत असलेल्या आमच्या निकृष्टावस्थेंत आह्मीं वाचली पाहिजेत. कारण शस्त्रांनीं जरी नाहीं तरी लेखणीनें आह्माला आमच्या दयाळु सरकाराशीं; आह्मां अत्यंत राजनिष्ट प्रजेस योग्य अशी जी टक्कर मारावयाची आहे, तींत मार्गदर्शक ह्मणून त्याचा थोडा तरी उपयोग होईल. सध्यां, आह्मी क्षुद्र, यःकश्चित् आमच्याजवळ पैसा ना आडका, तेव्हां आमच्या हातून काय होणार? आह्मी भलतीच हांव धरावी कशाला! आमच्या सारख्यांनीं पोटापुरता विचार करावयाचा सोडून देशासंबंधीं महत्वाकांक्षा धरणें ह्मणजे वामनमूर्तीनें सूर्य मंडळाला स्पर्श करण्याची इच्छा धरणेंच होय. अशा प्रकारचे निराशेचे उद्गार जे लहानापासून थोरां पर्यंत सर्वांच्या तोंडून निघालेले ऐकू येतात त्यांनींच आमची सारी वाण होत आहे. आह्मांला **वामन** मूर्तीनेंच तीन पावलांत त्रैलोक्य व्यापून त्रिविक्रम नांव मिळविलें ही गोष्ट कळली पाहिजे; **वाल्याकोळीच** पुढें सुप्रसिद्ध **रामायणाचा** कर्ता आदिकवि **वाल्मीकी** झाला, ही गोष्ट आमच्या चित्तांत ठसली पाहिजे, आणि ढुंगाला लंगोटी लावून व घोंगडीं पांघरून रान भर भटकणाऱ्या मावळे गड्यांचेच पुढें **तानाजी मालुसरे, येसाजीकंक** आणि **बाजी पासलकर** बनले. या गोष्टी आमच्या हृद-

यांत आणल्या पाहिजेत. प्रस्तुत चरित्रा पासून मुख्यतः शिकावयाचें तें हेंच; यःकश्चित् मेणबत्त्या विकणाराचा मुलगा निरोप्याच्या कामापासून जगद्विख्यात मुत्सद्दी, महान् तत्ववेत्ता आणि कट्टादेशाभिमानी कसा बनत गेला; आणि आमच्या हतभागी आर्यभूमीप्रमाणें बहुतांशीं पारतंत्र्यांत पडलेली अमेरिका, फ्रँक्लिन, वाशिंग्टन वगैरे निधड्या छातीच्या निःसीम देशभक्तांच्या प्रयत्नां-मुळें स्वातंत्र्य सुखाचा अनुभव कशी घेऊं लागली, या सध्यांच्या चरित्रापासून शिकण्या सारख्या गोष्टी आमच्या मेंदूंत अगदीं जागत्या राहिल्या पाहिजेत. आमच्या पेक्षां कमी साधनें असणारीं माणसेंही थोर होतात. आणि पारतंत्र्यानें पुरे घेरलेले देश देखील स्वातंत्र्य देवतेचीं आहेर घरें बनतात या गोष्टी जर वाचकहो ! हें चरित्र वाचून तुमच्या हृत्पटलावर खोदल्या गेल्या नाहींत, तर कसलें आमचें लिहिणें आणि कशाचें तुमचें वाचन?

फ्रँक्लिन जो इतक्या मोठ्या योग्यतेला चढला त्याचें बीज कशांत आहे? तो काय देवाचा अवतार होता? म्हणून इतकापुढें सरसावला? छे! छे! असें मुळींच नाहीं. तो देव नव्हता कीं, त्याजपाशीं अमानुष अशी एकादी गुप्त विद्याही नव्हती तो तुमच्या आमच्या सारखाच एक मनुष्य होता. त्याला जी इतकी योग्यता मिळाली आणि

त्यानें जीं अनेक महत्कार्यें शेवटाला नेलीं तीं केवळ आपल्या आंगच्या विलक्षण दृढनिश्चयानें, आपल्या जबऱ्या व्यासंगानें आणि आपल्या असाधारण प्रयत्नानेंच होत. आरंभापासून शेवटपर्यंत तुह्मीं त्याचें चरित्र वाचा, आणि उद्दिष्ट कार्यांत त्याला कसकशा अडचणी आल्या तें पहा. परंतु संकटांना भिऊन त्यानें कधीं हातचें कार्य सोडलें आहे काय? निश्चयापासून न ढळतां मोठ्या नेटानें तो आपलें कार्य करतांनाच तुह्मांला आढळेल; आणि असें होतें ह्मणूनच यश त्याच्या पुढें अगदीं हात जोडून उभें असे.

खोट्या हलकेपणास आणि लोक निंदेस न भितां प्रसंग पडेल त्याप्रमाणें वागणें आणि आलेल्या प्रसंगाचा आपल्या हिताकडे योग्य उपयोग करून घेणें हे श्रेष्ट गुण फ्रँक्लिनच्या चरित्रांत वेळोवेळीं दृष्टीस पडतात. त्यानें आपल्या मोठेपणाला कधीं फाजील महत्त्व दिलें नाहीं. तो मनाचा फार सरळ होता. मित्रांवर तर त्याचें विलक्षण प्रेम असे; अगदीं निकृष्टावस्थेंतही अर्धी भाकर खाऊन अर्धी त्यानें आपल्या मित्रांस दिली आहे.

आमच्या परमश्रेष्ठ ऋषिवर्यांनीं आपल्या ग्रंथांतून पुष्कळ प्रसंगीं वर्णिलेल्या नीतितत्वांनाच फ्रँक्लिन मोठें महत्व देत असे आणि त्यांना अनुसरणें ह्मणजेच धर्माप्रमाणें वागणें, असें तो समजत असे. ही गोष्ट लक्षांत आणून

आह्मीं जर ब्रह्माचरणापेक्षां याच धर्मतत्वांच्या अनुसरणांस जास्त महत्व देऊं, तर आज आमच्यांत चालू असलेले सुधारक दुर्धारकांतील तंटे, इच्छा असल्यास बरेच कमीं होतील अशी आमची समजूत आहे.

आमच्यांतील नोकरी, नोकरी, करून परसेवेकरितां हपापलेल्या मंडळींनीं—विशेषत: आपल्या पैसेवाल्या मंडळीनें तरी—**फ्रँक्लिननें** आपल्या जांवयास, नोकरी न करितां व्यापार करण्याविषयीं केलेला उपदेश चांगला ल-क्षांत ठेवण्या सारखा आहे.

अगदीं बारीक सारीक गोष्टी देखील **फ्रँक्लिन** मोठें मन लावून पाही आणि त्यांपासून आपणाला आपल्या देशाचा कोणता फायदा करून देतां येईल, याबद्दलचे विचार त्याच्या मनांत रात्रंदिवस घोळत राहत. लोकक-ल्याणेच्छा तर त्याच्या अगदीं पाच्यावरच पुजली होती ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. देशकार्य म्हटलें कीं तो स्वत्व अगदीं पूर्णपणें विसरे. समाजहिताच्या कामांत त्यानें आपला मानापमान कधींच आपल्या आड येऊं दिला नाहीं.

लहानपणापासून **फ्रँक्लिनच्या** आंगीं दृष्टीस पडणारी त्याची उद्योगशीलता, त्याची कर्तव्याची चाड, त्याची आमरण कायम राहिलेली ज्ञानतृष्णा, त्याचा सदा आनंदी

स्वभाव, व्यावहारिक उदाहरणांनीं आणि प्रत्यक्ष फायदे दाखवून एकादा विषय लोकांच्या मनांत भरवून देण्याची त्याची खुबी, त्याची समयसूचकता, शत्रूसही वळवून घेण्याची त्याची शैली, त्याची निरपेक्ष विद्याभिरुची, त्याचें वर्तनस्वातंत्र्य त्याचा स्वाभिमान आणि देशहिताच्या स्थंडिलावर त्यानें वेळोवेळीं केलेला तनमनधनादि आत्मद्रव्यांचा महायज्ञ, इत्यादि आमच्या चरित्र नायकाच्या ठिकाणीं पावलो पावलीं दृष्टीस पडणारे स्पृहणीय गुण लक्षांत आणून मथाळ्या वरील पद्यांत लिहिल्याप्रमाणें जो वाचक ते आपल्या आंगीं आणण्याचा थोडा तरी प्रयत्न करील त्याच्या हातून देशाचें अल्प तरी हित होईल असें आह्मांस वाटतें.